# लोकलेखा समिती

## (२०१७-२०१८)

### (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या स्थानिक संस्था अहवालामधील नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.१, ५.१ व ५.२) यावरील**

## एकोणपन्नासावा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक        मार्च, २०१९ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
फेब्रुवारी/मार्च, २०१९

# लोकलेखा समिती

## (२०१७-२०१८)

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या स्थानिक संस्था अहवालामधील नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.१, ५.१ व ५.२) यावरील**

## एकोणपन्नासावा अहवाल

# लोकलेखा समिती

## २०१७-२०१८

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

*(१०) श्री. प्रशांत ठाकूर वि.स.स.

(१० अ) श्री. पराग अळवणी, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

**(२१) श्री. विजय **ऊर्फ** भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

***(२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

****(२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक **ऊर्फ** भाई जगताप, वि.प.स.

*****(२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का).

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी.

* **श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर ॲड. पराग अळवणी, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

** **श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची पुन्हा दिनांक ५ सप्टेंबर २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

*** **श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

**** **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे जागा रिक्त झाली.**

***** **श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी निमंत्रित समिती सदस्य म्हणून दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी नामनियुक्ती केली होती. दिनांक २७ जुलै २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांची निमंत्रित समिती सदस्यत्वाची नियुक्ती संपुष्टात आली होती. ते विधानपरिषद सदस्य म्हणून पुन्हा निवडून आल्यामुळे मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची दिनांक ५ सप्टेंबर २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून रिक्त जागेवर नामनियुक्ती केली.**

## प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या स्थानिक संस्था अहवालावर विचार करून लोकलेखा समितीचा एकोणपन्नासावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक १४ जून, २९ ऑगस्ट, २५ सप्टेंबर, १७ ऑक्टोबर, २०१८ रोजी प्रधान सचिव, नगरविकास विभाग व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरून बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट " अ " मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक २ जानेवारी व १३ फेब्रुवारी २०१९ रोजीच्या बैठकीत नगरविकास विभागासंदर्भात तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारूप अहवालाला मान्यता दिली.

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक १३ फेब्रुवारी, २०१९.

**गोपालदास अग्रवाल,**
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

**अनुक्रमणिका**


| अनुक्रमांक<br>(१) | विभाग व तपशील<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>(३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** | (पाच) |
| | **नगरविकास विभाग** | १ |
| (१) | परिच्छेद क्र. ४.१ | १ |
| (२) | परिच्छेद क्र. ५.१ | ११० |
| (३) | परिच्छेद क्र. ५.२ | ११७ |

## नगरविकास विभाग

### भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सन २०१४-१५ साठीच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेदांवरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापने

| परिच्छेद क्र. | आक्षेप | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|
| ४.१.६ | वित्तीय व्यवस्थापन | |
| ४.१.६.१ | अग्निशमन विभागांकडून भांडवली अर्थसंकल्पीय तरतुदींचा वापर न होणे | **बृहन्मुंबई महानगरपालिका :-** |
| | MCs त्यांच्या स्वतःच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून अग्निशमन विभागांना निधी वाटप करतात. वर्ष २०१०-१५ दरम्यान निवडक आठ MCs मधील अग्निशमन विभागांना रू.१,०९१.२० कोटी (फक्त महसुली व आस्थापना खर्च) अर्थसंकल्पीय तरतुदींचे वाटप करण्यात आले होते. ज्यापैकी रू.८५४.८५ कोटी (७८ टक्के) खर्च करण्यात आले व अखर्चित शिल्लक रू.२३६.३५ कोटी होती.<br><br>संयंत्र व यंत्र सामग्री, साधनसामग्री, वाहने, विशिष्ट अग्निशमन उपकरणे इत्यादींच्या खरेदीसाठी प्रत्येक वर्षी MCs स्वतंत्र भांडवली अर्थसंकल्प देखील तयार करतात आणि मंजुरीसाठी स्थायी समित्यांना सादर करतात. लेखापरीक्षेत असे आढळून आले की, वर्ष २०१०-१५ दरम्यान केलेल्या एकूण रू. ७०२.९५ कोटी अर्थ संकल्पीय तरतुदींपैकी निवड केलेल्या आठ MCs नी फक्त रू. १५४.७१ कोटी (२२ टक्के) खर्च केले होते. रू. ५४८.२४ कोटी अखर्चित शिल्लकमधील बृहन्मुंबई महानगरपालिकेचा (MCGM) हिस्सा सर्वाधिक रू. ४२९.५९ कोटी (७८टक्के) होता त्यानंतर MC, नाशिक (आठ टक्के); MC, नागपूर (सात टक्के); आणि MC, पुणे (तीन टक्के) यांचा हिस्सा होता.<br><br>MCGM ने सांगितले (एप्रिल २०१६) की टाटा व अशोक लेलँड यासारख्या विविध चासिस उत्पादकांकडे वारंवार पाठपुरावा करूनही वर्ष २०१०-१५ दरम्यान अग्निशमन आणि बचावासाठीच्या वाहनांसाठी योग्य असे भारत स्टेज IV एमिशन नॉर्म कम्प्लाएंट चासिस उपलब्ध नव्हते. परिणामी, विशिष्ट सुविधा प्राप्त वाहने आणि साधनसामग्री यांची परदेशातून खरेदी / आयात करण्यासाठी अग्निशमन विभागाने आयात आदेश दिले. परंतु, आयात वाहने / साधनसामुग्री यांचा पुरवठा कालावधी बराच मोठा असल्याने वर्ष २०१०-१५ दरम्यान अर्थसंकल्पीय तरतुदींचा लक्षणीय हिस्सा अखर्चित राहीला.<br>MC, नाशिक यांनी सांगितले (डिसेंबर २०१५) की एरीअल लँडर प्लॅटफॉर्म (ALP) आणि टर्न टेबल लँडर (TTL) च्या खरेदीसाठीच्या रू. १५ कोटी अर्थसंकल्पीय तरतुदींचा वर्ष २०१३-१४ दरम्यान विनियोग करता येऊ शकला नव्हता आणि म्हणून ती तरतूद वर्ष २०१४-१५ मध्ये पुढे नेण्यात आली. परंतु जुलै २०१५ पासून भरणाऱ्या कुंभमेळयाच्या | • बृहन्मुंबई महानगरपालिकेने वर्ष २०१०-१५ दरम्यान रू. १०७२.७७कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतुद महसुली व आस्थापना खर्च यासाठी केली होती. ज्यापैकी रू. ४२४ कोटी हे प्रत्यक्ष महसुली व आस्थापना यासाठी खर्च करण्यात आले.<br>• संयंत्र व यंत्र सामग्री, साधनसामग्री, वाहने, विशिष्ट अग्निशमन उपकरणे इत्यादींच्या खरेदीसाठी रू.४०८.३९ कोटींची तरतुद २०१०-१५ दरम्यान करण्यात आलेली होती त्यापैकी रू.७८.८० कोटी त्यादरम्यान खर्च करण्यात आलेली आहे.<br>• विशेषत: जुन्या वाहनांच्या बदली नविन वेगवेगळ्या प्रकारची अग्निशमन व विमोचन वाहने खरेदी करण्याकरिता किंवा त्यांची अतिरिक्त आवश्यकता पुर्ण करण्यासाठी या दरम्यान अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आलेली होती.<br>• भारत सरकारने दि. ०१.०४.२०१० निर्धारित केल्यानुसार योग्य असे भारत स्टेज IV प्रदुषण प्रमाणक पूर्ण करणारे सांगाडे अग्निशमन आणि विमोचनांच्या वाहनांसाठी उपलब्ध नसल्याने खरेदी प्रक्रीयेस विलंब झाला.<br>• बृहन्मुंबई महानगरपालिकेने विविध सांगाडे उत्पादकांकडे भारत स्टेज IV प्रदुषण प्रमाणक पूर्ण करणारे सांगाडे पुरवठा करण्यासाठी संपर्क साधुन देखिल ते उत्पादक निर्धारित कालावधीत आवश्यक सांगाडे पुरवठा करू शकले नाही.<br>• विविध उत्पादकांकडे अग्निशमन आणि विमोचनांच्या वाहनांसाठी भारत स्टेज IV प्रदुषण प्रमाणक पूर्ण करणारे सांगाडे उपलब्ध होईपर्यंत सवलत मिळण्यासाठी MCGM यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.<br>• परंतु मा.उच्च न्यायालयाने याबबतीत अशी सवलत MCGM (अग्निशमन दल) यांना देण्यास नकार दिला.<br>• अग्निशमन दलाच्या आवश्यकतेनुसार वैशिष्टयपुर्ण बांधणीकरून पुरवठ्यासाठी लागणाऱ्या प्रदीर्घ कालावधीमुळे, विशिष्ट वाहने उदा. एरीअल लँडर प्लॅटफॉर्म (ALP), टर्न टेबल लँडर (TTL), विमोचन वाहने (Rescue Van) यांच्यासाठीची तरतुद अनुषंगिक आर्थिक वर्षात खर्च करण्यास विलंब झालेला आहे. |

हौटT/एच ३८२ [३००-८-१८]-१

| | | |
|---|---|---|
| | आयोजनासाठीच्या कामांच्या दबावामुळे ALP आणि TTL साठीच्या निविदांवर पुढील प्रक्रिया करता येऊ शकली नाही.<br>CFO, **नागपूर** यांनी सांगितले (फेब्रुवारी २०१६) की वर्ष २०१०-१५ दरम्यान प्रत्येक वर्षी ऑस्ट्रीया कडून TTL खरेदीसाठी रू. ७.०८ कोटींची तरतुद कण्यात आली होती. परंतु स्थायी समितीकडून त्याला मंजुरी मिळाली नव्हती.<br>CFO, **पुणे** यांनी सांगितले (जून २०१५) की निवडणूक आचारसंहीता लागू झाल्याने आणि इतर अनेक कारणांमुळे अग्निशमन साधनसामग्रीच्या खरेदीसाठी करण्यात आलेल्या रू.८.४० कोटी अर्थसंकल्पीय तरतुदींचा वापर करता येऊ शकला नव्हता. | **<u>नाशिक महानगरपालिका:-</u>**<br>• नाशिक महानगरपालिकेतर्फे सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मध्ये केलेली अर्थसंकल्पीय तरतुद ही एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (ALP) व टर्न टेबल लॅडर (TTL) साठी रु. १५.०० कोटी इतकी केली होती. तथापि सदरची उपकरणे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतुन खरेदी करावयाची असलेने निविदा प्रक्रिया राबविणेस विलंब झालेला आहे.<br>• तदनंतर माहे नोव्हेंबर २०१४ पासुन ऑक्टोंबर २०१५ पावेतो सिंहस्थ कुंभमेळा आयोजनाच्या दबावाखाली सदर कामास विलंब झालेला आहे. सदर कामासाठी प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर ०५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने व दोन्ही वाहनांच्या किंमतीमध्ये मोठी वाढ झालेने पुन:श्च तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेवून सदर कामासाठी नव्याने निविदा प्रक्रिया **राबवुन काम एक** वर्षाच्या आत पुर्ण करणेत येईल.<br><br>**<u>नागपूर महानगरपालिका :-</u>**<br>• सन २०१०-१५ या आर्थिक वर्षात अग्निशमन विभाग, महानगरपालिका, नागपूर साठी रु.७.०८ कोटीची तरतूद करण्यात आलेली **होती.**<br>• सदरची तरतूद ही ४२ मी. उंच टर्न टेबल **लॅडर (१ नग) खरेदी**करीता होती.<br>• परंतु या आर्थिक वर्षात प्रशासकीय मान्यता न मिळाल्यामुळे सदर वाहनाची खरेदी करण्यात आली नाही.<br><br>**<u>पुणे महानगरपालिका :-</u>**<br>• पुणे महानगरपालिकेच्या सन 2010-15 या दरम्यानचे अर्थसंकल्पीय तरतुदीतून अग्निशमन दलाचे तरतुदीमधून रक्कम रुपये 8.40 कोटी इतका निधी अखर्चित आहे.<br>• सन 2010-2015 या दरम्यान लागू झालेल्या विविध निवडणूक आचार संहिता नियमावलीतील तरतुदींमुळे ह्या निधीचा वापर करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविणे शक्य झाले नाही. ही तरतूद भांडवली निधीतील आहे.<br>• सन 2010-2015 या कालावधीत देण्यात आलेल्या एकूण आर्थिक तरतुदींचा विचार करता केवळ 3 टक्के निधी अखर्चित असून, उर्वरित निधीमधून अग्निशमन वाहने, सुरक्षा उपकरणे, जवानांचे सुरक्षेकरिता साधने जसे, फायर सूट, लाईफ बॉय, लाईफ जकेट, हंड्ग्लोव्ज, कुलिंग वेस्ट जाकेट, इत्यादी खरेदी करण्यात आलेली आहे.<br>• पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात नवीन अग्निशमन केंद्रे विकसित करण्यासाठी देखील निधी खर्च करण्यात आलेला आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | **अमरावती महानगरपालिका :-**<br>• अमरावती महापालिकेतर्फे सन २०१०-१५ दरम्यान,अग्निशमन विभागाकरिता एकुण रू.१,९७,६०,०००/-इतकी तरतुद करण्यात आलेली होती व यापैकी रू.९३,४४,२९५/- इतकी रक्कम खर्च झालेली आहे.<br>**ठाणे महानगरपालिका :-**<br>• ठाणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये प्रत्येक वर्षी तरतूद केल्याप्रमाणे मागील पाच वर्षात अग्निशमन विभागाकडून वाहने, अग्निशमन उपकरणे, साधनसामुग्री खरेदी करण्यात आलेली असून अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार वेळोवेळी रक्कम खर्ची करण्यात आली आहे.<br>**औरंगाबाद महानगरपालिका :-**<br>• औरंगाबाद महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये प्रत्येक वर्षी तरतूद केल्याप्रमाणे मागील पाच वर्षात अग्निशमन विभागाकडून वाहने, अग्निशमन उपकरणे, साधनसामुग्री खरेदी करण्यात आलेली असून अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार वेळोवेळी रक्कम खर्ची करण्यात आली आहे. |
| ४.१.६.२ | **अग्निसुरक्षा निधी न स्थापने** | |
| | महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम २५ (१) नुसार एक अग्नि सुरक्षा निधी (FPF) स्थापन करावा ज्यामध्ये MCs च्या अग्निशमन विभागाने सर्व इमारतींच्या मालकांकडून आणि रहिवासी / भोगवटादारांकडून आकारलेले व प्राप्त केलेले शुल्क जमा करावे. या निधीतील रक्कम सामान्यतः अग्निशमन केंद्रांची देखभाल (ज्यामध्ये अग्निशमन अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन, भत्ते आणि इतर अनुषंगीक खर्च यांचा देखील समावेश असेल) आणि विशेषतः महानगरपालिका क्षेत्राच्या मर्यादेत असलेल्या किंवा क्षेत्राबाहेरील कोणत्याही जमीन आणि कोणत्याही इमारतींत अग्निप्रतिबंधक आणि अग्निशमन कार्यासाठी आधुनिक साधनसामग्री व उपकरणे उपलब्ध करण्यासाठी करावयाचा होता.<br>लेखापरिक्षेत असे आढळून आले की निवड केलेल्या आठ MCs पैकी फक्त तीन MCs नी FPF स्थापन केला होता व वर्ष २०१०-१५ दरम्यान रू. ३२.०७ कोटी निधी जमा केला होता. तसेच, नागपूर MC ने तिच्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनादी लाभांचे प्रदान करण्यासाठी FPF मधील रू.१० कोटी रक्कमेचा नियमबाहय रीतीने वापर केला होता. डिसेंबर २०१५ अखेरीस या तीन MCs च्या FPF खात्यात रू. ४१.७४ कोटी उपलब्ध होते. उर्वरीत चार MCs नी FPF स्थापित केला नव्हता परंतु, वर्ष २०१०-१५ दरम्यान रू.४४९.९७ कोटी FPF शुल्क जमा केले होते आणि ते त्यांच्या सर्वसाधारण निधीत ठेवले होते, ज्यामध्ये MCs च्या | **बृहन्मुंबई महानगरपालिका :-**<br>• बृहन्मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम २५ (१) नुसार अग्निसुरक्षा निधी (FPF) संकलनासाठी अर्थसंकल्पीय शिर्ष तयार केलेले आहे. इमारतींच्या मालक / भोगवटादार / रहिवासी यांच्याकडुन अग्निशमन खात्याने संकलित केलेले व आकारलेले शुल्क या निधीत जमा करण्यात येईल.<br>**अमरावती महानगरपालिका :-**<br>• महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ च्या कलम २५ (१) नुसार क अग्नी सुरक्षा निधी (FPF) स्थापन करण्यात आलेला आहे. सदर निधी मध्ये जमा झालेल्या रक्कमेचा उपयोग अग्निशमन विभागाच्या बळकटीकरणा करीता करण्यात येतो.<br>**नागपूर महानगरपालिका :-**<br>• अग्निशमन विभाग, महानगरपालिका, नागपूर सन २००९ पासून अग्निसुरक्षा निधी स्थापन केलेला असून, त्यामध्ये विभागाला प्राप्त होणारे शुल्क जमा करण्यात येत आहे.<br>• वित्त विभाग, महानगरपालिका, नागपूर यांनी अग्निसुरक्षा निधी मधून कर्मचारी निवृत्ती वेतनाकरीता घेतलेले रु.१० कोटी परत त्या निधीमध्ये जमा केलेले आहेत. |

| | | |
|---|---|---|
| | अंतर्गत जमा ठेवल्या जातात. वर्ष २०१०-१५ दरम्यान अशाप्रकारे जमा केलेल्या रक्कमेचा (रू.४४९.९७ कोटी) वापर चार MCs नी अग्निशमन सेवांच्या पायाभूत सुविधा सुधारण्यावर केला नव्हता. | **<u>ठाणे महानगरपालिका :-</u>**<br>• ठाणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून महापालिका हद्दीमध्ये असलेल्या निर्माण होत असलेल्या इमारतींवर महाराष्ट्र आग सुरक्षा व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये आग सुरक्षा निधी लागू करण्यात आली असून दिनांक ०३.०९.२०१५ पासून सुरुवात करण्यात आलेली आहे.<br><br>**<u>औरंगाबाद महानगरपालिका :-</u>**<br>• महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ चे कलम २५ अन्वये अग्निशमन विभागासाठी "अग्नि सुरक्षा निधी" चे स्वंतत्र खाते स्थापन करण्याचे महाराष्ट्र शासनाने आदेशित केले होते.<br>• यानुसार लेखा विभागामार्फत "अग्निसुरक्षा **निधी" या नावाने** खाते उघडण्यात आलेल्या असून बचत खाते (खाते क्र. ०६३**३१०४००००६०५८९**) आय.डी.बी.आय.शाखा महानगरपालिका औरंगाबाद येथे आहे.<br><br>**<u>पुणे महानगरपालिका :-</u>**<br>• पुणे महानगरपालिकेने सन 2010-2015 **या वर्षादरम्यान** शासनाचे निर्णयानुसार आग सुरक्षा निधीसाठी स्वतंत्र जमा शिर्षक निर्मा**ण केले.**<br>• त्याकरिता पुणे मनपा च्या वित्त विभागाने **बँक ऑफ महाराष्ट्र,** पुणे या बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडले आहे.<br>• पुणे मनपा च्या अग्निशमन दलाच्या पाया**भूत सुविधा निर्माण** करण्यासाठी व तदनुषंगिक कामे पार पडण्यासाठी भांडवली व खास निधी **खर्चाचे शीर्ष** निर्माण करण्यात आले असून त्यामध्ये दरवर्षी जमा निधीच्या प्रमाणात योग्य ती तरतूद उपलब्ध करून दिली जाते.<br>• पुणे मनपाच्या विहित नियमावलीनुसार त्या निधीतून अग्निशमन दलासाठी पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी खर्च केला जातो.<br><br>**<u>नवी मुंबई महानगरपालिका :-</u>**<br>• नवी मुंबई महानगरपालिकेने अग्निसुरक्षा निधी स्थापन केलेला असुन सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अग्निसुरक्षा निधी या लेखाशिर्षकाअंतर्गत २३९ लाख एवढी रक्कम जमा झालेली आहे.<br>• सदर निधीचा वापर अग्निशमन सेवांच्या पायाभुत सुविधाकरीता करण्यात येतो. |

| | | |
|---|---|---|
| ४.१.६.३ | स्वीय प्रपंजी खात्यामधून नियमबाहय खर्च | |
| | UDD ने जारी केलेल्या (ऑगस्ट २०११) शासन निर्णयनुसार (GR), DFS ने जमा केलेली शुल्काची संपूर्ण रक्कम स्वीय प्रपंजी खात्यात (PLA) जमा करावयाची होती ज्या खात्यातील व्यवहार DFS यांनी स्वतः करावयाचे होते. अशा प्रकारे जमा केलेल्या शुल्काचा वापर फक्त अग्निशमन सेवांच्या बळकटीकरणासाठी करावयाचा होता.<br>लेखापरीक्षेत असे आढळून आले की, GR मधील तरतुदींच्या विरूध्द DFS ने विद्युत देयकांचे प्रदान करण्यासाठी आणि इतर किरकोळ खर्च भागवण्यासाठी PLA मधून नियमबाहयतेने रू.८३.४९ लाख खर्च केला होता (२०१२-१५). जुलै २०१५ रोजी DFS च्या PLA मध्ये रू.३०.५७ कोटी शिल्लक होते.<br>अंतिम बैठकीत, DFS यांनी सांगितले (डिसेंबर २०१५) की PLA मधील शिल्लक रक्कमेचा वापर अद्यावत अग्निशमन प्रशिक्षण प्रबोधिनीचे बांधकाम करण्यासाठी केला जाईल. | • महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ च्या कलम २५ अन्वये आग सुरक्षा निधी स्थापन करण्यात आला असून त्यानुसार शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.अग्नस-१४०९/प्र.क्र.०४/नवि-२०, दि.०२.०८.२०११ अन्वये संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचे नावे स्वीय प्रपंजी लेखा (Personal Ledger Account) भारतीय रिझर्व्ह बँकेमध्ये उघडण्यात आलेले आहे. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ तरतूदीनुसार अग्निशमन सेवेपोटी संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांना प्राप्त होणारी फी जमा करण्यात येते.<br><br>• महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ च्या कलम २५ च्या तरतूदीनुसार सदर आग सुरक्षा निधी अग्निशमन सेवेच्या बळकटीकरणासाठी (ज्यात अग्निशमन अधिकारी आणि कर्मचारी यांचे वेतन, भत्ते आणि आनुषंगिक खर्च याचा समावेश आहे) करण्यास मान्यता दिलेली आहे.<br><br>• तसेच शासन निर्णय, दि.०२.०८.२०११ मधील परिच्छेद ०१ मध्ये दिलेल्या महसूली खर्च लेखाशिर्षामध्ये १०८-अग्निसुरक्षा नियंत्रण, ०१-मार्गदर्शन व सल्ला, सुरक्षा व नियंत्रण प्रशिक्षण, इतर खर्च, १३-कार्यालयीन खर्च यावर स्वीय प्रपंजी लेख्यामधून खर्च करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.<br><br>• अग्निशमन सेवेतील कार्यरत मनुष्यबळाचे सक्षमीकरण हे अग्निशमन सेवेच्या सक्षमीकरणाचाच एक भाग असल्यामुळे या अभियान अंतर्गत सांताक्रुझ-पूर्व, मुंबई-४०००९८ येथील राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा विस्तार करुन त्याठिकाणी आठ मजली राज्य अग्निशमन अकादमी प्रस्थापित करण्यात आली. या आठ मजला इमारतीच्या देखभालीसाठी तसेच आवर्ती खर्चासाठी शासनाकडून आवश्यक ते अनुदान प्राप्त न झाल्यामुळे या इमारतीस आलेले विद्युत देयक व इतर किरकोळ खर्च स्वीय प्रपंजी खात्यामधुन भागविण्यात येत आहे.<br><br>• या महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत आंतरराष्ट्रीय दर्जावर उपलब्ध होत असलेल्या विविध अग्निशमन सुविधांचा विचार करून महाराष्ट्रासारख्या औद्योगिक व नागरिकीकरण झालेल्या प्रगत राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाची प्रगत अग्निशमन अकादमी प्रस्थापित करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | • या प्रगत अग्निशमन प्रशिक्षण अकादमीसाठी मौजे विराथन खुर्द, ता.जि.पालघर येथील स.नं.६०/अ ६, मधील ५-० हेक्टर म्हणजे सुमारे १२.५० एकर एवढी जागा या अकादमीसाठी मंजूर करण्यात आलेली असुन लवकरच अकादमीचे बांधकामाबाबतची कार्यवाही सुरु होईल. |
| ४.१.६.४ | **वार्षिक शुल्क न आकारणे** | |
| | महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम १३ (१) नुसार MCs च्या CFOs नी सामान्यतः अग्निशमन केंद्रांच्या देखभालीवरील आणि विशेषतः कोणत्याही जमिनीवर आणि कोणत्याही इमारतीमध्ये आगीच्या प्रतिबंधासाठी आणि अग्निशमनासाठी अद्यावत यंत्रसामग्री आणि उपकरणे उपलब्ध करण्यावरील खर्च भागविण्यासाठी अग्निशमन सेवा शुल्काच्या एक टक्का इतके वार्षिक शुल्क आकारावे.<br>निवडक आठ MCs मधील दस्तऐवजांच्या तपासणीत असे उघडकीस आले की, ज्या MC पुणे ने वर्ष २०१०-१५ दरम्यान रू.२६.३५ लाख वार्षिक शुल्कापोटी जमा केले होते त्या MC व्यतिरिक्त उर्वरीत सातपैकी एकाही MC ने कोणतेही वार्षिक शुल्क आकारले नव्हते, ज्याचा वापर अग्निशमन सेवांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी करता येऊ शकला असता.<br>MCGM ने सांगितले (एप्रिल २०१६) की यथावकाश अधिनियमातील तरतुदीनुसार वार्षिक शुल्क आकारण्यासाठी योग्य उपाययोजना केली जाईल. उर्वरीत सहा MCs नी कोणतेही विशिष्ट उत्तर सादर केले नाही. | **<u>बृहन्मुंबई महानगरपालिका :-</u>**<br>• महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम १३ (१) नुसार वार्षिक शुल्क आकारणीसाठीची मनपाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला असता, सदर प्रस्ताव परत पाठविण्यात आलेला आहे. वार्षिक शुल्क आकारणीसाठी महापालिकेच्या मंजुरीसाठी प्रस्ताव पुन्हा एकदा सादर करण्यात येईल.<br><br>**<u>नाशिक महानगरपालिका:-</u>**<br>• सन २०१० ते २०१६ या दरम्यान आग सुरक्षा निधी पोटी रु. २० कोटी अंदाजे जमा झालेले आहे. अधिनियमानुसार आग सुरक्षा निधीच्या **१ टक्का एवढी** वार्षिक शुल्क आकारणी करावयाची असलेने या कालावधीमध्ये वार्षिक शुल्कापोटी रू. २० लक्ष अदांजे जमा होणे अपेक्षित होते. तथापि कर्मचारी संख्ये अभावी सदर वसुली झालेली नाही.<br><br>**<u>अमरावती महानगरपालिका :-</u>**<br>• महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम १३ (१) नुसार वार्षिक शुल्क आकारणी करणेबाबतची कार्यवाही अमरावती महानगरपालिकेतर्फे सुरु आहे. आर्थिक वर्षे २०१८-१९ पासुन वार्षिक शुल्क आकारण्यात येईल.<br><br>**<u>नागपूर महानगरपालिका :-</u>**<br>• अग्निशमन विभाग, महानगरपालिका, नागपूर यांनी "महाराष्ट्र आग प्रतिबंध आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ कलम १३ (१) नुसार १% राशी इतके वार्षिक शुल्क आकारलेले असून इमारत धारकांकडून सदर राशी वसुल करण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | **<u>औरंगाबाद महानगरपालिका :-</u>**<br>• औरंगाबाद महानगरपालिका तर्फे शहरामध्ये मालमत्ता कर वसुल केला जातो त्यामध्ये अग्निशमन कर हा १.५ टक्के सामील केलेला असून अग्निशमन विभागाचे बळकटीकरण करण्यासाठी अग्निशमन करात २.० टक्के वाढ करण्यासाठी पत्र देण्यात आलेले असून प्रशासकीय मान्यता व मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी कार्यवाही प्रस्तावित आहे.<br><br>**<u>पुणे महानगरपालिका :-</u>**<br>• महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपायोजना अधिनियम 2006 च्या कलम 13(1) नुसार पुणे मनपा चे अग्निशमन दलाने सन 2010-2015 या दरम्यान खात्याकडे ना हरकत प्रमाणपत्रांसाठी सादर झालेल्या प्रस्तावांवर अग्निशमन सेवा शुल्काच्या 1 टक्के इतके वार्षिक शुल्क आकारले आहे.<br><br>**<u>नवी मुंबई महानगरपालिका :-</u>**<br>• नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभागामार्फत अग्निशमन सेवा शुल्काच्या १% वार्षिक शुल्क आकारण्यात येते. |
| ४.१.६.५ | **राज्य शासनाकडून निधी प्राप्त होणाऱ्या योजनेची अंमलबजावणी न करणे.** | |
| | नागरी स्थानिक संस्थांमधील अग्निशमन सेवांमधील तफावती दूर करण्यासाठी UDD, GoM ने महाराष्ट्रातील ड-वर्ग MCs मध्ये ''अग्निसुरक्षा अभियान'' नावाची एक योजना राबविण्याचा निर्णय घेतला (ऑगस्ट २००९). राज्य शासनाकडून प्राप्त निधी (३५ टक्के) आणि MCs चे अंशदान (६५ टक्के) यांच्याद्वारे ड-वर्ग MCs मध्ये आगीच्या बंबांची खरेदी आणि अग्निशमन केंद्रांचे बांधकाम करणे हे योजनेचे उद्दीष्ट होते. या योजनेअंतर्गत MC, औरंगाबादला (एक ड-वर्ग MC) मार्च २०१२ मध्ये UDD कडून (शासनाचा हिस्सा) रू.१.७८५ कोटी प्राप्त झाले. लेखापरिक्षेत असे आढळून आले की, या MC ने निधीचा वापर योजनेच्या अंमलबजावणीसाठी न करता ही रक्कम जून २०१२ ते मार्च २०१५ दरम्यान मुदत ठेवींमध्ये गुंतविली होती. तसेच, MC ने ऑगस्ट २०१४ ते जानेवारी २०१५ दरम्यान मुदत ठेवीतून मुदत संपण्याआधी रू. ७८.५० लाख आहरित केले आणि ती रक्कम आपत्कालीन व्यवस्थापन इमारतीच्या बांधकामावर झालेल्या खर्चापोटी MC चे दायित्व पूर्ण करण्यासाठी वळविली. जून २०१५ रोजी MC कडे रूपये एक कोटी अखर्चित शिल्लक होती. | **<u>औरंगाबाद महानगरपालिका :-</u>**<br>• महाराष्ट्र शासन यांना सादर करण्यात आलेला सविस्तर प्रकल्प अहवाल शासनाने मंजुर केला असून शासन हिस्साची रक्कम (३५ टक्के) रुपये १,७८,५०,०००/- चा धनादेश महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे.<br>• शहर आपत्ती व्यवस्थापन केंद्र या इमारतीचे बांधकाम काम चालु असल्यामूळे रक्कम रुपये १ कोटी २८ लाख ठेकेदारास देयक देण्यासाठी काढण्यात आले.<br>• सध्या अग्निशमन विभागासाठी पाच अग्निशमन वाहने खरेदी करण्याची प्रक्रिया अंतिम टप्पात असून एकुण रुपये ३ कोटी ६६ लाख खर्च येणार आहे.<br>• यामध्ये आपत्कालीन व्यवस्थापन इमारतीस वापरण्यात आलेला निधी रुपये १ कोटी २८ लाख पाच अग्निशमन वाहने खरेदीसाठी वापरण्यात येणार आहे. |
| | **शिफारस-१**<br>**स्थायी समित्यांनी वर्ष २०१०-१५ दरम्यान मंजुर केलेल्या प्रयोजनासाठीच** | **स्थायी समित्यांनी वर्ष २०१०-१५ दरम्यान मंजुर केलेल्या प्रयोजनासाठीच रू.५४८.२४ कोटी इतकी संचयी भांडवली अनुदाने त्वरीत वापरण्याबाबत,तसेच अग्निशमन** |

| | | |
|---|---|---|
| | रू.५४८.२४ कोटी इतकी संचयी थांडवली अनुदाने त्वरीत वापरण्यात येतील याची निवडक आठ महानगरपालिकांच्या मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांनी खात्री करावी. तसेच, अग्निशमन सेवांच्या बळकटीकरणासाठी आणि अग्निशमन क्षमता सुधारण्यासाठी ज्या महानगरपालिकांनी महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील तरतुदीनुसार अद्याप अग्निसुरक्षा निधी स्थापन केलेला नाही आणि वार्षिक शुल्क आकारणी व संकलन सुरू केले नाही त्यांनी ते कोणताही अधिक विलंब न लावता सुरू करावे. | सेवांच्या बळकटीकरणासाठी आणि अग्निशमन क्षमता सुधारण्यासाठी ज्या महानगरपालिकांनी महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील तरतुदीनुसार अग्निसुरक्षा निधी करणे व वार्षिक शुल्क आकारणे याबाबतची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याबाबत सर्व नागरी स्थानिक संस्थांना देण्यात येतील. |
| ४.१.७ | **पायाभूत सुविधांची पर्याप्तता** | |
| ४.१.७.१ | **अग्निशमन केंद्रांची अपर्याप्त संख्या** | |
| | केंद्र शासनाच्या (GOI) गृह व्यवहार मंत्रालयाने (MHA) प्रस्थापित केलेल्या अग्नि सल्लागार स्थायी परिषद (SFAC) या शिखर संस्थेने प्रतिसादासाठीचा कालावधी, धोका आणि लोकसंख्या यांच्या आधारावर अग्निशमन सेवांसाठी प्रमाणके निश्चित केली (ऑगस्ट २०१६). प्रमाणकांनुसार शहरी क्षेत्रात दर १० चौ.कि.मी. साठी एक अग्निशमन केंद्र आणि ग्रामीण क्षेत्रांत दर ५० चौ. कि.मी. साठी एक अग्निशमन केंद्र असणे आवश्यक आहे. अग्निशमन सेवांमध्ये योग्य ते सुधारणात्मक बदल करण्यासाठी देशात आगीचे धोके आणि जोखीम यांचे विश्लेषण करण्यासाठी GOI च्या NDRF आणि नागरी सुरक्षा (अग्निशमन), MHA महासंचालक यांनी RMSI (एक जागतिक IT सेवा कंपनी) नियुक्त केली (जून २०११) होती. डिसेंबर २०११ च्या तिचया अहवालात RMSI ने लोकसंख्या (११.२३ कोटी) आणि क्षेत्रफळ (३.०८ लाख चौ.कि.मी.) या निकषांनुसार महाराष्ट्र राज्यात १,२३१ अग्निशमन केंद्रांची गरज वर्तविली होती तिच्याशी तूलना करता राज्यातील शहरी क्षेत्रात फक्त १५४ अग्निशमन केंद्रे होती (७३ टक्के तूट). निवडक आठ MCs नी वर्ष २०१०-१५ दरम्यान अग्निशमन सेवांमध्ये योग्य ते सुधारणात्मक बदल करण्यासाठी तयार केलेल्या बृहद आराखडयांच्या आणि शमन आराखडयांच्या (mitigation plan) लेखापरिक्षा तपासणीत असे आढळून आले की, MCs मधील लोकसंख्या (२.६७ कोटी) आणि क्षेत्रफळ (१,८३६ चौ.कि.मी.) या निकषांचा विचार करता अग्निशमन केंद्रांच्या संख्येत १०५ इतकी तूट होती (६० टक्के). अग्निशमन केंद्रांच्या अतीव कमतरतेमुळे विद्यमान अग्निशमन केंद्रांवरील भार वाढण्याची आणि आगीची सूचना मिळाल्यावर प्रतिसादासाठी अधिक वेळ लागण्याची आणि मनुष्यहानी व मालमत्तेच्या हानीच्या घटना वाढण्याची शक्यता आहे. तसेच, निवडक आठ MCs मधील दस्तऐवजांच्या लेखापरिक्षा तपासणीत खालील बाबी आढळून आल्या.<br>➢ MCGM जेथे दर १३.५१ चौ.कि.मी. साठी एक अग्निशमन केंद्र उपलब्ध होते. | **<u>बृहन्मुंबई महानगरपालिका :-</u>**<br>• अग्नि सल्लागार स्थायी परिषदेने अग्निशमन सेवा प्रस्थापित करण्यासाठी मार्गदर्शक सूचना तयार केलेल्या आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे मुंबई अग्निशमन दल ही आस्थापना या परिषदेच्या ही खुप पूर्वीपासून अस्तित्वात असून MMC ACT १८८८ तील तरतुदीनुसार लागू करण्यात आली आहे. मनपा कार्यक्षेत्रात अग्निशमन सेवा ही त्या क्षेत्रातील आगीची जोखीम व प्रतिसादासाठीच्या कालावधीनुसार पुरविली जाते.<br>• सद्य:स्थितीत बृहन्मुंबई मनपाच्या नियंत्रणाखाली मुंबई अग्निशमन दलाची ३४ अग्निशमन केंद्र आहेत. तसेच SFAC च्या शिफारशी व RMSI व CRISIL यांच्या अभ्यासानुसार, प्रतिसादाचा कालावधी लोकसंख्येची क्षमता व आगीची जोखीम व धोके या प्रमाणकांनुसार मुंबई महानगरासाठी अतिरिक्त ३५ अग्निशमन केंद्रांची गरज आहे.<br>• त्याअनुषंगाने MCGM ने २६ नवीन अग्निशमन केंद्रासाठी जमिनीची आवश्यकता विकास नियंत्रण आराखडा२०१४-३४ मध्ये दाखविली आहे व मुंबई साठीच्या नवीन विकास आराखडयाच्या मंजुरीनुसार नवीन अग्निशमन केंद्राचे बांधकाम करण्यासाठीची योग्य पावले उचलण्यात येत आहेत.<br>• नवीन अग्निशमन केंद्रे बांधण्यासाठी २६ पैकी ६ ठिकाणी जागा निश्चित करण्यात आलेली असुन कांदरपाडा, दहीसर (पश्चिम) येथील नवीन अग्निशमन केद्राचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे. आंबोली, अंधेरी (प.), प्रियदर्शनी पार्क, नेपियन सी रोड, मलबार हिल येथील प्रकरणे न्यायप्रविष्ट आहे.<br>• ठाकुर व्हिलेज, कांदीवली (पू.) येथील जमिनीचा ताबा वनविभागाच्या ना-हरकती नंतर MCGM ला मिळालेला असून अग्निशमन केंद्राचे बांधकाम लवकरच सुरू |

त्या व्यतिरिक्त उर्वरीत सात MCs मध्ये शहरी क्षेत्रासाठी दर १० चौ.कि.मी. साठी एक अग्निशमन केंद्र असे प्रमाणक असतांना त्याऐवजी दर ३६.५७ चौ.कि.मी. साठी एक केंद्र उपलब्ध होते. ग्रामीण क्षेत्रात दर ५० चौ.कि.मी. साठी एक अग्निशमन केंद्र असे प्रमाणक असतानाही सात MCs मधील ग्रामीण क्षेत्रात एकही अग्निशमन केंद्र उपलब्ध नव्हते.

➢ सप्टेंबर २०१४ च्या बृहद आराखडयात विद्यमान ३३ अग्निशमन केंद्रांव्यतिरिक्त २६ नवीन अग्निशमन केंद्रे बांधण्याचे MCGM ने प्रस्तावित केले. परंतु, जमिनीची अनुपलब्धता (१८ प्रकरणे), जमीन निश्चित केलेली असणे परंतु ती इतर प्रयोजनांसाठी राखीव असल्याचे आढळणे (सात प्रकरणे) आणि न्याय प्रविष्ट (एक प्रकरण) या कारणांमुळे मार्च २०१६ पर्यंत कोणतेही बांधकाम सुरू करता येऊ शकले नव्हते. या आधी घडलेल्या आगीच्या भीषण घटनांच्या आपत्कालीन परिस्थितीत MCGM ने बचाव कार्यासाठी घेतलेल्या अत्युच्च/प्रदीर्घ कालावधीस विचारात घेता नवीन अग्निशमन केंद्रांच्या बांधकामात विलंब झाल्यास आगीची सूचना मिळाल्यावर त्वरीत व प्रभावी रीतीने बचावकार्य सुरू करण्याच्या MCGM च्या क्षमतेवर आणखी प्रतिकुल परिणाम होईल.

होईल.घाटकोपर (पूर्व) येथील अग्निशमन केंद्रासाठी आरक्षित भुखंड हा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या ताब्यात असून त्यांना प्रकरण प्राधान्याने हाताळण्यासाठी कळविण्यात आलेले आहे. कांजुरमार्ग रेल्वेस्टेशन जवळील भुखंड हा MCGM च्या ताब्यात असून अग्निशमन केंद्र बांधण्यासाठी प्राधान्याने पावले उचललेली आहेत. अग्निशमन केंद्रासाठीची संकल्पचित्रे व रेखाटने तयार केली जात आहे.

- यान्व्यतिरिक्त लघु अग्निशमन केंद्राची (Mini Fire Station) संकल्पना MCGM कार्यक्षेत्रात सुरू करण्यात आलेली असून MCGM च्या अस्तित्वात असलेल्या भूखंड / आस्थापनांच्या २० ठिकाणे यासाठी निश्चित करण्यात आलेली आहेत. यासाठी आवश्यक मनुष्यबळ व वाहने (QRV व मिनी फायर टेंडर) पूरविण्यात येतील. या लघु अग्निशमन केंद्राच्या उभारणीसाठी व वाहन खरेदीसाठी २०१६-१७ साठी आवश्यक अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे मनपाने नवीन अग्निशमन केंद्र व लघु अग्निशमन केंद्रासाठी अतिरिक्त ६५४ अग्निशामकांच्या पदांना मंजुरी दिलेली आहे व रिक्त पदे मिळुन एकुण ७७४ अग्निशामकांची भरती प्रक्रिया पूर्ण झालेली असून निवड झालेल्या उमेदवारांचे प्रशिक्षण लवकरच सुरू होईल.

**नाशिक महानगरपालिका:-**

- आजमितीस नाशिक महानगरपालिका क्षेत्र २६० चौ.कि.मी. असुन त्यापैकी अंदाजे ८० चौ.कि.मी. क्षेत्र हरीत क्षेत्र व संरक्षण खात्याचे क्षेत्र आहे. उर्वरित १८० चौ.कि.मी. क्षेत्रामध्ये १८ अग्निशमन केंद्रांची आवश्यकता आहे. त्यापैकी ०६ अग्निशमन केंद्र अस्तित्वात असुन उर्वरित १२ अग्निशमन केंद्रांसाठी नाशिक शहराच्या मंजूर झालेल्या नविन शहर विकास आराखडयामध्ये १२ जागा आरक्षित दाखविल्या आहेत. उपलब्ध निधीनुसार प्राधान्य क्रमाने अग्निशमन केंद्रे बांधुन घेणेबाबत कार्यवाही सुरु करणेत येईल.
- नाशिक महानगरपालिका हद्दीमध्ये फक्त ०६ अग्निशमन केंद्रे कार्यरत असले तरी नजिकच्या केंद्रावरुन घटनास्थळी पोहचणेसाठी किमान ५ मिनिटे व अन्य काही अल्प घटनाप्रसंगी कमाल १० मिनिटे एवढा प्रतिसाद कालावधी लागलेला आहे. शहराची वाढती लोकसंख्या व रस्त्यावरील गर्दी विचारात घेता सदर प्रतिसाद कालावधी (Response Time) योग्य आहे.

**अमरावती महानगरपालिका :-**

- अमरावती महापालिकेची लोकसंख्या ८ लाखाच्या जवळपास आहे. तसेच क्षेत्रफळ १२१ चौ.कि.मी. असून सद्यस्थितीत अग्निशमन दलाचे ४ केंद्र कार्यरत आहेत.

| | | |
|---|---|---|
| | | १) मुख्य अग्निशमन केंद्र वालकंट कंपाऊंड अमरावती<br>२) अग्निशमन उपकेंद्र बडनेरा अमरावती<br>३) अग्निशमन उपकेंद्र ट्रान्सपोर्ट नगर अमरावती<br>४) अग्निशमन उपकेंद्र MIDC गोपाल नगर अमरावती<br>• तसेच एक नविन उपकेंद्र राहटगाव, एक नविन उपकेंद्र आकोली, एक केंद्र विद्यापीठ रोड, एक केंद्र यवतमाळ रोड येथे सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. सदर नविन केंद्र सुरु झाल्यावर प्रतिसादासाठी आणि मनुष्य हानी व मालमत्तेच्या हानी नियंत्रण अधिक प्रभावीपणे करणे शक्य होईल.<br>• सदर नविन केंद्राकरिता जागा आरक्षण करण्याबाबतचे प्रस्ताव उपसंचालक नगर रचना विभागाकडे सादर करण्यात आलेले आहे.<br>**<u>नागपूर महानगरपालिका :-</u>**<br>• नागपूर महानगरपालिका हद्दीमध्ये सद्यःस्थितीत ८ अग्निशामक स्थानके कार्यरत आहेत.<br>• नविन आकृतीबंधनुसार १३ स्थानकांना मान्यता प्राप्त झाली आहे.<br>• अग्निशमन केंद्रासाठी आरक्षित असलेल्या जागेवर (१) त्रिमुर्तीनगर व (२) वाठोडा, नागपूर येथे अग्निशमन स्थानकाचे बांधकाम सुरु आहे व (३) पाचपावली येथील स्थानकाची जुनी इमारत जीर्ण झाल्याने या इमारतीचे पुर्नबांधकाम प्रस्थापित करण्यात आले आहे.<br>• उर्वरीत २ स्थानकाच्या जागेचा शोध घेण्यात येत आहे.<br>• तसेच गंजीपेठ, कॉटन मार्केट व लकडगंज या अग्निशमन स्थानकाचे पुर्नरचना करण्याबाबत प्रशासकीय मंजुरी मिळण्यास प्रस्तावित केलेले आहे.<br>• नागपूर अग्निशामक विभागाने नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांना मेट्रो रिजन अंतर्गत येणाऱ्या क्षेत्रात नविन स्थानकाकरीता जागा मिळण्याकरीता पत्रव्यवहार सुरु आहे.<br>• स्थानकाकरीता विभागाला जागा प्राप्त होताच नविन स्थानके निर्माण करण्याची कार्यवाही विभागातर्फे करण्यात येईल.<br>**<u>ठाणे महानगरपालिका :-</u>**<br>• महापालिका क्षेत्रात किमान आवश्यक असणा-या अग्निशमन केंद्रांबाबत स्टँडींग फायर ॲडव्हायझरी कौन्सिलने (S.F.A.C.) ने काही निकष ठरवून दिले आहेत. स्टँडींग फायर ॲडव्हायझरी कौन्सिलने अंतिम केलेले निकष खालीलप्रमाणे आहेत. |

| | | |
|---|---|---|
| | | १) अग्निशमन केंद्राचा प्रतिसाद कालावधी कमाल ०५ मिनिट असणे आवश्यक आहे.<br>२) ०५ कि.मी. त्रिज्येच्या क्षेत्रात किमान १ अग्निशमन केंद्र असणे आवश्यक आहे.<br>• उपरोक्त निकषांप्रमाणे ठाणे महापालिका क्षेत्रात किमान १४ अग्निशमन केंद्रांची आवश्यकता असून सद्या महापालिका क्षेत्रामध्ये केवळ ०५ अग्निशमन केंद्रे अस्तित्वात असल्याने स्टँडींग फायर ॲडव्हायझरी कौन्सिल (S.F.A.C.) चे निकषानुसार ठाणे महापालिका क्षेत्रासाठी अतिरिक्त ०९ अग्निशमन केंद्रांची आवश्यकता आहे.<br>• महापालिकेचे क्षेत्रफळ, भौगोलिक परिस्थिती, लोकसंख्या तसेच अस्तित्वात असलेल्या अग्निशमन केंद्रांची ठिकाणे व अग्निशमन केंद्राचा प्रतिसाद कालावधी कमाल ०५ मिनिटे आवश्यक आहे. हा निकष हया सर्व गोष्टीचा विचार करुन एकंदर ०९ ठिकाणी अतिरिक्त अग्निशमन केंद्रे प्रस्तावित करण्यात आली आहे.<br>**<u>औरंगाबाद महानगरपालिका :-</u>**<br>• अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत (सन २००१ च्या जनगणनेनुसार) औरंगाबाद महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी खालील पाच अग्निशमन केंद्राची उभारणासाठी कार्यवाही चालू आहे.<br>१) शहागंज, सिटीएस नंबर १०२३४ क्षेत्र १३००.६ चौ.मी.<br>२) पैठण रोड (गोलवाडी), ता.जि. औरंगाबाद सर्व्हे नं. ४२ क्षेत्र ९२ आर.<br>सर्व्हे नं. ४३ क्षेत्र २७ आर.<br>३) हर्सूल नाका/पदमपुरा अग्निशमन केंद्र, सिटीएस नं. १९६४५ क्षेत्र ६१६.९ चौ.मी.<br>४) टि.व्ही. सेंटर, सिडको (मजनु हिल्स उद्यान) क्षेत्र ३ एकर.<br>५) रोजाबाग, पाणीपुरवठा विभाग (ताज हॉटेलसमोर, मनपा शाळेजवळ)<br>**<u>पुणे महानगरपालिका :-</u>**<br>• पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात सद्यस्थितीमध्ये एकूण 13 ( तेरा ) अग्निशमन केंद्रे कार्यान्वित आहेत. पुणे मनपाच्या भवन रचना विभागाकडून उपलब्ध निधीच्या अनुषंगाने आणखीन 5 ( पाच ) ठिकाणी नवीन अग्निशमन केंद्रे विकसित करण्याची कार्यवाही चालू आहे.<br>• अस्तित्वातील 13 केंद्रांपैकी कसबा पेठ, कोथरूड, येरवडा या 3 (तीन) ठिकाणची केंद्रे त्या परिसरातील उपलब्ध जमिनीवर विकसित करणेत आली आहेत.<br>• सदर तीन ठिकाणी दाट लोकवस्ती, झोपडपट्टी, अरुंद गल्ल्या, रस्ते अशी परिस्थिती असल्याने विनाविलंब मदतकार्य पोहोचविण्याच्या दृष्टीने विकसित करण्यात आली आहेत. वाहनाच्या हालचालीसाठी व बचावकार्याचे सरावासाठी सदर तीन केंद्रातील |

| | | |
|---|---|---|
| | | कर्मचारी व वाहने मध्यवर्ती केंद्रामध्ये बोलावली जातात.<br>• मध्यवती केंद्र व कात्रज येथील आभासी DRILL TOWER चा उपयोगही बचाव कार्याच्या सरावासाठी केला जातो.<br>**<u>नवी मुंबई महानगरपालिका :-</u>**<br>• नवी मुंबई महागनरपालिके अंतर्गत सद्या ४ अग्निशमन केंद्र कार्यरत आहे. याव्यतिरिक्त कोपरखैरणे येथे एक नवीन अग्निशमन केंद्र बांधण्यात आलेले असुन सदरचे केंद्र लवकरच कार्यान्वीत करण्यात येणार आहे. |
| ४.१.७.२ | **अग्निशमन केंद्रे सुसज्ज नसणे** | |
| | आगीच्या घटनांमध्ये बचावकार्य त्वरीत सुरू करण्यासाठी कार्यक्षम व सुसज्ज अग्निशमन विभागांची सेवा आवश्यक असते. आठ निवडक MCs पैकी सात मध्ये (MCGM व्यतिरिक्त) २४ अग्निशमन केंद्रांच्या संयुक्त प्रत्यक्ष तपासणीत खालील त्रुटी आढळून आल्या.<br>➢ २४ अग्निशमन केंद्रांपैकी दोन मध्ये मुख्य रस्त्याकडून अग्निशमन केंद्रापर्यंत जाणारा पोहोच रस्ता अतिशय गजबजलेला असल्याचे आढळून आले होते. ११ अग्निशमन केंद्रामध्ये अग्निशमन वाहनांच्या हालचालींसाठी पुरेशी जागा उपलब्ध नव्हती. तसेच, अग्निशमन दलाला बचाव कार्याचा सराव करता यावा. यासाठी अग्निशमन केंद्रामध्ये आभासी ड्रील टॉवर्सची अत्यंत आवश्यकता होती. परंतु, १५ अग्निशमन केंद्रांमध्ये आभासी ड्रील टॉवर्स उपलब्ध नव्हते.<br>➢ एप्रिल २०१२ च्या राष्ट्रीय आपत्कालीन व्यवस्थापन मार्गदर्शक सूचनांच्या (प्रकरण ७) परिशिष्ट-१ नुसार अग्निशमन वाहने, उपकरणे आणि साधनसामग्री सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक अग्निशमन केंद्रात एक कायमस्वरूपी इमारत असावी. निवडक आठ MCs पैकी सहा मधील सात अग्निशमन केंद्रात आगीचे बंब कायमस्वरूपी इमारतीऐवजी रस्त्याच्या कडेला असलेल्या पत्र्याच्या आडोश्याखाली ठेवण्यात येत होते. या व्यवस्थेमुळे वाहनांवर लहरी हवामानाचा परिणाम होत होता आणि त्यांचे अपघात व नुकसान होण्याचाही धोका होता.<br>➢ २४ अग्निशमन केंद्रांपैकी ११ मध्ये जलस्त्रोत, फायर हायड्रंट आणि उपसंयंत्रे उपलब्ध नव्हती. परिणामी दूरवरच्या जलस्त्रोतामधून पाणी उपसून ते मोठया पाण्याच्या टॅंकरमधून आगीच्या घटनास्थळी वाहून न्यावे लागत होते. तसेच, सात MCs मधील शहरांमध्ये व नगरांमध्ये सार्वजनिक रस्त्यालगत व इतर ठिकाणी बाहय फायर हायड्रंट उपलब्ध नव्हते किंवा कार्यरत नव्हते. | **<u>बृहन्मुंबई महानगरपालिका :-</u>**<br>• बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत एकूण १०४७० हायड्रंटस (नळखांब) उपलब्ध असून त्यापैकी फक्त ११३१ हायड्रंटस कार्यरत आहेत. एवढया मोठया संख्येने हायड्रंटस कार्यरत नसण्यासाठी मुख्य कारणे म्हणजे कपलिंग व हायड्रंट व्हॉल्हची चोरी व रस्ते दुरूस्तीमध्ये मुख्य व्हॉल्व्ह जमिनीखाली गाडला जाणे हे होय. त्याचप्रमाणे पदपथावरील फायर हायड्रंट हे झोपडपट्टी वासियांनी अतिक्रमित केलेले आहेत.<br>• तसेच सदर फायर हायड्रंटमध्ये फक्त त्या क्षेत्रास पाणीपुरवठा करण्याच्या वेळी पाणी उपलब्ध असते, त्यामुळे प्रत्यक्ष आगीच्या वेळी पाणी उपलब्ध होत नाही. त्यासाठी MCGM च्या अग्निशमन दलाने ९००० लिटर्स ते १८००० लिटर्स एवढया उच्च क्षमतेचे वॉटर टॅंकर्स खरेदी केलेले आहेत. सध्या दलाकडे या क्षमतेचे ३२ वॉटर टॅंकर्स आहेत.<br>• त्याचप्रमाणे मोठया प्रमाणातील आगींच्या वेळी अग्निशमन दल जवळ असलेली तळे, नदी, समुद्र येथून दलाकडे उपलब्ध असलेल्या पोर्टेबल फायर फायटिंग पंपाद्वारे पाणी उपसून अग्निशमनाकरीता वापरले जाते. त्यानुसार गरीब नगर झोपडपट्टी, बांद्रा, मंत्रालय इमारत, लोटस नीलकमल संयुक्त व्यापारी संकुल, अंधेरी या ठिकाणच्या भीषण आगीवर फायर इंजिनच्या टाक्या, वॉटर टॅंकर्स आणि इतर जवळील उपलब्ध जलस्त्रोत यांचा वापर करून प्रभावीपणे विझविण्यात आलेल्या आहेत.<br>• SFAC च्या प्रमाणकांनुसार दर ५०,००० याप्रमाणे ३,००,००० पर्यंत लोकसंख्येसाठी एक आगीचा बंब तदनंतर दर एक लाख लोकसंख्येसाठी किंवा त्याच्या भागासाठी एक अतिरिक्त आगीचा बंब असावा त्यानुसार २०११ च्या जनगणनेनुसार मुंबई महानगराची लोकसंख्या १.२४ कोटी इतकी असून त्यासाठी एकूण १२७आगीच्या बंबाची आवश्यकता आहे. RMSI ने २०११ मध्ये असाच अभ्यास करून आगीच्या बंबाच्या प्रकाराची व्याख्या |

- MCGM मधील पाच अग्निशमन केंद्रांमध्ये लेखापरिक्षकांना कोणत्याही लक्षणीय त्रुटी आढळून आल्या नाहीत. परंतु, डिसेंबर २०१५ रोजी MCGM च्या स्थानिक कार्यकक्षेतील १०,६३७ फायर हायड्रंटपैकी केवळ १२६० (१२ टक्के) कार्यरत होते. परंतु, MCGM च्या अग्निशमन विभागाने उर्वरीत ९३७७ फायर हायड्रंट कार्यरत करण्यासाठी कोणतीही कार्यवाही केली नव्हती. खरेतर गरीब नगर झोपडपट्टी, बांद्रा (४ मार्च २०११) मंत्रालय इमारत (२१ जून २०१२) आणि लोटस नीलकमल संयुक्त व्यापारी संकुल, अंधेरी (१८ जुलै २०१४) या तीन ठिकाणी घडलेल्या आगीच्या भीषण अपघातांमध्ये बचावकार्याच्या वेळी MCGM च्या अग्निशमन विभागाची अग्निशमन क्षमता अत्यंत कमकूवत ठरण्यास कारणीभूत झालेल्या कारणांपैकी आवारातील अकार्यरत फायर हायड्रंट हे एक कारण होते.
- ऑगस्ट २००६ च्या SFAC च्या प्रमाणकानुसार दर ५०००० लोकसंख्येसाठी एक आगीचा बंब आणि दर तीन ते १० लाख लोकसंख्येसाठी एक बचाव कार्याचे वाहन असण्याची तरतूद आहे. लोकसंख्येच्या निकषाच्या आधारावर RMSI नी त्यांच्या डिसेंबर २०११ च्या अहवालात राज्यात १२६८आगीचे बंब (८१ टक्के) आणि ३७ बचाव कार्याची वाहने (६४टक्के) कमी असल्याचे स्पष्टपणे दर्शविले होते. निवडक आठ MCs नी तयार केलेल्या बृहद आराखडयांच्या आणि शमन आराखडयांच्या लेखापरीक्षा तपासणीतदेखील आगीचे बंब व बचाव वाहने यांच्या संख्येत अनुक्रमे ७६ टक्के व ७३ टक्के तूट असल्याचे आढळून आले होते.
- MCs च्या स्थानिक कार्यकक्षेतील औद्योगिक आणि धोकादायक क्षेत्रात उद्भवणाऱ्या वेगवेगळया प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितींचा सामना करण्यासाठी वापरली जाणारी सुकी रासायनिक पावडर वाहनारे बंब (Dry chemical powder tenders) आणि स्वतंत्र श्वसन उपकरण संच वाहने यांच्या बरोबरच अग्निशमन सेवांकडून वापरली जाणारी विशिष्ट उपकरणे ही तांत्रिक दृष्टया प्रगत यंत्रे / यंत्रसामुग्री असतात जी पाणी आणि फेस, टर्न टेबल लॅडर / हायड्रोलीक प्लॅटफॉर्म / स्काय लिफ्ट, श्वसन उपकरण संच यासारख्या वेगवेगळया प्रकारच्या साधनसामग्री आणि अग्निशमन माध्यमांना वहून नेण्यास सक्षम असतात. डिसेंबर २०११ च्या RMSI च्या अहवालात मात्र राज्यात फेसवाहक बंब (९१ टक्के), सुकी रासायनिक पावड फवारणी बंब (१०० टक्के), टर्न टेबल लॅडर/स्काय लिफ्ट (४३ टक्के) आणि श्वसन उपकरण संच वाहने (९२ टक्के) यांच्या संख्येत तूट असल्याचा अंदाज वर्तविला होता. निवडक आठ MCs नी तयार केलेल्या बृहद आराखडयांच्या व शमन आराखडयांच्या

निर्धारित केली त्यानुसार आगीचा बंब म्हणजे पाण्याची टाकी व आगीचा पंप असणारे वाहन या व्याख्येनुसार मुंबई अग्निशमन दलाकडे सध्या ९४ पंपींग युनिट (५६आगीचे बंब व ३२ वॉटर टँकर्स फायर पंपासहीत, ३ फोम टेंडर्स, ३ मिनी फायर टेंडर्स) आहेत. त्याचप्रमाणे MCGM ने १७ क्वीक रिस्पॉन्स मल्टीपर्पज वाहने व ३ मिनी फायर टेंडर्स साठी खरेदी आदेश नोंदविलेला आहे. जे डिसेंबर २०१६ / जाने २०१७ दरम्यान दलाच्या ताफ्यात समाविष्ट होणे अपेक्षित आहे.

- या व्यतिरिक्त ६ नवीन आगीचे बंब, ३ फोम टेंडर्स यांचा खरेदी आदेश देण्यात आलेला असून हे आगीचे बंब व फोम टेंडर्स जानेवारी / फेब्रुवारी २०१७ पर्यंत मिळणे अपेक्षित आहे.
- २६ अग्निशमन केंद्रे बांधण्याचा प्रस्ताव प्रक्रिया सुरू आहे. या नवीन अग्निशमन केंद्रांना देखील आगीचे बंब पुरवले जाणार असून २६ उच्च क्षमतेचे वॉटर टँकर्स पुरवले जाणार आहेत. त्यामुळे एकूण पंपींग युनीटची संख्या १७५ होते. जी SFAC च्या प्रमाणके व RMSI अहवालापेक्षा अधिकतम आहे.
- MCGM च्या अग्निशमन दलाकडे विशिष्ट अग्निशमन आणि बचावाची वाहने व साधनसामुग्रीचा मोठा ताफा आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

  १) हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म-३ नग (९० मी.पर्यंत)
  २) एरीअर लॅडर प्लॅटफॉर्म- १० नग (४२ मी.पर्यंत)
  ३) टर्न टेबल लॅडर- ६ नग (५५ मी.पर्यंत)
  ४) विमोचन वाहने – ५ नग
  ५) ब्रिथींग ऍपरेटर्स व्हॅन-६ नग
- या व्यतिरिक्त एक ८१ मी. उंचीचे हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म खरेदी करण्याकरिता पुरवठा आदेश देण्यात आलेला असून जानेवारी / फेब्रुवारी २०१७ मध्ये वाहन कार्यान्वित होणे अपेक्षित आहे. तसेच ६४/६८ मी. उंचीच्या टर्न टेबल लॅडर ३ नग खरेदी साठीचा प्रस्ताव प्रक्रिया सुरू असून पुढील आर्थिक वर्षात ही वाहने दलात समाविष्ट होणे अपेक्षित आहे.
- १ नग HAZMAT वाहनाच्या खरेदीसाठी निविदा मागविण्यात आल्या असून वाहन लवकरच खरेदी करण्यात येईल. मुंबई महानगरातील सातत्याने वाढत जाणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी MCGM च्या अग्निशमन दलाच्या तंत्रज्ञानातील प्रगतीसाठी २०१६-१७ या अर्थसंकल्पात तरतुद केलेली आहे.
- पायाभूत सुविधा (अग्निशमन केंद्र आणि साधनसामुग्री/ विशिष्ट उपकरण) मधील तफावत दूर करण्यासाठी MCGM सर्वंकष प्रयत्न करीत आहे. त्यामुळे जीवित व वित्त हानी कमी

| | | |
|---|---|---|
| | लेखापरीक्षा तपासणीत देखील फेसवाहक बंब (७९ टक्के), सुकी रासायनिक पावडर फवारणीचे बंब (१०० टक्के), टर्न टेबल लॅडर / स्काय लिफ्ट (६३ टक्के) आणि श्वसन उपकरणसंच वाहने (८० टक्के) यांच्या संख्येत तूट असल्याचे आढळून आले होते. | करण्याकरीता उत्कृष्ठ सेवा प्रदान करता येईल.<br><br>**नाशिक महानगरपालिका:-**<br><br>• नाशिक महानगरातील ०६ पैकी ०२ अग्निशमन केंद्रावरील वाहने पत्र्याच्या शेडमध्ये उभी करणेत येत होती. सदर ०२ अग्निशमन केंद्रांपैकी ०१ पंचवटी येथील अग्निशमन केंद्राचे सुधारित बांधकाम सुरु करणेत आलेले आहे. त्यामुळे तेथील पत्राचे शेड काढून सदर ठिकाणी आर.सी.सी. बांधकामामध्ये अग्निशमन केंद्र बांधणेत येत आहे.<br><br>• दुसरे अग्निशमन केंद्र सिडको (नविन नाशिक) येथे असुन सदर अग्निशमन केंद्राचे शेड सन १९९३ साली सिडको प्रशासनाने बांधुन महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेले आहे. सदर अग्निशमन केंद्राच्या बांधकामाबाबत निधी उपलब्धतेनुसार कार्यवाही सुरु करणेत येईल.<br><br>• अस्तित्वातील ०४ अग्निशमन केंद्रे हे भुतपुर्व नगरपालिकेच्या कार्यकाळातील बांधकामे आहेत. केंद्रावर जागा उपलब्ध नसलेने मनपाच्या मुख्य अग्निशमन केंद्र, शिंगाडा तलाव येथील अग्निशमन केंद्रावर तसेच आडगांव नजिकच्या पंचवटी विभागीय अग्निशमन केंद्रावरील मोकळया मैदानावर आठवडयातुन ०२ दिवस नियमित परेड सराव व ड्रील करुन घेतल्या जातात.<br><br>• नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रत्येक **विभागात जलकुंभ** उपलब्ध असुन त्याची क्षमता किमान ते ४ ते ५ लाख लिटर इतकी आहे. सदर प्रत्येक जलकुंभाखाली अग्निशमन बंब भरण्यासाठी फायर हायड्रंटची व्यवस्था केली आहे. त्यामुळे विभागातील आगी प्रसंगी अग्निशमन बंब भरणेकामी तीन ते चार किलोमीटरच्या जलस्त्रोत व फायर हायड्रंट उपलब्ध होतात.<br><br>• नाशिक महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता सार्वजनिक रस्त्यांलगत संपुर्ण शहरभर फायर हायड्रंट यंत्रणा उभारणे आर्थिक दृष्टया शक्य नसल्याने शहरात सर्व सार्वजनिक रस्त्यांलगत फायर हायड्रंट उपलब्ध नाहीत.<br><br>• तथापि शासनाकडुन निधी व अनुदान मिळाल्यास अंदाज पत्रकात तरतुद करुन उपलब्ध निधीच्या अनुषंगाने सदर यंत्रणा बसवु घेता येते.<br><br>• नाशिक महानगरपालिकेकडे असलेल्या फोम टेंडर या वाहनावर सुकी रासायनिक पावडर फवारणीसाठी ५० कि.ग्रॅ. क्षमतेचे ०४ मोठे नळकांडे बसविणेत आलेले आहेत. शासनाच्या अग्निशमन वाहने कमतरता अहवालानुसार (GAP Analyasis) व सन २०११ च्या जनगणेनुसार क्षेत्रफळाचा विचार करुन सन २०१५-१६ मध्ये आवश्यक सर्व वाहने |

| | | |
|---|---|---|
| | | उपलब्ध करुन घेतलेली आहे. याशिवाय अतिरिक्त एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (ALP) व टर्न टेबल लॅडर (TTL) हया दोन वाहनांची शहरात होऊ घातलेल्या ४५ मीटर किंवा त्या पेक्षा उंच इमारती लक्षात घेऊन खरेदीसाठी प्रस्ताव सुरु केला होता. तथापि अद्याप पावेतो नाशिक शहरामध्ये ४५ मीटर पेक्षा जास्त उंचीची एकही इमारत बांधून झालेली नाही.<br>• सदर कामासाठी प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर ०५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने व दोन्ही वाहनांच्या किंमतीमध्ये मोठी वाढ झालेने पुन:श्च तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेवून सदर कामासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबवुन काम एक वर्षाच्या आंत पुर्ण करणेत येईल.<br>**<u>अमरावती महानगरपालिका :-</u>**<br>• अमरावती महानगरपालिका, अग्निशमन सेवेची चारही अग्निशमन केंद्रे मोकळ्या जागेवर आणि अमरावती महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर उभारण्यात आलेली आहेत.<br>• याठिकाणी अग्निशमन वाहनांच्या हालचालीसाठी पुरेशी जागा उपलब्ध आहे. सदर केंद्रामध्ये ड्रिल टावर्स उभारण्याची प्रक्रिया सुरु आहे.<br>• अग्निशमन वाहने, उपकरणे आणि साधन सामुग्री सुरक्षित ठेवण्यासाठी चारपैकी तीन इमारतीमध्ये अशी सोय करण्यात आलेली असून, चौथ्या इमारतीमध्येही अशी सोय करण्याचे प्रस्तावित आहे.<br>• ०३ अग्निशमन केंद्रात कायमस्वरुपी इमारती आहे. सदर नमूद प्रत्येक केंद्रात फायर हायन्ड्रंट तसेच पाण्याच्या स्त्रोत्राची मुबलग प्रमाणात उपलब्ध आहे.<br>**<u>नागपूर महानगरपालिका :-</u>**<br>• (अ) नागपूर शहरामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये काही अग्निशामक स्थानक सुरु करण्याकरीता ठराविक ठिकाणी मोजक्याच जागा दिलेल्या आहेत. सध्या नागपूरच्या लोकसंख्येत झपाट्याने वाढ झाल्यामुळे सुरु असलेल्या स्थानकाच्या अवतीभेवती अतिशय गजबजलेले क्षेत्र निर्माण झालेले आहे. तसेच पूर्वीकाळी मिळालेल्या स्थानकाला कमी जागा मिळाल्याने ड्रील टावर उभारण्यात आले नाही. विभागातर्फे नविन बांधकाम करण्यात येणाऱ्या स्थानकामध्ये ड्रील टावरच्या बांधकामाचे करण्याचे प्रस्तावित आहे.<br>• (ब) महानगरपालिका, नागपूर यांनी अग्निशमन विभागाला कमी क्षेत्रफळाची जागा मिळाल्यामुळे मिळालेल्या जागेवरच अग्निशमन वाहने, उपकरणे आणि साधनसामग्री सुरक्षित ठेवण्यासाठी व यंत्रसामुग्री खराब होऊ नये याकरीता विभागाने प्रत्येक अग्निशमन केंद्रात काही प्रमाणात कायमस्वरुपी इमारती तसेच टीन शेडची व्यवस्था तयार करण्यात |

आलेली आहे.

- (क) नविन स्थानके निर्माण कार्याअंतर्गत वाहने, उपकरणे आणि साधनसामग्री सुरक्षित ठेवण्याकरीता कायमस्वरुपी इमारतीमध्ये प्रयोजन करण्यात आलेले आहे.
- (ड) नागपूर महानगरपालिकेने नागपूर शहराला पाणीपुरवठ्याचे कार्य मे. ऑरेंज सिटी प्रा.लि., नागपूर या कंपनीला दिलेले आहे. सदर कंपनीने नागपूर शहरातील जुनी असलेली पाण्याची पाइपलाइन बदलवून नविन जलवाहीन्या टाकण्याचे कार्य सुरु केले असल्याने नागपूर शहरामध्ये असलेले जुने हॅड्रन्ट बंद झालेले आहेत.
- (इ) नागपूर शहरात आगीच्या घटना घडल्यास आग विझविण्याकरीता लागणारे पाणी शहरातील मे.ऑरेंज सिटी प्रा. लि., नागपूर यांच्याकडून घेण्यात येते. नविन फायर हॅड्रन्टचा प्रस्ताव संबंधित विभागाकडे पाठविलेला आहे.
- (फ) नविन आगीचे बंब व बचाव वाहने खरेदी करण्याकरीता महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये पुरेशी तरतूद नसल्याने तसेच विभागाला शासनाकडून अनुदान प्राप्त न झाल्याने नविन वाहनांची आणि नविन सुकी रासायनिक पावडर, वाहनाचे बंब व स्वतंत्र श्वसन उपकरण संच वाहने खरेदी केली नाहीत.

**<u>औरंगाबाद महानगरपालिका :-</u>**

- तीन अग्निशमन केंद्रापैकी दोन अग्निशमन केंद्राना पुरेशी जागा उपलब्ध आहे. मुख्य अग्निशमन केंद्र पदमपुरा हे मध्य वस्तीत म्हणजे सन १९४० पासून कार्यरत आहे. सदरील ठिकाणी पुरेशी जागा उपलब्ध नसल्यामुळे ते आता पूर्णपणे पाडण्यात आले असून क्र अ ३ मजली इमारत करण्यात आली आहे. उंच इमारत करीत असल्याने जास्तीची मोकळी जागा उपलब्ध होणार आहे.
- शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. अशस-१४०७/३६०/प्र.क्र.२११/नवि-२०, दिनांक ३१/०८/२००९ नूसार पाच स्टेशन मंजूर झालेले असून त्याकरिता पुरेसी जागा उपलब्ध करुन परीपूर्ण करण्यात येईल.
- औरंगाबाद महानगरपालिकेकडे स्वत:चे यांत्रिकी विभाग असून औरंगाबाद शहराच्या मध्यवर्ती भागात उपलब्ध आहे. सध्या तीन अग्निशमन केंद्र व मान्य पाच अग्निशमन केंद्राच्या सरासरी पाच किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे अग्निशमन वाहने, साहित्य किरकोळ दुरुस्ती करण्यात अडचण येत नाही. उर्वरीत आठ अग्निशमन केंद्राचे काम करण्यासाठी व वाहने दुरुस्तीची काळजी घेतली जाईल.

- वॉचरुम, ड्रील टॉवर रुम, संडास-बाथरुम हे नवीन बांधकाम इमारतीत प्रस्तावीत केले आहे उर्वरीत दोन ठिकाणी या सवलती उपलब्ध आहे. सिडको येथे ड्रील टॉवर बांधकाम करण्याची कारवाई चालु करण्यात येईल.
- पदमपुरा अग्निशमन केंद्रात २४ तास पाणी पुरवठाची व्यवस्था करण्यात आली आहे. सिडको व चिकलठाणा येथे पाणी साठविण्याची व्यवस्था करणे चालू प्रस्ताव विचारधीन आहे. सिडको येथे पाणी साठविण्यासाठी अंडरग्राऊंट हौद बांधकाम करुन हायड्रन्ट सिस्टीमचे प्रस्ताव विचारधीन आहे.

**पुणे महानगरपालिका :-**

- पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात सद्यस्थितीमध्ये एकूण 13 ( तेरा ) अग्निशमन केंद्रे कार्यान्वित आहेत. पुणे मनपाच्या भवन रचना विभागाकडून उपलब्ध निधीच्या अनुषंगाने आणखीन 5 ( पाच ) ठिकाणी नवीन अग्निशमन केंद्रे विकसित करण्याची कार्यवाही चालू आहे. अस्तित्वातील 13 केंद्रांपैकी कसबा पेठ, कोथरूड, येरवडा या 3 (तीन) ठिकाणची केंद्रे त्या परिसरातील उपलब्ध जमिनीवर विकसित करणेत आली आहेत.
- सदर तीन ठिकाणी दाट लोकवस्ती, झोपडपट्टी, अरुंद गल्ल्या, रस्ते अशी परिस्थिती असल्याने विनाविलंब मदतकार्य पोहोचविण्याच्या दृष्टीने विकसित करण्यात आली आहेत. वाहनाच्या हालचालीसाठी व बचावकार्याचे सरावासाठी सदर तीन केंद्रातील कर्मचारी व वाहने मध्यवर्ती केंद्रामध्ये बोलावली जातात. मध्यवती केंद्र व कात्रज येथील आभासी DRILL TOWER चा उपयोगही बचाव कार्याच्या सरावासाठी केला जातो.
- एप्रिल 2012 च्या राष्ट्रीय आपत्कालीन व्यवस्थापन मार्गदर्शन सूचना ( प्रकरण 87 ) नुसार सदर 13 केंद्रांपैकी 2010-2015 दरम्यान ज्या केंद्रांमध्ये उपकरणे, वाहने व साधन सामग्री सुरक्षित ठेवणेसाठी कायमस्वरूपी इमारत उपलब्ध नव्हती. त्या इमारतींमध्ये सद्यस्थितीमध्ये उपलब्ध क्षेत्राच्या प्रमाणात सुरक्षित जागा निर्माण करण्यात आल्या आहेत. 2010-2015 दरम्यान पुणे मनपाच्या अग्निशमन दलाचे कसबा पेठ मधील एकाच केंद्र असे होते.
- पुणे मनपाच्या 13 अग्निशमन केंद्रांपैकी सन 2010-2015 दरम्यान कसबा पेठ येथिल केंद्र सोडून उर्वरित सर्व केंद्रांमध्ये भूमिगत जलस्त्रोत उपलब्ध आहेत. तसेच पाणी उपसा यंत्रे त्यावर उभारण्यात आली आहेत. कसबा पेठ केंद्राची जमीन वादग्रस्त व न्यायालयीन प्रक्रियेत असल्याने त्या ठिकाणी भूमिगत जलस्त्रोत निर्माण होऊ शकत नाही, असे मनपाच्या भवन खात्याकडे पाठपुराव्याअंती समजले आहे.

| | | |
|---|---|---|
| | | **नवी मुंबई महानगरपालिका :-**<br>• अ) नवी मुंबई महागनरपालिकेअंतर्गत सद्या ४ अग्निशमन केंद्र कार्यरत आहे. याव्यतिरिक्त कोपरखैरणे येथे एक नवीन अग्निशमन केंद्र बांधण्यात आलेले असुन सदरचे केंद्र लवकरच कार्यान्वीत करण्यात येणार आहे.<br>• ब) अग्निशमन मुख्यालय वाशी येथे नवीन ड्रील टॉवर बांधणीचे काम सुरु असुन इतर सर्व अग्निशमन केंद्रामध्ये ड्रिल टॉवर बांधणीचे काम प्रस्तावित करण्यात आलेले आहे.<br>• क) नवी मुंबई महागनरपालिका अग्निशमन दलामध्ये सर्व प्रकारची अग्निशमन वाहने उपलब्ध असुन दलामध्ये पुरेशी श्वसन उपकरणे संच उपलब्ध आहेत.तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात एकुण ५ Fire fighting वाहने खरेदी करण्यात येणार आहेत. |
| | **शिफारस २- अग्निशमन सेवांच्या पायाभुत सुविधा व साधनसामग्रीच्या उपलब्धतेतील वाढत्या तुटीमुळे अग्निशमन कर्मचारी आणि समाजाला असलेले आगीचे धोके अधिक वाढतात, त्यामुळे राज्य शासनाने राज्यातील अग्निशमन सेवांच्या सध्याच्या पायाभूत सुविधांचा आढावा घ्यावा आणि नवीन भांडवली मत्तांसाठी आणि जुन्या मत्ता बदलण्यासाठी / पुनरूज्जीवीत करण्यासाठी सातत्याने निधीची तरतूद करून या तुटी कमी कराव्या.** | **दिनांक ३१ ऑगस्ट,२००९ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व नगर परिषदा,नगरपंचायती व ड वर्ग महानगरपालिका यांच्या अग्निशमन सेवेतील तुट भरुन काढण्याकरीता व राज्यातील अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्याकरिता विविध आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने "महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान" राबविण्याचा निर्णय घेतला असुन या नागरी स्थानिक संस्थांना अग्निशमनसेवेतील तुट भरुन काढण्याकरीता निधी उपलब्ध करुन दिला जातो. राज्यातील अ+,अ,ब व क वर्ग महानगरपालिका अर्थिकदृष्ट्या सक्षम असल्यामुळे या अभियानाअंतर्गत सदर महानगरपालिकांना निधी उपलब्ध करुन दिला जात नाही.** |
| ४.१.८ | **मनुष्यबळाची / कर्मचाऱ्यांची कमतरता** | |
| | अग्निशमन विभागात (MC स्तरावर), CFO (अग्निशमन सेवांचा सर्वकष प्रमुख) असावा ज्यास उप CFO, विभागीय अधिकारी (DOs), सहाय्यक विभागीय अधिकारी (ADOs) यांनी सहाय्य करावे. क्षेत्रीय स्तरावर, प्रत्येक सर्वसाधारण अग्निशमन केंद्रात केंद्र अधिकारी, अग्निशमन प्रणेते, अग्निशमन कर्मचारी, आगीच्या बंबांसाठी वाहनचालक, रूग्णवाहिकेचे वाहनचालक, आकाशवाणी / बिनतारी यंत्रचालक, तंत्रज्ञ, मेकॅनिक इत्यादी सारखे अनेक महत्वपूर्ण कर्मचारी तैनात असावेत. डिसेंबर २०११ च्या RMSI अहवालानुसार राज्यात कर्मचाऱ्यांच्या (महत्वपूर्ण कर्मचाऱ्यांसह ) संख्येत १२,१५९ इतकी तूट होती त्याचवेळी बृहद / शमन आराखडयांनुसार निवडक आठ MCs मधील कर्मचाऱ्यांच्या संख्येत, १७३१ इतकी तुट असल्याचे दर्शविण्यात आले होते. अशा प्रकारे | **बृहन्मुंबई महानगरपालिका :-**<br>• MCGM चे अग्निशमन दलाचे सर्वकष प्रमुख अग्निशमन अधिकारी असून त्यांना ७ उपप्रमुख अग्निशमन अधिकारी व १ उपप्रमुख अधिकारी (तांत्रिक) आहेत. अग्निशमन दल खात्याच्या आस्थापनेवर ११ विभागीय अग्निशमन अधिकारी, १७ सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी, ५४ केंद्र अधिकारी व १४६ सहाय्यक केंद्र अधिकारी ही पदे आहेत. या व्यतिरिक्त १६८६ अग्निशामक, २४३ प्रमुख अग्निशामक व ४८३ यंत्रचालक ही पदे आहेत.<br>• मुंबई महानगराची वाढ पाहता उपप्रमुख अग्निशमन अधिकारी २ पदे, विभागीय अग्निशमन अधिकारी ४ पदे, सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी ९ पदे व केंद्र अधिकारी २४ |

| | | |
|---|---|---|
| | RMSI अहवाल प्रसिध्द होऊन चार वर्षापेक्षा अधिक काळ उलटूनही राज्य शासन आणि संबंधित MCs नी अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांच्या संख्येतील तूट कमी करण्यासाठी कोणतीही कारवाई केली नव्हती.<br>लेखा परिक्षेत असेही आढळून आले की, राज्यातील अग्निशमन सेवा बळकट करण्यासाठी ११६७ अतिरिक्त पदे निर्माण करण्याविषयीचा प्रस्ताव DFS, मुंबई यांनी GOM च्या UDD ला सादर केला होता (एप्रिल २०१४). राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समितीने जरी, ११६७ पदांपैकी १३१ पदे निर्माण करण्यास मंजुरी दिली होती (जून २०१४) तरी मार्च २०१६ पर्यंत राज्य शासनाने त्यावर कुठलीही कार्यवाही केली नव्हती. | पदे. त्याचप्रमाणे नवीन ४० वरीष्ठ केंद्र अधिकारी ही पदे नव्याने आस्थापनेवरती निर्माण करण्यात आलेली आहेत. ६५४ अग्निशामक, १६५ प्रमुख अग्निशामक व १८२ यंत्रचालक ही अतिरिक्त पदे मंजुर असून त्याची भरती प्रक्रिया सुरू आहे.<br>• वाहने व साधनांच्या दैनंदिन दुरूस्तीकरीता सर्वस्वी अग्निशमन दलाकरीता कार्यशाळा आहेत. त्या कार्यशाळेसाठी विविध तांत्रिक संवर्गातील १०९ पदे आहेत. बिनतारी संच साधनसामुग्रीच्या परिरक्षणासाठी स्वतंत्र कार्यशाळा असून त्यामध्ये १ केंद्र अधिकारी (बिनतारी), २ सहाय्यक केंद्र अधिकारी (बिनतारी) व ९ रेडीओ मॅकेनिकची पदे आहेत.<br>**<u>नाशिक महानगरपालिका:-</u>**<br>• नाशिक महानगरपालिका अग्निशमन दलासाठी अग्निशमन अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करुन देणेबाबत महासभा ठराव क्र. ८५७ दि. ४/१/२०१४ अन्वये मंजुरी झालेली आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या आकृतीबंधामध्ये सदर पदे समाविष्ट करुन आकृतीबंध आस्थापना विभागामार्फत शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आलेला आहे.<br>**<u>अमरावती महानगरपालिका :-</u>**<br>• अमरावती महापालिकेत मुख्य अग्निशमन अधिकारी तथा सहाय्यक अग्निशमन अधिकारी ही दोन पदे रिक्त आहे. सन २००६ मध्ये सदर दोन पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली परंतु तांत्रिक कारणास्तव ही प्रक्रिया स्थगीत करण्यात आली.<br>• सद्य स्थितीत लिडींग फायरमन हे या पदाचे प्रभारी अग्निशमन अधिक्षक म्हणून कामकाज सांभाळत आहेत. तसेच प्रशासकीय प्रमुख म्हणून उपायुक्त (सा.) यांच्याकडे कामकाज आहे.<br>• सन २०१५ मध्ये २७ SFTC चे प्रशिक्षित उमेदवारांची कायमस्वरुपी भरती करण्यात आले आहेत.सन २०१६ मध्ये २५ कंत्राटी वाहनचालक यांची सेवा बाह्य संस्थेकडून कंत्राटी पध्दतीवर घेण्यात आलेले आहेत.तसेच फायरमनची २१ पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबतची प्रक्रिया पूर्ण झालेली असून, लवकरच याबाबत पुढील कार्यवाही पूर्ण करण्यात येत आहे.<br>• सद्य:स्थितीत, उपलब्ध अधिकारी/कर्मचा-यांच्या आधारे सदरची सेवा कार्यक्षमपणे पुरविण्यात येत आहेत.<br>**<u>नागपूर महानगरपालिका :-</u>**<br>• नागपूर महानगरपालिका अग्निशामक विभागाने नविन १३ स्थानके स्थापन करण्यास तसेच त्याकरीता ८७२ मंजुर पदांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला होता. |

| | | |
|---|---|---|
| | | • त्यास शासन निर्णय, नगरविकास विभाग क्र.नामपा-२०१६/प्र.क्र.१८/नवि-२६, दि.०३.०५.२०१६ अन्वये आकृतीबंधास मान्यता दिली आहे. (प्रत सोबत)<br>• यामध्ये उप मुख्य अग्निशमन अधिकारी-१, विभागीय अधिकारी-२, सहा विभागीय अग्निशमन अधिकारी-४, अग्निशमन केंद्र अधिकारी-१५, या पदांचा समावेश आहे.<br>• तसेच शासन निर्णय नगरविकास विभाग, क्र.नामपा-२०१५/१६५२/प्र.क्र.१६६/नवि-२६, दि.१२.०५.२०१७ नागपूर महानगरपालिकेतील अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागातील अधिकारी / कर्मचारी (वर्गीकरण, सेवाभरती व पदोन्नती) नियमांना शासन मान्यता मिळालेली आहे.<br><br>**<u>औरंगाबाद महानगरपालिका :-</u>**<br>• औरंगाबाद महानगरपालिकेत अग्निशमन विभागात कर्मचारी कमी असल्याने मा.आयुक्त यांच्या मान्यतेने ११ महिने करारानुसार कंत्राटी पध्दतीने ४० अग्निशामक, ०९ वाहन चालक, ६ दुरध्वनी चालक घेण्यात आले आहे.<br><br>**<u>पुणे महानगरपालिका :-</u>**<br>• सद्यस्थितीमध्ये पुणे मनपाच्या अग्निशमन सेवेमध्ये विविध पदांवर 447 इतके अधिकारी - कर्मचारी नेमलेले आहेत. प्रत्यक्षात 921 इतकी मंजूर पदे आहेत. रिक्त असणाऱ्या पदांवर भरती करण्याची प्रक्रिया पुणे मनपाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून सुरु असून दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात कर्मचारी भरती करण्याची कार्यवाही देखील सुरु आहे.<br><br>**<u>नवी मुंबई महानगरपालिका :-</u>**<br>• महाराष्ट्र शासनामार्फत नमुंमपा अग्निशमन दलातील विविध संवर्गातील एकुण ४७५ पदांना महाराष्ट्र शासन निर्णय क्र.नमुंम/ १२१५/३९४/ प्र.क्र. १६/१५ (भाग-२)/नवि-२८, दि. २० मे २०१६ अन्वये मान्यता मिळालेली असुन सदरची पदे भरण्याची प्रक्रिया ही अंतिम टप्प्यात आहे.<br><br>➤ राज्यातील अग्निशमन सेवा बळकट करण्यासाठी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीने १३१ पदे निर्माण करण्यास मंजुरी दिली आहे.त्यापैकी संचालक ,अग्निशमन सेवा गट-अ हे महत्वाचे वरिष्ठ पद सरळसेवेने भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर करण्यात आले आहे. तसेच इतर पदांचे सेवाप्रवेश नियम अंतिम करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. |

| | | |
|---|---|---|
| | शिफारस ३- मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे अग्निशमन विभागांच्या अग्निशमन क्षमतेवर परिणाम होत असल्यामुळे राज्य शासनाने या समस्येवर प्राथमिकतेने तोडगा काढणे आवश्यक आहे. | राज्यातील अग्निशमन सेवा बळकट करण्यासाठी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीने १३१ पदे निर्माण करण्यास मंजुरी दिली आहे.त्यापैकी संचालक ,अग्निशमन सेवा गट-अ हे महत्वाचे वरिष्ठ पद सरळसेवेने भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर करण्यात आले आहे. तसेच इतर पदांचे सेवाप्रवेश नियम अंतिम करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. |
| ४.१.९ | **अग्नि सुरक्षा प्रमाणकांचे अनुपालन न करणे** | |
| | महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ नुसार नागरीकांवर, प्रामुख्याने धोकादायक जागांमधील, अग्नि सुरक्षा प्रमाणकांचे पालन सक्तीचे करणे आणि आग प्रतिबंधक उपाययोजनांविषयी जागरूकता निर्माण करणे ही अग्निशमन विभागाची प्रमुख कार्ये आहेत, जेणेकरून आगीचा धोका कमी करता येईल. MCs चे अग्निशमन विभाग सर्व प्रकारच्या इमारती आणि पेट्रोल पंप, द्रवरूप पेट्रोलियम वायू (LPG) पुनर्भरण केंद्रे किंवा वितरण केंद्रे, फटाक्यांची दुकाने आणि लाकुड गिरण्या यासारख्या धोकादायक व्यवसायांना ना हरकत प्रमाणपत्रे (NOCs)देखील जारी करतात. अधिनियमात तरतूद केलेल्या अग्निसुरक्षा प्रमाणकांची सक्तीने अंमलबजावणी करण्यात अनेक त्रुटी असल्याचे लेखा परिक्षेत आढळून आले. | |
| ४.१.९.१ | **ना हरकत प्रमाणपत्रे जारी करण्यातील अपर्याप्तता** | |
| | MCs च्या क्षेत्रीय कार्यकक्षेत इमारतींचे बांधकाम सुरू होतांना MCs चे अग्निशमन विभाग तात्पुरती फायर NOC जारी करतात. MCs च्या नगर रचना विभागाकडून भोगवटा प्रमाणपत्रे (OCs) देण्याआधी अग्निशमन विभागाकडून अंतिम फायर NOCs दिल्या जातात. Commencement Certificate/NOCs/OCs यांच्या नोंदवहया आणि संबंधित इमारत प्रस्ताव नस्तींच्या लेखापरिक्षा तपासणीत खालील बाबी आढळून आल्या:<br>➢ अग्निशमन विभागाकडून अंतिम फायर NOCs जारी केलेल्या नसतानाही वर्ष २०१०-१५ दरम्यान MC, अमरावती येथील नगर रचना विभागाने २८ इमारतींना OCs जारी केल्या. सबब, या इमारतींनी अग्निसुरक्षा प्रमाणकांचे पालन केले होते अथवा नाही याची लेखापरीक्षेत पडताळणी करणे कठीण होते.<br>➢ वर्ष १९६८ ते २०१५ दरम्यान MC नागपूरच्या अग्निशमन विभागाने ९२ पेट्रोल पंपना आवश्यक अग्निशमन साधनसामग्री प्रस्थापित करण्याच्या अटीवर तात्पुरती फायर NOCs जारी केली. परंतु, डिसेंबर २०१५ पर्यंत ९२ पैकी एकही पेट्रोल पंपने अंतिम फायर NOCs ची मागणी केली नव्हती. या कसूरदार पेट्रोल पंपांविरूध्द अग्निशमन विभागाने कोणतीही कारवाई केली नव्हती. तसेच, अग्निशमन विभागाकडून फायर NOCs प्राप्त न करता वर्ष १९९४-२०१४ या | **<u>बृहन्मुंबई महानगरपालिका :-</u>**<br>• MCGM च्या अग्निशमन दलाद्वारे MMC ACT १८८८ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक प्रतिबंध व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ तील तरतुदीनुसार विविध इमारती व आस्थापने यांना ना हरकत प्रमाणपत्र दिली जातात. अग्नि सुरक्षेविषयक नियमांची कठोर अंमलबजावणी MCGM द्वारे केली जाते.<br>• पेट्रोलपंप, फटाक्यांची दुकाने, LPG फिलींग स्टेशन यांना देखील MMC ACT १८८८ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक प्रतिबंध व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६नुसार ना हरकत प्रमाणपत्रे दिली जातात. यांचा सविस्तर संख्यात्मक तपशील MCGM च्या संबंधित विभागातील अनुज्ञती खात्याकडे उपलब्ध आहे.<br>• MCGM ने मुंबई महानगरासाठी आणीबाणी व्यवस्थापन आराखडा तयार केलेला असून त्यामध्ये आगीच्या जोखमीचे विशलेषण आणी विविध धोके अगोदरच निश्चित करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे MCGMचा आणीबाणी व्यवस्थापन कक्ष मुंबई महानगरातील विविध धोक्यांचे आराखडे देखील बनवत आहे. |

एच ३८२ [३००-६१८]-४

| | | |
|---|---|---|
| | कालावधीत २७ फटाक्यांची दुकाने, ३२२ लाकूड गिरण्या आणि ४१ LPG वितरण केंद्रे (दोन पुनर्भरण केंद्रे आणि ३९ वितरक) व्यापार करत होते.<br>➢ तसेच, लेखापरिक्षकांनी MC नागपूर मधील ९२ पैकी दोन पेट्रोल पंप आणि २७ पैकी एका फटाक्याच्या दुकानांच्या केलेल्या संयुक्त प्रत्यक्ष तपासणीत असे आढळून आले की, (i) जमिनीखाली ५०००० लिटर्सचा पाणी साठा असण्याची अनिवार्य अट असतांना त्याऐवजी पेट्रोल पंपाकडे फक्त २००० लिटर्सची साठवण क्षमता होती, (ii) सामान्य CO असलेल्या अग्निशमन यंत्रांव्यतिरिक्त फेस/ कोरडी रासायनिक पावडर असणारी कोणतीही अग्निशमन यंत्रे पेट्रोल पंपामध्ये उपलब्ध नव्हती, (iii) पेट्रोल पंपांवर कोणतेही फायर हायड्रंट बसविल्याचे आढळून आले नव्हते. (iv) तीन मजली इमारतीच्या तळ मजल्यावर असलेल्या फटाक्यांच्या दुकानात जरी १५०० किलो फटाके/स्फोटक पदार्थ यांचा साठा होता तरी दुकानात फक्त चार CO युक्त अग्निशमन यंत्रे ठेवली होती. इतक्या मोठया प्रमाणातील फटाक्यांच्या साठयासाठी कोरडी रासायनिक पावडर असलेली अग्निशमन यंत्रे असणे आवश्यक होते यास CFO नी दुजोरा दिला.<br>➢ MC ठाणे ने २०११ मध्ये तयार केलेल्या शमन आराखडयामध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत फक्त १४ फटाक्यांची दुकाने असल्याचे दर्शविले होते, परंतु, पेट्रोल पंप, लाकुड गिरण्या आणि LPG भरणा केंद्रे यासारख्या इतर धोकादायक जागांचा तपशील शमन आराखडयात दिला नव्हता किंवा मार्च २०१६ पर्यत CFO कडे उपलब्ध नव्हता.<br>➢ MC नाशिक मध्ये अग्निशमन विभागाकडून कोणतेही अंतिम फायर NOCs प्राप्त न करता नऊ फटाक्यांची दुकाने, ४७ पेट्रोल पंप आणि ६२ लाकुड गिरण्या चालवल्या जात होत्या (एप्रिल २०१६).<br>➢ NOC दिलेले एकूण पेट्रोल पंप, फटाक्यांची दुकाने आणि LPG भरणा केंद्रे यांची अचूक संख्या MCGM आणि अमरावती येथील अग्निशमन विभागांकडे उपलब्ध नव्हती. तसेच, MC अमरावती यांनी कोणतेही शमन आराखडे तयार केले नव्हते, २०११ मध्ये MCGM ने जो शमन आराखडा तयार केला होता त्यामध्ये देखील मुंबई शहरात चालविल्या जात असलेल्या अशा धोकादायक व्यापारांचे अस्तित्त्व दर्शविले नव्हते.<br>➢ वर्ष २०१०-१५ दरम्यान MC, नवी मुंबई यांनी दोन व्यापाऱ्यांना त्यांच्याकडे फायर NOCs आहेत अथवा नाही याची खातरजमा न करता ४५० किलो स्फोटक पदार्थांच्या विक्रीसाठी फटाक्यांचे परवाने दिले. तसेच, वर्ष २०१४-१५ पासून १२ LPG वितरक कोणत्याही फायर NOC शिवाय व्यवसाय करत होते. | • नवीन प्रशासकीय इमारतीची तपासणी केल्यानंतर तपासणी अहवाल संबंधित प्राधिकाऱ्यांकडे चवथ्या व बाराव्या मजल्यावरील कॅनटीनमध्ये LPG सिलेंडर्सच्या वापरावर योग्य कारवाई करण्यासाठी पाठविलेला आहे. तसेच १३ व्या मजल्यावरील अतिक्रमण काढून टाकण्यास सांगण्यात आलेले आहे.<br>• जून २०१२ मध्ये मंत्रालयाच्या इमारतीत लागलेल्या आगीनंतर महाराष्ट्र राज्य शासनाने मंत्रालय इमारत (मुख्य इमारत) यांचे नुतनीकरण करण्याचे ठरविले आणि त्यानुसार अग्निशमन दलाने अग्निसुरक्षा व जीवसंरक्षक उपाययोजना करण्याकरिता नव्याने नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.<br>• महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याने त्यांचे पालन केल्याचा अहवाल सादर केल्यानुसार अग्निशमन दलाने अंशतः भोगवटा प्रमाणपत्र दिलेले आहे.<br>• महाराष्ट्र आग प्रतिबंधक प्रतिबंध व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ च्या अनुसूची I प्रमाणे MCGM चे अग्निशमन दल शासकिय इमारतींची नियमित तपासणी करून अग्निसुरक्षा उपाययोजनांची खातरजमा करते. आतापर्यंत अनेक शासकिय इमारतींची तपासणी झाली असून त्यामधील अग्निसुरक्षितेतची उपाययोजना करण्यासाठी योग्य कार्यवाही करण्यात आलेली आहे.<br>**<u>ठाणे महानगरपालिका:-</u>**<br>• ठाणे महानगरपालिकेने सन २०११ मध्ये तयार केलेल्या शमन आराखड्यामध्ये १४ फटाक्यांची दुकाने दर्शविले होते परंतु पेट्रोल पंप,लाकुडगिरण्या आणि एल.पी.जी.भरणा केंद्रे यासारख्या धोकादायक जागांचा तपशील अग्निशमन आराखड्यात दिला नाही.परंतु, यापुढे ठाणे महानगरपालिकेकडुन नविन अग्निशमन आराखडा तयार करताना संबंधीत विभागाकडून माहिती प्राप्त करुन त्यांचा समावेश करण्यात येईल.<br>**<u>नाशिक महानगरपालिका:-</u>**<br>• नाशिक शहरात अग्निशमन विभागाकडुन अंतिम फायर एनओसी न घेता फटाकेची दुकाने व पेट्रोलपंप चालु असल्याबाबतचे आक्षेप आहेत. तथापि सदर आस्थापनांना परवाना देण्याचे व अपुर्तता असल्यास कार्यवाही करण्याचे अधिकार विस्फोटक कायदा व पेट्रोलियम कायदा(Explosive Act & Petrolium Act) नुसार परवाना देणारे प्राधिकरण म्हणजेच मा. पोलिस आयुक्त, नाशिक किंवा मुख्यविस्फोटक नियंत्रक भारत सरकार यांचे |

- तीन MCs (औरंगाबाद, नागपूर आणि अमरावती) च्या स्थानिक कार्यक्षेत्रेतील २८ जुन्या शासकीय इमारतींमध्ये आवश्यक अग्निशमन उपकरणे बसविली नसल्यामुळे संबंधित अग्निशमन विभागांनी या इमारतींना अंतिम फायर NOCs दिल्या नव्हत्या. परंतु, महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम ५(१) अंतर्गत इमारतींची तपासणी करणे आवश्यक असूनही तीन MCs च्या अग्निशमन विभागांच्या CFOs नी या इमारतींच्या मालकांना सूचना जारी केल्या नव्हत्या. अशाप्रकारे, या इमारती फक्त असुरक्षितच होत्या असे नाही तर या इमारतींमधील शासकीय कर्मचाऱ्यांच्या जीवासही सातत्याने धोका होता.
- GOI च्या नगर विकास मंत्रालयाच्या नगर आणि शहर नियोजन संघटनेच्या इमारत उपविधीच्या (by-laws)नमुन्यानुसार (नोव्हेंबर २००४), निवासी इमारती / उपाहारगृहे / वसतिगृहे / स्वयंपाकगृहे /पँट्री व्यतिरिक्त इतर टोलेजंग इमारतींमध्ये LPG चा वापर करण्यास परवानगी नाही. CFO, MCGM यांनी मुंबई येथील मंत्रालयाच्या "नवीन प्रशासकीय इमारतीची" तपासणी केली (ऑगस्ट २०१२) आणि त्यांना असे आढळून आले की पाचव्या आणि बाराव्या मजल्यावरील दोन उपाहारगृहे कोणत्याही सुरक्षात्मक उपाययोजनेशिवाय किंवा सक्षम प्राधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी अनुक्रमे चार व दोन LPG सिलेंडर्सचा वापर करून चालविण्यात येत होती. तसेच, १३ व्या मजल्यावरील उद्वाहनासमोरील मोकळी जागा अर्धा भाग लाकडाचा असलेल्या आडोश्यांनी आणि अभ्यागतांसाठीच्या आसन व्यवस्थेने व्यापलेली होती. इतर मजल्यांवरील सामायिक जागा / उद्वाहनासमोरील जागादेखील स्टील / लाकडी कपाटांनी व्याप्त असल्याचे आढळून आले होते. परंतु, लेखापरीक्षकांनी मंत्रालय इमारतीच्या केलेल्या प्रत्यक्ष तपासणीतून आणि CFO, MCGM यांनी दिलेल्या उत्तरातून असे उघडकीस आले (एप्रिल २०१६) की, तीन वर्षांपेक्षा अधिक काळ उलटूनही CFO नी दर्शविलेल्या त्रुटी रहिवासी व मालमत्तेच्या सुरक्षेसाठी UDD/MCGM ने सुधारल्या नव्हत्या.
- महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या अनुसूची १ नुसार अग्निशामके, आवारातील हायड्रंट, जलकुंभ, होस रिल्स, फवारणी साधने, स्वयंचलित शोध आणि धोका सूचक यंत्रणा यासारखी किमान अग्निशमन साधने शासकीय इमारती / रूग्णालये / शैक्षणिक संस्था / व्यापारी आस्थापना यामध्ये प्रस्थापित करणे आवश्यक आहे. निवडक आठ MCs मधील ५३ शासकीय इमारती / रूग्णालये / शैक्षणिक संस्था / व्यापारी आस्थापना यांची

आहे.

- ०९ पैकी ०८ फटाक्यांच्या दुकानांचे ना -हरकत दाखले अटी -शर्तींची पुर्तता न केल्याने किमान ०५ ते ०६ वर्षांपासुन नुतनीकरण केलेले नाहीत. व ते दाखल्यातील अटी-शर्तीनुसार रदद झालेले आहेत. फक्त एक फटाक्याच्या दुकानाच्या विस्फोटक कायदयानुसार अनुपालन होत असल्याने त्या दुकानाचा अग्निशमन दलाचा ना -हरकत दाखला नुतनीकरण करुन देणेत आलेला आहे.
- पेट्रोल पंपांना बांधकाम करणेपुर्वी अग्निशमन दलाचा दाखला दिलेला आहे. मात्र पेट्रोलपंप धारकांनी व्यवसाय सुरु करणेपुर्वी जागा / इमारत वापराचा दाखला नगररचना विभागाकडुन घेणे आवश्यक असते. तथापि तसा जागा वापराचा दाखला न घेता प्राधिकृत प्राधिकरणाने पेट्रोल पंप सुरु करण्याची परवानगी दिल्याने जागा वापराचा व अग्निशमन दलाचा अंतिम ना- हरकत दाखला पेट्रोलपंपांनी घेतलेला नाही.
- नाशिक शहरामध्ये सन १९८२ साली महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर एकही लाकुड वखार नव्याने सुरु झालेली नाही. सुरु असलेल्या वखारी या भुतपुर्व नगरपालिकेपासुन सुरु असल्याने त्यांचेवर कार्यवाही करणे शक्य होत नाही.
- नाशिक शहरातील शासकीय इमारती उदा. जिल्हा परिषद इमारत जिल्हा रुग्णालय तसेच शैक्षणिक संस्था हया महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक व जिवसुरक्षा उपाययोजना अधिनियम २००६ लागु होण्याच्या आधीपासुन कार्यरत आहेत. त्यांचेशी आग प्रतिबंधक उपाययोजना करुन घेणेबाबत वैयक्तिक पत्रव्यवहार केलेला आहे. तसेच वर्तमान पत्रामधुन सर्व इमारतींसाठी जाहीर सुचना प्रसिध्द केलेली आहे. याबाबत सक्तीने व प्रभावी अंमलबजावणी करणे बाबत कारवाई करण्यात येईल.

**अमरावती महानगरपालिका :-**

- नॅशनल बिल्डींग कोड (NBC) २००५ नुसार इमारतीचे बांधकाम सुरु होताना अमनपा अग्निशमन विभागातर्फे अटी व शर्तींच्या अधिन राहून तात्पुरते ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत असून, आतापर्यंत वर्ष २०१०-१५ दरम्यान लेखापरिक्षण करण्यात आले त्यानुसार मा.आयुक्त तसेच सहायक संचालक नगर रचना यांच्याशी चर्चा करण्यात आली. त्यानुसार अग्निश्मन विभागाचे अंतिम ना-हरकत प्राप्त झाल्यावरच नगर रचना विभागाकडून सदर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्रास देण्यात येते.
- अमरावती महापालिके तर्फे महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील तरतुदींची काटेकोर पणे अंमलबजावणी करण्याचे काम

| | | |
|---|---|---|
| | लेखापरीक्षकांनी संयुक्त प्रत्यक्ष तपासणी केली असता असे आढळून आले की ५३ पैकी ११ इमारतीत फक्त अग्निशामके बसविली होती आणि उर्वरीत ४२ इमारतीत उपरोक्त अग्निशमन साधनांपैकी एकही साधन उपलब्ध नव्हते. ५३ इमारतींमधील रहिवासी तसेच या इमारती ज्या MCs अंतर्गत होत्या त्या संबंधित MCs देखील लेखापरीक्षकांना पडताळणीसाठी अंतिम फायर NOC सादर करू शकले नव्हते.<br>अशाप्रकारे, इमारती आणि धोकादायक जागांसाठी अग्निशमन विभागाकडून मंजुरी प्राप्त करणे अनिवार्य असण्याची कायदेशीर प्रक्रियेत तरतूद असूनही राज्यातील अग्निशमन कार्यातील दुर्बलतांवर पर्याप्तपणे तोडगा काढला गेला नव्हता. | अग्निशमन कृती दलाकडून करण्यात येत आहे.<br>• अमरावती महानगरपालिका क्षेत्रात एकूण पेट्रोल पंप १९ असून यापैकी एकाही पंपधारकाने अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र घेतल्याचे दिसून आलेले नाही म्हणून या पंपधारकांना ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याबाबत नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. शहरात एकही LPG/CNG भरणा केंद्र नाहीत तथापि, शहराबाहेर ०२ एलपीजी गोडाऊनधारक असून, त्यांना अग्निशमन नाहरकत घेण्याबाबत नोटीस दिलेल्या आहेत.<br>• अमरावती शहरात एकूण ५७ शासकिय इमारती असून, या इमारतीबाबत अग्निशमन व्यवस्थेबाबत वेळोवेळी तपासणी करण्यात येत असून, याबाबत महापालिका अग्निशमन विभागाकडून दक्षता घेण्यात येत आहे.<br>**<u>पुणे महानगरपालिका :-</u>**<br>• सन 2012 मध्ये मंत्रालय इमारतीस लागलेल्या आगीच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून प्राप्त झालेल्या निर्देशांच्या अनुषंगाने पुणे मनपा क्षेत्रातील सर्व शासकीय इमारतीचे फायर ऑडीट हे अग्निशमन दलाचे अधिकारी व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपायोजना अधिनियम 2006 चे कलमानुसार लायसन्स देण्यात आलेल्या अभिकरनांकडून करण्यात येऊन संबधित विभागांना अग्निसुरक्षा विषयक उपाययोजानाचे दृष्टीने आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात आले. सन 2010-2015 दरम्यान शासकीय इमारती / रुग्णालये शैक्षणिक संकुले इत्यादी ठिकाणी अग्निसुरक्षा विषयक जनजागृतीपर व्याख्याने, प्रात्यक्षिके, प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.<br>• रुग्णालयांचे परवाना नुतनीकरन करताना पुरेशा अग्निसुरक्षा उपाययोजना करणे व त्या नुसार अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करण्यात आले. शैक्षणिक संकुलानाही दर्जा तपासणीचे वेळी अग्निशमन व सुरक्षा यंत्रणा तपासणीचा आग्रह करण्यात येतो.<br>• अशा पद्धतीने कार्यवाही न केल्यास संबंधितांचे विरुद्ध आवश्यक ती कारवाई करण्यात येते. यासह महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपायोजना अधिनियम 2006 चे तरतुदीनुसार अग्निसुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक व असुरक्षित इमारतींना मार्गदर्शन सूचना जारी करण्यात आलेल्या आहेत.<br>**<u>नागपूर महानगरपालिका :-</u>**<br>• (i)शहरातील चिल्लर व ठोक फटाके विक्रता, एल.पी.जी. डिलर, पेट्रोल पंप यांना अग्निसुरक्षा संबंधित मार्गदर्शन तत्व पाळावीत याबाबत शासनाने लेखी स्वरुपात माहिती |

पुरविलेली नाही.

- (ii)महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अंमलात येण्यापूर्वी नागपूर शहरामध्ये बरेच चिल्लर व ठोक फटाके विक्रेता, एल.पी.जी. डिलर, पेट्रोल पंप यांनी आपली दुकाने सुरु केलेली आहेत.
- (iii)डेव्हलपमेंट कंट्रोल रुल नुसार अशा इमातरीला अग्निशमन विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. इमारत मंजूरी विभागाने अशा प्रकरचा प्रस्ताव अग्निशामक विभागाकडे पाठविणेसुध्दा आवश्यक आहे. ज्या इमारतधारकांचे प्रस्ताव अग्निशामक विभागाकडे प्राप्त होतात त्यांनी नियमानुसार नाहरकत प्रमाणपत्र विभागातर्फे जारी करण्यात येते.
- (iv)डेव्हलपमेंट कंट्रोल रुल नागपूरमध्ये अंमलबजावणी होण्यापूर्वी चिल्लर फटाके विक्रेता, पेट्रोल पंप, एल.पी.जी. वितरण केंद्र, लाकुड गिरण्या नागपूर शहरामध्ये अस्तित्वात होते. म्हणून अग्निशमन नियमांचे प्रावधान सदर विक्रेत्यांना मागील तारेखपासून लागू करता येत नाही. ज्या मालकांना अग्निशामक विभागाने नाहरकत प्रमाणत्र जारी केलेले आहेत त्यांना नुतनीकरण करुन घेण्यासाठी नोटीस देण्यात आलेले असून फॉर्म "A" व फार्म "B" भरुन देण्यास सांगितलेले आहे.
- (v) डेव्हलपमेंट कंट्रोल रुल नुसार ज्या चिल्लर दुकानाचे क्षेत्रफळ १५० स्क्वे.मी. पेक्षा कमी असल्यास सदर नियम त्यांना लागू होत नाही. परंतु जीवहानी व सुरक्षेच्या दृष्टीने विभागातर्फे अग्निशमन नियमांचे पालन करण्याच्या अटीवर सशर्त तात्पुरते नाहरकत प्रमाणपत्र अग्निशामक विभागाकडून देण्यात येतात.
- (vi) शहरातील एल.पी.जी. डिलर यांना वॉटर बेस फायर फायटींग सिस्टम लावण्यासंबंधी बाध्य केलेले आहे व त्यांच्याकडून फार्म "B" प्राप्त झाल्यावरच नुतनीकरण करण्यात येते.अग्निशामक विभागाने नागपूर शहरातील जुन्या शासकीय इमारतींचे फायर ऑडिट करुन महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या अनुसूची (१) नुसार अग्निशमन सुरक्षा योजना करण्यास पत्राद्वारे कळविलेले आहे.

**औरंगाबाद महानगरपालिका :-**

- औरंगाबाद येथील स्थानिक कार्यक्षेत्रातील जुन्या शासकीय इमारतीची तपासणी अग्निशमन अधिकारी यांच्याकडून करण्यात आलेली असून इमारतीच्या मालकांना सुचना जारी करण्यात आलेल्या आहे.
- अग्निशमन विभागाने शासकीय रुग्णालय, कार्यालय येथे फायर ऑडीट करुन अग्निशमन

| | | |
|---|---|---|
| | | सुरक्षा उपाययोजना करण्यासाठी नोटीस दिल्या असता शासकीय रुग्णालयानी फॉर्म बी उपलब्ध करुन दिलेला नाही. सदरील ठिकाणी अग्निशमन उपकरणे खरेदी करण्यासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे.<br>• महानगरपालिकेच्या इमारतीना निधी उपलब्ध नसल्यामुळे कमी अग्निशमन उपकरणे बसविण्यात आलेली आहे.<br>**<u>नवी मुंबई महानगरपालिका :-</u>**<br>• अ) नवी मुंबई कार्यक्षेत्रामध्ये वाणिज्यीक वापराच्या इमारतीध्ये २ कायमस्वरुपी फटाक्यांची दुकाने असुन सदर दुकानामध्ये पुरेशी अग्निशमन यंत्रणा स्थापिंत केलेली आहे.तसेच दिवाळी सणानिमित्त दरवर्षी केवळ ५ ते ६ दिवसांसाठी तात्पुरत्या स्वरुपात फटाक्यांच्या स्टॉल्सना अग्निशमन विभागामार्फत शासन निकषानुसार परवानगी देण्यात येते.<br>• ब) नवी मुंबई कार्यक्षेत्रामध्ये एकुण ४४ पेट्रोल पंप आहेत त्यापैकी २९ पेट्रोल पंपानी अग्निशमन विभागाचा ना हरकत दाखला घेतलेला असुन उर्वरित १५ पेट्रोल पंप धारकांनी अग्निशमन विभागाचा ना हकरत दाखला नुतनीकरण केलेला नाही.नुतनीकरण न केलेल्या पेट्रोल पंप धारकांना महाराष्ट्र आग प्रतिबंधक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ अन्वये नोटीस बजावण्यात आलेली आहेत.<br>• क) नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये एकुण १२ एलपीजी वितरक आहेत. या सर्वांना महाराष्ट्र आग प्रतिबंधक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ अन्वये नोटीस बजावण्यात आलेली आहेत. |
| | **शिफारस ४- सर्व धोकादायक व्यवसाय, व्यापारी, शासकीय आणि संस्थात्मक इमारती राज्य अग्निसुरक्षा विनिमयांचे पालन करीत आहेत आणि अग्निशमन क्षमतेच्या बाबतीत त्या स्वयंपूर्ण आहेत याची खात्री करण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील तरतुदींची अधिक प्रभावी रीतीने सक्तीने अंमलबजावणी करणे.** | **महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील तरतुदींची अधिक प्रभावी रीतीने सक्तीने अंमलबजावणी करण्यात येईल.** |
| ४.१.१० | **क्षमता बांधणीतील तूट** | |
| | आगीच्या आपत्तींशी प्रभावीपणे मुकाबला करण्यासाठी अग्निशमन कर्मचाऱ्यांची क्षमता सुधारण्यासाठी अग्निशमन कर्मचाऱ्यांना ज्ञान, कौशल्य, कल, शारिरीक स्वास्थ्य, दृष्टी आणि बौध्दिक जागरूकता यासारख्या वेगवेगळया बाबी नियमितपणे तपासल्या जाव्या आणि नियमीत प्रशिक्षण, मॉक ड्रील, कार्यशाळा आणि सामाजिक जागृती कार्यक्रम याद्वारे | **<u>संचालक,अग्निशमन सेवा :-</u>**<br>• अग्निशमन सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता नियमीत अग्निशमन प्रशिक्षण सत्रे राज्य अग्निशमन सेवा अकादमीमध्ये आयोजित करण्यात येतात. या अकादमीच्या |

| | | |
|---|---|---|
| | त्यात सुधारणा करण्यात याव्या. | अधिपत्याखालील शासनाने ८ प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्रांना मान्यता दिली असून तेथेही अग्निशमन प्रशिक्षणाचे पाठयक्रम आयोजित करण्यात येतात.<br>• आगीच्या आपत्तींशी प्रभावीपणे मुकाबला करण्यासाठी अग्निशमन कर्मचा-यांची क्षमता सुधारण्यासाठी अग्निशमन कर्मचा-यांच्या ज्ञान, कौशल्य, कला, शारिरीक स्वास्थ्य, दुष्टी अणि बाबी नियमीतपणे तपासणे आणि नियमीत प्रशिक्षण, मॉक ड्रिल, कार्यशाळा आणि सामाजिक जागृती कार्यक्रम याव्दारे त्यात सुधारणा करण्याबाबत सर्व महानगरपालिकांना सुचना देण्यात येतील. |
| ४.१.१०.१ | **प्रशिक्षणातील तूट** | |
| | GoM ने कालिना (सांताक्रुझ), मुंबई येथे एक राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र (SFTC) स्थापन केले. मार्च १९९० च्या GR नुसार, SFTC मध्ये अग्निशमन कर्मचाऱ्यांना (नव्याने भरती झालेले व कनिष्ठ श्रेणीतील कर्मचारी) वर्षभरात सहा महिन्यांचे मुलभूत तांत्रिक अग्निशमन प्रशिक्षण द्यावयाचे होते. लेखापरीक्षेत असे आढळून आले की, वर्ष २०१०-१५ दरम्यान राज्यात प्रशिक्षण द्यावयाच्या १२५० अग्निशमन कर्मचाऱ्यांपैकी STFC मध्ये फक्त ४०१ कर्मचाऱ्यांना (३२ टक्के) प्रशिक्षण देण्यात आले होते (MCGM व्यतिरिक्त).निवडक आठ MCs पैकी दोन मध्ये, वर्ष २०१०-१५ दरम्यान SFTC मध्ये एकाही अग्निशमन कर्मचाऱ्याला प्रशिक्षण देण्यात आले नव्हते. तसेच, MC, अमरावती आणि नागपूर (एकूण कर्मचारी संख्या ३७७) मधून प्रत्येकी फक्त एका अग्निशमन कर्मचाऱ्याला या कालावधीत प्रशिक्षण देण्यात आले होते. | **<u>बृहन्मुंबई महानगरपालिका :-</u>**<br>• MCGM च्या अग्निशमन दलाची स्वत:ची प्रशिक्षणाची सुविधा वडाळा अग्निशमन केंद्र येथील प्रशिक्षण केंद्रात उपलब्ध आहे. या प्रशिक्षण केंद्रात अधिकारी व अग्निशामकांसाठी ६ महिन्यांचे भरती प्रशिक्षण देण्यात येते, या व्यतिरिक्त दुय्यम अधिकारी, प्रमुख अग्निशामक व यंत्रचालक या पदांच्या पदोन्नतीसाठी प्रशिक्षण देखील येथे देण्यात येते. अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना श्वसन उपकरण संच, विशेष उपकरणांचे संचालन व हाताळणी इत्यादींचे उजळणी वर्ग या प्रशिक्षण केंद्राद्वारे दिले जाते.<br>• बाहेरील उमेदवार व संस्था यांना देखील सशुल्क प्रशिक्षण या प्रशिक्षण केंद्राद्वारे दिले जाते. अलीकडेच महाराष्ट्र राज्य शासनालादेखील स्टेट फायर ट्रेनिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांना आवश्यक प्रशिक्षण सुविधा मुंबई अग्निशमन दलाकडे उपलब्ध असल्याचे आढळून आलेले आहे.<br>**<u>अमरावती महानगरपालिका :-</u>**<br>• अमरावती महापालिका अग्निशमन दला मध्ये वर्ष २०१५ मध्ये २७ फायरमनची भरती करण्यात आली सदर फायरमन हे SFTC मुंबई कडून प्रशिक्षित आहे. सद्य:स्थिती २१ कंत्राटी फायरमन बाह्य संस्थेद्वारा घेण्याचे प्रस्तावीत आहे. मनुष्य बळाची कमतरता पूर्ण झाल्यावर दर सहामाही प्रशिक्षणा करिता विभागाकडून चार फायरमन प्रशिक्षणास पाठविण्यात येतील.<br>**<u>नागपूर महानगरपालिका :-</u>**<br>• नागपूर अग्निशामक विभागातील कर्मचाऱ्यांना राज्य प्रशिक्षण केंद्र, मुंबई येथे वेळोवेळी होणाऱ्या बेसिक फायर फायटिंग कोर्स करीता पाठविण्यात येते.<br>• सन २०१०-१५ या कालावधीत नागपूर महानगरपालिका, नागपूर ने केलेल्या कर्मचारी |

| | | |
|---|---|---|
| | | भरती प्रक्रियेमध्येएस.एफ.टी.सी. कोर्स पास अशी पात्रता असलेल्या कर्मचा-यांचीच भरती केलेली आहे.<br>• त्यामुळे सन २०१०-१५ या कालावधीत सदर पाठ्यक्रमाकरीता कमी कर्मचाऱ्यांना पाठविण्यात आले.<br>**<u>औरंगाबाद महानगरपालिका :-</u>**<br>• औरंगाबाद महानगरपालिका अग्निशमन विभागामध्ये २६ अधिकारी/कर्मचारी असून यापैकी १३ कर्मचा-यांनी नॅशनल फायर सर्व्हिस, नागपुर येथील उप अग्निशमन अधिकारी या पदाचे प्रशिक्षण घेतलेले असून अग्निशमन विभागाकडे अधिकारी/कर्मचारी कमी असल्याने सन २०१४-१५ या वर्षात प्रशिक्षणास पाठविण्यात आलेले नाही.<br>**<u>संचालक,अग्निशमन सेवा :-</u>**<br>• अग्निशमन सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता नियमीत अग्निशमन प्रशिक्षण सत्रे राज्य अग्निशमन सेवा अकादमीमध्ये आयोजित करण्यात येतात. या अकादमीच्या अधिपत्त्याखालील शासनाने ८ प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्रांना मान्यता दिली असून तेथेही अग्निशमन प्रशिक्षणाचे पाठयक्रम आयोजित करण्यात येतात. |
| ४.१.१०.२ | **अद्ययावत अग्निशमन प्रशिक्षण प्रबोधिनी बांधण्यातील विलंब** | |
| | एप्रिल २०१२ च्या राष्ट्रीय आपत्कालीन व्यवस्थापन मार्गदर्शक सुचनांनुसार (प्रकरण ६), सिम्युलेटर्स व इतर अत्याधुनिक साधनसामग्री यासारख्या आधुनिक प्रशिक्षण साधनांसह पर्याप्त पायाभूत सुविधा, प्रशिक्षक व सुविधा असलेली आधुनिक प्रशिक्षण केंद्रे राज्यांनी प्रस्थापित करावी. कालिना येथे १.२५ एकर क्षेत्राच्या सध्याच्या SFTC वर सराव प्रात्यक्षिकांसाठी पुरेशी मोकळी जागा व अद्यावत प्रशिक्षण सुविधा उपलब्ध नाहीत. म्हणून, DFS, मुंबई यांनी UDD, GoM कडे ५० एकर जमिनीवर एक अद्यावत अग्निशमन प्रशिक्षण प्रबोधिनी (AFTA) स्थापन करण्यासाठी एक प्रस्ताव सादर केला (जुलै २००८) ज्या प्रबोधिनीत अग्निशमन व बचावासाठीच्या वेगवेगळया साधनांबरोबरच मोकळया जागेतील प्रशिक्षण कार्यक्रम / सुविधा उपलब्ध असतील. यासाठी UDD ने ऑगस्ट २००९ मध्ये एका ठरावाद्वारे रू. ५० कोटी मंजूर केले. परंतु, सात वर्षापेक्षा अधिक काळ उलटूनही AFTA साठी जमीन अधिग्रहीत करण्यात आली नव्हती. (जुलै २०१५)<br>DFS, मुंबई यांनी सांगितले (ऑक्टोबर २०१५) की AFTA स्थापन करण्यासाठी महसूल विभागाने भिवंडी तालुक्यातील (ठाणे जिल्हा) १८ एकर जमीन हस्तांतरीत करण्यास मान्यता दिली होती आणि जमिनीच्या सद्यस्थितीची (आरक्षणमुक्त आहे अथवा नाही) पडताळणी केली जात होती. | **<u>संचालक,अग्निशमन सेवा :-</u>**<br>• शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.अशस-१४०७/३६०/ प्र.क्र.२११/नवि-२०, दिनांक ३१.०८.२००९ नुसार राज्यातील अग्निशमन सेवांचे सक्षमकरण करण्यासाठी शासन महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान राबवित आहे.<br>• या महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत आंतरराष्ट्रीय दर्जावर उपलब्ध होत असलेल्या विविध अग्निशमन सुविधांचा विचार करून महाराष्ट्रासारख्या औद्योगिक व नागरिकीकरण झालेल्या प्रगत राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाची प्रगत अग्निशमन अकादमी प्रस्थापित करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे.<br>• भिवंडी तालूक्यातील (ठाणे जिल्हा) येथील जागेवर अन्य आरक्षण असल्याचे एम.एम.आर.डी.ने. कळविले असल्यामुळे येथे प्रगत अग्निशमन अकादमी प्रस्थापित करता येणार नाही.<br>• आता या प्रगत अग्निशमन प्रशिक्षण अकादमीसाठी मौजे विराथन खुर्द, ता.जि.पालघर येथील स.नं.६०/अ ६, मधील ५-० हेक्टर म्हणजे सुमारे १२.५० एकर एवढी जागा या |

| | | |
|---|---|---|
| | | अकादमीसाठी मंजूर करण्यात आलेली आहे.<br>• लवकरच ही प्रगत अग्निशमन अकादमी प्रस्थापित होईल. प्रगत अग्निशमन अकादमीमध्ये अग्निशमनाचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रगत प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल. |
| ४.१.१०.३ | **शारिरीक स्वास्थ्य शिबीरे आयोजित न करणे** | |
| | आगीपासून बचाव हे एक वैशिष्ठयपूर्ण कार्य असते जे करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे शारिरीक स्वास्थ्य अत्युत्तम असणे आवश्यक असते. वर्ष २०११ च्या अग्नि सल्लागार स्थायी समितीच्या शिफारशींच्या सारसंग्रथाच्या परिशिष्ट ११-G नुसार, अग्निशमन कर्मचारी त्यांची कार्ये पार पाडण्यास सक्षम राहतील याची खात्री करण्यासाठी प्रत्येक सहा महिन्यांनी त्यांच्या शारिरीक क्षमता तपासणी चाचण्या घेतलया जाव्या. लेखापरीक्षेत असे आढळून आले की, निवडक सात MCs पैकी CFO, MCGM व्यतिरिक्त एकाही MC ने वर्ष २०१०-१५ दरम्यान मोहिमेवर जाणाऱ्या कर्मचाऱ्यांचे शारिरीक स्वास्थ्य तपासण्यासाठी कोणतीही शारिरीक स्वास्थ्य शिबीरे आयोजित केली नव्हती. | **<u>बृहन्मुंबई महानगरपालिका :-</u>**<br>• दि. ०९/०५/२०१५ रोजीच्या गोकुळ निवास इमारत, काळबादेवी येथील भीषण आगीनंतर सत्यशोधन समितीने अग्निशमन दलातील सर्व कर्मचाऱ्यांची नियमित वैद्यकीय तपासणी करण्याची शिफारस केली, त्यानुसार वर्ष २०१५-१६ मध्ये १२२५ (३५ अधिकारी आणि ११९० कर्मचारी) कर्मचारी ज्यांचे वय ४५ वर्षे व त्यापेक्षा जास्त होते त्यांची महानगरपालिकेच्या विविध रूग्णालयांमध्ये वैद्यकीय तपासणी करण्यात आली.<br>• या व्यतिरिक्त विविध अग्निशमन केंद्रांमध्ये योगा शिबीर, AIDS व कॅन्सर जनजागृती कार्यक्रम, तणाव व्यवस्थापन शिबीर तसेच विविध आरोग्यविषयक तपासणी शिबीर, शारिरीक क्षमता शिबीर घेण्यात आले.<br>**<u>नाशिक महानगरपालिका:-</u>**<br>• नाशिक महानगरपालिकेतील अग्निशमन दलातील अधिकारी/ कर्मचारी यांची नियमित वैदयकिय तपासणी करणेसाठी नियोजन करण्यात येत आहे.<br>**<u>अमरावती महानगरपालिका :-</u>**<br>• आगीच्या आपत्तीशी प्रभावीपणे मुकाबला करण्यासाठी अग्निशमन कर्मचा-यांची क्षमता सुधारण्यासाठी अग्निशमन कर्मचा-यांच्या ज्ञान, कौशल्य, कल, शारिरीक स्वास्थ, दृष्टी आणि बौध्दिक जागरुकतेकरिता अमनपा अग्निशमन विभागात नियमीतपणे आरोग्य शिबीर आयोजित करण्यात येतात. विभागातील फिल्ड ड्युटी कर्मचांऱ्यांकरिता ०१ अत्याधुनिक व्यायाम शाळा असून, आणखी एक खुली व्यायामशाळा सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.<br>• फिल्ड ड्युटी कर्मचाऱ्यांना नियमीत प्रशिक्षण, मॉक ड्रिल, कार्यशाळा, इत्यादी उपक्रम विभागा तर्फे आयोजित करण्यात येतात.<br>**<u>नागपूर महानगरपालिका :-</u>**<br>• अग्निशामक विभाग महानगरपालिका, नागपूर येथील कर्मचाऱ्यांची अशी शिबीरे आयोजित केली जात नव्हती. |

एम ३८२ [३००-८-१८]-८

<table>
<tr><td></td><td></td><td>• परंतु लेखापरीक्षणाच्या घेतलेल्या आक्षेपानंतर अग्निशामक विभागातील अधिकारी / कर्मचारी यांच्या स्वास्थ्याची शारीरीक क्षमता चाचणीची शिबीरे घेण्यात येतील.<br><br><u>नवी मुंबई महानगरपालिका :-</u><br>• नवी मुंबई अग्निशमन दलात दर ६ महिन्यांत शारीरिक क्षमता तपासणी शिबिरे घेतली जातात.</td></tr>
<tr><td>४.१.१०.४</td><td>अपर्याप्त सामाजिक सुसज्जता आणि जागृती</td><td></td></tr>
<tr><td></td><td>एप्रिल २०१२ च्या राष्ट्रीय आपत्कालीन व्यवस्थापन मार्गदर्शक सुचनांमध्ये, आगीच्या आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावीपणे आणि संघटीतरित्या सामना करता यावा यासाठी मॉक एक्सरसाईज आणि जागृती कार्यक्रमांद्वारे समाजाला नियमीतपणे / कायमस्वरूपी संघटीत आणि प्रशिक्षीत ठेवेल असा योग्य घोषित कार्यक्रम आखण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले होते.<br>लेखापरीक्षेत असे आढळून आले की, निवडक आठ MCs पैकी सहा मधील अग्निशमन विभाग दरवर्षी १४ ते २० एप्रिल दरम्यान फक्त अग्निप्रतिबंध सप्ताह साजरा करत होते आणि समाजापर्यंत जास्तीत जास्त प्रमाणात पोहोचण्यासाठी आणि त्याला शिक्षीत करण्यासाठी वर्षभरात नियमीतपणे इतर कोणतेही कार्यक्रम आयोजित करण्यात आले नव्हते. तसेच, निवडक आठ MCs पैकी एकाही MC ने वर्ष २०१०-१५ दरम्यान आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजनांच्या क्षेत्रांतील तज्ञ व्यक्तींना आमंत्रण देऊन सामाजिक जागृती कार्यक्रम आयोजित केले नव्हते.</td><td><u>बृहन्मुंबई महानगरपालिका :-</u><br>• MCGM चे अग्निशमन दल उत्तुंग इमारती, शाळा, शासकीय इमारती इत्यादींमध्ये नियमितपणे मॉक ड्रील आणि इर्मजन्सी इव्हॅक्युएशन ड्रील घेते. प्रत्येक वर्षी अग्निशमन सेवा सप्ताह (१४ एप्रिल ते २० एप्रिल) यामध्ये सर्वसामान्यांच्या अग्निसुरक्षा जागृतीसाठी व्याख्याने, प्रात्याक्षिके इ. सहकारी संस्था, झोपडपट्ट्या, शाळा इत्यादी ठिकाणी दाखवितात. या व्यतिरिक्त अग्निसुरक्षेविषयक प्रदर्शने विविध जागी भरविण्यात येतात.<br><br>• या व्यतिरिक्त MCGM च्या आणीबाणी व्यवस्थापन कक्षामार्फत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, नागरीक, खाजगी संस्था, अशासकीय स्वयंसेवी संख्या इत्यादींसाठी दोन दिवसाचे प्रथम प्रतिसाद प्रशिक्षण नियमितपणे चालविते. या प्रशिक्षणात प्रथमोपचार, सी.पी.आर. इम्प्रोव्हाईज स्ट्रेचर, प्राथमिक अग्निशमन, रोप रेस्क्यु ऍन्ड कॅज्युअल्टी हॅन्डलींग यांचा समावेश असतो. तसेच आणीबाणी व्यवस्थापन कक्षाद्वारे वर्षातून दोन वेळा MCGM च्या कार्यक्षेत्रातील २४ विभागांमध्ये आग आणि पूर परिस्थिती आणीबाणी प्रसंगाची मॉक ड्रील घेतली जाते.<br><br>• MCGM चे अग्निशमन दल हे विविध ठिकाणे, शाळा इत्यादी जागी शैक्षणिक वाहनाद्वारे जनजागृती कार्यक्रम नियमितपणे राबविते. दलातील अनुभवी अधिकाऱ्यांद्वारे प्राथमिक अग्निशमन आणि इव्हॅक्युएशन विषयक प्रशिक्षण राबविले जाते. बाहेरील तज्ञांद्वारे रासायनिक आणीबाणी परिस्थिती हाताळणे, आण्विक आणीबाणी इत्यादी विषयांवर अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण देण्यात येते. २४ विभागाच्या कार्यक्षेत्रात अग्निसुरक्षेविषयीची भित्तीचित्रे लावण्यासाठी वितरीत करण्यात आली आहेत.<br><br><u>नाशिक महानगरपालिका:-</u><br>• संरक्षण उपाययोजना क्षेत्रातील तज्ञांना बोलावुन सामाजिक जागृतीच्या दृष्टीने जनजागृती व प्रशिक्षण आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. यासाठी मा. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांची मदत घेता येईल. तसेच राज्य अग्निशमन</td></tr>
</table>

प्रशिक्षण केंद्र यांचे सहकार्य घेण्यात येईल.

**अमरावती महानगरपालिका :-**

- अमरावती महापालिका अग्निशमन विभागातर्फे नियमीत पणे मॉक ड्रिल तसेच जनजागृती कार्यक्रम घेण्यात येतात. विभागातील वरिष्ठ फायरमन आणि त्यांच्या सहयोगी दला मार्फत शालेय शिक्षण विद्यार्थी, NCC कॅडर्स, रुग्णालय, इत्यादी ठिकाणी वेळोवेळी डेमो देण्यात येते. तथापी अग्निशमन विभागाचे कामकाजाचे स्वरुप लक्षात घेता आणि मनुष्य बळाची कमतरता असल्यामुळे फक्त आवश्यक त्याठिकाणी मॉक ड्रिल / प्रात्यशिके देण्यात येतात.

**नागपूर महानगरपालिका :-**

- अग्निशामक विभाग महानगरपालिका नागपूरद्वारे एप्रिल, २०१२ च्या राष्ट्रीय आपत्कालीन व्यवस्थापन मार्गदर्शक सुचनाअन्वये आगीच्या आपत्कालीन परिस्थितीत काम करण्याकरीता विभागातर्फे वेळोवेळी मॉक एक्सरसाईज आणि जागृती कार्यक्रमाद्वारे आयोजित केले जातात.

**नवी मुंबई महानगरपालिका**

- नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात शाळा,कॉलेज,ऑफिसेस,हॉस्पीटल,उंच गृहसंकुले अशा विविध आस्थापनामध्ये अग्निशमन सेवा सप्ताह निमित्ताने दिनांक १४ ते २० एप्रील या कालावधीमध्ये तसेच इतर वेळेसही एखादया सोसायटीने किंवा वाणिज्यीक इमारतीधारकाने मागणी केल्यास सदर ठिकाणी अग्निशमन प्रात्यक्षीकांचे आयोजन करुन नागरीकांमध्ये जनजागृती केली जाते.

**संचालक,अग्निशमन सेवा :-**

- दिनांक १४ एप्रिल, १९४४ रोजी मुंबई गोदीत एस.एस.फोर्ट स्टिकिन् या जहाजाला आग लागून झालेल्या भीषण स्फोटात अग्निशमन व विमोचनाचे कार्य करीत असताना मुंबई अग्निशमन दलाच्या ६६ जवानांना हौतात्म्य प्राप्त झाले. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सुचनेनुसार जनतेमध्ये अग्निशमनाबाबत जनजागृती निर्माण होण्यासाठी प्रत्येक वर्षी १४ ते २० एप्रिल या कालावधीत अग्निशमन सेवा सप्ताह पाळण्यात येतो.
- या सप्ताहामध्ये अग्निशमनाबाबत जनजागृती होण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय निबंध व चित्रकला स्पर्धा एका घोषवाक्यावर आयोजित केली जाते. तसेच औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी ७ इव्हेंटवर इंडस्ट्रीयल फायर ड्रील स्पर्धा तसेच नियमित अग्निशमन सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी टेक्टिकल मेडली ड्रील व इंडिव्हीज्युअल

| | | |
|---|---|---|
| | | लॅडर ड्रील स्पर्धा आयोजित केली आहे.<br>• अग्निशमन सेवा सप्ताहाच्या घोषवाक्याच्या आधारे राज्यातील विविध सिनेमागृहामध्ये माहितीपट/स्लाईड्स दाखविण्यात येतात. वरील मुंबई दुरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे इत्यादी प्रसार माध्यमांद्वारे अग्निशमनाबाबत जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित केले जातात. दिनांक २० एप्रिल रोजी अग्निशमन सेवा सप्ताहाचा समारोप समारंभ आयोजित केला जातो. याप्रसंगी प्रमुख अतिथींना मानवंदना देण्यात येते. |
| | **शिफारस ५- आगविषयक सर्व आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आणि इतर आपत्कालीन परिस्थितींशी कार्यक्षमतेने व प्रभावीपणे मुकाबला करण्यासाठी राज्य शासनाने (i) अग्निशमन कर्मचारी व दुय्यम अधिकारी यांच्या प्रशिक्षणाच्या गरजांचा आढावा घ्यावा आणि प्रशिक्षणात कोणत्याही तफावती / त्रुटी राहणार नाहीत याची सुनिश्चिती करावी, (ii) अद्यावत अग्निशमन प्रशिक्षण प्रबोधिनी प्रस्थापित करण्याच्या कार्यास वेग द्यावा, आणि (iii) मोहिमेच्या अग्रक्रमातील कर्मचारी सदासर्वकाळ अतिशय सतर्क राहतील याची खात्री करण्यासाठी नियमीतपणे त्यांच्यासाठी शारिरीक स्वास्थ्य शिबीरे आयोजित करावी.** | **महाराष्ट्र अग्निशमन सेवा ॲकडमी,कलिना,सांताक्रूज येथे कार्यरत असुन तेथे अग्निशामक व दुय्यम अधिकारी यांच्यासाठी अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम आयोजित केले जातात.प्रगत अग्निशमन प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानाअंतर्गत पालघर येथे प्रगत अग्निशमन अकॅडमी स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे. या प्रगत अग्निशमन प्रशिक्षण अकादमीसाठी मौजे विराथन खुर्द, ता.जि.पालघर येथील स.नं.६०/अ ६, मधील ५-० हेक्टर म्हणजे सुमारे १२.५० एकर एवढी जागा या अकादमीसाठी मंजूर करण्यात आलेली आहे लवकरच ही प्रगत अग्निशमन अकादमी प्रस्थापित होईल. या प्रगत अग्निशमन अकादमीमध्ये अग्निशमनाचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रगत प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल. प्रत्येक महानगरपालिकेत अग्निशमन सेवेतील कर्मचारी व अधिकारी यांच्या शारीरीक क्षमता संतुलित राखण्यासाठी नियमीतपणे स्वास्थ्य शिबीरे आयोजित करण्यात येतात.** |
| **४.१.११** | **अपर्याप्त तपासणी आणि संनियंत्रण कार्यतंत्रे** | |
| **४.१.११.१** | **आग तपासणी अहवाल तयार करण्यातील कमतरता** | |
| | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (जून २०१४ मध्ये सुधारीत केलेला) च्या कलम २८९ नुसार शहरातील आगीच्या प्रत्येक घटनेचा अहवाल अग्निशमन केंद्राच्या मुख्य किंवा इतर प्रभारी अधिकाऱ्याने महापालिका आयुक्तांना आगीच्या घटनेच्या पुढील दिवसांपर्यंत सादर करावा ज्यांनी आवश्यकतेनुसार पुढील चौकशी करावी व शहरात घडलेल्या अशा आगीच्या सर्व घटनांचे एक साप्ताहिक विवरण MC च्या स्थायी समितीला सादर करावे. हा अधिनियम MCGM व्यतिरिक्त सर्व MCs ना लागू आहे. याच तरतुदी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (डिसेंबर २०११ मध्ये सुधारीत) च्या कलम ३६४ अंतर्गत MCGM ला देखील लागू आहेत.वर्ष २०१०-१५ दरम्यान निवडक आठ MCs पैकी सहा MCs च्या स्थानिक कार्यकक्षेत एकूण २,८२२ आगीच्या घटना (गंभीर आणि किरकोळ) घडल्या ज्यामध्ये मृतांची संख्या १,१८७ होती. MCGM क्षेत्रात याच कालावधीत २४,३३२ आगीच्या घटना (गंभीर आणि किरकोळ) नोंदल्या गेल्या ज्यामधील मृतांची | <u>**बृहन्मुंबई महानगरपालिका :-**</u><br>• MMC ACT १८८८ (Amended upto date) कलम ३६४ मधील तरतुदींनुसार आगीच्या किंवा इतर घटनांचा अहवाल, जर वित्तहानी रू. ५ लाख किंवा त्यापेक्षा अधिक किंवा जिवीतहानी झालेली असल्यास मनपा आयुक्तांना प्रतिवेदीत केला जातो. तसेच अशा सर्व घटनांचा साप्ताहित विवरण मनपाच्या स्थायी समितीला सादर केला जातो.<br>• MCGM च्या कार्यक्षेत्रात २०१०-२०१५ च्या कालावधीत एकूण २४,३३२ आगीच्या घटना घडल्या. या घटनांमध्ये गंभीर व किरकोळ घटनांचा समावेश आहे. ज्या घटनांमध्ये वित्तहानी रू.५ लाख किंवा त्यापेक्षा जास्त आहे किंवा जिवीतहानी झालेली आहे अशा सर्व घटनांचे प्रतिवेदन मनपा आयुक्तांना व स्थायी समितीस देण्यात आलेले आहे.<br>• MCGM चे अग्निशमन दल हे आगीच्या अहवालासाठी ठराविक प्रपत्र वापरते. घटनेवरील |

| | | |
|---|---|---|
| | संख्या १,१४४ होती. लेखापरीक्षकांना असे आढळून आले की, CFOs नी आगीचे तपासणी अहवाल तयार करण्यासाठी / दाखल करण्यासाठी कोणताही एक समान नमुना विहित केला नव्हता. म्हणूनच, MCs चे सर्व CFOs आगीच्या घटनांचा तपशील वेगवेगळया तऱ्हेने आणि पध्दतीने दाखल करत होते. दोन MCs (अमरावती आणि नागपूर) मध्ये अहवाल सादर करण्यासाठी जो नमुना वापरला जात होता त्यात संपुर्ण तपशीलाचीही नोंद घेतली जात नव्हती. तसेच, MCGM व्यतिरिक्त इतर CFOs कडून संबंधित महापालिका आयुक्तांना आणि स्थायी समित्यांना नियमीतपणे आग तपासणी अहवाल पाठवले जात नव्हते. आगीच्या घटनांचा अहवाल देण्यातील अशा तफावतींमुळे उच्च प्राधिकाऱ्यांना आगीच्या आपत्तींमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीचे मुल्यमापन आणि संनियंत्रण दीर्घकालीन रीतीने करणे आणि योग्यवेळी उपाययोजना सुचविणे शक्य होणार नाही. | संबंधित अधिकारी किंवा कार्यभारी अधिकारी या प्रपत्रात प्रमुख अग्निशमन अधिकारी यांना प्रतिवेदन देतात.तद्नंतर वित्तहानी रू. ५ लाख किंवा ५ लाखापेक्षा जास्त असल्यास किंवा जिवीतहानी झालेली असल्यास प्रमुख अग्निशमन अधिकारी हे मनपा आयुक्त व स्थायी समितीस अहवाल सादर करतात.<br>• MCGM च्या अग्निशमन दलाची ''आगीच्या किंवा अन्य घटनांच्या प्रतिवेदनाची कार्यपध्दती सुस्थापित असून त्यामुळे प्राधिकाऱ्यांना परिस्थितीचे मुल्यमापन व नियंत्रण करण्यास व भविष्यातील धोरणे निश्चित करण्यास व कार्यवाही पध्दती ठरविण्यास मदत होते.<br>**<u>पुणे महानगरपालिका :-</u>**<br>• पुणे शहर व परिसरात उद्भवणाऱ्या आग व अपघातांचे अहवाल साप्ताहिक स्वरुपात पुणे मनपाच्या म. स्थायी समितीसमोर विषयपत्राद्वारे मा. महापालिका आयुक्त यांचे स्वाक्षरीने सादर करण्यात येतो. तसेच त्यांचे निवारणासाठी केलेल्या उपाययोजनांचे वर्णन मध्यवर्ती अग्निशमन केंद्रातील तपशील पुस्तक व संबंधित उप केंद्राकडील तपशील पुस्तकात नोंदविण्यात येतो. प्रत्येक अग्निशमन वाहनाच्या स्वतंत्र असणाऱ्या आगीच्या डायरीमध्ये देखील प्रत्यक्षदर्शी अहवालाची नोंद केली जाते.<br>• साप्ताहिक तपासणी अहवालाची पाहणी करून घटनेच्या गांभिर्यानुसार मा. आयुक्त व मा. स्थायी समिती यांचेकडून चर्चेअंती मार्गदर्शक सूचनाही केल्या जातात. तसेच त्रुटी निर्मुलनासाठी आवश्यक त्या सुविधा निर्माण करून देणेबाबत संबंधिताना आदेशित केले जाते.<br>**<u>नाशिक महानगरपालिका:-</u>**<br>• नाशिक महानगरपालिका अग्निशमन दलाकडुन दर आठवडयाला मा. आयुक्त सो. व मा. स्थायी समितीला अहवाल सादर करण्यात येतो.<br>**<u>अमरावती महानगरपालिका :-</u>**<br>• अमरावती महापालिका अग्निशमन विभागातर्फे शहरातील आगीच्या प्रत्येक घटनेचा अहवालाची नोंद घेण्यात येते सर्व घटनांचे साप्ताहीक विवरण मा.स्थायी समिती समक्ष आर्थिक वर्ष २०१८-१९ पासून सादर करण्यात येईल. अमरावती महापालिकेच्या अग्निशमन विभागाचा सदरचा अहवाल अद्ययावत करण्यात आला आहे.<br>**<u>नागपूर महानगरपालिका :-</u>** |

एच ३८२ [३००-८-१८]-९

| | | |
|---|---|---|
| | | • नागपूर शहरामध्ये घडत असलेल्या आगीच्या प्रत्येक घटनेचा अहवाल " महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम २८९" नुसार आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांना पाठविण्यात येतो.<br>• विभागाकडे आगीच्या घटनेचा तपासणीचा अहवाल हा जुना असून आजपर्यंत त्याचप्रमाणे कार्यवाही करण्यात येत होती.<br>• लेखापालांनी घेतलेल्या आक्षेपांची नोंद घेवून त्याप्रमाणे तपशिलाबाबत नवीन नमुना तयार करण्याची प्रक्रिया चालू आहे.<br>**<u>नवी मुंबई महानगरपालिका :-</u>**<br>• नवी मुंबई अग्निशमन दलात येणा-या प्रत्येक वर्दीची माहिती नवी मुंबई आपत्ती निवारण कक्षाला कळविली जाते व त्यांच्या मार्फत नवी मुंबई आयुक्त सो यांना कळविण्यात येते.तसेच मोठया वर्दीबाबतची माहिती अग्निशमन विभागप्रमुखांमार्फत मा.आयुक्त यांना कळविण्यात येते. |
| **४.१.११.२** | **इमारतींची तपासणी न करणे** | |
| | महाराष्ट्र आगप्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना, अधिनियम २००६ च्या कलम ५(१) नुसार, आगप्रतिबंध आणि जीव सुरक्षा उपाययोजनांची पर्याप्तता किंवा त्यांच्या उल्लंघनांची पडताळणी करण्यासाठी ज्या इमारतींची तपासणी करणे गरजेचे असल्याचे निदर्शनास येईल अशा इमारतींच्या रहिवाश्यांना तीन तासाची आगावू सुचना दिल्यानंतर DFS किंवा CFO किवा कोणतीही नामनिर्देशित अधिकारी सूर्योदय आणि सुर्यास्त यामधील कोणत्याही वेळेस एखाद्या जागेची किंवा इमारतीची तपासणी करू शकतो.<br>लेखापरीक्षेत असे आढळून आले की, दोन MCs (MCGM आणि ठाणे) व्यतिरिक्त निवड केलेल्या सहा MCs च्या CFOs पैकी एकानेही वर्ष २०१०-१५ दरम्यान कोणत्याही इमारती, शैक्षणिक संस्था, रूग्णालये, मॉल, मल्टीप्लेक्स, उद्योग, सार्वजनिक सम्मेलनाच्या जागा, उपाहारगृहे इत्यादींची तपासणी केली नव्हती. तसेच, ठाणे जिल्हयातील केंद्रीय उत्पादन शुल्क कार्यालय, प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि पोलीस अधिक्षकांचे कार्यालय यांच्या तपासणी दरम्यान (जून २०१२) CFO ना असे आढळून आले की, या तीन इमारतींमध्ये एकही आग प्रतिबंधक आणि जीव सुरक्षा साधन बसविण्यात आले नव्हते. या कार्यालयांना जुलै २०१२ मध्ये जरी नोटीस जारी करण्यात आल्या होत्या तरी अग्निसुरक्षा साधनांच्या अभावावर CFO नी घेतलेल्या आक्षेपांचे निराकरण डिसेंबर २०१५ पर्यंत करण्यात आले नव्हते. | **<u>बृहन्मुंबई महानगरपालिका :-</u>**<br>• महाराष्ट्र आग प्रतिबंधक प्रतिबंध व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ मधील तरतुदींनुसार MCGM चे अग्निशमन दल हे MCGM च्या कार्यक्षेत्रातील विविध इमारतींची अग्निसुरक्षा व जीवसंरक्षक उपाययोजनांमध्ये कमतरता आढळून येते, त्या इमारतींच्या मालक / भोगवटादार यांच्यावर योग्य ती कारवाई करते.<br>**<u>पुणे महानगरपालिका :-</u>**<br>• सन 2010-2015 दरम्यान पुणे मनपाच्या अग्निशमन विभागाने प्राप्त अधिकारात व नागरिकांच्या मागणीनुसार निवासी, शैक्षणिक, रुग्णालये, मॉल, मल्टीप्लेक्स, उपहारगृहे, सार्वजनिक कार्यक्रमांच्या जागा अशा विविध प्रकारच्या इमारतींची आग व सुरक्षेच्या दृष्टीने पाहणी / तपासणी करणेसाठी वारंवार प्रयत्न केले जात आहेत.<br>• विविध व्यावसायिक , शैक्षणिक, रुग्णालये यांचे परवाना नुतनीकरणासाठी अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणेचे धोरण आहे. तसेच सार्वजनिक संमेलनाचे वेळी पोलीस विभागाकडून देण्यात येणाऱ्या परवान्यासाठी अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्राची अट घातलेली असते. साहजिक यामुळे आग सुरक्षा विषयक काळजी घेणे भाग असते. |

| | | |
|---|---|---|
| | | **नाशिक महानगरपालिका:-**<br>• नाशिक शहरामध्ये असलेल्या इमारतींपैकी मोठे हॉस्पीटल्स, मॉल्स, मल्टिप्लेक्सेस या ठिकाणी मॉकड्रिल आयोजित करण्यात आलेले असुन त्या व्यतिरिक्त मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी अग्निशमन यंत्रणेच्या तपासण्या केलेल्या आहेत.<br>**अमरावती महानगरपालिका :-**<br>• अमरावती महापालिका अग्निशमन विभागाकडून अग्निशमन कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. सदर दलाचे प्रमुखपदी वरिष्ठ फायरमन यांना नेमण्यात आले आहे. सदर दला मार्फत क्षेत्रातील सरकारी कार्यालय, शैक्षणिक इमातरती, सिनेमा हॉल, नाट्यगृहे, इस्पितळे, पेट्रोल पंम्पस, वाणिज्यीक / व्यापारी संकुले, मॉल्स, तारांकीत हॉटेल्स, रेस्टॉरंन्ट, मोठी व्यावसायीक कार्यालय, मंगल कार्यालये, LPG केंद्र फटाका दुकाने, लाकूड गौरण्या, जिनींग प्रेसींग इत्यांदीची अग्निसुरक्षतेच्या दृष्टीकोनातून तपासणी करण्याचे काम प्रगती पथावर आहे.<br>**नागपूर महानगरपालिका :-**<br>• सन २०१०-१५ या दरम्यान नागपूर शहरामध्ये असलेल्या इमारती शैक्षणिक संस्था, रुग्णालय, मॉल मल्टीप्लेक्स, उद्योग, सार्वजनिक संमेलनाच्या जागा, उपहारागृह, इ. ची "महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम ५ (१) नुसार तपासणी करुन आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजनांची अपर्याप्तता किंवा त्याचे उल्लंघन करणाऱ्या इमारत मालक धारकाविरुध्द विभागातर्फे कार्यवाहीची प्रक्रिया सुरु केली आहे. त्यामुळे बरीच (१२) ईमारतधारक यांनी या प्रकरणाबाबत मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर येथे महानगरपालिका विरुध्द याचिकासुध्दा दाखल केलेल्या आहेत.<br>**नवी मुंबई महानगरपालिका :-**<br>• नवी मुंबई कार्यक्षेत्रात आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ अन्वये विभागातील नामनिर्देशित अधिका-यांमार्फत विविध प्रकारच्या इमारतीची तपासणी करुन त्यांना अग्निशमन यंत्रणा कार्यान्वीत करण्यास भाग पाडले जाते. |
| ४.१.११.३ | **अग्निशमन कृती कक्षाची निर्मिती न करणे.** | |
| | महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील तरतुर्दीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि संनियंत्रणासाठी MCGM ने ९९ अधिकाऱ्यांचा (३३ केंद्र अधिकारी आणि ६६ सहाय्यक केंद्र अधिकारी ) समावेश | **बृहन्मुंबई महानगरपालिका :-**<br>• प्रथमतः (ऑक्टोबर २०१२) इमारतींची नियमितत तपासणी करणे, नोटीस जारी करणे, पाठपुरावा करणे, कायदेशीर कारवाई करणे इत्यादी कार्यांकरीता ''अग्निशमन कृती कक्ष'' |

| | | |
|---|---|---|
| | असलेला अग्निशमन कृती कक्ष या नावाचा एक स्वतंत्र कक्ष निर्माण करण्याचे प्रस्तावित केले (ऑक्टोबर २०१२). परंतु, मार्च २०१६ पर्यंत अग्निशमन कृती कक्षाची निर्मिती करण्यात आली नव्हती. अग्निशमन कृती कक्षाची निर्मिती न केल्यामुळे इमारतींची नियमीत तपासणी करणे, नोटीस जारी करणे, पाठपुरावा करणे, कायदेशीर कारवाई करणे इत्यादी कार्ये MCGM च्या विद्यमान मोहीम कर्मचारी / अधिकारी यांच्याकडून पार पाडली जात होती ज्याचा प्रतिकुल परिणाम आपत्कालीन परिस्थितीच्या दैनंदीन हाताळणीवर होत होता.<br>MCGM ने सांगितले (एप्रिल २०१६) की, प्रभावी तपासणी आणि अधिनियमाचे अनुपालन यासाठी त्यांनी ''अग्निशमन व्यवस्थापन प्रणाली'' या नावाची एक IT आधारित प्रणाली विकसीत केली आहे ज्याद्वारे ज्या इमारती अधिनियमातील तरतुदींचे अनुपालन करत नाहीत त्यांच्यावर संनियंत्रण ठेवले जाईल आणि त्याची योग्य प्रकारे नोंद ठेवली जाईल. | या नावाचा स्वतंत्र कक्ष निर्माण करण्याचे प्रस्तावित होते. परंतु तदनंतर सदर कार्ये विद्यमान विभागीय अग्निशमन अधिकारी ते सहाय्यक केंद्र अधिकारी पदांवरील अधिकाऱ्यांना सोपविण्यात आले.<br>• अग्निशमन दलाचे नियंत्रण कक्ष हे कार्य करित असताना याचा प्रतिकुल परिणाम आपत्कालीन परिस्थितीच्या दैनंदिन हाताळणीवर होऊ नये यासाठी पुरेशी काळजी घेते.<br>• MCGM च्या अग्निशमन दल माहिती तंत्रज्ञान विभाग व सल्लागार PWC यांच्या सल्ल्याने RFP डॉक्युमेंट तयार केलेले असून ते इमारतीच्या तपासणीसाठी 'इमारत तपासणी प्रणाली' या नावाचे सॉफ्टवेअर विकसीत करत आहे.<br>• हे RFP डॉक्युमेंट अंतिम टप्प्यात असून 'इमारत तपासणी प्रणाली' खरेदी करण्यासाठी लवकरच निविदा मागविण्यात येतील जेणेकरून विद्यमान नामनिर्देशित अधिकाऱ्यांना इमारतींची तपासणी करणे, नोटीस जारी करणे, पाठपुरावा करणे, कायदेशीर कारवाई करणे इ. कार्यात सहाय्य होईल. |
| ४.१.११.४ | **निम्न स्तरावील कर्मचाऱ्यांकडून अग्निशमन केंद्राचे नियंत्रण केले जाणे.** | |
| | अग्निशमन केंद्राचा प्रभारी केंद्र अधिकारी हा एक महत्वपूर्ण कार्याधिकारी असतो जो आगीची सूचना मिळाल्यावर त्यावर त्वरीत कारवाई करण्यासाठी स्वतःला आणि इतर कर्मचाऱ्यांना नेहमी सतर्क ठेवतो. केंद्राला देण्यात आलेली सर्व अग्निशमन उपकरणे, भांडार सामुग्री आणि साधनसामुग्री यांची योग्य साठवण आणि देखभाल करणे तसेच लॉग-बुक्स, नोंद पुस्तिका, हजेरी पत्रक इत्यादी ठेवणे आणि त्याच्या वरिष्ठांना सर्व विवरणे व विवरणपत्रे सादर करणे यासाठी देखील जबाबदार असतो.<br>लेखापरीक्षेत असे आढळून आले की, MC, नागपूर अंतर्गत आठ अग्निशमन केंद्रे आहेत ज्यापैकी फक्त दोन अग्निशमन केंद्रांचे नियंत्रण केंद्र अधिकाऱ्यांकडून केले जात होते व ऑक्टोबर २०१० पासून केंद्र अधिकाऱ्यांनी रिक्त पदे न भरल्यामुळे उर्वरित सहांचे नियंत्रण अग्निशमन प्रणेत्यांकडून केले जात होते. दोन केंद्र अधिकाऱ्यांपैकी एका केंद्र अधिकाऱ्याकडे CFO चा अतिरिक्त कार्यभार होता. MC, अमरावती मध्ये दोन अग्निशमन केंद्रे होती ज्यापैकी एक केंद्र अग्निशमन कर्मचाऱ्याकडून आणि दुसरे अग्निशमन प्रणेत्याकडून नियंत्रित केले जात होते, ज्याच्याकडे ऑगस्ट २०१२ पासून अग्निशमन अधिक्षकाचा अतिरिक्त कार्यभार देखील होता.<br>केंद्र अधिकाऱ्यांच्या कार्य व जबाबदाऱ्यांचा आवाका लक्षात घेता निम्नश्रेणीतील कर्मचाऱ्यांकडून (अग्निशमन कर्मचारी आणि अग्निशमन प्रणेते) अग्निशमन केंद्रांचे नियंत्रण केले जाणे ही स्थिती आगीच्या आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावीपणे मुकाबला | **<u>नागपूर महानगरपालिका :-</u>**<br>• नागपूर अग्निशमन विभागाकडे फक्त दोनच सक्षम अधिकारी असल्याने त्यापैकी १ उपमुख्य अग्निशमन अधिकारी व १ प्रभारी प्रमुख अग्निशमन अधिकारीचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.<br>• विभागाने उर्वरीत ८ स्थानकांकरीता ज्या कर्मचाऱ्यांची पदोन्नती उप अग्निशमन अधिकारी या पदावर झालेली आहे व तसेच ज्या अधिकाऱ्यांनी या पदाकरीता लागणारी शैक्षणिक पात्रता पुर्ण केलेली आहे अशा अधिकाऱ्यांना स्थानकाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.<br>**<u>अमरावती महानगरपालिका :-</u>**<br>• अमरावती महापालिकेत मुख्य अग्निशमन अधिकारी तसेच सहाय्यक अग्निशमन अधिकारी असे दोन पदे रिक्त आहेत. सद्य:स्थितीत अग्निशमन अधिक्षक पदाच्या अतिरिक्त कार्यभार SO कोर्स उर्त्तीर्ण लिडींग फायरमन यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. तसेच विभागवार मा.उपायुक्त (सा.) यांचे प्रशासकीय नियंत्रण आहे.<br>• अग्निशमन विभागात सद्यस्थितीत चार उपकेंद्र कार्यरत आहे त्यापैकी एक मुख्य कार्यालय वालकंट कंपाउट येथे असून अग्निशमन उपकरणे, भांडार सामुग्री, लौक बुक्स, नोंद |

| | | |
|---|---|---|
| | करताना आणि गंभीर प्रसंगी धोरणात्मक निर्णय घेताना आदर्शवत ठरली नसती. | पुस्तिका हजेरी पत्रक इत्यादी ठेवण्यात आलेले आहे. |
| ४.१.११.५ | **अनुज्ञापक संस्थांनी जारी केलेल्या प्रमाणपत्रांवर संनियंत्रण न ठेवणे.** | |
| | महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम ९(१) आणि (३) नुसार एखाद्या इमारतीत किंवा त्यातील काही भागात अग्निप्रतिबंधात्मक आ ण जीव सुरक्षा साधने पुरविण्याचे कार्य हाती घेण्यासाठी अनुज्ञापक संस्था म्हणून कामकाज करण्यासाठी एखादी व्यक्ती किंवा व्यक्तींची संघटना यांना MCs चे CFOs परवाना देऊ शकतात. अशाप्रकारे दिलेला परवाना एक वर्षासाठी वैध असतो ज्याचे तत्सम कालावधीसाठी नूतनीकरण केले जाते किंवा काही कारणांसाठी ते नाकारले जाते जी कारणे लिखित स्वरूपात नोंदवायची असतात. तसेच, महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना नियम, २००९ च्या नियम ४(१) आणि (२) नुसार अनुज्ञापक संस्थेने इमारतीमध्ये अग्निप्रतिबंधात्मक आणि जीव सुरक्षा साधनांची व्यवस्था केल्याविषयी प्रपत्र –अ मध्ये एक प्रमाणपत्र जारी करावे ज्यानंतर त्या अनुज्ञापक संस्थेने प्रत्येक वर्षी दोन वेळा (जानेवारी आणि जुलै) प्रपत्र ब मध्ये इमारती किंवा मालमत्तांमध्ये प्रस्थापित केलेल्या अग्निप्रतिबंधात्मक आणि जीव सुरक्षा साधनांची देखभाल व्यवस्थित केली जाऊन त्या उत्तम आणि कार्यक्षम स्थितीत असल्याविषयी प्रमाणपत्र सादर करावे. मार्च २०१६ रोजी, राज्यात वैध प्रमाणपत्र प्राप्त अशा २९० अनुज्ञापक संस्था होत्या.<br>निवडक आठ MCs मधील दस्तऐवजांच्या लेखापरीक्षेत खालील बाबी आढळून आल्या:<br>• निवडक आठ MCs पैकी चार MCs मध्ये ज्या १५,३३८ इमारतींना २०१०-१५ दरम्यान अंतिम फायर NOCs दिली गेली होती त्यापैकी फक्त ४५९ इमारतींविषयी (तीन टक्के) अनुज्ञापक संस्थेने प्रपत्र-ब मधील प्रमाणपत्रे जारी केली होती. एकूण १५,३३८ इमारतींपैकी ११,९२५ इमारती MCGM च्या कार्यकक्षेत होत्या ज्यापैकी याच कालावधीत फक्त २०५ प्रपत्र ब प्रमाणपत्रे (दोन टक्के) अनुज्ञापक संस्थांनी जारी केली होती. तसेच, निवडक आठ MCs मधील ५३ शासकीय इमारती / रूग्णालये / शैक्षणिक संस्था/ व्यापारी आस्थापना यांची लेखापरीक्षकांनी संयुक्त प्रत्यक्ष तपासणी केली असता असे आढळून आले की, अनुज्ञापक संस्थांनी २०१०-१५ दरम्यान या मालमत्तांची कोणतीही तपासणी केली नव्हती आणि म्हणूनच प्रपत्र-ब मधील प्रमाणपत्रे जारी केली नव्हती.<br>• MC, नाशिकमध्ये परवान्याच्या वैधतेचा कालावधी संपल्यानंतर सहयाद्री रूग्णालयाला एका अनुज्ञापक संस्थेने प्रपत्र-अ मधील प्रमाणपत्र जारी केले होते जे नियमबाहय होते. रूग्णालयाने अग्निशमन विभागाला प्रमाणपत्र सादर केले होते ज्या आधारावर रूग्णालयाला फायर NOC जारी करण्यात आली होती.<br>• तीन MCs मध्ये अनुज्ञापक संस्थांनी तीन आस्थापनांना जानेवारी आणि जुलै | **<u>बृहन्मुंबई महानगरपालिका :-</u>**<br>• महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ च्या कलम ९ (१) आणि (३) नुसार परवाने महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचलनालय कार्यालयाद्वारे दिले जातात. दि. ३१/०७/२०१६ पर्यंत या अधिनियमांनुसार ४३८ अनुज्ञापक संस्थांची नोंदणी झालेली आहे.<br>• MCGM च्या अग्निशमन दलाने इमारतींच्या भोगवटा प्रमाणपत्रासाठी ना हरकत प्रमाणपत्र देतेवेळी विकासक / वास्तुविशारद यांनी 'प्रपत्र-अ' सादर करणे अनिवार्य केलेले आहे. त्याचप्रमाणे इमारती / मालमत्तमध्ये प्रस्थापित केलेल्या अग्निप्रतिबंधात्मक आणि जीव सुरक्षा साधनांची देखभाल व्यवस्थित केली जाऊन त्या उत्तम आणि कार्यक्षम स्थितीत असल्याविषयी 'प्रपत्र-ब' सादर करणे वर्षातून दोन वेळा (जानेवारी आणि जुलै) संबंधित मालक / भोगवटादार यांना बंधनकारक केलेले आहे. MCGM च्या कार्यक्षेत्रातील 'प्रपत्र-ब' सादर करण्याकरीता थेट MCGM च्या वेबसाईटवर अनुज्ञापक संस्थेने जारी केलेले 'प्रपत्र-ब' अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे.<br>**<u>पुणे महानगरपालिका :-</u>**<br>• सन 2010-2015 दरम्यान सन 2011 साली महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपायोजना अधिनियम 2006 चे तरतुदीनुसार पात्र व्यक्ती वा संस्थाना पुणे मनपाचे लायसन्स अभिकरण वाटप केलेले आहे. त्यांचेकडून सदर अधिनियमातील तरतुदीनुसार प्रपत्र ब प्राप्त झाली आहेत. मे. डीझनियर फायर एन्टरप्राईजेस प्रा. लि., पुणे यांना चार महिन्यांच्या कालावधीसाठी ( मार्च ते जून 2015 ) साठी दिलेली प्रमाणपत्रे चुकीची असल्याचे व पुढील काळात सहा महिने कालावधीसाठी प्रमाणपत्रे सादर करण्याचे त्यांना सूचित करण्यात आलेले आहे. प्रपत्र ब मधील प्रमाणपत्रे ही सहा महिने कालावधीसाठी सादर करणेचे कर्तव्य आस्थापना मालकांचे असल्याचे महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपायोजना अधिनियम 2006 चे तरतुदीमध्ये नमूद आहे.<br>**<u>नाशिक महानगरपालिका:-</u>**<br>• अनुज्ञापक संस्थेचे प्रमाणपत्र दि.५/१/२०१४ पावेतो होते. सदर संस्थेने प्रत्यक्ष यंत्रणा बसविणेचे काम त्यापुर्वी पुर्ण केलेले होते. व दाखल्यासाठी दि.७/१/२०१४ ला अर्ज सादर |

महिन्यात जारी करावयाच्या दोन सहामाही प्रमाणपत्रांऐवजी प्रपत्र ब मध्ये एका संपूर्ण वर्षाच्या कालावधीची प्रमाणपत्रे जारी केली होती. इतर तीन प्रकरणांत अनुज्ञापक संस्थेने जारी केलेल्या प्रमाणपत्रांमध्ये कोणत्याही कालावधीची उल्लेख करण्यात आला नव्हता. तसेच, MC, पुणे मध्ये अनुज्ञापक संस्थेने १० आस्थापनांना प्रपत्र ब मध्ये सहा महिन्यांच्या कालावधीऐवजी चार महिन्यांच्या कालावधीसाठी (मार्च ते जून २०१५) प्रपत्र ब मध्ये प्रमाणपत्रे जारी केली होती. अशी चुकीची प्रमाणपत्रे CFO, पुणे यांनी मात्र स्विकारली होती आणि अनुज्ञापक संस्थेविरूध्द कोणतीही कारवाई केली नव्हती.

वर नमूद केलेल्या सर्व प्रकरणांमध्ये CFOs नी महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना नियम, २००९ च्या नियम १७ अंतर्गत कसूरदार अनुज्ञापक संस्थांना त्यांनी परवान्याच्या अटींचे पालन न केल्याबद्दल अकार्यक्षमता, गैरव्यवहार किंवा इतर कोणत्याही गंभीर कारणांसाठी कोणत्याही कारणे दाखवा नोटीसा जारी केल्या नव्हत्या.

सचिवांनी वस्तुस्थिती मान्य केली आणि सांगितले की अग्निसुरक्षा हे एक सामुहिक प्रयत्नाने करायचे कार्य आहे ज्यामध्ये अग्निशमन विभागाच्या सेवांबरोबरच इमारतींमधील रहिवासी / भोगवटादार यांचे सहकार्यदेखील आवश्यक असते.

केलेला होता. मुदत संपण्यापुर्वी अनुज्ञापक संस्थेने संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांच्याकडे नुतनीकरणासाठी अर्ज सादर केला होता व प्रकरण मा.संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचेकडे नुतनीकरणासाठी प्रलंबित होते. सदर संस्थेचे प्रमाणपत्र नियमानुसार एका महिन्यासाठी ग्राहय धरता येत असल्याने कार्यवाही झालेली आहे. अशी दुसरी घटना घडलेली नाही.

**<u>अमरावती महानगरपालिका :-</u>**

- महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ च्या कलम ९ (१) आणि (३) नुसार एखाद्या इमारतीत किंवा त्यातील काही भागात अग्निप्रतिबंधात्मक आणि जीव सुरक्षा साधने पुरविण्याचे कार्य हाती घेण्यासाठी अनुज्ञापक संस्था म्हणून कामकाज करण्यासाठी अमनपा क्षेत्रात चार – पाच MFS लायसींसीस एजन्सी कार्यरत आहे. अमरावती महापालिकेकडून कोणत्याही खाजगी संस्थेला फायर सेफ्टी ऑडीट करण्याकरिता नेमणूक केलेली नाही.
- अग्निसुरक्षा हे एक सामूहीक प्रयत्नाने करायचे कार्य आहे ज्यामध्ये अग्निशमन विभागाच्या सेवांबरोबरच इमारतींमधील रहिवासी / भोगवटादार यांचे सहकार्यदेखील आवश्यक असते. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपायोजना नियम २००९अन्वये फक्त MFS मान्यता प्राप्त एजन्सी द्वारे अमरावती क्षेत्रात फायर सेफ्टी ऑडीटचे काम करण्यात येते. सदर एजन्सी मार्फत प्रपत्र-अ आणि प्रपत्र-ब सादर करण्यात येतात.

**<u>नागपूर महानगरपालिका :-</u>**

- (अ) अग्निशमन विभाग, महानगरपालिका नागपूरकडे सक्षम अधिकाऱ्यांची कमतरता असल्याने अनुज्ञापन संस्थांनी जारी केलेल्या प्रमाणपत्रावर संनियंत्रण ठेवणे कठिण होत आहे. परंतु विभागाने जारी केलेल्या ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त इमारत धारकांना नोटिस देवून त्यांच्याकडून वैध प्रमाणपत्र मागविण्याची कार्यवाही केली जाते. तसेच इमारतीची तपासणीसुध्दा करण्यात येते.
- (ब) अग्निशमन विभाग, महानगरपालिका, नगापूरतर्फे शहरातील ज्या इमारत धारकांना अंतिम फायर N.O.C. दिलेली होती त्यापैकी बहुतांश इमारत धारकांकडून अनुज्ञापन संस्थेचे "प्रपत्र ब" प्राप्त झालेले आहे व ज्या इमारत धारकांनी अनुज्ञापन संस्थेने "प्रपत्र ब" दिले नाहीत अशा इमारत धारकांविरुध्द "महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६" चे कलम ६, ८ (१) व ८ (२) अंतर्गत विभागातर्फे पुढील कार्यवाहीबाबतची नोटीस सुध्दा बजावण्यात आलेल्या आहेत.

| ४.१.११.६ | **टोलेजंग आणि मोडकळीस आलेल्या इमारतींच्या नियतकालिक तपासण्या न केल्यामुळे झालेले आगीचे भीषण अपघात** | |
|---|---|---|
| | २०१०-१५ दरम्यान MCGM च्या कार्यकक्षेत आगीचे १२ भीषण अपघात (ज्यांना "ब्रिगेड फायर कॉल्स" असेही ओळखले जाते, ज्यामध्ये अग्निशमनासाठी २० किंवा त्याहूनही अधिक आगीचे बंब तैनात केले जातात) घडले होते. खाली चर्चा केलेल्या टोलेजंग इमारतीमधील दोन आणि मोडकळीस आलेल्या इमारतीमधील एक अशा तीन अपघातांमध्ये CFO, मुंबई यांनी इमारतींची नियतकालिक तपासणी न केल्यामुळे महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मध्ये नमूद केलेल्या अग्निप्रतिबंधात्मक आणि जीव सुरक्षा उपाययोजनांशी तडजोड करण्यात आली होती.<br>• सदोष विद्युत सर्कीटमुळे २१ जून २०१२ रोजी मंत्रालयामध्ये (एक टोलेजंग इमारत) भीषण आग लागली ज्यामध्ये पाच जण मृत्युमुखी पडले आणि मालमत्तेचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. अपघाताच्यावेळी इमारतीकडे MCGM च्या अग्निशमन विभागाकडून देण्यात येणारी अंतिम फायर NOC नव्हती. ऑगस्ट २०१२ मध्ये CFO मुंबई यांनी सादर केलेल्या आग तपासणी अहवालात इतर बाबी बरोबरच असे आढळून आले की (i) वाहने उभी केल्यामुळे इमारतीकडे जाणाऱ्या अंतर्गत पोहोच रस्त्यावर कोंडी झाली होती आणि म्हणूनच आगीचे बंब पोहोचण्यास असाधारण विलंब झाला होता. (बचावकार्य सुरू करण्यास १६ मिनीटांचा कालावधी लागला होता), (ii) जरी इमारतीमध्ये जमिनीखाली पाणी साठविण्याची टाकी (२.३४ लाख लिटर क्षमतेची) उपलब्ध होती तरी इमारतीच्या आवारातील फायर हायड्रंट आणि वेटरायझर्स अकार्यरत असल्यामुळे पाण्याचा उपसा होऊ शकला नव्हता. (iii) इमारती बाहेरील मोकळया जागांमध्ये निसर्गचित्रांकन (landscaping) आणि द्वारमंडप (proche) असल्याने अग्निशमन वाहने प्रवेशण्यासाठी आणि चालविण्यासाठी ती जागा पर्याप्त नव्हती आणि (iv) अग्निशमन साधने कार्यरत नव्हती.<br>अग्निशमन विभागाने ऑक्टोबर २०१५ मध्ये अंतिम फायर NOC जारी केली होती. राज्य शासनाने मार्च २०१६ पर्यंत मंत्रालय इमारतीच्या नुतनीकरणावर रू. २०२ कोटी खर्च केला होता.<br>• काचेचे आच्छादन असलेल्या लोटस निलकमल व्यापार संकुल हया २० मजली इमारतीला अग्निशमन विभागाने नोव्हेंबर २००६ मध्ये अंतिम फायर NOC दिले होते. इमारतीच्या सर्व्हर कक्षातील सदोष विद्युत सर्कीटमुळे १८ जुलै २०१४ रोजी इमारतीला भीषण आग लागली आणि ही आग आटोक्यात आणण्यासाठी ३० | **<u>बृहन्मुंबई महानगरपालिका :-</u>**<br>• MCGM चे अग्निशमन दल नामनिर्देशित अधिकाऱ्यांद्वारे इमारतींची नियतकालीक तपासणी करत असते. अशा इमारतींमध्ये रूग्णालये, उत्तुंग इमारती, मॉल्स, मल्टीप्लेक्सेस, शासकीय इमारती, शाळा इत्यादींचा समावेश आहे. आजमितीस ६६७९ इमारतींची तपासणी करण्यात आलेली असून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ नुसार अग्निसुरक्षा व जीवसुरक्षा उपाययोजनांची पर्याप्तता नसलेल्या व कमतरता आढळून आलेल्या २७७३ इमारतींना नोटीस जारी करण्यात आल्या. नोटीसीत उल्लेख असलेल्या पर्याप्तता / कमतरतांचे अनुपालन न करणाऱ्या इमारतींवर कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. MCGM च्या विधी कक्षाद्वारे अशा १२ इमारतींच्या मालक / भोगवटादारांवर खटला दाखल करण्यात आलेला आहे.<br>• दि. २१ जून २०१२ रोजी 'सदोष विद्युत प्रवाह प्रणाली' मुळे मंत्रालयाच्या इमारतीस लागलेल्या आगीमुळे जिवीत व वित्तहानी झाली. या आगीनंतर महाराष्ट्र शासनाने मुख्य इमारतीच्या नुतनीकरणाचा निर्णय घेतला व यासाठी MCGM च्या अग्निशमन दलाने नवीन 'ना-हरकत प्रमाणपत्र' जारी केले. या नविन ना-हरकत प्रमाणपत्रात आणीबाणीच्या परिस्थितीत अग्निशमन दलाच्या वाहनांची सहज हालचाल होणे, शीघ्रगतीने इमारत रिकामी करण्यासाठी आणीबाणीच्या प्रसंगी बाहेर पडण्याचे मार्ग इ. तत्सम मुद्यांची योग्य काळजी घेण्यात आलेली असून अंतर्गत अग्निशोधसूचक व अग्निशमन यंत्रणा प्रस्थापित करण्याचा आग्रह धरण्यात आलेला आहे. मंत्रालयाच्या मुख्य इमारतीस MCGM च्या अग्निशमन दलाने मेझॅनीन फ्लोअर व्यतिरिक्त अंतिम नाहरकत प्रमाणपत्र जारी केलेले आहे.<br>• दि. १८/०७/२०१४ रोजी लोटस नीलकमल बिझनेस कंडोमिनीअम येथे लागलेल्या अतिगंभीर स्वरूपाच्या आगीनंतर इमारतीच्या अंतर्गत संरचनेस अनधिकृत फेरफार केल्यामुळे या इमारतीचे नाहरकत प्रमाणपत्र रद्द केले. सदर ना हरकत प्रमाणपत्र अग्निप्रतिबंध व जीवसुरक्षा विषयक उपाययोजनांसाठी नवीन शर्ती / अटींसह पुर्नस्थापित करण्यात आली. या नवीन शर्ती / अटींच्या अनुपालनाच्या आधारावर या इमारतीच्या अंशतः भोगवटयास अग्निशमन दलाने ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.<br>• दि. ०९/०५/२०१५ रोजीच्या गोकुळ निवास इमारतीस लागलेल्या आगीनंतर सत्यशोधक समितीने केलेल्या शिफारशींनुसार विशेषतः सी विभागातील सरसकट जुन्या इमारतींची तपासणी अनुज्ञप्ती खाते, इमारत खाते, इमारत व कारखाने खाते व अग्निशमन दलाचे अधिकारी यांनी संयुक्तपणे केली. दि.१८/०५/२०१५ ते दि.११/०१/२०१६ पर्यंतच्या |

| | | |
|---|---|---|
| | तासांचा कालावधी लागला. अग्निशमन कार्यादरम्यान एका अग्निशमन कर्मचाऱ्याला जीव गमवावा लागला. CFO मुंबई यांनी त्यांच्या तपासणी अहवालात (ऑगस्ट २०१४) असे नमूद केले की, इमारतीमध्ये जरी जमिनीखाली एक लाख लीटर क्षमतेची पाणी साठवण्याची टाकी उपलब्ध होती तरी, जेव्हा आग लागली त्यावेळी टाकीमध्ये जेमतेम १० टक्के पाणी उपलबध होते आणि त्यामुळे आवारातील फायर हायड्रंट आणि वेटरायझर्स कार्यरत नसल्यामुळे पाण्याचा उपसा करता येऊ शकला नव्हता. इमारतीला दिलेले फायर NOC जुलै २०१४ मध्ये रद्द करण्यात आले.<br>• ३० वर्षांपेक्षा जास्त जुनी असलेली गोकुळ निवास ही एक व्यापारी-नि-निवासी इमारत अत्यंत गजबजलेल्या काळबादेवी रस्त्यावर स्थित आहे. व्यापारी या इमारतीचा वापर रेशीम व सुती साडया, रसायने, संस्करण विद्रावके (Processing Solvent), आम्ल, LPG सिलेंडर, भ्रमणध्वनीचे सुटे भाग आणि बॅटरी, प्लास्टीक आणि कागदापासून बनविलेली वेष्टन साहित्ये, सोन्याच्या दागिन्यांसह इतर मौल्यवान धातूंवर संस्करण आणि प्रक्रीया करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य इत्यादींसारख्या वेगवेगळया प्रकारच्या ज्वलनशील पदार्थांचा / साहित्याचा साठा करण्यासाठी करत होते. सदोष विद्युत सर्कीटमुळे ९ मे २०१५ रोजी या इमारतीत भीषण आग लागली जी आटोक्यात आणण्यासाठी ८० तासांपेक्षा जास्त कालावधी लागला. संपुर्ण इमारत (तळ मजला व पोटमाळ्यांसह चार मजले) कोसळली आणि CFO, मुंबई यांच्यासह चार अग्निशमन कर्मचाऱ्यांनी या मोहिमेदरम्याने त्यांचे प्राण गमावले. MCGM ने गठीत केलेल्या सत्य शोधक समितीने इतर बाबींबरोबर अशा शिफारशी केल्या (मे २०१५) की, (i) MCGM च्या आग आपत्ती व्यवस्थापन विभागाने / महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रातील प्राधिकरणाने मुंबईतील मोडकळीस आलेल्या सर्व इमारतींची यादी ठेवावी, (ii) बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन (BEST) उपक्रम यांनी ३० वर्षांपेक्षा अधिक जुन्या इमारतींमधील विजेचे वायरिंग आणि मीटर बॉक्स यांची तपासणी करावी आणि BEST ने वार्षिक विद्युत लेखापरीक्षा करावी, (iii) जुन्या इमारतींमध्ये रासायनिक द्रव्यांचा साठा आणिसोनारकाम यावर बंदी घालावी, आणि (iv) सर्व अग्निशमन वाहनांमध्ये जागतिक स्थितीदर्शक यंत्रणा (GPs) बसवावी.<br>MCGM ने सांगितले (एप्रिल २०१६) की, सत्य शोधक समितीने केलेल्या शिफारशींवरील अंमलबजावणी वेगवेगळया टप्प्यांवर होती. परंतु, सदर इमारतीकडे फायर NOC उपलब्ध नव्हती आणि अग्निशमन विभागाने तिच्या नियतकालिक तपासण्या केल्या नव्हत्या ज्या | कालावधी दरम्यान एकूण २४७३ इमारतींची तपासणी करण्यात आली व त्यानुसार आढळून आलेल्या कमतरता / उल्लंघन या साठी MMC ACT व महाराष्ट्र आग प्रतिबंधक प्रतिबंध व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ मधील तरतुदींनुसार योग्य कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच संबंधित विभाग प्राधिकारी व म्हाडा यांना जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचे अभिलेख परिरक्षीत करण्यासाठी सूचित करण्यात आलेले आहे. ३० वर्षांपेक्षा जास्त जुन्या इमारतींमधील विद्युत यंत्रणा / तार यांची तपासणी करण्यासाठी विद्युत ऊर्जा पुरवठादार म्हणजेच बेस्ट, टाटा, रिलायंस यांना सूचित करण्यात आलेले आहे.<br>• MCGM च्या अग्निशमन दलाने "इंटिग्रेटेड कमांड ऍन्ड कंट्रोल सिस्टीम कंसीस्ट ऑफ GIS & GPS बेस्ड ऍटोमेटीक व्हेईकल ट्रॅकींक सिस्टीम व डिस्ट्रेस कॉल रिस्पॉन्स मॅनेजमेंट सिस्टीम- डायल १०१ या प्रणालीच्या अंमलबजावणीसाठीचे कंत्राट दिलेले आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीस अगोदरच सुरुवात झालेली असून सप्टेंबर २०१७ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षित आहे. |

| | | |
|---|---|---|
| | केल्या असत्या तर इतक्या मोठया प्रमाणावर उद्भवलेली आपत्ती टाळता आली असती, हे सत्य आहे. | |
| | **शिफारस ६- (i) राज्य शासनाने राज्यातील सर्व अति लोकसंख्येच्या, महत्वाच्या आणि धोकादायक जागांच्या धोका प्रवणतेचे विश्लेषण करावे आणि आगीच्या घटनांच्या वेळी पालन करावयाच्या आणि टाळावयाच्या बाबींविषयी लोकांमधील जागरुकता वाढवावी आणि (ii) इमारती आणि मालमत्तांमधील आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक सुरक्षा उपाययोजनांच्या अनुपालनाची खात्री करण्यासाठी अनुज्ञापक संस्थेने जारी केलेल्या प्रपत्र - अ व प्रपत्र - ब मधील प्रमाणपत्रांवर केले जाणारे संनियंत्रण अधिक प्रभावी करावे.** | **दिनांक २२ जुन,२०१२ व दिनांक २५ जुन,२०१२ शासन परिपत्रकान्वये आगसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण करुन शासकीय व अन्य इमारतीतील अग्निसुरक्षा यंत्रणा कार्यान्वीत ठेवण्याच्या सुचना राज्यातील सर्व अग्निशमन सेवांना दिलेल्या आहेत.अनुज्ञापक संस्थानी सादर केलेल्या प्रपत्र अ व प्रपत्र ब मधील प्रमाणपत्रानुसार इमारतीतील अग्निशमन यंत्रणेची तपासणी स्थानिक अग्निशमन अधिकाऱ्यांमार्फत केली जाते.** |
| ४.१.१२ | **निष्कर्ष** | |
| | निवडक आठ MCs मध्ये अग्निशमन विभागांनी हाती घेतलेल्या अग्नि प्रतिबंधात्मक आणि नियंत्रण उपाययोजना अत्यंत असमाधानकारक होत्या. वर्ष २०१०-१५ मध्ये विशिष्ट अग्निशमन उपकरणे, साधनसामग्री, वाहने इत्यादींच्या खरेदीसाठी जी भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती त्यापैकी आठ महानगरपालिकांकडून फक्त २२ टक्के भाग वापरण्यात आला होता. आठ पैकी चार महानगरपालिकांनी जेथे अग्निसुरक्षा निधी गठीत केला नव्हता त्याचवेळी आठ पैकी सात महानगरपालिकांनी अग्निशमन सेवा बळकटीकरणासाठी कोणतेही वार्षिक शुल्क संकलीत केले नव्हते वा आकारलेही नव्हते. राज्यात, तसेच आठ महानगरपालकांमध्ये अग्निशमन केंद्रांच्या संख्येत खूप कमतरता होती. अग्निशमन केंद्रे जमीन, कायमस्वरूपी इमारत, ड्रील टॉवर्स, पाणी स्त्रोत, फायर हायड्रंट, आगीचे बंब, विशिष्ट अग्निशमन उपकरणे यासारख्या मुलभूत पायाभूत सुविधांनी सुसज्जीत नव्हती आणि त्यांची कमतरता होती. राज्यात, तसेच आठ महानगरपालिकांमध्ये अग्निशमन विभागांमध्ये महत्वपूर्ण पदांची संख्या लक्षणीय कमी होती. आठ महानगरपालिकांमध्यल्या स्थानिक क्षेत्रातील अनेक इमारती आणि पेट्रोल पंप, LPG, केंद्रे, फटाक्यांची दुकाने, लाकूड गिरण्या इत्यादींसारखे धोकादायक व्यवसाय अग्निशमन विभागांकडून अंतिम फायर NOC प्राप्त न करता चालविले जात होते. वर्ष २०१०-१५ दरम्यान अग्निशमन कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात लक्षणीय तूट होती आणि अद्यावत अग्निशमन प्रशिक्षण प्रबोधिनी बांधण्याच्या पहिल्या प्रस्तावाच्या तारखेपासून सात वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटूनही त्याचे बांधकाम प्रलंबित होते. मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांद्वारा दाखल करण्यात येणाऱ्या अग्निशमन तपासणी अहवालात संपूर्ण माहिती भरली / दिली जात नव्हती. काही महानगरपालिकामध्ये अग्निशमन केंद्रांचे नियंत्रण केंद्र अधिकाऱ्यांऐवजी अग्निशमन कर्मचारी आणि अग्निशमन प्रणेते यांच्याकडून केले जात होते. इमारती आणि | या निष्कर्षानुसार आवश्यक सुधारणात्मक कार्यवाही करण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | इतर मालमत्तांमधील अग्निप्रतिबंधक आणि जीव सुरक्षा उपाययोजना यांच्या अनुपालनाची खात्री करण्यासाठी अनुज्ञापक संस्थांनी जारी केलेली प्रपत्र-अ आणि प्रपत्र-ब मधील प्रमाणपत्रे त्रुटीपुर्ण होती आणि त्यावर मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांकडून प्रभावी संनियंत्रण केले जात नव्हते. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने टोलेजंग आणि मोडकळीस आलेल्या इमारतींच्या नियतकालिक तपासण्या न केल्यामुळे वर्ष २०१०-१५ दरम्यान मुंबईमध्ये आगीचे भीषण अपघात घडले आणि जीवित आणि मालमत्तेची हानी झाली.<br>सप्टेंबर २०१५ मध्ये ही बाब शासनाकडे संदर्भित करण्यात आली, त्यांचे उत्तर एप्रिल २०१६ पर्यंत प्राप्त झाले नव्हते. | |

*********

कार्यालय प्रधान महालेखाकार (लेखापरिक्षा)-1
महाराष्ट्र, प्रतिष्ठा भवन,
101, एम के मार्ग मुंबई-400 020
दूरभाष क्रं.22190591/585

सत्यमेव जयते

सं.एस.एस-1/रिपोर्ट/ले.प.प्र 2014-15/यु ओ आर/1189 दिनांक: 02/07/2018

प्रति,

प्रधान सचिव, नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई-400 032

**विषय:** UOR received from Urban Development Department in respect of para No 4.1 of Audit Report (Local Bodies) for the year ended 31 March 2015.

**संदर्भ:** नस्ती क्रमांक-अशसं-2018/प्र.क्र-92/नवि-04

The remark of this office in respect of above UOR para No 4.1 of AR (Local Bodies) 2014-15 is as under:

| Para no. | Subject | Remarks |
|---|---|---|
| 4.1.6 | **Financial management** | No Remarks |
| 4.1.6.1 | **Non-utilization of capital budget by Fire Departments** | There was inordinate delay in utilisation of budgetary grants by MCGM, Nasik, Nagpur and Pune Municipal Corporation. Reasons stated thereof for delay in utilisation of funds may be explained to PAC. |
| 4.1.6.2 | **Non-constitution of fire protection fund** | In respect of Nagpur Municipal Corporation the copy of the receipt towards depositing the Rs 10 crore in FPF may be produced to the PAC.<br>The status of utilisation of FPF funds of Rs 449.97 crore deposited in their General Fund by the MCGM, Thane, Navi Mumbai and Pune MCs may be Stated to the PAC. |
| 4.1.6.3 | **Irregular expenditure from personal ledger account** | The status of utilisation of balance of Rs 30.57 crore in the PLA account may be communicated to the PAC<br>The status of construction of advance fire training academy in Palghar district may be communicated to the PAC. |
| 4.1.6.4 | **Non-levy of annual fees** | The reply furnished by the Nashik MC that due to staff shortage it could not collect 1 % Annual Fee is not tenable since during the same period it has already collected Rs 20 crore towards Fire Service Fee.<br>The status of levy and collection of Annual Fees by the other Municipal Corporations may be explained to the PAC. |

एच ३८२-८-१८१-१२

| | | |
|---|---|---|
| **4.1.6.5** | **Non-implementation of a Scheme funded by the State Government** | The reasons for delay in implementation of the scheme by the Aurangabad Municipal Corporation may be explained to the PAC. Whether the share of AMC has been released and utilisation of the unspent balances may be stated to PAC. |
| | **Recommendation 1:** | In this regard Copies of instructions issued to ULBs may be produced to PAC. |
| **4.1.7.1** | **Inadequate number of fire stations** | The status of construction of new fire stations/ mini fire stations by the MCs may be furnished to the PAC. |
| **4.1.7.2** | **Under-equipped fire stations** | Current status of construction of mock drill towers, construction of new fire station buildings, installation/revival of non-functional fire hydrants, procurement of new fire tenders, rescue tenders and purchase of new foam tenders, dry chemical powder tenders, turntable ladders/sky lifts, breathing apparatus vans and any other major measures taken for fire safety may be communicated to the PAC. |
| | **Recommendation 2:** | Details of additional capital grants provided to Urban Local Bodies for procurement of capital assets and replacement/renewal of older assets may be communicated to the PAC. |
| **4.1.8** | **Shortfall of manpower** | The current position of Manpower requirement, Men in position, new posts sanctioned or recommended for sanction and filled by the respective Municipal Corporations may be communicated to the PAC.<br>The reasons GoM in UDD did not approve the proposals of DFS Mumbai, despite sanction of posts by the High Power Committee, be communicated to the PAC. |
| | **Recommendation 3:** | The status of recruitment of 131 posts sanctioned by the High Power Committee may be communicated to the PAC. |
| **4.1.9** | **Non-compliance to fire safety norms** | No remarks. |
| **4.1.9.1** | **Inadequacies in issue of No Objection Certificates** | Reasons for issuing OCs to 28 buildings without obtaining the final Fire NOC may be communicated to the PAC.<br>Action taken against the petrol pumps, fire cracker shops, LPG distributors for running the business without obtaining the final Fire NOC may be communicated to the PAC.<br>Status of preparation of New Mitigation Plan by the Thane MC may be communicated to the PAC<br><br>Action taken under the provisions of the relevant Act for running the business without obtaining Final Fire NOC may be communicated to the PAC.<br><br>Status of preparation of New Mitigation Plan by the Amravati MC may be communicated to the PAC. Status of updating of mitigation plan by the MCGM showing hazardous business may be communicated to the PAC. |

| | | |
|---|---|---|
| | | The status of issue of fire NOC to 15 petrol pump dealers and 12 LPG dealers may be communicated to the PAC<br>Action taken against the owners of these 28 buildings for utilising the buildings without obtaining the final Fire NOC may be communicated to the PAC.<br><br>Action taken by the competent authority on the Inspection Report may be communicated to the PAC.<br><br>1. The status of final Fire NOC in respect of 53 buildings jointly physically inspected in eight selected MCs may be communicated to the PAC.<br>2. Whether the minimum fire-fighting installations required under the Act, have been installed in these 53 buildings? |
| | **Recommendation 4:** | No remarks. |
| **4.1.10** | **Shortfalls in capacity building** | Instructions/ directions issued by the Director, Fire Services for improving the capability of the staff may be communicated to the PAC. |
| **4.1.10.1** | **Shortfalls in training** | Steps taken for maximum utilisation of State Fire Training Centre, Kalina for training purpose may be communicated to PAC. |
| **4.1.10.2** | **Delay in construction of an advance fire training academy** | Current status of land acquisition for construction of Advance Fire Training Academy at Palghar may be communicated to the PAC. |
| **4.1.10.3** | **Non-conducting of physical fitness camps** | Details of Physical Fitness conducted by the Nashik, Nagpur, Pune, Thane and Aurangabad Municipal Corporations may be communicated to the PAC. |
| **4.1.10.4** | **Inadequate community preparedness and awareness** | Details of Community preparedness and awareness programmes conducted by the Pune, Aurangabad, Thane and Nashik Municipal corporations may be communicated to the PAC. |
| | **Recommendation 5:** | No remarks. |
| **4.1.11.1** | **Deficiencies in preparation of fire investigation reports** | Whether any uniform format had been prescribed for documenting/ filing the fire investigation reports by the CFOs may be communicated to the PAC. |
| **4.1.11.2** | **Non-conducting of inspection of the buildings** | Status of inspection of buildings by the Aurangabad Municipal Corporation may be communicated to the PAC. |
| **4.1.11.3** | **Non-creation of fire act cell** | The status of development of the software for Inspection of the buildings may be communicated to the PAC. |
| **4.1.11.4** | **Fire stations commanded by lower grade staff** | The action taken and time line fixed for filling of vacant posts may be communicated to the PAC. |
| **4.1.11.5** | **Non-monitoring of certificates issued by licensed agencies** | Action taken against the defaulting licenced agencies for issue of incorrect and irregular certificates may be informed to the PAC. |
| **4.1.11.6** | **Non-conducting of periodical inspections of high-rise and dilapidated buildings** | 1. Whether the list of all dilapidated buildings in Mumbai has been kept by Fire and Disaster Management Department of MCGM.<br>2. Whether the electric supply companies have checked |

| | | |
|---|---|---|
| | **leading to major fire accidents** | the electric wiring and meters boxes of buildings more than 30 years old.<br>3. Further action taken for banning of storing of chemicals and gold making process in old buildings may also be communicated |
| | **Recommendation 6:** | No remarks |
| **4.1.12** | **Conclusion** | No remarks |

ब.ले.प.अधिकारी एस.एस-1/रिपोर्ट

**साक्ष—**

**भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. ४.१ - निवडक महानगरपालिकांकडून आगीचा प्रतिबंध आणि नियंत्रण या परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव तसेच विभागीय प्रतिनिधींची दिनांक २९ ऑगस्ट, २५ सप्टेंबर व १७ ऑक्टोबर, २०१८ रोजी समितीने साक्ष घेतली.**

**परिच्छेद क्रमांक-४.१.६.१ - अग्निशमन विभागांकडून भांडवली अर्थसंकल्पीय तरतुदींचा वापर न होणे-**

**१.१** मुंबई महानगरपालिकेने २०१० ते २०१५ पर्यंत १०७२ कोटी रुपयांपैकी फक्त ४२४ कोटी रुपये खर्च केला याबद्दल विभागाने खुलासा करावा असे समितीने निर्देशित केले असता, यासंदर्भात अधिक माहिती देताना २०१० ते २०१५ याचे पूर्ण डिटेल स्टेटमेंट आहे. बृहन्मुंबई महापालिकाने एकूण मेजर ३६ आयटेम्स खरेदी केले आहेत. २०१० मध्ये युरो-४ ची अडचण आली होती. युरो-४ च्या गाड्या आणि चेसीस नसल्यामुळे पूर्वीच्या काळात बृहन्मुंबई महापालिकेची थकबाकी झाली. काळात खरेदी झाली. भारत स्टेज-४ गाड्यांना लागणाऱ्या चेसीसची रिक्वायरमेंट पूर्ण झाल्यानंतर बजेट युटिलायझेशन आता व्यवस्थित नियोजन होत आहे. त्या शिवाय सदर गाड्या कस्टमाईज आहेत. आज ऑर्डर दिली, या आर्थिक वर्षात बजेट दिले तरी टेस्टींग, फॅब्रिकेशन करण्यात पुढील बजेटमध्ये जाते. त्यामुळे पूर्वीच्या काळात युटिलायझेशन ऑफ फंड कमी होता. २०१५ नंतर २०१८ पर्यंत पाहिले तर तो फार चांगला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

युटीलायझेजन ऑफ फंड किती चांगला आहे ? तसेच, हायकोर्टाने सांगितले की, अग्निशमन दलाला रिलॅक्सेशन देता येत नाही. तरी पण इन्व्हेस्टमेंट झालेली नाही? अग्निशमन विभागाला प्राधान्यक्रम दिला पाहिजे. विभागाला किती कॅपिटल खर्च करण्याची मुभा होती, किती बजेट होते व किती खर्च केला ? अशी विचारणा समितीने केली.

समितीने साक्षी दरम्यान नाशिक महानगरपालिकेची माहिती काय आहे? अशी विचारणा केली यावर, हा मुद्दा २०१३-१४ आणि २०१४-१५ या वर्षात एरियल लँडर प्लॅटफॉर्म आणि टर्न टेबल लँडर यासाठी बजेट तरतूद केली होती, तो निधी खर्च झालेला नाही. २०१३-१४ मध्ये १५ कोटी आणि २०१४-१५ मध्ये २० कोटी रुपयांची तरतूद केली होती. उपकरणे आंतरराष्ट्रीय बाजारातून खरेदी करण्यासाठी टेंडर प्रक्रिया केली होती, त्याला विलंब झालेला आहे. २०१३ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली होती, ती पाच वर्षे व्हॅलिड असते. सद्यःस्थितीत नाशिकमध्ये ३५ मीटरपेक्षा जास्त उंचीच्या इमारती नाहीत. त्यामुळे यासाठी ५५ मीटरच्या लॅडरची तशी आवश्यकता नाही. २०१५-१६ या वर्षी कुंभमेळा झाला. त्यावेळी १४ कोटी रुपयांची तरतूद होती. परंतु इतर फायर इक्वीपमेंट लागतात त्यासाठी खर्च केलेला आहे. २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये कुंभमेळ्यासाठी आवश्यक असलेल्या साहित्याची खरेदी केलेली आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

यावर समितीने अशी विचारणा केली की, गरज नव्हती तर त्यावेळी तरतूद का केली ? आजही गरज नाही असे नाशिक महापालिकेच्या प्रतिनिधींचे म्हणणे आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यावेळी तो विचार केला गेला असावा. २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये अनुक्रमे १५ व २० कोटी रुपयांची तरतूद केली, परंतु ते फायनालाईज झालेले नाही. ५५ मीटर हाईटच्या लॅडर या सर्वसाधारणपणे ३५ मीटरच्या उंचीच्या इमारती असतील तर लागतात. ३५ मीटरपेक्षा जास्त उंचीच्या इमारती विभागाकडे नाहीत. जशा हायराईज वाढत जातील त्याप्रमाणात पुढील काळात आवश्यकतेप्रमाणे घेता येतील असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

पुढे साक्षी दरम्यान समितीने अशी विचारणा केली की, आतापर्यंत एकूण इन्व्हेस्टमेंट किती केली ? सन २०१२-१३ मध्ये ९ कोटी रुपये तरतूद केली होती, त्यापैकी १.३९ कोटी रुपये खर्च झाले, १५.४४ टक्के आहे. २०१३-१४ मध्ये १५ कोटी रुपये तरतूद केली होती, खर्च निरंक आहे. २०१४-१५ मध्ये २० कोटी रुपये तरतूद केली होती, खर्च ९.१४ कोटी रुपये झाला, ४५.०७ टक्के आहे. २०१५-१६ मध्ये ४.५५ कोटी रुपये तरतूद केली होती, खर्च २.६७ कोटी रुपये झाला, ५८.६८ टक्के आहे. २०१६-१७ मध्ये १० लाख रुपये तरतूद केली होती, खर्च निरंक आहे. २०१७-१८ मध्ये ७० लाख रुपये तरतूद केली होती, खर्च १० लाख रुपये झाला आहे, १४.२८ टक्के आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

महालेखापालांचा हाच आक्षेप आहे की, कॅपिटल कॉस्ट खर्च करीत नाही. बंधनकारक आहे म्हणून तरतूद केली जाते आणि खर्च होत नाही. तसेच बजेट करताना महापालिकेला काय पाहिजे, किती निधी लागणार याचे नियोजन केले पाहिजे. एवढे मोठे शहर असताना जी तरतूद केली ती खूप कमी आहे आणि ती सुद्धा खर्च केली जात नाही. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता, खर्च अल्पप्रमाणात झालेला आहे. यापुढे आवश्यक असलेल्या गोष्टीसाठी ८ बजेटरी तरतूद करायची आणि ते काम पूर्ण करायचे याची पुढे काळजी घेण्यात येईल. तसेच यापुढे बजेट करताना आवश्यक असलेले आयटेम्स आणि त्यासाठी आवश्यक असलेला निधी याची तरतूद करून ती प्रोसेस पूर्ण करण्यात येईल, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला आश्वासित केले.

आज मोठ्या प्रमाणात शहरीकरण होत आहे. तळमजला अधिक दोन मजले, तळमजला अधिक तीन मजले इमारती असायच्या. आज ब वर्ग नगरपालिका क्षेत्रात २२ मजली इमारतींना परवानगी दिली जाते. आपण अग्निशमन यंत्रणेवर विसंबून राहतो. त्या इमारतीमध्ये फायर सिस्टीम उभी करण्यावर विसंबून राहतो. शेवटी क्रिस्टल इमारतीमध्ये जी घटना घडली, अशा घटनांमधून निरपराध लोकांचे जीव जातात. अत्याधुनिक सामग्रीवर दुर्लक्ष करून चालणार नाही. अग्निशमन दलातील अधिकारी स्वतःचा जीव धोक्यात घालून काम करणारे आहेत. टायर-१, टायर-२, टायर-३ शहरांच्या अनुषंगाने अपडेटेड तंत्रज्ञानाच्या संदर्भात एक्स्पर्टाईज कमिटी स्थापन केली पाहिजे. अग्निशमन दलातील अधिकाऱ्यांना परदेशात पाठवून तेथील तंत्रज्ञान अवगत करण्याची संधी दिली जाते. प्रत्यक्षात आपले ९ मीटरचा रस्ता असताना २०-२२ मजली इमारती बांधल्या जातात. एका फायर फायटिंग इंजिनमध्ये २० हजार लीटर पाणी असते. मुंबईतील हायड्रण्ट सिस्टीम संपुष्टात आली आहे. शहरांची भौगोलिक परिस्थिती आणि वास्तवता लक्षात घेऊन एक्स्पर्टाईज समितीच्या तांत्रिक सल्ल्यानुसार अत्याधुनिक मशिनरी खरेदी केली पाहिजे. जगातील पुढारलेल्या देशांनी २०-२५ वर्षापूर्वी जे त्याजले ते आपल्याला अत्याधुनिक वाटते. त्यांनी ३० वर्षापूर्वी सोडले ते आपण घेऊन येतो, आपल्या कॉस्टमध्ये ते परवडते. आपल्याला आवश्यक आहे ते मॉडिफिकेशन केले पाहिजे. या संदर्भात तज्ज्ञांची समिती करण्याची आवश्यकता आहे अशी सूचना समितीने विभागाला केली.

पुढे साक्षी दरम्यान मुंबई महानगरपालिकेची माहिती देण्यास समितीने सांगितले असता, मुंबई आणि इतर शहरांच्या संदर्भात केंद्र शासनाची एक टीम आली होती. त्यांनी केलेल्या ऑडिटनुसार किती फायर स्टेशन्स पाहिजेत, किती मनुष्यबळ हवे याबाबत एक अहवाल दिला आहे. मुंबईच्या अनुषंगाने त्या अहवालात ३६ फायर स्टेशन्सची आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे. आज मुंबई महानगरपालिकेमध्ये ३४ फायर स्टेशन्स आहेत अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

केंद्र शासनाच्या टीमचा अहवाल केव्हा देण्यात आला ? अशी विचारणा समितीने केली असता, २०१४ साली देण्यात आला आहे. मुंबईकरिता नवीन डीपीमध्ये भौगोलिक परिस्थितीचा विचार करून २६ फायर स्टेशन्स प्रस्तावित केली आहेत. या डीपीमध्ये २६ फायर स्टेशन्ससाठी भूसंपादन आणि डिमार्केशन करण्यात आलेले आहे. यावर्षी बृहन्मुंबई महापालिका कांदरपाडा येथील फायर स्टेशन सुरू करीत आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

जी अत्याधुनिक मशिनरी आणली पाहिजे, त्या प्रकारची व्यवस्था बृहन्मुंबई महापालिकेकडे नाही. बृहन्मुंबई महापालिका आऊटडेटेड मशिनरी घेते अशी स्थिती आहे. बृहन्मुंबई महापालिका मुंबईसाठी काय केले त्याचा आढावा द्या असे समितीने विभागास सुचित केले असता, सन २०१० ते २०१५ या काळात आपण उपलब्ध निधी रु.४०८ कोटीपैकी १५१.०४ कोटी रुपये खर्च केला आहे, असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला.

स्थानिक स्वराज्य संस्था स्तरावर अग्निशमन यंत्रणा आहे. त्यामुळे त्या स्तरावर सुविधा मिळू शकतात. ग्रामीण भागात आग लागल्याची घटना घडली तर तेथे एकही फायर स्टेशन नाही. स्थानिक स्वराज्य संस्था त्याकडे दुर्लक्ष करतात. म्हणून राज्य शासनाने स्वतंत्र अग्निशमन यंत्रणा उभी करावी, टोल फ्री क्रमांकावर घटनेची माहिती दिल्यास फायर फायटिंग इंजिन उपलब्ध होऊ शकेल ही गंभीर बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता, राज्य अग्निशमन संचालनालयाचे संचालक या व्यवस्थेबाबत देखरेख ठेवतात. राज्य शासनामार्फत प्रत्येक ठिकाणी आवश्यक यंत्रणा उभी करणे आणि देखभाल करणे कठीण होईल. म्हणून राज्य शासनाने ५ वर्षापूर्वी निर्णय घेतला होता की, प्रत्येक नगरपालिका क्षेत्रात असलेली त्यांची फायर फायटिंग सिस्टीम मजबूत करायची. त्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला होता. सगळ्याच नगरपालिका समाविष्ट करण्यात आल्या तर त्या नगरपालिका त्यांच्या आजूबाजूच्या ग्रामीण भागाकडे लक्ष देऊ शकतील, अशी अपेक्षा त्यावेळी होती अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

भुसावळ नगरपालिकेतील घटनेमुळे हा विषय पुढे आला. न्यायालयात गेल्यामुळे न्यायालयाने राज्य शासनाला ही कार्यवाही करण्यास सांगितले. स्वतंत्र फायर इंजिन दिले गेले असे समितीने निदर्शनास आणले असता, स्वतंत्र गाड्या दिल्या, यंत्रणेचा पगार विभाग देतो. राज्य शासनाला प्रत्येक ठिकाणी स्वतःचा कर्मचारीवर्ग निर्माण करणे कठीण होईल अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

साक्षी दरम्यान विभागीय सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, एक हा विषय होता. दुसरा विषय तज्ज्ञांची समिती स्थापन करणे शक्य आहे का ? समिती स्थापन करणे शक्य होईल. समिती स्थापन करताना त्या समितीमध्ये कोणते तज्ज्ञ घ्यायचे ? आज या क्षेत्रातील तज्ज्ञ आहेत ते संचालक, अग्निशमन संचालनालय आणि मुंबई-पुणे महापालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी आहेत. यांच्या सूचनेप्रमाणेच आपण सुविधा निर्माण करतो. आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ घेऊन समिती करता येईल का याचा विचार करता येईल. तिसरा विषय हा वारंवार समोर येतो. एफएसआय वाढतो, इमारतींची उंची वाढते, परंतु पुरेशी यंत्रणा नसते. साधारणपणे नगरविकास-१ कडून अशी भूमिका घेतो की, जोपर्यंत त्या उंचीच्या इमारतीमधील लोकांना वाचविण्याची यंत्रणा त्या महापालिकेची नसेल तर तेथे तेवढ्या उंचीला महापालिकेने परवानगी देऊ नये असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आता नुकतेच ठाणे जिल्ह्याचेही उदाहरण आहे. त्यात विभागाने सांगितले की, महापालिकेने आधी गाडी घ्यावी आणि मग जास्त उंचीच्या इमारतीला मंजूरी द्यावी. कमिशनरनी आताच सांगितले की, त्यांच्या भागात ते फक्त ३६ मीटर उंचीच्या इमारतीला परवानगी देतात. त्या संबंधीच्या सूचना नगरविकास विभागाकडून दिलेल्या आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

एका बाजुला नगरविकास-१ मध्ये असताना विभाग एफएसआय देतो आणि नगरविकास- २ मध्ये असताना उंची वाढवू नका असे सांगण्यात येते. याची सांगड कशी करणार अशी विचारणा समितीने केली असता, नगरविकास १ च्या वतीने खुलासा केला की, उंची वाढवू नये कारण फायर फायटींग आणि फायर रेस्क्यु असे दोन विषय आहेत. फायर फायटींगचा असा विषय आहे की, इमारत जशी उंच होईल त्या इमारतीने स्वतःची फायर फायटींग स्वतःच्या अंतर्गत यंत्रणेने करावी. असा नियम जगात पण सर्व जागी आहे कारण फायर ब्रिगेड तिथे जाऊन कोणाचीही आग विझवत नाही. परंतु फायर रेस्क्यु हा दुसरा एक महत्त्वाचा आहे. जर त्या इमारतीमध्ये लोक अडकले तर त्यांच्यासाठी एक वेगळा स्वतंत्र जिना करण्यात येतो. परंतु जर कोणी त्या जिन्यामध्ये येऊ शकले नाही तर ते ज्या उंचीवर असतील त्या उंचीवरुन त्यांना काढण्याची यंत्रणा तरी किमान महानगरपालिकेकडे पाहिजे. हे दोन विषय नगरविकास विभाग साधारणपणे बघतो असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

नगरपालिकेकडे ते काम आहे तर राज्य अग्निशमनच्या महासंचालकांनी काय करणे अपेक्षित असते किंवा ते काय करतात ? किंवा ग्रामीण भागासाठी काय व्यवस्था आहे ? या संदर्भात समितीला माहिती देण्यास सांगितले असता, ग्रामविकास विभागाकडून ती माहिती घ्यावी लागेल. तथापी नगरपालिकांपर्यंत ही योजना पोहचावावी असा शासनाचा मानस आहे, त्याप्रमाणे काय पूर्तता झाली असेल हे आम्ही समितीसमोर ठेवू शकतो असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

पुढे साक्षी दरम्यान समितीने नागपूर महानगरपालिकेची काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा केली असता, सन २०१०-१५ या आर्थिक वर्षात अग्निशमन विभाग, महानगरपालिका, नागपूरसाठी रु.७.०८ कोटीची तरतूद करण्यात आलेली होती. सदरची तरतूद ही ४२ मी. उंच टर्न टेबल लॅडर (१ नग) खरेदीकरीता होती. परंतु या आर्थिक वर्षात प्रशासकीय मान्यता न मिळाल्यामुळे सदर वाहनाची खरेदी करण्यात आली नाही. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

सन २०१०-१५ मध्ये एकूण किती गुंतवणुकीची तरतूद होती. त्या तरतुदीपैकी विभागाने किती रुपये खर्च केले आहेत आणि पुढच्या तीन वर्षामध्ये त्याचे काय नियोजन केलेले आहे ? कारण परिच्छेदामध्ये मूळ मुद्दा असा आहे की, कॅपिटल इन्वेस्टमेंट खूप कमी आहे. नियोजन केले जाते पण खर्च करीत नाहीत हा या परिच्छेदाचा मूळ गाभा आहे. त्या दृष्टीने सन २०१०-१५ मध्ये किती आऊटले मंजूर होता, किती खर्च केला आणि त्या कालखंडात अडचण होती असे आपण सांगितले तर पुढच्या कालावधीत म्हणजे सन २०१५-१८ मध्ये खर्च केला आहे काय, याची थोडक्यात माहिती देण्याचे समितीने सूचित केले असता, सन २०१०-१५ या आर्थिक वर्षात एकूण ७.०८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. ती तरतूद प्रत्येक वर्षी कॅरी फॉरवर्ड होत राहीली कारण निविदा प्रक्रिया झाली नव्हती. सन २०१५-१६ मध्ये निविदा प्रक्रिया करून आपण टर्नटेबल लॅडरची खरेदी केलेली आहे. आता सन २०१६ मध्ये ते ऑपरेशनल पण केलेले आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

पूर्णपणे किती गुंतवणूक केली आणि किती रुपयांचे नियोजन होते याची आकडेवारी द्यावी. पूर्ण नागपूर जिल्ह्यासाठी मागच्यावर्षी सन २०१०-१५ मध्ये ७.०८ कोटी रुपयांचे नियोजन होते काय ? याबाबत समितीने खुलासा करावयास सांगितला असता, ४२ मीटर उंचीसाठी १ नग टर्नटेबल लॅडर खरेदी करायचे होते ते अखर्चित राहिलेले होते असे समितीला सांगण्यात आले.

सन २०१७-१८ या वर्षाची अर्थसंकल्पीय तरतूद किती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, यावर्षी ३३ कोटी रुपयांची अर्थसंकल्पिय तरतूद केलेली आहे असे समितीला विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

परिच्छेद एवढाच आहे की, विभाग भांडवली खर्चाचा जेवढा आऊटले काढतो तो खर्च होत नाही. त्या दृष्टीने नागपूर महानगरपालिकेचा सन २०१०-१५ दरम्यान किती रुपयांचा आऊटले होता आणि किती रुपये खर्च केलेले आहेत. सन २०१०-१५ मध्ये अडचण आहे असे आपण सांगितले तर सन २०१५-१८ मध्ये किती खर्च केला याची समितीला लेखी माहिती द्यावी अशी सूचना समितीने विभागास केली व या आर्थिक वर्षात प्रशासकीय मान्यता न मिळाल्यामुळे हे झालेले आहेत तर प्रशासकीय मान्यता देण्यासाठी विभागाला काय अडचण होती ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१० मध्ये ते खरेदी करण्याची मान्यता मिळाली होती. परंतु सर्व अटी व शर्ती मागवण्यामध्ये ते वर्ष संपले होते. कारण दिनांक २४ डिसेंबर, २०१० रोजी प्रक्रिया सुरू झाली होती. तीन महिन्याच्या कालावधीमध्ये ते होऊ शकत नसल्यामुळे सन २०११-१२ च्या कालावधीमध्ये गेले होते अशी माहिती समितीला दिली असता, समितीने पुढे अशी विचारणा केली की, मग सन २०११-१२ मध्ये ती प्रक्रिया का केली नाही ? यावर सन २०११-१२ मध्ये ती निविदा प्रकाशित करण्यात आली होती, त्यानंतर ती निविदा उघडण्यापर्यंत आली होती. परंतु ज्या एजन्सीने भाग घेतला होता त्यांनी काही कागदपत्रे सादर केली नव्हती म्हणून ती प्रक्रिया तिथे विखंडीत करून शासनाने दर कराराप्रमाणे खरेदी करण्याचे ठरविले होते. शासनाच्या दर कराराप्रमाणे खरेदी करण्यासाठी स्थायी समितीने मान्यता दिली नव्हती. त्यामुळे प्रशासकीय अडचणीमुळे तो ठराव विखंडीत करण्यासाठी पाठवला होता. तो ठराव विखंडीत होऊन शासनाकडे आला नाही म्हणून स्थायी समितीने निविदा करा आणि प्रक्रिया राबवा, असा ठराव कार्यान्वित करून ही खरेदी प्रक्रिया करण्यात आली आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

पुढे साक्षी दरम्यान पुणे जिल्ह्याची काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, अग्निशमन विभागासाठी पुणे महानगरपालिकेमध्ये सन २०१०-१५ या ५ वर्षामध्ये एकूण ८ कोटी ४० लाख एवढा निधी अखर्चित आहे. एकूण मिळालेल्या तरतूदीच्या विरुद्ध एकूण फक्त ३ टक्के एवढा निधी अखर्चित राहिलेला आहे. उर्वरित सर्व भांडवली खर्च महापालिकेने केलेला आहे. त्यामध्ये सर्व प्रकारची साधने म्हणजे अग्निशमन वाहने, सुरक्षा खरेदी केलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले. यावर समितीने समाधान व्यक्त करून अमरावती जिल्ह्याची काय परिस्थिती आहे ? अमरावती जिल्ह्याचे बजेट खूप कमी आहे काय ? अशी विचारणा समितीने केली त्यावर अधिक खुलासा करताना अमरावती जिल्ह्यासाठी १ कोटी ९७ लाख ६० हजार रुपयांची तरतूद होती. त्यापैकी ९३ लाख रुपये खर्च झालेले आहेत. बजेट प्रोव्हिजन आणि कॅश फ्लोमध्ये तफावत असल्यामुळे हा खर्च कमी झालेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सद्य:स्थितीमध्ये भांडवली खर्चासाठी अग्निशमनसाठी अमरावती महानगरपालिकेचा किती निधी राखीव असतो ? अशी विचारणा समितीने केली यावर माहिती देताना अंदाजित ४० ते ५० लक्ष इतका निधी राखीव असेल अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

५० लाख रुपयांमध्ये महापालिका काय खरेदी करणार आहे त्यामध्ये फक्त दोन गाड्या येतील. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली व अनुदान धरून फक्त ५० लाख रुपयांची तरतूद विभाग करता काय ? अशी विचारणा समितीने केली, यासंदर्भात अधिक खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, महापालिकेच्या निधीतील तरतूद आहे. वेळोवेळी आवश्यकता पडल्यावर महापालिका निधीतून पूर्तता होत नाही.

अमरावती महापालिकेमध्ये शेवटचे फायर इन्स्ट्रुमेंट कधी, काय आणि किती रुपयाचे घेतले होते ? यासंदर्भात समितीने विचारणा केली असता, गत वर्षी शासन निधीमधून अग्निशमन बळकटीकरणात २ कोटी रुपयांचे वाहन घेतलेले आहे. जेव्हा प्रोव्हिजन मागितली जाते तेव्हा आपण त्या खरेदी करतो. महापालिकेच्या बजेटमधून तरतूद करण्यासाठी अडचणी जातात. तरतूद केली तर कॅशफ्लोप्रमाणे ते करतो अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

पुढे साक्षी दरम्यान समितीने पुनश्चः मुंबईची काय परिस्थिती आहे ? तसेच सन २०१०-१५ या वर्षाचाच प्रश्न आहे. त्याप्रमाणे विभागाने फक्त १ हजार ७२ कोटी रुपयांपैकी ४२४ कोटी रुपये खर्च केले आहेत, असे विभागाने सांगितले आहे. पुढच्यावर्षी खर्च केला म्हणून सन २०१५-१८ चा प्रश्न विचारला नाहीतर समिती हे विचारणार नव्हती कारण सन २०१०-१५ चा समितीचा विषय आहे. प्रदुषणामुळे गाडी खरेदी केली नाही असे विभाग समर्थन करीत असेल तर त्यासाठी १० ते २० कोटी रुपये वाचले असतील. असे कारण दाखवून विभागाला बाकीच्या बाबींना बगल देता येत नाही असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता, विभागाचा फार मोठा रिव्हॅम कार्यक्रम झाला आहे. १ हजार ६९ वाहनांमध्ये ५० टक्के वाहने ही नवीन घेण्यात आली. त्यावेळी चेसीसमध्ये अडकल्याचे त्याला ते कारण होते. त्यामुळे फायरींग नाहीतर जेटी, वॉटर टँकर या सर्व गोष्टींचा चेसीसला विषय असल्यामुळे त्यावेळेस जी बजेट प्रोव्हिजन होती ती पहिल्या वेळेस युटीलाईज झाली नाही. ते विभाग मंजूर करतो. परंतु गेल्या तीन वर्षामध्ये चेसीस मिळायला लागल्या त्यामुळे जी तरतूद वाटप झालेली आहे तो विभागाकडून व्यवस्थित हाताळले गेली अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

भारत स्टेज फोअरचा प्रदुषण करणाऱ्या सांगाड्याबाबत महापालिकेने निवेदन केले आहे. ही माहिती अशी आहे की, महापालिकेच्या इतर विभागाने कॉन्ट्रॅक्टवर वाहन घेताना किंवा स्वतःचे वाहन घेतानाभारत स्टेज फोअर नसताना सुद्धा वाहन घेतले होते. मुंबई पालिकेच्या अंतर्गत बीईएसटी चालते. त्यामध्ये सुद्धा भारत स्टेज फोअरच्या प्रमाणात नसलेले वाहन आहे. कारण त्याकाळी ते इनसिस्ट केले होते. हे काही मँडेटरी नव्हते. फायर ब्रिगेडच वाहन हे काही नेहमी ८ किंवा १२ तास रोडवर धावणारे वाहन नाही की, यामुळे मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रदुषण निर्माण होईल. यासाठी मानांक दिले होते आणि त्याप्रमाणे वाहन चालवा असे सांगितले होते. पण त्या सर्व सिस्टिमला धरून ठेवले आणि ५ वर्ष एकही वाहन खरेदी केले नाही. महापालिकेने दुसऱ्या विभागाची वाहने खरेदी केली काय ? हे आता चिफ फायर ऑफिसर म्हणू शकणार नाहीत कारण त्यांच्याकडे माहिती नसेल. त्याकाळी वित्त विभागाच्या अंतर्गत होते ते आता बीएमसीच्या आहे. ते सांगू शकतील की, महापालिकेने केले म्हणून केले. प्रेस कंट्रोल विभागाची वाहने परचेस केली. ही सर्व कारणे सांगून मुंबई शहरातील जी टॅक्सपेअर आणि सामान्य मध्यमवर्गीय लोक आहेत त्यांना हे मानांकन सांभाळून ठेवण्यासाठी काहीही लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय? अशी विचारणा समितीने केली. यावर विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केली की, विभागाकडे आरटीओ पासिंगचे युरो-४ असायला पाहिजे. मुंबईमधील बाकीच्या गाड्या आऊट ऑफ रजिस्ट्रेशन झालेल्या होत्या. महापालिकेमध्ये येणाऱ्या सर्व वाहनांपैकी ८० टक्के वाहने ही भाडेतत्त्वावर आहेत.

महापालिका जर ती वाहने वापरणार असेल आणि स्वतः वाहने घेणार नसेल त्यांनाही हे लागू होते. विभाग जर हे मानांकन असाल तर ज्या गाड्या कचरा उचलण्यासाठी रस्त्यावर दैनंदिन डंपर म्हणून फिरणार असेल त्या सर्वांना हे मानांकन लागू करायला पाहिजे होते. जर हे मानांकन मानले तर कॉन्ट्रॅक्चुएल वाहने का घेतली आहेत ? म्हणून हे केवळ फायर बिग्रेडला लागू केले आहे. तसेच हे फायर ब्रिगेड त्या मानांकनाच्या रिलॅक्सेशनसाठी उच्च न्यायालयामध्ये गेले, न्यायालयाने त्यांना मान्यता दिली. इतर भाडेतत्वावरील वाहनाला ते लागू नाही. However, they

have also tried for that relaxation. It is not that they have not tried or they sat ideal. यामध्ये असा उल्लेख आहे की, the Municipal Corporation tried to purchase but High Court have not permitted. This is the reason for the problem. विभाग अशोक लेलॅन्ड आणि टाटा या दोनच कंपन्यांकडे गेला. या कंपन्या ब्रँडेड रजिस्ट्रार महापालिकेशी डील करणाऱ्या आहेत. आज जगामध्ये भारत स्टेज फोअर पुरवण्यासाठी सन २०१० साली १० कंपन्या होत्या. पण अशोक लेलॅन्ड आणि टाटा याशिवाय हिंदूजा आणि टाटा याशिवाय आपण आयशर, बजाज किंवा महिंद्रा कंपनीकडे विभाग गेला नाही ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली.

सन २०१५-१८ ची काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१४-१९ पर्यंत ८५९.२८ करोडची तरतूद झाली होती आणि विभागाने २६५ करोड रुपये एवढा प्रत्यक्ष खर्च केलेला आहे. आता पुन्हा १५४ करोड रुपये खर्च हा या वर्षाचा आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली. पुढे समितीने तरतूद केलेल्या रक्कमेपैकी काही निधी खर्च केला नाही. याबाबत विचारणा केली असता, सदर बाब विभागीय प्रतिनिधींनी मान्य करून याचे सर्व निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे अशी माहिती दिली.

सन २०१०-१५ मध्ये सुद्धा अशीच परिस्थिती होती. बृहन्मुंबई महापालिकेला साधारण १००० हजार कोटी रकमेची तरतूद असतानाही केवळ ४०० कोटी पर्यंत खर्च करण्यात आला. आता ही सन २०१४-१९ मध्येही खर्चाची टक्केवारी ४०% पर्यंतच आहे. उर्वरित निधीचा विभागाकडून योग्य प्रकारे उपयोग केला जात नाही. खर्चाची टक्केवारी वाढून ८०% पर्यंत गेली पाहिजे अशी समितीने अपेक्षा व्यक्त केली. तसेच या सर्व प्रक्रिया जलद गतीने व यासंदर्भातील सर्व अधिकार आयुक्तांकडे सोपवून निर्णय प्रक्रिया जलद करावी अशी सूचनाही समितीने केली. यासंदर्भात मोठया प्रमाणात जी रक्कम अखर्चित राहते त्याबद्दल सर्व महानगरपालिकेने काय करावे, बजेटिंग कसे करावे. यासाठी नगरविकास विभागाकडून सूचना देण्यात येतील असे विभागीय सचिवांनी समितीला आश्वासित केले.

**परिच्छेद क्रमांक ४.१.६.२. अग्निसुरक्षा निधी न स्थापणे—**

पुढे साक्षी दरम्यान अग्निसुरक्षा निधी न स्थापना यासंदर्भात मुंबई महानगरपालिकेने आजपर्यंत अग्निसुरक्षा निधी न स्थापनेची कारणे काय आहेत ? तसेच सन २००६ मध्ये कायदा झाला आणि अजूनपर्यंत त्याची कार्यवाही केलेली नाही अशी विचारणा समितीने केली असता, यावर मुंबई महानगरपालिकेचा फायर प्रोटेक्शन फंड आहे त्यासाठी महानगरपालिकेची मंजुरी घेतलेली आहे. महानगरपालिकेकडून मंजूर झाले तरी महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना ॲक्टमधील २५ नुसार नोटीफिकेशन होऊन त्याचे गॅझेट व्हायला पाहिजे. तसेच यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

सन २००६ च्या कायद्यानुसार अन्य महानगरपालिकांमध्ये अंमलबजावणी होत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये अंमलबजावणी न होण्याची कारणे काय आहेत, या संदर्भात नियम झालेले आहेत, तेव्हा शासनाच्या मान्यतेची आवश्यकता काय ? तसेच लेखी उत्तरामध्ये अर्थसंकल्प शीर्ष तयार केले आहे असे नमूद केलेले आहे व मुंबई महानगरपालिकेला वेगळा अधिनियम आहे. मुंबई शहरासाठी महसूल गोळा करण्यासाठी बंधने आहेत त्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवावा लागतो काय याबाबत माहिती देण्यास सांगितली असता, दिनांक २९ जानेवारी २०१८ रोजी पत्र पाठविलेले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेडून विभागाकडे पत्र आले असल्यामुळे त्यावर उत्तर देणे क्रमप्राप्त आहे. या संदर्भातील सेक्शनमध्ये नमूद केलेले आहे की, या निधीतील रक्कम वापरावयाची असेल तर त्या निधीची रक्कम वापरण्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून आणि राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाला अधीन राहून खर्च करायची आहे. जमा करण्यासंदर्भातील तरतूद काही दिसत नाही. अन्य महानगरपालिकांनी अंमलबजावणी केलेली दिसते. त्यांनी पत्राद्वारे शंका उपस्थित केलेली आहे त्याला उत्तर देणे आवश्यक आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली. यावर विभागाकडून उत्तर देणे क्रमप्राप्त आहे. परंतु यास होणारा विलंब अनाकलनिय आहे व जर प्रस्ताव १२-१२ वर्षे उशिरा पाठविण्यात येत असेल तर शासनावर ढकलण्याचे काही कारण नाही. तसेच लेखी उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, अर्थसंकल्प लेखाशीर्ष तयार केलेले आहे. त्यानुसार अग्नी सुरक्षा निधी लवकर स्थापन करण्यात यावा, अशा सूचनाही समितीने विभागाला केल्या या सर्व सूचना विभागीय प्रतिनिधींनी मान्य केल्या.

औरंगाबाद महानगरपालिकेने अग्नी सुरक्षा निधी खाते केव्हा उघडले ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २००९ मध्ये औरंगाबाद महानगरपालिकने अग्नी सुरक्षा निधी खाते उघडले, तेव्हापासून वसुली सुरू आहे, अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

नवी मुंबई महानगरपालिकेने अग्नी सुरक्षा निधी खाते केव्हा उघडले ? अशी विचारणा समितीने केली यावर लेखीशीर्ष अगोदरपासून आहे आणि खाते आता उघडलेले आहे. सन २०१७-२०१८ मध्ये वसुली केलेली आहे, अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

यासंदर्भात अधिक माहिती जाणून घेताना निधी गोळा करून कोणत्या खात्यामध्ये जमा करीत होता ? अशी विचारणा समितीने केली यावर जनरल खात्यामध्ये निधी जमा करीत होतो. आता स्वतंत्र खाते उघडलेले आहे अशी माहिती समितीला विभागीय प्रतिनिधींनी दिली.

मुंबई महानगरपालिकेला १८८८चा वेगळा अधिनियम आहे आणि संपूर्ण महाराष्ट्रातील महानगरपालिकांसाठी वेगळा अधिनियम आहे. महानगरपालिका अधिनियम १८८८ अन्वये वेगळी बाब जनरेट करण्यासाठी आणि त्या खर्चासाठी महानगरपालिका आमसभेचा ठराव करून तो शासनाकडे पाठवावा लागतो. महसूल जनरेट करावयाचा असेल तर त्यासाठी स्टॅण्डींग कमिटीची मान्यता नंतर महानगरपालिकेची मान्यता त्यानंतर शासनाकडे प्रस्ताव येतो. शासनाने मान्यता दिल्यावर हे होऊ शकते. विभागाने उशीर केला हे खरे आहे. पण त्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता होती. हा कायदा अन्य महानगरपालिकांना लागू झाला आणि मुंबई महानगरपालिकेने न करण्याचे कारण म्हणजे महानगरपालिकेचा वेगळा अधिनियम आहे. त्यामुळे सी.ए.फायनान्सवर कारवाई करावी असे समितीने सूचित केले.

**परिच्छेद क्रमांक ४.१.६.३ स्वीय प्रापंजी खात्यामधून नियमबाह्य खर्च—**

स्वीय प्रापंजी लेख्यामधून नियमबाह्य खर्च केलेला आहे. सन २०१२-२०१३ मध्ये पीएलएमधून नियमबाह्यतेने विद्युत देयकावर रुपये ८३.४९ लाख खर्च केला. सन २०१५ च्या अखेरीस पीएलएमध्ये ३० कोटी ५७ लाख रुपये शिल्लक होते. हा खर्च अद्ययावत अग्निशमन प्रशिक्षण प्रबोधिनीच्या बांधकामासाठी केला जाईल. ३० कोटी रुपयांचे काय करणार आहे आणि स्वीय प्रापंजी लेख्यामधून खर्च करण्याचे कारण काय ? यासंदर्भात समितीला माहिती देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केली की, पीएलए म्हणजे पर्सनल लेजर अकाऊंट. पीएलए संदर्भात शासन निर्णय आहे आणि त्या निर्णयाच्या अनुषंगाने त्यामध्ये वेगवेगळे हेड दिले होते. सन २०१६ पर्यंत खात्यामध्ये ३० कोटी रुपये शिल्लक होते. जसे अदर ॲडमिनिस्ट्रेटीव्ह सर्व्हीसेस, फायर प्रोटेक्शन ॲण्ड कंट्रोल, डायरेक्शन ॲण्ड ॲडव्हाईज प्रोटेक्शन ॲण्ड कंट्रोल, ट्रेनींग ॲण्ड अदर एक्स्पेन्डीचर्स आणि ऑफीस एक्सपेन्सेस यामध्ये वेगवेगळे शीर्ष झाले नाहीत. जुलै २०१७ मध्ये या शीर्षाचे वर्गीकरण करण्यात आले. इतर प्रशासकीय सेवा, अग्नीसुरक्षा यंत्रणा अस शीर्ष केले. डायरेक्टर, महाराष्ट्र फायरर सर्व्हीस यांचे ऑफीस आणि कार्यालयासाठी ज्या ज्या गोष्टी लागतात त्यासाठी हा छोटा फंड युटीलाईज होतो. सन २०१७ मध्ये ३० कोटी रुपये रिझर्व्ह बँकेत जमा केले. द्वमागील वर्षाचे १२ कोटी असे एकूण ४२ कोटी रुपये रिझर्व्ह बँकेत जमा केलेले आहेत. अग्निशमन प्रशिक्षण अकादमीसाठी पालघर येथे १२ एकर जागा मंजूर करण्यात आली आहे. त्यासाठी वेगवेगळ्या एनओसीची आवश्यकता आहे. मागील दीड वर्षात वन विभाग, ग्रामपंचायतीकडून एनओसी मिळविल्या आहेत. आता हे प्रकरण जिल्हाधिकारी यांच्याकडे आहे. ही अकादमी भिवंडी येथे होणार होती पण आता पालघर येथे होणार आहे. या कामासाठी ४८ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

बांधकामास केव्हा सुरुवात करण्यात येणार आहे ? यासंदर्भात विभागाकडून बांधकाम ते लवकरात लवकर सुरू करून सन २०१८ च्या अखेरीस पूर्ण होईल. यादृष्टीने कार्यवाही करावी असे समितीने सूचित केले असता, जिल्हाधिकारी यांच्याकडून मान्यता मिळाल्यानंतर टेंडर डॉक्युमेन्टेशनची प्रक्रिया करावी लागेल व सन २०१८ पूर्ण करण्याबाबत प्रयत्न करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

विभागाकडून जी मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित केलेली आहेत त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, स्वीय प्रपंजी खात्यामध्ये आग सुरक्षा निधीची रक्कम जमा करणे व जमा निधीतील रक्कम अग्नीशमन यंत्रणा सक्षम करणे खेरीज अन्य कोणत्याही प्रयोजनार्थ खर्च करता येणार नाही आणि हेडवर कार्यालयीन खर्च देखील लिहिलेले आहे. समितीने महालेखाकारांच्या आक्षेपाला ओव्हररुल केलेले आहे. कारण शासन निर्णयामध्ये विसंगती आहे. विभागाने शासन निर्णय स्पष्ट करून दिल्यास जास्त चांगले होईल अशी सूचना समितीने केली.

**परिच्छेद क्रमांक ४.१.६.४ - वार्षिक शुल्क न आकारणे—**

यासंदर्भात वार्षिक शुल्क आकारणीमध्ये अजून प्रस्ताव विभागाकडून मंजूर करण्यात येत आहेत? तसेच सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरीसाठी महानगरपालिकेच्या आमसभेला प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यांनी तो परत पाठविण्याचे कारण काय ? अशी विचारणा समितीने केली असता, यावर प्रत्येक डेव्हलपमेंटमध्ये वेगळी छाननी फी घेण्यात येते. पहिली कॅपिटेशन फी होती, आता छाननी फी आहे. तेव्हा दोन दोन वेळेचा भार होणार आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

इमारत प्रस्ताव विभागाकडे इमारतीच्या मंजुरीसाठी आराखडा येतो. त्याच्या छाननीसाठी फी घेण्यात येते. तसेच ही वार्षिक शुल्क आकारणी आहे. अशी बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता, स्टॅण्डींग कमिटीची अशी हरकत होती की, फायर टॅक्स गोळा करण्यात येतो आणि छाननी फी गोळा करण्यात येते. महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे फायर टॅक्स गोळा करीत आहे. त्यामुळे लेखी दिलेल्या ज्ञापना अन्वये वार्षिक शुल्क आकारण्याचा प्रस्ताव परत आला आहे. व तो नामंजूर करण्यात आला आहे. प्रस्ताव पुनश्च मान्यतेसाठी पाठविण्यात येईल अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

पुढे साक्षी दरम्यान समितीने नाशिक महानगरपालिका - वार्षिक शुल्क न आकारण्याचे कारण काय आहे ? अशी विचारणा समितीने केली. यावर सन २०१० ते २०१६ च्या दरम्यान आग सुरक्षा निधी पोटी १९.६८ कोटी जमा केलेले आहेत त्याच्या एक टक्का म्हणजे १९.६८ लाख रुपये

वार्षिक शुल्क आकारणे अपेक्षित होते. ती रक्कम वसूल केलेली नाही. सन २०१८-२०१९ मध्ये १.८९ लक्ष रुपये वसूल केलेले आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

परंतु स्पष्टीकरणामध्ये नमूद केलेले आहे की, कर्मचारी संख्ये अभावी वसुली झालेली नाही ही बाब समितीने विभागीय प्रतिनिधींच्या निदर्शनास आणून दिली असता, कर्मचारी संख्या कमी आहे. जेवढी मंजूर पद असणे आवश्यक होते तेवढी पदे नाहीत ते एक कारण आहे. अधिनियमातील कलम १४ (३) नुसार दिनांक ६.१२.२००८ रोजी सुरक्षा निधी लागू करण्यात आला. १४८४ पेक्षा जास्त इमारती आहेत. त्यापैकी ९३४ इमारतींना पूर्णत्वासाठी अंतिम ना हरकतत दाखला दिलेला नाही. त्यामुळे वार्षिक आकारणी करणे आवश्यक होते, परंतु ती केलेली नाही. यावर्षी ती सुरू केलेली आहे. १ लाख ८९ हजार ७८८ रुपये वसूल केलेले आहेत आणि उर्वरित रक्कम वसूल करण्याचा प्रयत्न विभागाकडून करण्यात येत आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सादर केली.

सन २०१०-२०१५ या कालावधीमधील अमरावती महानगरपालिकेच्या वार्षिक शुल्क आकारणीची माहिती देण्यात यावी. या वर्षापासून वार्षिक शुल्क आकारणी करण्यात येत आहे. यापूर्वी ती का करण्यात येत नव्हती ? याबाबत समितीने खुलासा करावयास सांगितला असता, दिनांक ९ मे, २०१८ पासून वसुलीसंदर्भात कार्यवाही केलेली आहे व दिनांक १२ एप्रिल, २०१८ च्या स्थायी समितीमध्ये याबाबतचा ठराव संमत झाला होता. त्यानुसार या वर्षापासून वार्षिक शुल्क आकारणी वसूल करणे सुरू केलेले आहे अशी माहिती खुलाश्यादरम्यान विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

मागील काळापासून वसुली न करण्याचे कारण काय आहे ? आतापर्यंत कोटयवधी रुपयांची वसुली होऊ शकली असती. त्याचप्रमाणे नागपूर महानगरपालिकेची वसुली केव्हा पासून सुरू आहे. याबाबत विचारणा केली असता, मे, २०१५ पासून नागपूर महानगरपालिकेने वसुली करण्यास सुरुवात केलेली आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

औरंगाबाद महानगरपालिकेची किती कराची रक्कम वसूल झाली याबाबत माहिती देण्यात यावी अशी सुचना समितीने केली असता, सन २००५-०६ पासून वसुली सुरू आहे. परंतु रक्कमेबाबतची आकडेवारी उपलब्ध नाही अशी विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली.

वार्षिक शुल्क वसुलीचा नियम सन २००६ पासून अंमलात आलेला आहे. औरंगाबाद महानगरपालिकेने मालमत्ता करामध्ये अग्निशमन कर वसूल केलेला आहे. मालमत्ता करामधून अशा प्रकारचा कर वसूल करता येतोकाय? इतर महानगरपालिका कशा प्रकारे वसुली करीत असतात ? अशी विचारणा समितीने केली असता, मालमत्ता करामध्ये अशा प्रकारचा कर वसूल केला जात नाही. बऱ्याच ठिकाणी वेगळ्या पद्धतीने हा कर वसूल केला जातो. मालमत्ता कराचा भाग वेगळा असतो अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

यामध्ये प्रत्येक महानगरपालिका वेगवेगळ्या प्रकारे कर वसूल करीत असते. परंतु याबाबतच्या सर्वसमावेशक सूचना विभागामार्फत सर्व महानगरपालिकांना देण्यात येतात. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रश्नासंदर्भात उत्तर द्यावयाचे आहे. त्या उत्तराच्या अनुषंगाने सर्वच महानगरपालिकांना सामाईक सूचना देण्यात येतील असे विभागीय सचिवांनी समितीला आश्वास्त केले.

पुणे महानगरपालिकेच्या कराच्या वसुलीसंदर्भातील माहिती देण्यात यावी अशी सूचना समितीने केली असता, पुणे महानगरपालिकेमार्फत सन २०१० पासून वसुली करण्यात येत आहे. सन २०१०-१५ मध्ये सुमारे २६ लाख ३५ हजार रुपये वसूल करण्यात आलेले आहेत अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली. परंतु ही आकडेवारी फार कमी आहे. किती टक्के वसुली करण्यात येत असते. याबाबत समितीने विचारणा केली असता, निधीच्या एक टक्क्याप्रमाणे वसुली करण्यात येत असते अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

नवी मुंबई महानरपालिकेच्या वसुलीसंदर्भात माहिती देण्यात यावी असे समितीने सुचित केले असता, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१० रोजी कराच्या वसुलीसंदर्भातील नगर विकास विभागाने सूचना दिल्या होत्या. तेव्हापासून नवी मुंबई महानगरपालिका वसुली करीत आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

**परिच्छेद क्र.४.१.६.५ राज्य शासनाकडून निधी प्राप्त होणाऱ्या योजनेची अंमलबजावणी न करणे—**

राज्य शासनाकडून निधी प्राप्त होणाऱ्या योजनेची अंमलबजावणी न करणे संदर्भात साक्षीदरम्यान महापालिका आयुक्तांनी सदर शिर्षामधून ७८.५० लाख रुपये काढून वापरले आहेत. अशाप्रकारे कार्यवाही करणे योग्य आहे का ? अशाप्रकारे निधी वापरता येतो का ? तसेच मार्च, २०१२ मध्ये नगरविकास विभागाने आपल्याला १,७८,५०,००० इतक्या रकमेचा निधी अदा केला. त्या अनुषंगाने विभागाला ६५ टक्के मॅचिंग ग्रँट जमा करायची होती. परंतु त्यासंबंधी विभागाने कोणतीही कार्यवाही केली नाही. तसेच सदर योजना ५.२० कोटी रुपयांची असल्यामुळे १.७८ कोटी रुपये ३५ टक्क्यांप्रमाणे मिळाले आहेत. परंतु आजपर्यंत तो निधी खर्च केला नाही किंवा मॅचिंग ग्रँट दिली नाही. तसेच तो निधी इतरत्र वळता केला आहे. याबाबत सद्यःस्थिती काय आहे ? या बाबत समितीने विचारणा केली असता, या संदर्भात खुलासा करताना औरंगाबाद महापालिकेच्या प्रतिनिधींनी महानगरपालिकेने त्यावेळी जो निधी खर्च केला तो निधी त्या खात्यामध्ये टाकण्यासंबंधी महापालिका कार्यवाही करीत आहे अशी माहिती दिली.

अशाप्रकारे एका कामासाठी असलेला निधी दुसऱ्या कामासाठी वापरता येतो का ? असल्यास यासंबंधी शासनाने परिपत्रक काढलेले आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, अशाप्रकारे शासनाने कोणतेही परिपत्रक काढलेले नाही. त्यामुळे यासंबंधी कोणी कार्यवाही केली याबाबत विभागाकडून चौकशी करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

महानगरपालिकेकडे मॅचिंग ग्रँट तयार असल्यानंतर शासनाने त्यांच्याकडे निधी पाठवला पाहिजे होता. परंतु शासनाने सदर निधी ॲडव्हान्समध्ये पाठवून दिला. त्यानंतर महानगरपालिकेने जून, २०१२ ते मार्च, २०१५ पर्यंत ३ वर्षे ती रक्कम फिक्स डिपॉझीटमध्ये ठेवली. त्यानंतर आपत्कालीन व्यवस्थापनाकरिता इमारत बांधायची होती. त्याकरिता निधी कमी पडल्यामुळे हा निधी वापरण्यात आला. आता संबंधित अधिकारी सदर निधी त्या खात्यामध्ये वर्ग करीत असल्याचे सांगत आहेत. याकरिता १९५८ चा कंपनी ॲक्ट लागू होतो. हा ॲक्ट लिमिटेड कंपनी तसेच प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला लागू होतो. हा शासन तसेच स्वायत्त संस्थांचा प्रश्न आहे. हा निधी फायर ब्रिगेडचा होता. शासनाने त्यांची मॅचिंग ग्रँट तयार असेपर्यंत ३५ टक्के निधी पाठविण्याची गरज नव्हती अशी बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता, मागील बैठकीच्या वेळी समितीने यासंबंधी सूचना देण्यासंबंधी सांगितले होते. त्यानुसार सर्व महानगरपालिकांना सूचना दिल्या आहेत की, शासनाकडून आलेला निधी आपल्या मॅचिंग ग्रँटसमवेत जोडून ठरवून दिलेल्या कारणांकरिता खर्च करावी अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

शासनाने निधी पाठविल्यानंतर तो खर्च करण्यासाठी जास्तीत जास्त एक वर्षांची मुदत असते. परंतु सदर महानगरपालिकेने तो निधी ३ वर्षांसाठी फिक्स डिपॉझीटमध्ये ठेवला. शासनाने एखाद्या महानगरपालिकेला निधी दिल्यानंतर एक किंवा दोन वर्षांमध्ये खर्च केला पाहिजे अन्यथा तो निधी शासनाकडे समर्पित केला पाहिजे. विभागाकडून अशा प्रकारच्या सूचना दिल्या पाहिजेत. नसल्यास त्या देणे आवश्यक आहे. शासनाने सदर निधी फिक्स डिपॉझीटमध्ये टाकण्याकरिता महानगरपालिकेला दिलेला नाही. शासन स्तरावरुन सर्व महानगरपालिकांना सूचना दिल्या पाहिजेत की, शासनाकडून प्राप्त झालेला निधी विहित मुदतीत महानगरपालिकेने खर्च न केल्यास त्यानंतर आयुक्तांनी सदर निधी शासनाकडे समर्पित केला पाहिजे अशी सूचना समितीने साक्षीदरम्यान विभागास केली.

महानगरपालिकेने सदर निधीमध्ये ६५ टक्के हिस्सा मॅचिंग ग्रँट म्हणून समाविष्ट करणे आवश्यक होते. परंतु ६ वर्षे उलटून सुद्धा महानगरपालिकेने ५.२० कोटी रुपयांच्या मॅचिंग ग्रँटकरिता तरतूद केलेली नाही. तसेच विभाग असे सांगत आहेत की, वाहन खरेदी करण्यासाठी ३ कोटी रुपयांचा निधी खर्च करणार आहात. महानगरपालिका जोपर्यंत ६५ टक्क्यांच्या हिशेबाने ५.२० कोटी रुपये जमा करीत नाहीत तोपर्यंत पार्टली स्वरुपात निधी कसा खर्च करु शकतात ? अशाप्रकारे महापालिकेने निधी डायव्हर्ट केला आहे. तसेच हा निधी कोणाच्या अधिकारात वळता करण्यात आला. त्याकरिता आमसभेची मंजुरी घेण्यात आली होती का किंवा यासंबंधी नगरविकास विभागाला कळविण्यात आले होते का ? अशी विचारणा समितीने केली असता, यावर्षीच्या अंदाजपत्रकात महानगरपालिकेचा जेवढा हिस्सा होता तेवढया रकमेची तरतूद केली आहे. तसेच १.१७ कोटी रुपये खर्च झाले होते त्या निधीची सुद्धा तरतूद करण्यात आली आहे. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

महानगरपालिका आयुक्तांनी शासनाकडून आलेल्या निधीच्या अनुषंगाने त्याच्या हिश्यानुसार निधीची तरतूद करणे गरजेचे आहे अशा प्रकारचा प्रस्ताव त्यांनी महानगरपालिकेमध्ये मांडला होता का ? असल्यास तो प्रस्ताव महानगरपालिकेने मंजूर केला की नामंजूर केला ? सदर प्रस्ताव महानगरपालिकेने नामंजूर केला असल्यास त्यानंतर आयुक्तांनी कोणती कार्यवाही केली ? या संदर्भात समितीने विभागास खुलासा करावयास सांगितला त्यावर सदर निधी खर्च झाला नाही. ती रक्कम फिक्स डिपॉझीटमध्ये ठेवली होती व ती दुसऱ्या कारणासाठी वापरली. तसेच निधी खर्च करीत असताना ही बाब अकाऊंट ऑफिसरने महानगरपालिकेच्या निदर्शनास आणली का अशा प्रकारचे सर्व मुद्दे चौकशीमध्ये घेण्यात येतील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यात २-३ मुद्यांचा समावेश आहे. पैसे वळते केले, तसेच ६५ टक्के हिश्यानुसार तरतूद न करता ६-६ वर्षे रक्कम अखर्चित ठेवण्यात आली. महानगरपालिकेमध्ये आयएएस दर्जाचे आयुक्त कार्यरत असतात. आयुक्तांनी अशाप्रकारची कार्यवाही केल्यामुळे ही बाब योग्य नाही. तसेच या संदर्भात ऑडिट पॅरा आला नसता तर त्यासंबंधी तरतूद करण्यात आली नसती. हा अक्षम्य अपराध आहे असे समितीचे मत आहे. शासनाने यासंबंधी कारवाई करून समितीकडे एक महिन्यात अहवाल सादर करावा अशी सूचना समितीने साक्षीदरम्यान केली परंतु अद्याप अहवाल अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.४.१.७.१. – अग्निशमन केंद्रांची अपर्याप्त संख्या-**

महानगरपालिकेने २६ नवीन अग्निशमन केंद्र बांधण्याचे प्रस्तावित केले होते. त्याकरिता ठोस आधार असणे आवश्यक आहे. त्यापैकी १८ वर आरक्षण होते. त्यापैकी ७ प्रकरणे राखीव होती, एक प्रकरण न्यायप्रविष्ट होते. जमिनीची उपलब्धता १८ प्रकरणांमध्ये नव्हती. तसेच ॲकॉमडेशन रिझर्व्हेशन पॉलिसी अंतर्गत महानगरपालिकेच्या ताब्यात किती अग्निशमन केंद्र आली होती ? तसेच विकास नियंत्रण आराखडा २०१४ ते २०३४ पर्यंत आहे. याचा अर्थ २०३४ पर्यंत ३४ अग्निशमन केंद्र बांधत राहणार आहात का ? ही अग्निशमन केंद्र मुंबईतील असल्यामुळे त्यासंबंधी टाईमबाऊंड कार्यक्रम असणे अत्यावश्यक आहे. मुंबईत हायराईज इमारती, इंडस्ट्रीज असल्यामुळे आगीची प्रकरणे सर्वात जास्त घडत असतात. यासंबंधी ठोस आराखडा तयार करण्याची गरज आहे. यासंबंधी महानगरपालिकेची नेमकी भूमिका समितीला समजली पाहिजे. अग्निशमन व

महापालिका या स्वतंत्र यंत्रणा असल्यासारख्या कामकाज करतात. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणली असता, DCR आराखडयानुसार मुंबईला अतिरिक्त ३५ अग्निशमन केंद्राची गरज आहे. सध्या मुंबईत ३४ अग्निशमन केंद्र कार्यान्वित आहेत. नवीन आराखडयानुसार ३५ अग्निशमन केंद्रापैकी २६ ठिकाणी आरक्षण ठेवलेले आहे. ॲकॉमडेशन रिझर्व्हेशन पॉलिसीचा नियम मागील वर्षी लागू झाला आहे. परंतु यानंतरच्या काळात थोडया जास्त प्रमाणात त्याकरिता जागा मिळू शकतील असे वाटते. डीसी रेग्युलेशनमध्ये ॲकॉमडेशन रिझर्व्हेशन पॉलिसीला दीड वर्षापूर्वी देण्यात आलेल्या प्रोत्साहनापैकी जास्त प्रोत्साहन मिळत आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

नवीन डीपीमध्ये अग्निशमन केंद्राकरिता २६ ठिकाणी आरक्षण ठेवल्याची बाब चांगली आहे. त्याकरिता जमीन मिळण्याकरिता किती कालावधीत प्रयत्न करणार आहात? याकरिता स्पेशल ड्राईव्ह घेतला तर त्याकरिता जमिनी मिळू शकतील. शासन अशाप्रकारे ड्राईव्ह घेणार आहे का ? याबाबत समितीने विचारणा केली असता, ड्राईव्ह घ्यावयाचा असल्यास आपल्या भूसंपादनाची कार्यवाही सुरू करावी लागेल. त्याकरिता तेवढे पैसे द्यावे लागतील. त्यामुळे सध्या असा मानस आहे की, ॲकॉमडेशन रिझर्व्हेशन पॉलिसीला जास्त प्राधान्य दिले आहे. त्यात पहिल्या ५ वर्षांमध्ये त्यांनी जागा दिल्यास त्याकरिता त्यांना ॲडिशनल इन्सेटिव्ह दिला आहे. त्यामुळे पहिल्या ५ वर्षांमध्ये त्यांच्याकडून कशा प्रकारचा प्रतिसाद मिळतो, त्यानुसार पुढील कारवाई करावी लागेल असा खुलासा विभागीय सचिवांनी समितीला केला.

सध्या ३४ अग्निशमन केंद्राव्यतिरिक्त किती अग्निशमन केंद्र तयार झाली आहेत, लेखी स्पष्टीकरणामध्ये कांदरपाडा व दहिसर येथील २ अग्निशमन केंद्र अंडर कन्स्ट्रक्शन असून ती अंतिम टप्प्यामध्ये असल्याचे नमूद केले आहे. ती पूर्ण झाली आहेत का तसेच या व्यतिरिक्त आणखी काही बांधकामे सुरू आहेत का ? त्याबाबत सद्यःस्थिती समितीला द्यावी अशी सूचना समितीने केली असता, यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, महापालिकेकडे सध्या ३४ अग्निशमन केंद्र कार्यरत आहेत यापूर्वी करण्यात आलेल्या गॅप ॲनेलेसीसमध्ये असे आढळून आले की, सध्याच्या परिस्थितीत मुंबईला ३४ अग्निशमन केंद्रांव्यतिरिक्त ३६ अग्निशमन केंद्रांची गरज आहे. तसेच विकास आराखडयामध्ये सध्या २६ अग्निशमन केंद्र बांधण्याकरिता आरक्षण ठेवल्याबाबत माननीय सचिवांनी समितीला माहिती दिली आहे. त्यापैकी १७ ठिकाणी आपण मिनी फायर स्टेशन सुरू करु शकतो. त्यापैकी ७ फायर स्टेशनची कामे सुरू झाली आहेत. गॅप ॲनेलेसीसमध्ये ३६ अग्निशमन केंद्रांची गरज असून आम्हाला अशाप्रकारे ४३ फायर स्टेशनची सुविधा उपलब्ध करून देता येईल. कांदरपाडा येथे नवीन अग्निशमन केंद्र बांधण्यात येत असून ते अंतिम टप्प्यात आहे. तसेच ते लवकरात लवकर कार्यान्वित होईल. दहिसर आणि कांजूरपाडा ठाकूर व्हीलेज, कांदिवली येथील अग्निशमन केंद्र ही दोन्ही एक आहेत. ते प्रगतीपथावर असून महापालिका स्तरावरुन त्यासंबंधी सातत्याने पाठपुरावा करीत आहे.

आंबोली, प्रियदर्शनी पार्क, नेपियन्सि रोड व मलबार हिल येथील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. ही बाब विचारात घेऊन महापालिकेने यासंदर्भात काही निर्णय घ्यायला हवा असे समितीने सुचित केले असता, प्रियदर्शनी पार्क, नेपियन्सी रोड मलबार हिल हा विषय डीपी मंजूर झाल्यानंतर मिटणार आहे असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले.

इन्सेन्टीव्ह दिले जाणार आहे हे चांगले आहे. आता त्यांना १०० टक्के देणे बंधनकारक आहे. जेवढया जागा ॲकोमडेशन व रिझर्व्हेशनच्या पॉलीसी नुसार मिळणार आहेत तेवढयाच जागेचे पर्चेस नोटीस काढावी. ५ वर्षात जागा देणार असल्यास त्याचे कमिटमेंट त्याने द्यावी किंवा त्याची पर्चेस नोटीस काढावी अशी सूचना समितीने कली असता, तेवढया जागेपुरती संपादनाची नोटीस काढता येणार नाही पूर्ण जागेची काढावी लागेल. संपादन सुरू झाले तर ७५ टक्के रक्कम भरल्याशिवाय जिल्हाधिकारी पुढील कारवाई करीत नाही अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

दुसऱ्याच्या जमिनीवर डीपीनुसार आरक्षण घातलेले आहे. मुंबई शहरापासून उपनगरापर्यंत बरेच भूखंड आहेत. मुंबई महापालिका दुसऱ्यांच्या जागा मिळेल मग अग्नीशमन केंद्र तयार करणार याची वाट बघत बसणार काय ? मुंबई महापालिका स्वतःच्या जागेवर अग्नीशमन केंद्र तयार करणार काय ? अशी विचारणा केली असता, नेपियन्सी रोड येथील जागेवर केंद्र होते ते काढून आता महापालिकेच्या जागेवर आरक्षण प्रस्तावित केले आहे. त्यामुळे त्याचे बांधकाम लगेच होईल. हा निर्णय महापालिकेला कळविण्यात येईल. ज्या ठिकाणी महापालिकेची जागा असेल व अग्नीशमन केंद्रासाठी सोयीस्कर असेल तेथे बांधकाम करावे अशा प्रकारच्या विभागाकडून महापालिकेला सूचना देण्यात येतील असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले.

७७४ कर्मचाऱ्यांची भरती केली त्यांना प्रशिक्षण दिले काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, या ७७४ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिलेले आहे. त्यांना फिल्डमध्ये पाठवले आहे.

मिनी फायरस्टेशन्सची संकल्पना अतिशय चांगली आहे. शासन स्तरावरुन इतर महापालिकांना कळवण्याची गरज असल्यास तसे विभागामार्फत कळविण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले.

नाशिकबाबत माहिती द्यावी असे समितीने सूचित केले असता, नाशिक महापालिकेत एकूण १८ अग्नीशमन केंद्रांची गरज असून ६ कार्यरत आहेत. सन २०१७ मध्ये डीपी मंजूर झाला असून १२ रिझर्व्हेशन ठेवले असून त्यांचा विकास करावा लागेल अशी माहिती महापालिकेच्या आयुक्तांनी

समितीला दिली.

निधीची उपलब्धता करण्यात येईल असे आयुक्तांनी सांगितले होते असे समितीने निदर्शनास आणले असता, आरक्षित ठेवलेली जागा संपादित करावी लागेल किंवा टीडीआरच्या माध्यमातून घ्यावी लागेल. टीडीआरमधून जागा घेण्याचा पहिला प्रयत्न असेल. टीडीआर मधून न मिळाल्यास भूसंपादनन करावे लागेल. बांधकामासाठी येणारा खर्च फायर निधी वापरता येईल काय याची चाचपणी करण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे महापालिकेच्या आयुक्तांनी विदित केले.

अमरावती संबंधी खुलासा करण्यात यावा असे समितीने निदेश दिले असता, अमरावती येथे ४ अग्नीशमन केंद्र असून ४ करिता जागा प्रस्तावित केली आहे. डीपीचे काम सुरू आहे. जागा मिळण्यासाठी व आरक्षणाबाबत कळवले आहे असे महापालिकेच्या आयुक्तांनी विदित केले. यापूर्वीच्या डीपीमध्ये आरक्षण नव्हते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, जुने आरक्षण होते ते बांधून घेतले आहे. आता सुधारित डीपीचे काम सुरू झाले असून त्यात ४ केंद्र ठेवले आहेत असे आयुक्तांनी समितीस अवगत केले.

एकूण ५ केंद्र प्रस्तावित आहेत. हातगाव अकोली, यवतमाळ रोड येथे एकूण ८ केंद्र प्रस्तावित आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, सध्या ४ केंद्र असून ४ कार्यरत आहेत. ४ ठिकाणी आरक्षण दाखवावे अशी मागणी केलेली आहे. जुन्या डीपीमध्ये टीडीआर मिळालेले आहे ते दाखवल्यावर काम पुढे जाऊ शकेल असे आयुक्तांनी समितीस अवगत केले.

नागपूरमध्ये २ ठिकाणी काम सुरू आहे. २ ठिकाणी जागेचा शोध सुरू आहे. याबाबत खुलासा करावा असे समितीने निदेशित केले असता, सध्या ३ स्थानकांच्या पुर्नर्निमाणाचे काम सुरू आहे. नवीन २ केंद्रे सुरू करायचे आहेत त्याकरिता जागेचा शोध सुरू आहे. त्रिमुर्तीनगर व वाटोळा येथे सुरू झाले आहे. २ केंद्रांचे बांधकाम सुरू झालेले आहे अशी माहिती आयुक्तांनी समितीला दिली.

नागपूरला बरीच शासकीय जमीन आहे. अग्नीशमन केंद्रासाठी जागा मिळत नाही. हा शोध कधी संपणार? अशी विचारणा समितीने केली असता, एक महिन्याच्या आत जागेचा शोध पूर्ण करण्यात येईल असे आयुक्तांनी समितीस अवगत केले. त्यावर मेट्रोसाठी २ महिन्यात जागा मिळाली. नागपूरला जागा बरीच आहे. तेथे शासकीय जमीन आहे असे समितीने निदर्शनास आणले.

ठाणे बाबत माहिती देण्याबाबत समितीने निदेशित केले असता, निकषानुसार १४ केंद्रांची आवश्यकता होती सध्या ६ केंद्र सुरू असून ३ मिनिकेंद्रे आहेत. एकूण ९ केंद्र सुरू असून आवश्यकतेप्रमाणे ८ केंद्रांचे बांधकाम सुरू आहे. जागा निश्चित झालेली असून काम सुरू आहे. एक वर्षात सर्व पूर्ण होईल अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

औरंगाबादबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, १३ केंद्रांची आवश्यकता असून त्यापैकी ३ अस्तित्वात आहेत. अग्नी सुरक्षा अभियानमधील अनुदान आले असून त्या मधून ५ केंद्र बांधायचे आहेत. ४ केंद्रांचे वर्कऑर्डर झाले असून एका केंद्राकरिता प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने जागा बदलत आहे. त्यावर कोणते केंद्र कधी पूर्ण होईल या बाबत आयुक्तांनी प्रत्येक महापालिकेकडून बार चार्ट मागवला पाहिजे. वर्षानुवर्षे हा कार्यक्रम सुरू आहे. महापालिकेने समितीला चार्ट पाठवावा. किती ठिकाणी जागा मिळाली आहे, किती ठिकाणी बांधकाम पूर्ण होणार आहे. महापालिकेला किती केंद्रांची आवश्यकता आहे, किती ठिकाणी जागा उपलब्ध आहे व जागेची कमतरता आहे. तसेच सुरू झालेले बांधकाम कधी पूर्ण होणार इ. माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने निदेशित केले.

पुण्याबाबत माहिती देण्यात यावी असे समितीने सांगितले असता, ३५ अग्नीशमन केंद्राची आवश्यकता असून १३ कार्यरत आहेत. २ केंद्रांचे बांधकाम आताच पूर्ण झाले असून २ केंद्राचे बांधकाम प्रगतीपथावर आहे इतर ४ ठिकाणी जागा ताब्यात आलेली आहे असे आयुक्त यांनी समितीस माहिती देताना सांगितले.

३५ केंद्रापैकी केवळ १३ केंद्र आहेत. दोन वर्षांपूर्वी १३ पैकी शेवटचे केंद्र बांधलेले आहे. नजीकच्या काळात दोन केंद्र बांधून पूर्ण असून त्याचे उद्‌घाटन व्हायचे आहे. दोन केंद्रांचे काम प्रगतीपथावर आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

४ केंद्रांचे बांधकाम कधी पूर्ण होणार आहे? महापालिकेच्या किंवा शासनाच्या जागेकरिता महापालिकेने जास्त आग्रही असले पाहिजे. व्हाएबिलीटी नसल्यास कोणी टीडीआर घेणार नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, अंदाजपत्रकातील तरतूद ४ केंद्राकरिता केलेली नसेल. पुढील वर्षी तरतूद केली जाईल व काम होईल असे आयुक्तांनी समितीस आश्वास्त केले.

विभागाने सर्व आयुक्तांना सूचना द्यावी की, जिल्हाधिकाऱ्यांकडे बसून शासकीय जागेचा तपास घेण्यात यावा. प्रत्येक शहरात जागा आहेत. प्रिमियम घेऊन शासन एफएसआय विकते तेव्हा टीडीआरचे मार्केट संपुष्टात येते. शासन टीडीआर, एफएसआय विकत असेल तर कोणी कशाला विकत घेईल. आरक्षणाची जागा कशी ताब्यात येईल या करिता विभागाने प्रयत्न करावा असे मत समितीने व्यक्त करून पुण्याचा डीपी कधी तयार झाला, त्यावेळी जागा आरक्षित केली नाही काय ? अशी विचारणा केली असता, मागील वर्षी डीपी झाला होता. ८ जागा आरक्षित असून त्या पैकी

४ जागा ताब्यात आल्या आहेत. ४ जागांची प्रक्रिया सुरू आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

महापालिकेच्या मालकीच्या जेवढ्या जागा असतील तेथे रिॲलोकेशन ऑफ रिझर्व्हेशन करावे असे सूचित करून नवी मुंबई महापालिकेबाबत माहिती द्यावी असे समितीने निदेशित केले असता, लोकसंख्येनुसार एमआयडीसी वगळता ८ केंद्र आवश्यक असून सध्या ४ केंद्र कार्यरत आहे. कोपरखैरणे येथील केंद्राचे बांधकाम पूर्ण झाले आहे. कर्मचारी नियुक्त करण्यासाठी जाहीरात दिली आहे. कर्मचारी नियुक्त झाल्यानंतर पाचवे केंद्र देखील सुरू होईल. एक भूखंड राखीव आहे. जागा बघून महानगरपालिका नियोजन करेन. तरतूद करून स्टाफ नियुक्त करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

एक केंद्र किती दिवसात पूर्ण होईल ? या करिता तरतूद केली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सध्या यावर्षी नवी मुंबई येथील दोन एक्झसिटींग मंजूर होती त्याची काही बांधकामे सुरू आहेत. ते आता पूर्ण होत आलेली आहेत. त्यातून किती निधी उरतो काय ते बघून सुधारित तरतूद करण्याची गरज पडेल. समितीच्या सूचनेप्रमाणे उरलेल्या तीन नवीन आगीच्या बंबसाठी नियोजनाची प्रक्रिया सुरू करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

समितीचा प्रश्न हा ६ आगीच्या बंबसाठी आहे त्यासाठी विभागाने आश्वस्त करावे असे समितीने सूचित केले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शवून विभागाकडून ६ आगीच्या बंबासाठीच्या प्रक्रिया सुरू करण्यात येईल असे आश्वस्त केले.

यावर्षी अर्थसंकल्पामध्ये किती रुपये निधीची तरतूद केली आहे ते सांगण्यात यावे व महापालिका फायर ब्रिगेडसाठी किती रुपयांची भांडवली तरतूद केली हा समितीचा स्पेसिफिक प्रश्न आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, यावर्षी अर्थसंकल्पातील एकूण तरतूद ही ५९.९७ कोटी रुपये आहे. ही सर्व भांडवली तरतूदच आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

मग महापालिकेला निधीच्या कमतरतेचा काही प्रश्नच नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, समितीच्या सूचनेप्रमाणे तरतूद करून पुढची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधीनी समितीस आश्वस्त केले.

**परिच्छेद क्र. ४.१.७.२ – अग्निशमन केंद्र सुसज्ज नसणे**

बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या उत्तरामध्ये नमूद केले आहे की, १०,४७० हायड्रंटस उपलब्ध असून त्यापैकी फक्त १,१३१ हायड्रंट कार्यरत आहेत. बाकीचे हायड्रंट बंद का आहेत तर ते झोपडपट्टीने व्यापलेले आहेत, व्हॉल्व्हची चोरी होते तसेच रस्ते दुरुस्तीमध्ये मुख्य व्हॉल्व्ह जमिनीखाली गाडला जातो. हा रस्त्यामध्ये गाडलेला व्हॉल्व्ह काढण्यासाठी किती वेळ लागतो ? ही काढण्याची अडचण आहे. दुसरे असे की, समितीच्या माहितीप्रमाणे हे सर्व हायड्रंट स्वातंत्र्यपूर्व काळातील आहेत. अशा प्रकारची यंत्रणा राबवणे आवश्यक आहे, यासाठी स्वातंत्र्यानंतर मुंबई महानगरपालिकेने काही व्यवस्था केली आहे काय ? कारण आग विझवण्यासाठी तो अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. महापालिकेने दुसरे उत्तर असे दिले आहे की, मोठ्या प्रमाणातील आगीच्या वेळी अग्निशमन दलजवळ असलेली नदी, तळे व समुद्र हे उपलब्ध होईल तिथून पाणी घेऊन महापालिका आग विझवते. मुंबईमध्ये अशा किती नद्या व तळे उपलब्ध आहेत याची माहिती अग्निशमन दलाजवळ आहे काय ? त्याचप्रमाणे सदर फायर हायड्रंटमध्ये फक्त त्या क्षेत्रात पाणीपुरवठा करण्याच्यावेळी पाणी उपलब्ध असते. एकेकाळी मुंबई शहरात त्या लॅनमध्ये २४ तास पाणी उपलब्ध असायचे तेव्हा ते हायड्रंट उपयोगाचे होते. नंतरचे टाकलेले हायड्रंट हे फक्त एअर काढण्यासाठी किंवा कंटेमिनेशन वॉटरला बाहेर फ्लो करण्यासाठी होते. त्यासाठी २४, २६, ३६, ४८ किंवा ९ अशा जॉएंटला ते हायड्रंट कामाचे होते. पण आता ते हायड्रंट उपयोगाचे नाहीत. स्टँडींग कमिटीमध्ये वारंवार हे विषय काढले आहेत. त्या हायड्रंटला पाण्याचे रिर्सोसेस नाहीत हे खरे आहे. प्रत्येक सेक्टरमध्ये सहजपणे जास्तीत जास्त पाणी कसे उपलब्ध होईल याची व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. मुंबईत अनेक मैदानांमध्ये जलसाठ्याच्या टाक्या बनवण्यात आलेल्या आहेत. परंतु त्यांची काय परिस्थिती आहे, त्यामध्ये खरच जलसाठा आहे काय ? हे देखील पाहिले जात नाही म्हणून यासाठी फायर बिग्रेडचे काही नियम तयार करा किंवा यासाठी काही यंत्रणा आहे काय, नसल्यास विभाग ती उपलब्ध करून देणार की नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, महानगरपालिकेकडे १०,६३६ वॉटर हायड्रंट होते, असे लेखी दिलेले होते. आता ते बऱ्यापैकी डिसफंक्शनल झालेले आहे. त्याचा रिव्हाईव्ह करण्यासंदर्भात एक मोहीम हाती घेतली होती. परंतु त्याचा शेवट असा दिसतो की, फक्त १,१३१ वॉटर हायड्रंट फंक्शनल आहेत. हे हायड्रंट वापरायचे असतील तर फक्त पाण्याच्या वेळी त्याला वापरु शकतो, ही एक मर्यादा त्यामध्ये आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, हे सर्व रिव्हाईव्ह करणार नाही तर त्यासाठी महानगरपालिकेने बनवलेल्या काही योजना आहेत. त्याबाबत पाठपुरावा सुरू आहे. ३२ वॉटर टँकर महानगरपालिकेने आणलेले आहेत. ज्या ठिकाणी घटना घडेल तिथे वॉटर टँकर डिप्लॉय केले जातील. त्या व्यतिरिक्त २६ वॉटर फिलिंग पॉइंटस् शोधलेले आहेत म्हणजे ते २४/७ उपलब्ध राहतील. एखादी घटना घडल्यानंतर तिथे पाण्याची गरज पडली तर या फिलिंग पॉईटस् वरुन पाणी घेता येईल. तसेच वॉटर ट्रान्सपोर्टेशनची योजना विभागाने बघितलेली आहे. ती योजना जर आली तर पाण्याच्या कमतरतेची गरज रिझॉल्व होईल. हे सर्व विभाग लवकर परचेस करणार आहे आणि ते लास्ट स्टेजवरच आहे. मोठ्या प्रमाणावर जे वॉटर हायड्रंट होते ते कार्यरत नाही. ते सर्व डिसयुजमध्ये आले

आहे त्यामुळे ते पूर्ण नवीन रितीने करता येणार नाही. त्या दृष्टीने मजबूत करण्याचा जो प्लॅन होता तो केलेला आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

महापालिकेचे फायर ब्रिगेडचे फिलिंग स्टेशन कुठे आहेत अशी विचारणा समितीने केली असता, ते सर्व फिलिंग स्टेशन महानगरपालिकेच्या पोर्टलमध्ये टाकले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले आहे.

काही फिलिंग स्टेशन केवळ फायर ब्रिगेडसाठीच आरक्षित ठेवली पाहिजे. मुंबईत आजही टँकरच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर पाणी काढले जाते. रोज २०० टँकर पाणी गाळले तर २०० टँकर पाणी जमिनीतून काढून त्या सोर्समधून येते. असे जे टँकरचे फिलिंग स्पॉट आहेत ते खाजगी जागेतील असले तरी फायर ब्रिगेडने त्याचा ताबा किंवा नियंत्रण घेण्याची आवश्यकता आहे. मुंबई शहरामध्ये मोठ्या प्रमाणात विहिरी होत्या. पण आता माती टाकून त्या सर्व विहिरी बुजवल्या गेल्या आहेत. कोणकोणत्या ठिकाणी विहिरी होत्या त्याचे पॉइंटस् आजही कलेक्टरच्या रेकॉर्डमध्ये आहेत. त्या विहिरी महापालिकेने फायर ब्रिगेडसाठी ताब्यात घेऊन आरक्षित ठेवण्याची आवश्यकता आहे. सर्वात मोठी अडचण ही पाण्याची आहे. आपली क्षमता आहे आणि आपले जवान ही काम करतात. ज्या मशिन उपलब्ध आहेत तिथे ते काम करतात पण त्यांना पाण्याची अडचण आहे की, एक वेळा गाडी फिलिंगला रिफिल करायला पाठवली की त्यांची हायंदरी सुरू होते असे समितीने निदर्शनास आणले असता, सध्या हायड्रंट चालत नाहीत त्यामुळे पाण्याच्या स्रोतांची गरज आहे. २ वर्षांपूर्वी फक्त ८ फिलिंग पॉइंटस् होते, ते आता २६ केलेले आहेत आणि पुढच्या काळात ते ५० करणार आहोत. त्याचे मॅपिंग केलेले आहे आणि त्यामध्ये क्लियरकट सांगितलेले आहे की, इमजरन्सीच्या केसमध्ये फक्त फायर ब्रिगेडलाच त्याचा उपयोग होणार आहे. त्याप्रमाणे त्याची प्रोव्हिजन पण केलेली आहे. त्यानंतर मॅडमने सांगितले की, विहिर, तलाव किंवा समुद्र अशा एखाद्या ठिकाणी समरसिबल पंप आतमध्ये टाकल्यानंतर ४.५ ते ५ किलोमीटरपर्यंत वॉटर ट्रान्सपोर्ट सिस्टिम करून तिथून आगीवर मारा करण्याची सिस्टिम नेदरलँडमध्ये चालते त्याप्रमाणे त्याची प्रोव्हिजन या बजेटमध्ये केलेली आहे. त्याशिवाय विभागाकडे आताच २६ पोर्टेबल पंप घेतलेले आहेत. ते पंप प्रत्येक गाडीवर ठेवलेले आहेत. उचंग इमारतीमध्ये फायर ब्रिगेडसाठी अनिवार्यपणे पाणी ठेवणे गरजेचे आहे. ते पण मॅपिंग सुरू आहे. त्यामध्ये कुठेही आग लागली तर म्हणजे जर वांद्र्याला आग लागली तर बाजूची एसडीएल इमारतीमधून मुंबई महापालिका नेहमी पाणी घेत होतो आणि त्याला रिफिल करीत होतो. अशा प्रकारची प्रोव्हिजन सुरू आहे. त्याप्रमाणे आगीवर पाण्याचा तुटवडा होत असेल तर जास्तीत जास्तीत पाण्याची उपलब्धतता करणे यासाठी मोठा प्रयत्न सुरू आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

मॉकड्रीलसाठी ज्या व्यवस्था पाहिजे त्या महालेखाकारांनी लिहिल्या आहेत. चारकोप येथे दोन फायर स्टेशन आहेत. दोन्ही ठिकाणी दयनीय अवस्था आहे. मालवणी व कांदिवली फायर स्टेशन. मुंबई महापालिका ही कॅशरीच महापालिका आहे. त्यामुळे या सर्व गोष्टी प्रायरीटी सेक्टरच्या आहेत असे समितीने सूचित केले असता, समितीने एकदा मालवणी व कांदिवली फायर स्टेशनला जाऊन पाहणी करावी. त्यात ज्या काही त्रुटी आहेत त्या नंतर महापालिकेला सबमीट करण्यात याव्या. दुसरे असे की, विहिर रिव्हाइव्ह करता येते काय ? यासाठी महापालिकेने अभ्यास सुरू केला होता असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

जानेवारी, २०१६-१७ मध्ये विभाग खूप काही घेणार असे सांगितलेले आहे. सर्व प्रस्तावित खरेदीची अपडेट पोझिशन काय आहे ? विभागाने सांगितले की, ९४ पंपींग युनिटस्, १७ क्वीक रिस्पॉन्स मल्टीपर्पज वाहने व ३ मिनी फायर टेंडर्स हे सर्व डिसेंबर, २०१६ पर्यंत येतील. तसेच जानेवारी/फेब्रुवारी, २०१७ पर्यंत ६ नवीन आगीचे बंब, ३ फोम टेंडर्स येतील. त्यानंतर हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म, एरीअर लॅडर प्लॅटफॉर्म, टर्न टेबल लेंडर हे सर्व फेब्रुवारी, २०१७ पर्यंत येणार होते. हझमेट वाहन देखील येणार होते. असे समितीने निदर्शनास आणले असता, ही सर्व खरेदी आलेली आहे. काही प्रस्ताव या वर्षीच्या बजेटमध्ये आहेत. तसेच हाझमेट वाहन ऑर्डर होऊन २ महिन्यांत येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

इन्स्ट्रुमेंटेशनला काही कमी नाही. फायर स्टेशनला जवानांसाठी ज्या पायाभूत सुविधा पाहिजे त्या सुविधा नाहीत असे समितीने निदर्शनास आणले असता, एसी यांचे सॅक्शन घेऊन आता महापालिकेने प्रत्येक फायर स्टेशनला जीम आहे केल्या आहेत. त्याप्रमाणे ६ कमांड सेंटरमध्ये जीम आहेत. आताच्या परिस्थितीमध्ये सर्व जीम एअर कंडीशन आहेत. ऑफिसर इनचार्जच्या ज्या कॅबिन होत्या त्या सर्व एअर कंडीशन केल्या आहेत. फायर स्टेशनचे रेसिडेन्शिअल क्वॉटर्स तुडवून जुन्या फायर स्टेशनला जीममध्ये कन्व्हर्जन करावे लागते. त्याप्रमाणे प्रोव्हिजन करून जीमचे साहित्य १ ते १.५ महिन्यात ऑर्डर देऊन येतील. त्यामुळे सर्व फायर स्टेशनमध्ये जीम असणार आहेत. त्यांना जे चेजिंग दिलेले आहे त्यातील कबोर्डस नवीन प्रकारचे आणलेले आहेत. याची ऑर्डर पण प्लेस झालेली आहे. ते सर्व १.५ ते २ महिन्यामध्ये येत आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

नाशिक महानगरपालिका हद्दीमध्ये ४५ मीटरच्या वरील इमारत नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, नाशिकमध्ये जास्त उंचीच्या इमारती नाहीत. सर्वसाधारणे ३० मीटरच्या जवळपास उंची असलेल्या इमारती आहेत आणि एक ते दोन इमारती या ३५ ते ४० मीटरच्या असतील. त्यामुळे ४५ मीटरच्या पुढील इमारती तिथे नाहीत असे महापालिकेच्या आयुक्तांनी विदित केले. त्यामुळे इथे एरीअर लॅडर प्लॅटफॉर्मची

काही गरज नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

नागपूर येथे नवीन जलवाहिन्या टाकण्याचे काम सुरू असल्यामुळे जुन्या जलवाहिन्या पण दुरुस्त झाल्या. तर त्या नवीन जलवाहिन्या टाकल्या आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, जवळपास नवीन १०७ हायड्रंटचा प्रस्ताव महानगरपालिकेने तयार केलेला आहे. परंतु सध्या ती योजना सुरू केलेली नाही. सध्या तिथे जे पाणी लागते ते पाणी तिथे असणाऱ्या ओसीडब्ल्यू या पाणीपुरवठ्याच्या कंपनीकडून घेतले जाते असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

बजेट तयार करताना महापालिकेने आयुक्त किंवा मुख्याधिकारी यांना सांगितले आहे की, या गोष्टी अग्रक्रमावर करणे अनिवार्य आहे. तसेच फायर ब्रिगेडचे काम हे प्रायरीटी सेक्टरमध्ये टाका आणि आयुक्त व महापालिकेचे मुख्याधिकारी यांनी कोणत्याही परिस्थितीत याच्याशी तडजोड करु नये, असा एखाद्या निर्णय करून शासन निर्णय काढला तर ते योग्य होईल. कारण नगरसेवक किंवा बॉडीला यामध्ये इंटरेस्ट नसतो. ते रस्ते, नाली यामध्येच गुंतलेले असतात. त्यामुळे या विषयामध्ये कोणीच काही करत नाही. नवीन आगीचे बंब, बचाव वाहने यासाठी पैसेच नाही असे महापालिका म्हणते असे समितीने निदर्शनास आणले असता, सध्या आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे हायड्रंटच्या कामासाठी ५० लक्ष रुपये ठेवलेले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

औरंगाबादच्या ड्रील टॉवरच्या बांधकामाची कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले आहे तर ही कार्यवाही कधी सुरू करण्यात येईल ? तसेच हायड्रंटबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे असे महापालिकेने म्हटले आहे. त्यावर काय निर्णय झाला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, औरंगाबाद येथे ३ फायर स्टेशन आणि २ पाण्याच्या टाक्या यातून पाणी भरण्याची व्यवस्था आहे. चिखलठाणा आणि सिडको या भागात महापालिकेने पाण्याच्या टाक्या बांधलेल्या आहेत. हायड्रंटची उपलब्धतता किती होऊ शकते यावर अद्याप प्रयत्न सुरू आहे. औरंगाबादमध्ये पाण्याची टंचाई आहे तिथे ४ ते ५ दिवसांनी पाणी येते त्यामुळे तिथे हायड्रंट फिजिबल होणार नाही. त्यामुळे पाण्याच्या टाक्या किंवा हौद पाणी साठवण्यासाठी केले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले. ड्रील टॉवरचे काय झाले ? अशी विचारणा समितीने केली असता, ड्रील टॉवरचे काम पूर्ण करायचे आहे ते नियोजनामध्ये आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

पुणे जिल्ह्याची काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, पुणे महानरपालिकेकडे १३ फायर स्टेशन अस्तित्वात आहे. त्यापैकी कसबा सोडून बाकी सर्व ठिकाणी जलस्रोताची व्यवस्था आहे. कसबामध्ये जागेचा वाद असल्यामुळे न्यायालयीन प्रकरण सुरू असल्यामुळे त्या ठिकाणी फायर स्टेशनच्या प्रत्यक्ष जागी पाण्याची व्यवस्था केली आहे. त्यामुळे तिथे तशी काही अडचण येत नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

कसबामध्ये जमीन वादग्रस्त आहे आणि न्यायालयीन प्रकरण सुरू असल्यामुळे फायर स्टेशन सुरू आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यास विभागीय प्रतिनिधींनी होकारार्थी उत्तर दर्शविले. त्यावर यामध्ये न्यायालयाला सांगावे की, यात जो निकाल येईल तो विभागास मान्य असेल आणि जिथपर्यंत फायर स्टेशन आहे तिथपर्यंत पाण्याचा स्रोत करण्याबाबत विनंती करण्यात यावी. सन २०१० ते सन २०१८ पर्यंत हे काम सुरू आहे म्हणून याचे खाजगीकरण केले पाहिजे अशी समितीने सूचना केली असता, याबाबत विचार करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

जागेच्या आरक्षणासंबंधी अडचणी येत असल्यामुळे गुंठेवारी बंद करणार आहात का ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता, गुंठेवारी बंद आहे. त्याकरिता २००१ मध्ये शेवटची तारीख होती असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले. अद्यापही जुन्या कायद्यानुसार गुंठेवारी सुरू आहे असे समितीने निदर्शनास आपले असता, कोणत्याही महानगरपालिका यासंबंधी अर्ज सुद्धा स्वीकारत नाहीत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

या संदर्भात नगरपालिकांमध्ये सर्रासपणे मोठ्या प्रमाणात बॅक डेटने गुंठेवारीची कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे गुंठेवारी पद्धत बंद करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. जुन्या तारखेचा १० रुपयांचा स्टॅम्प पेपर मिळतो व त्या अनुषंगाने कार्यवाही केली जाते. विभागाने यासंबंधी वाशिम नगरपालिकेचा आढावा घेण्यात यावा. सन २००१ नंतर अनेक नगरपालिकांमध्ये गुंठेवारीची प्रकरणे झालेली आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, हा विषय नंतर येणार असल्यामुळे आजच्या विषयामध्ये त्याची शिफारस करावी अशी विनंती विभागीय सचिवांनी समितीस केली व बैठकीत झालेल्या चर्चेचा संदर्भ देऊन विभागाकडून त्यासंबंधी पुढील निर्णय घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वस्त केले.

नवीन ड्रील टॉवर बांधणीचे काम सुरू असून इतर किती प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. त्याबाबत समितीला माहिती देण्याबाबत समितीने निदेशित केले असता, २ ठिकाणी ड्रील टॉवर आहेत. त्यापैकी वाशी येथील ड्रील टॉवरचे बांधकाम पूर्ण होईल. तसेच २ ठिकाणी ड्रील टॉवरकरिता इमारत बांधकामाचे प्रस्ताव टेंडर स्टेजला आहेत. ते पूर्ण झाल्यानंतर ५ ठिकाणी ड्रील टॉवर पूर्ण होतील असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

**परिच्छेद क्र.४.१.८ – मनुष्यबळाची / कर्मचाऱ्यांची कमतरता—**

चंद्रपूरमध्ये मध्यंतरी कुर्ती बाजारला आग लागली होती. महानगरपालिकेमध्ये असलेले कर्मचारी प्रशिक्षित नसल्याबाबत त्यावेळी सांगण्यात आले होते. याबाबत वर्तमानपत्रात मोठी बातमी आली होती. आकृतीबंधानुसार मंजूर असलेला कर्मचारी पूर्णतः प्रशिक्षित आहे का व आकृतीबंधानुसार सर्व पदे भरली आहेत का ? आकृतीबंध कमी असल्यामुळे तो बदलण्याची गरज आहे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता, कर्मचाऱ्यांची पदे मंजूर करणे व त्यांना प्रशिक्षण देणे असे २ विषय आहेत. कर्मचाऱ्यांची पदे मंजूर करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीमध्ये प्रयत्न करून विविध ठिकाणी असलेली पदे मंजूर करून घेण्याचा विभागाने प्रयत्न केलेला आहे. त्या अनुषंगाने राज्य स्तरावरील पदे निर्माण झाली. तसेच महानगरपालिकांच्या स्तरावरील पदांकरिता त्यांना आकृतीबंध ठरवून दिलेला आहे. त्यानुसार त्यांना पदे मंजूर केलेली आहेत. आकृतीबंधामध्ये काही बदल करायचा असल्यास तशा प्रकारचा प्रस्ताव प्राप्त झाल्यास विभाग त्याबाबत ताबडतोब कार्यवाही करु शकतो. तसेच कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासंबंधी सर्वांना सूचना दिलेल्या आहेत. यापूर्वीच्या प्रश्नामध्ये उत्तर देण्यात आले आहे की, मुंबईमध्ये किती पदांची भरती झाली व किती कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण झाले आहे. त्यानुसार कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण होत आहे. तसेच प्रशिक्षित कर्मचारी नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यामध्ये विभागाकडून दुरुस्ती करण्याच्या सूचना देण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

चंद्रपूर ही "क" वर्ग नगरपालिका आहे. त्या संदर्भात मोठी बातमी आली होती. आकृतीबंधानुसार मंजूर पदे भरण्यात यावीत व त्या पदांवरील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात यावे अशी समितीची मागणी आहे. आकृतीबंधानुसार पदे भरली गेली पाहिजेत. तसेच सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण मिळण्यासंबंधी आदेश काढावेत. प्रशिक्षणासंबंधी प्रोसिजर आहे. मुंबईमध्ये अग्निशमन व इतर पदांच्या भरती प्रक्रिया सुरू असल्याबाबत लेखी उत्तरात नमूद करण्यात आले आहे. सन २०१३ पासून भरती प्रक्रिया सुरू आहे. समितीचा दुसरा प्रश्न आहे की, फायर ब्रिगेडमध्ये २ प्रकारची कामे आहेत. आता डीसीआरमध्ये फायर ब्रिगेडची मोठी भूमिका असते. त्यांची प्रशासकीय कामे मोठ्या प्रमाणात आहेत. परिणामी फायर ब्रिगेडकडे प्रशासकीय मान्यतेसाठी किंवा रिमार्ककरिता गेलेल्या फाईलचा निपटारा लवकर होत नाही. त्यामुळे मोठा गोंधळ निर्माण होत आहे. फायर फायटींग करणारा स्टाफ आणि फायर ब्रिगेड ॲडमिनीस्ट्रेटिव्ह वर्क संबंधित डीसीआरला लागून आहे. त्याकरिता वेगळा स्टाफ देणार आहात का ? डीसीआरच्या प्रत्येक स्तरावर फायर ब्रिगेडची एनओसी अत्यावश्यक असते. परंतु फायर ब्रिगेडच्या स्टाफकडून २-३ महिने फाईल मुव्हमेंट केली जात नाही. त्यामुळे फायर फायटींग आणि डीसीआर संबंधित फायर ब्रिगेड हे दोन्ही विभाग वेगळे करणे अत्यावश्यक आहे असे समितीने सूचित केले असता, समितीने जी सूचना केली आहे त्यावर विभागाला आता ताबडतोब उत्तर देता येणार नाही असे विभागीय सचिवांनी विदित केले.

फायर फायटींग आणि डीसीआर संबंधित फायर ब्रिगेड हे दोन्ही विभाग वेगळे करण्यासंबंधी फक्त मुंबईचा विषय नाही. हा विषय संपूर्ण महानगरपालिकांचा विषय आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, विभाग या बाबतीत सर्वांसमवेत चर्चा करेन. त्यानंतर शासन स्तरावर याबाबतचा निर्णय घ्यावा लागल्यास तशी कार्यवाही करण्यात येईल. सध्या अशी पद्धत आहे की, चिफ फायर ऑफिसर व त्यांचा स्टाफ त्या साईटवर जाऊन पहिली एनओसी देत असतात. त्यामुळे दोन्ही ठिकाणी असलेली कामे वेगळी असल्यामुळे ते सफर होत आहेत. विभागाकडून यासंबंधी अभ्यास करून नंतर निर्णय घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

मुंबईमध्ये अग्निशमन विभागात आकृतीबंधानुसार मंजूर असलेल्या पदांच्या भरतीची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, मुंबईमध्ये अग्निशमन विभागात ३२४६ पदे मंजूर आहेत. सदर पदे कमी पडत असल्यामुळे सन २०१७-१८ मध्ये ६५४ पदांची भरती करण्यात आली. तसेच नंतर निर्माण झालेल्या पदांची टेबलनिहाय माहिती तयार करून त्याचा पाठपुरावा करीत आहोत. सन २०१७-१८ मध्ये केलेली भरती अतिशय पारदर्शक असल्यामुळे त्यासंबंधी एकही तक्रार प्राप्त झालेली नाही. अद्याप ५१९ पदे कमी पडत आहेत त्यासंबंधी तातडीने प्रक्रिया करून पाठपुरावा करणार आहोत अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

मुंबईच्या संदर्भात अनेक ठिकाणी एसआरए स्कीम सुरू असून त्याअन्वये झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन केले जात आहे. तेथील फायर स्टेशनकरिता जागा आरक्षित ठेवाव्यात असे समितीने सूचित केले असता, जेथे एसआरए स्कीम सुरू असते तेथे फायर स्टेशनकरिता जागा घेतली जाते. आता अशी सूचना आली आहे की, नवीन रिडेव्हलपमेंटच्या वेळी फायर स्टेशनकरिता वेगळी जागा काढून घ्यावी. विभागाच्या मते सकृतीदर्शनी मुंबईत अशाप्रकारे कार्यवाही करणे कदाचित कठीण जाईल. मुंबईतील झोपड्यांची डेन्सिटी खूप आहे. त्यांच्या पुनर्वसनासाठी जागा लागत असते तसेच त्यात ओपन स्पेस सुद्धा कमी करीत असतो. तरी सुद्धा विभागाकडून निश्चितपणे याचा विचार करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

समितीचा दुसरा प्रश्न असा आहे की, अनेक वेळा लेखी उत्तरात नमूद केले जाते की, अनेक हायड्रंट बंद आहेत. तसेच सध्या ६ हजारपैकी फक्त एक हजार हायड्रंट सुरू आहेत. तेथील जमिनीवरील असलेले स्ट्रक्चर आहे तसेच ठेवून अंडर ग्राऊंडचे पाणी घेऊ शकतो का ? अशी

विचारणा समितीने केली असता, यासंबंधी उत्तरात अशाप्रकारे किती सुविधा दिली आहे याबाबत माहिती देण्यात आली आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले. या बाबतीत तयार केलेला चार्ट समितीला द्यावा असे समितीने निदेशित केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

अमरावती येथील फायर ब्रिगेड स्टेशनची सद्यःस्थिती काय आहे ? तेथे मुख्य अग्निशमन अधिकारी, सहाय्यक अग्निशमन अधिकारी नाहीत असे समितीने निदर्शनास आणले असता, अमरावती येथे अग्निशमन विभागामध्ये ५२ पदे मंजूर असून ४६ पदे भरलेली आहेत. परंतु रिक्त पदांमध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी, सहाय्यक अग्निशमन अधिकारी व स्टेशन ऑफिसर अशी पदे आहेत. सदर पदे भरण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

रिक्त पदांमध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी, सहाय्यक अग्निशमन अधिकारी व स्टेशन ऑफिसर अशी पदे आहेत. ती पदे भरण्याचा अधिकार आयुक्तांना आहे की याकरिता शासन स्तरावरुन परवानगी आवश्यक असते अशी समितीने विचारणा केली असता, यासंबंधी महानगरपालिकेला अधिकार आहेत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

आयुक्त व मुख्याधिकारी अग्निशमन विभागाचा गांभीर्याने विचार करीत नाहीत. विभागाने या संदर्भात एक परिपत्रक काढावे असे समितीने सूचित करून सदर पदे भरण्यासाठी काही निकष असतील त्याची पूर्तता करण्यासाठी विभागाकडे अधिकारी कार्यरत आहेत का ? अशी विचारणा केली असता, रिक्रुटमेंट रुल फायनल न झाल्यामुळे महापालिका थांबली आहे. यासंबंधी शासन स्तरावरुन कार्यवाही केली जाते. परंतु इतर कनिष्ठ स्तरावरील रिक्त पदे भरता येतील असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

रिक्रुटमेंट रुल लवकरात लवकर निश्चित करावेत. डायरेक्टर ऑफ फायर यांनी प्रस्तावित केलेली पदे उच्चाधिकार समिती सकारात्मक असताना सुद्धा नगरविकास विभागाकडून ती पदे मंजूर केली जात नाहीत अशाप्रकारे एजी कार्यालयाने त्रुटी काढलेली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, डीएफ यांनी ११६७ अतिरिक्त पदांचा प्रस्ताव सादर केला होता. परंतु त्यापैकी १३१ पदे मंजूर झाली. साधारणतः जेवढया पदांची आवश्यकता आहे तेवढी पदे प्रोव्हाईड करणे अत्यावश्यक आहे. उच्चाधिकार समितीने मंजूर केलेली १३१ पदे ही डायरेक्टर, महाराष्ट्र फायर सर्व्हीस यांच्याकरिता आहेत. डायरेक्टर महाराष्ट्र सर्व्हीस ही ॲडव्हायझरी बॉडी आहे, अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

डायरेक्टर फायर सर्व्हीसकरिता पदे मागितल्यानंतर त्याकरिता नगरविकास विभागाकडून मंजूर का केली जात नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, उच्चाधिकार समितीने मंजूर केलेली १३१ पदे ही डायरेक्टर, महाराष्ट्र फायर सर्व्हीस येथील जो कंट्रोल रुम आहे त्याकरिता व डायरेक्टर ऑफीसला लागणारी मॅनपॉवर एक आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक सहाय्यक अग्निशमन अधिकारी व एक स्टेशन ऑफिसर पदांची तरतूद केली असून ही बाब उच्चाधिकार समितीने मंजूर केली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

११०० पदांची मागणी केली होती असे समितीने निदर्शनास आणले असता, गॅप ॲनेलेसिस झाल्यानंतर डायरेक्टर, फायर सर्व्हीसकडून रिपोर्ट मागितला होता. त्यावेळी पूर्ण राज्यामध्ये किती पदांची कमतरता आहे त्या अनुषंगाने ही आकडेवारी आली आहे. राज्य स्तरावर आवश्यक असलेल्या १३१ पदांना मंजुरी दिलेली आहे व त्यासंबंधी कार्यवाही झाली आहे. उर्वरित पदे ही महानगरपालिका, नगरपालिका स्तरावरील आहेत. त्यांच्या स्तरावरील सदर रिक्त पदे भरली जातील असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

महानगरपालिकेला स्वायत्तता असल्यामुळे रिक्त पदे महानगरपालिका भरु शकतात व पदे मंजूर करु शकतात. परंतु नगरपालिका पदे भरु शकत नाही. नगरपालिकांमधील पद निर्मिती शासन स्तरावरुन करावी लागते व त्याकरिता शासनाला निधी द्यावा लागतो. ही मूळ अडचण आहे. त्यामुळे नगरपालिका स्तरावरील पदे शासन स्तरावरुन भरायची आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, उच्चाधिकार समितीने पदांना मंजुरी दिली तरी नगरविकास त्या पदांना मंजुरी देत नाही. परंतु अशी वस्तुस्थिती नाही. उच्चाधिकार समितीने जेवढया पदांना मंजुरी दिली आहे त्यासंबंधी विभागाने कार्यवाही केली आहे. या व्यतिरिक्त जास्त पदांची आवश्यकता असल्यास विभाग त्याचा अभ्यास करून पुन्हा उच्चाधिकार समितीसमोर जाईल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

नाशिक जिल्ह्यातील अग्निशमन विभागातील पदांची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, नाशिक जिल्ह्याकरिता अग्निशमन विभागाकरिता १५१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १०३ पदे भरली असून ४८ पदे रिक्त आहेत. या व्यतिरिक्त महानगरपालिकेचा आकृतीबंध तयार करून शासनाकडे मंजुरीसाठी पाठविलेला आहे. त्यात अग्निशमन विभागातील पदांचा सुद्धा समावेश आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले. सदर पदे महानगरपालिका स्तरावर भरता येत नाही का ? अशी विचारणा समितीने केली असता, महानगरपालिकेचा आस्थापना आराखडा शासनाने मंजूर करायचा असतो. त्यानंतर पद भरतीची प्रक्रिया महानगरपालिकेच्या स्तरावर होते. सन २०१४ मध्ये महानगरपालिकेचा आस्थापना आराखडा शासनाकडे मंजुरीसाठी पाठविलेला असला तरी, सध्या महानगरपालिकेचा आस्थापना खर्च ३५ टक्क्यांपेक्षा जास्त असल्यामुळे अद्याप आस्थापना आराखडा मंजूर झालेला नाही. पूर्वी महानगरपालिकेचा आस्थापना खर्च साधारणतः ५२ टक्क्यांपर्यंत होता. सन २०१७-१८ मध्ये

तो खर्च ३८ टक्क्यांपर्यंत आला आहे. नॉम्सनुसार ३५ टक्क्यांपेक्षा जास्त आस्थापना खर्च असल्यामुळे शासनाकडून आस्थापना आराखडा मंजूर केला जात नाही. विभाग उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करीत आहे. आस्थापना खर्च वाढीच्या मुख्य कारणांपैकी एक कारण असे आहे की, नाशिक महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे पगार शासन स्तरावर कार्यरत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांपेक्षा जास्त आहेत. शासनामध्ये काम करीत असलेल्या वरिष्ठ लिपिकाचा पगार हा महानगरपालिकेतील शिपायाएवढा आहे. महानगरपालिकेतील अधिकारी कर्मचाऱ्यांची सॅलरी किती असावी याबाबत महानगरपालिका निर्णय घेत असते.

दुसरे असे की, नाशिक महापालिका 'क' पासून 'ब' पर्यंत आली व त्यानंतर जो १४ हजार पदसंख्येचा आराखडा पाठविलेला आहे तो खूप जास्त आहे. आजच्या तारखेला ७ हजार पदे सँक्शन असताना व ५ हजारच्या आसपास पदे भरलेली असताना आमचा खर्च ३८ टक्के आहे. १४ हजार पदे भरली तर तो खर्च ७० टक्क्यांपर्यंत जाईल. त्यामुळे ऑबव्हिअसली शासन त्याला मंजुरी देणार नाही. परंतु त्यावर रि-वर्क केलेले आहे. रि-वर्क करून परत यु.डी.शी चर्चा करून त्याप्रमाणे पुढची कारवाई करता येईल असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले. महाराष्ट्रातील कुठल्या महानगरपालिकेचा आस्थापना खर्च हा ३५ टक्क्यांपेक्षा कमी किंवा ३५ टक्के आहे ते सांगावे असे समितीने निदेशित केले असता, नवी मुंबईचा आस्थापना खर्च हा ३५ टक्क्यांपेक्षा कमी आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

नाशिक महानगरपालिकेने किती पदांचा प्रस्ताव पाठविलेला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१४ मध्ये पाठविलेला प्रस्ताव साधारणतः १४००० पदांचा आहे. आता परत प्रस्ताव पाठविलेला नाही. कारण तो महासभेने मंजूर करून पाठविलेला प्रस्ताव आहे. त्यामुळे नाशिक महापालिकेने त्यावर काम केले आहे. नाशिक मनपा यु.डी. बरोबर चर्चा करण्यात येईल व त्यानंतर ते फायनल करेल असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले. अमरावती महापालिकेचा प्रशासकीय खर्च किती आहे, महाराष्ट्रात कोणत्या महापालिकेचा खर्च हाययेस्ट आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, अमरावती महापालिकेचा प्रशासकीय खर्च ५७ टक्क्यांच्या जवळपास आहे. हाययेस्ट खर्च कोणत्या महापालिकेचा आहे याची माहिती माझ्याकडे नसल्याचे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

महाराष्ट्रातील महापालिकेचा हाययेस्ट खर्च अंदाजे सांगावे असे समितीने सूचित केले असता, हाययेस्ट खर्च औरंगाबादचा असावा असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

औरंगाबाद येथे मनपा सर्व पदे कंत्राटी पद्धतीने भरते काय? अशी विचारणा समितीने केली असता, आता तेथे जो जुना आकृतीबंध अस्तित्वात आहे त्यानुसार ८१ पदे मंजूर आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

४० अग्निशामक, ९ वाहन चालक, ७ दूरध्वनी चालक हे सर्व कर्मचारी आपण कंत्राटी पद्धतीने नेमता, हे कंत्राटी लोक काय सेवा देणार? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, अगदी तातडीची गरज होती म्हणून ते कंत्राटी कर्मचारी नेमले आहेत. औरंगाबाद महापालिकेचा आकृतीबंध तयार करावयाचे काम सुरू आहे. जुन्या आकृतीबंधातील ३५ पदे रिक्त आहेत. त्या पदांच्या भरतीची प्रक्रियाही विभाग करीत आहे. या महिन्यामध्ये बिंदू नामावली मंजूर करून घेतली आहे. जुन्या आकृतीबंधातील मंजूर पदे २-३ महिन्यांत भरत आहोत व नवीन आकृतीबंधामध्येही प्रस्तावित करीत आहोत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

विभागाने दिलेल्या माहितीमध्ये २०१६ मध्ये २५ कंत्राटी वाहन चालकांबाबत नमूद केले आहे. या अनुषंगाने समितीला हे विचारावयाचे आहे की, तेथे २५ व्हेईकल्स आहेत काय? अशी विचारणा समितीने केली असता, मधल्या काळात नवीन व्हेईकल्स घेतली होती. ती अनुदानातून मिळाली. ३ शिफ्ट प्रमाणे एका वाहनाला जवळपास ४ ड्रायव्हर्स लागतात व १ रिलिव्हर लागतो असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले. विभागाच्या नॉर्म्समध्ये असे आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, ३ शिफ्टला ३ ड्रायव्हर व १ रिलिव्हर असतो असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

नॉर्म्समध्ये ३ रेग्युलर ड्रायव्हर व १ रिलिव्हर असे आहे काय ? ४ गाड्यांचे युनीट असते. ४ गाड्यांचे १२ ड्रायव्हर झाले व एखादा रिलिव्हर समजू शकतो. परंतु, प्रत्येक गाडीला १ रिलिव्हर असे कसे होईल ? किती गाड्या आहेत, त्यावर किती कंत्राटी व किती पर्मनंट ड्रायव्हर आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, १९ वाहने आहेत. २५ कंत्राटी ड्रायव्हर घेतले आहेत. १० पर्मनंट ड्रायव्हर आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले. १९ पैकी किती गाड्या सुरू आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, सर्व गाड्या सुरू आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले. या सर्व २५ गाड्या अग्निशमन विभागाच्या आहेत की, इतरही गाड्या आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, सर्व गाड्या अग्निशमन विभागाच्या आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

या सर्व फायर एस्टींग्वीशर आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, फायर एस्टींग्वीशर बरोबर वॉटर टेंडर, रेस्क्यु वाहन मिळालेले आहे. फोम वॉटर टेंडर असे वेगवेगळे आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले. समितीला त्याचा आढावा घ्यावा लागेल असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

पुणे महानगरपालिकेतील परिस्थिती सांगून ९३१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी किती पदे भरलेली आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, ९३१ पैकी ४४७ पदे पुणे महापालिकेने भरलेली आहेत. जवळपास ४७२ पदे रिक्त आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले. रिक्त पदांमुळे सिस्टिम अफेक्ट होते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, पुणे मनपाने मागणी केलेली आहे. पुणे मनपाचे आर.आर. (सेवा प्रवेश नियम) ॲप्रुव्हलसाठी पेंडिंग आहेत. ॲप्रुव्हल मिळाल्यानंतर ती पदे भरणार आहोत असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

पुणे मनपाचा प्रशासकीय खर्च किती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, ती माहिती आता नाही. परंतु, तो ३५ टक्क्यांच्या वर असेल असे पुणे मनपाच्या आयुक्तांनी विदित केले. पुणे मनपाने सेवा प्रवेश नियमासाठी कोणाकडे मान्यता मागितली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, शासनाकडून मागितली आहे. पुणे मनपाचा स्टाफिंग पॅटर्न (आकृतीबंध) मंजूर आहे. आर.आर. (सेवा प्रवेश नियम) ॲप्रुव्ह व्हायचे आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले. पदे मंजूर असतानाही भरण्याची परवानगी नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, आर.आर. (सेवा प्रवेश नियम) ला अजून मान्यता मिळालेली नाही असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

रिक्रुटमेंट रुलची (सेवा प्रवेश नियम) एक बाब आहे. दुसरा मुद्दा म्हणजे फायर सर्व्हीसेस ही कम्पलसरी सर्व्हीस आहे. याकरिता खर्चाचे बंधन टाकणे योग्य नाही असे समितीला वाटते. या दोन्ही विषयाबाबत शासनाने आपली भूमिका समितीला स्पष्ट करावी. या दोन विषयांबाबत समितीची अशी भूमिका आहे की, एक तर रिक्रुटमेंट रुलला लगेच मान्यता द्यावी. दुसरी गोष्ट म्हणजे जो पर्सेंटेज ऑफ एक्सपेन्सेसचा मुद्दा आहे ते नियम फायर ब्रिगेडला लागू करणे योग्य नाही, कारण ही इमर्जन्सी सर्व्हीस आहे. त्यांना हे नियम लागू करणे कुठेही समर्थनीय होऊ शकत नाही. या दोन्ही बाबींबाबत विचार करून मागणी प्रमाणे मंजूर पदे भरण्याची मंजुरी दिली पाहिजे असे मत व्यक्त केले.

नवी मुंबई महापालिकेबाबतची माहिती द्यावी असे समितीने निदेशित केले असता, नवी मुंबई महापालिकेमध्ये शासनाकडून आकृतीबंध मंजूर करून घेतला आहे. शासनाने ४७५ पदे मंजूर केली आहेत. शासनाकडून सेवाप्रवेश नियम मंजूर करून घेतले आहेत. सद्यःस्थितीमध्ये ४७५ पैकी १३२ पदे भरलेली आहे. ३४३ पदे रिक्त आहेत. नवी मुंबई मनपा महापरीक्षा पोर्टलवर त्याची ऑनलाईन रिक्रुटमेंटसाठी जाहीरात दिलेली आहे. आता अर्ज छाननी वगैरे प्रक्रिया सुरू आहे. पुढील साधारणतः ३ महिन्यात अग्निशमन दलाची भरती प्रक्रिया पूर्ण होईल असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

**परिच्छेद क्रमांक ४.१.९.१. : ना हरकत प्रमाणपत्रे जारी करण्यातील अपर्याप्तता—**

पेट्रोलपंप, फटाक्याची दुकाने, एल.पी.जी. फिलिंग स्टेशन तसेच, ५३ इमारतींचे पूर्ण ८ महानगरपालिका क्षेत्रामध्ये जे ऑडिट झाले त्यामध्ये फायरची एन.ओ.सी. न घेता त्यांना कमेन्समेंट सर्टिफिकेट व ऑक्युपन्सी सर्टिफिकेट दिलेले आहे, याबाबत सांगावे. तसेच यामध्ये एक टेक्नीकल मुद्दा आहे. विभागाच्या लेखी उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, ४७ पेट्रोल पंपांना फायर डिपार्टमेंटची एन.ओ.सी. नव्हती. पेट्रोल पंपाना राज्य शासनाचे एक्सप्लोजिव्ह डिपार्टमेंट एन.ओ.सी. देते. त्यानंतरच कलेक्टर त्यांना फायनल एन.ओ.सी. देतात. दर ३-५ वर्षांनी या पेट्रोल पंपांची एन.ओ.सी. रिन्यूवल करून घेण्याचे काम कार्पोरेशन करीत असते. मग फायर ब्रिगेड स्टेशनच्या एन.ओ.सी.चा संबंध कुठे येतो, अशी कोणती तरतूद आहे ते सांगावे ? समितीकडे अशी माहिती आहे की, पेट्रोल पंपांना फायर ब्रिगेडची एन.ओ.सी. लागत नाही. एक्सप्लोजिव्हची एन.ओ.सी. मुंबईवरुन मिळते. पूर्णच्या पूर्ण प्रस्ताव सादर केल्यानंतर पेट्रोल पंपाची परवानगी सर्व पूर्ण केल्यावर मिळते. पेट्रोल पंप चेक करण्यासाठी एक्सप्लोजिव्ह डिपार्टमेंट मुंबईवरुन कंट्रोल करते. एक्सप्लोजिव्ह डिपार्टमेंटच करते. परंतु, त्या अगोदर फायर किंवा महानगरपालिकेच्या एन.ओ.सी.ची गरज आहे की नाही? दरवर्षीचे समिती मान्य करते परंतु, सुरुवातीला एन.ओ.सी.लागते की नाही ? एक्सप्लोजिव्ह डिपार्टमेंट त्याचे पूर्ण ड्रॉइंग तयार करून राज्याला परवानगी देते. एक्सप्लोजिव्ह डिर्पाटमेंट ही फायनल ऑथॉरिटी असते. परंतु, त्याला जे बेसिक पेपर लागतात. ते बेसिक पेपर, पूर्ण प्रस्ताव एक्सप्लोजिव्ह डिपार्टमेंटकडे सादर केला जातो. तो एन.ओ.सी. शिवाय केला काय ? त्याचप्रमाणे नवी मुंबईमध्ये एक्सप्लोजिव्ह डिपार्टमेंट पूर्ण प्रस्ताव सादर करून घेते व पूर्ण टेक्नीकल चेक करून त्याला परवानगी देते. एक्सप्लोजिव्ह डिपार्टमेंट ती एन.ओ.सी. कलेक्टरला पाठवतात व कलेक्टर पेट्रोल पंप सुरू करण्याची परवानगी देतात. जोपर्यंत एक्सप्लोजिव्हची परवानगी नसते तोपर्यंत पेट्रोल पंपला परवानगी मिळत नाही. एक्सप्लोजिव्ह शिवाय तर मिळणारच नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, पेट्रोलियम ॲक्टमध्येच प्रोव्हीजन आहे की, फायर एन.ओ.सी. घ्यायची. एक पेट्रोल पंप सुरू करावयाचा असेल तर डिफरंट रिक्वायरमेंट असतात. त्यातील एक रिक्वायरमेंट ही फायर एन.ओ.सी. ची आहे. मुंबई शहर सोडून इतर ठिकाणी कलेक्टर वगैरे त्यामध्ये ते सर्व पेपर घेऊन तेथे गेल्यानंतर एन.ओ.सी. देतात असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

फायनल ऑथॉरिटी एक्सप्लोजिव्ह डिपार्टमेंट आहे. परंतु, त्याला लागणाऱ्या पेपर्समध्ये फायर सर्व्हीसेसकडून एकदा एन.ओ.सी. पाहिजे. त्यानंतर त्यांचे वन टाईम इन्स्पेक्शन झाले पाहिजे असे समितीने मत मांडले असता, ती एन.ओ.सी. वन टाईमच असते असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

अमरावती येथे कमिशनर यांनी बैठक बोलावली होती. तेव्हा पेट्रोल पंप मालकांनी हेच ऑब्जेक्शन घेतले होते की, एकदा एन.ओ.सी. घेतल्यानंतर मनपाची एन.ओ.सी. घेण्याची गरज काय ? असे समितीने निदर्शनास आणून दिले असता, मागच्या बैठकीच्या अनुषंगाने आयुक्त, अमरावती सर्व पेट्रोल पंप धारकांची बैठक घेतली होती. तेव्हाही हाच मुद्दा उपस्थित करण्यात आला. तेव्हा पेट्रोलपंप धारकांना सांगितले की, ज्यावेळेस १०-२० वर्षांपूर्वी पेट्रोल पंप सुरू झाले असतील त्यावेळेस एन.ओ.सी. दिली की नाही हे माहीत नाही. त्यामुळे एक्सप्लोजिव्ह डिपार्टमेंटची जी फायनल एन.ओ.सी. आहे ते पेपर्स अमरावती म.न.पा.ला सबमिट करावेत. ते १५ पैकी ९ लोकांनी सबमिट केले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

ती एन.ओ.सी. मनपाला सबमिट करण्याचे कामच नाही. आयुक्त त्याशिवाय पेट्रोल पंपाला परवानगीच देत नाही. आयुक्ताला ज्या एन.ओ.सी.ची रिक्वायरमेंट असते त्यामध्ये फायर एक्सप्लोजिव्हची एन.ओ.सी. कम्पल्सरी आहे. त्या शिवाय पेट्रोल पंप सुरू होत नाहीत. पेट्रोल पंप हा डिलर सुरू करीत नाही तर पेट्रोल पंप मनपा सुरू करते. एन.ओ.सी. डिलरच्या नावाने मिळत नाही, ती कार्पोरेशनच्या नावाने मिळते. कार्पोरेशन त्यामध्ये एका पैशाची चूक न करता प्रथम एन.ओ.सी. घेते त्याशिवाय तो पेट्रोल पंप सुरू होत नाही. आयुक्त म्हणून एन.ओ.सी. घेणे अनिवार्य आहे की नाही ? हे आयुक्तांचे कामच नाही. नवी मुंबईमध्ये एक्सप्लोजिव्ह डिपार्टमेंट आहे. याबाबत काय म्हणणे आहे? अशी विचारणा समितीने केली असता, पेट्रोलियम ॲक्टमध्ये प्रोव्हीजन आहे. त्यामध्ये फायरची सिंगल टाईम एन.ओ.सी. सुरुवातीला कम्लपसरी आहे. आता औरंगाबादला असा एक इशु झाला होता की, तेथे एका पेट्रोल पंपाला एक्सप्लोजिव्ह डिपार्टमेंटने एन.ओ.सी. दिल्यानंतरही फायर क्लिअरन्स नव्हते कारण त्यांनी सी.एन.जी. सिलेंडर मधील डिस्टन्स बरोबर ठेवले नव्हते. त्यावर ऑब्जेक्शन घेण्यात आले. त्यानंतर ते मॅटर औरंगाबाद येथून मुंबई फायर संचालकांपर्यंत आले होते व शेवटी इंटरव्हेन करावे लागले. परंतु, ॲक्ट मधील तरतुदीनुसार फायर ब्रिगेडची वन टाईम एन.ओ.सी. आवश्यक आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

नाशिकचे आयुक्त याबाबत काही सांगू शकतील काय ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये दोन इशु आहेत. पहिला इशु असा आहे की,एक्सप्लोजिव्ह रुल्सनुसारची एन.ओ.सी. ही कॉम्पींटंट ऑथॉरिटीकडून घ्यायची असते. ती कलेक्टरकडून घ्यायची की सी.पी. कडून घ्यायचे हे त्या एरियावर अवलंबून असते. पेट्रोल पंप सुरू करावयाचा झाल्यास त्यांच्याकडून ती घेण्यात येईल. ते लायसन्सींग ऑथॉरिटी या दृष्टिकोनातून असते. दुसरा इशु असा आहे की, फायरची परवानगी घ्यावी लागते, कारण ती बिल्डींग कोणत्याही स्पेशल बिल्डींगला फायरच्या नॉर्म्सनुसार ती आवश्यक असते, जसे पेट्रोल पंपाला असते म्हणून ती एन.ओ.सी. बिल्डींगचे काम सुरू करतेवेळी व बिल्डिंगचे काम पूर्ण करतेवेळी द्यावी लागते. त्यानंतर दरवर्षी जानेवारी व जुलै महिन्यामध्ये फॉर्म बी भरायचा असतो. कारण ती सिस्टिम तेथे सुरू आहे की नाही हे पहावे लागते. या दोन वेगवेगळया बाबी आहेत. एक प्लानिंग ऑथॉरिटी म्हणून बिल्डींग परमिशनच्या दृष्टीकोनातून फायर सेफ्टी असण्याच्या दृष्टीकोनातून व दुसरी म्हणजे पेट्रोलियम ॲक्ट नुसार सन २००८ चे जे एक्सप्लोजिव्ह रुल्स आहेत, त्यातील सेक्शन ९९, १२७ व १२८ नुसार कलेक्टर किंवा सी.पी. व एक्सप्लोजिव्ह कमिशनर यांच्याकडून ती होत असते. या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. एक पर्मनंट एक वेळेस लागते व फायर एन.ओ.सी. ही कार्पोरेशन मार्फत कम्प्लीशन सर्टिफिकेट देतेवेळी व दरवर्षी बी फॉर्म या स्वरुपात लागते. बी फॉर्म हा सी.एफ.ओ. मार्फत होत असतो असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

आवश्यक रिक्वायरमेंट नसतानाही याकडे सर्व दुर्लक्ष होत आहे हाच विषय या परिच्छेदामध्ये आहे. ८ महानगरपालिकांमध्ये ५३ इमारतींना ओ.सी. दिली त्यानंतर फायर सर्टिफिकेट घेतलेच नाही, अशी चूक झालेली आहे. तसेच पेट्रोल पंप, फटाक्यांची दुकाने, एल.पी.जी. फिलिंग स्टेशन यांनाही एम.एम.सी. ॲक्ट, १८८८ व महाराष्ट्र आग प्रतिबंध योजनेखाली प्रमाणपत्र न देता ते सर्व चालत आहे. याकरिताच ए.जीं.नी हा परिच्छेद काढलेला आहे. यामध्ये असे नमूद केले आहे की, अमरावतीमध्ये अग्निशमन विभागाकडून अंतिम फायर एन.ओ.सी. जारी केलेली नसतानाही वर्ष सन २०१० ते सन २०१५ या दरम्यान नगर रचना विभागाने २८ इमारतींना ओ.सी. जाहीर केली. सदर इमारतींनी अग्नि सुरक्षा प्रमाणकाचे पालन केले होते किंवा नाही याची लेखा परीक्षणात पडताळणी करणे कठीण होते, याबाबत सांगावे असे समितीने निदेशित केले असता, त्यावेळेच्या डी.सी.आर. नुसार १५ मीटरच्या खालच्या इमारतींना टाऊन प्लानिंग डिपार्टमेंट फायर एन.ओ.सी. घेत नव्हते. त्यामुळे त्या घेण्यात आल्या नव्हत्या. परंतु, यापैकी ६ इमारती पब्लिक किंवा कमर्शिअल होत्या. त्यांची तपासणी करून आता त्यांना एन.ओ.सी. दिली आहे. स्कूल, कॉलेज व १ वॉलमार्ट अशा ६ जणांना एन.ओ.सी. दिली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस यांनी विदित केले.

६ जणांना एन.ओ.सी. दिली आहे, मग २२ जणांवर काय कारवाई केली ? अशी विचारणा समितीने केली असता, २२ जणांना नोटिसा दिल्या आहेत. परंतु, जुन्या डी.सी.आर. प्रमाणे १५ मीटरच्या खालच्या इमारतींना टाऊन महापालिकेचे प्लानिंग डिपार्टमेंट फायर एन.ओ.सी. लागत नव्हते. डी.सी.आर. मध्येच तशी प्रोव्हीजन होती असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

जे लोक ओ.सी. घेत नाहीत त्यांना डबल प्रॉपर्टी टॅक्स लावण्यात येते. त्यानुसार मनपाने या वर्षामध्ये डबल प्रॉपर्टी टॅक्स लावला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, ती माहिती तपासून समितीस सादर करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

अमरावतीचा स्पेसिफिक परिच्छेद आहे की, २८ इमारतींनी फायरची एन.ओ.सी. न घेता ओ.सी. घेतली. ज्या ६ पब्लिक युटिलिटी होत्या त्यांना तपासणी करून एन.ओ.सी. दिली आहे. उर्वरित २२ वर काय कारवाई केली ? अशी विचारणा समितीने केली असता, २२ ना फायर एन.ओ.सी.च्या नोटिसेस इशु केल्या आहेत. ते प्रकरण सध्या नोटिसच्या प्रोसेसमध्ये आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

ज्यांनी ओ.सी. घेतलेली नाही, त्यांच्याकडून मागच्या ६ वर्षापर्यंत डबल प्रॉपर्टी टॅक्स लावून किंवा दंडात्मक कारवाई करून प्रॉपर्टी टॅक्स वसूल करता येतो. तसा मनपाने वसूल केला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी नकारार्थी उत्तर देऊन यामध्ये इमारतींना ओ.सी. दिलेली आहे. परंतु, ज्या इमारतींना ओ.सी.नाही व ऑक्युपन्सी असेल तर नियमाप्रमाणे त्यांना टॅक्स आकारतो असे सांगितले.

आयुक्त अमरावती ओ.सी. दिली असे सांगत आहे. मात्र ओ.सी. देणे चुकीचे आहे. महानगरपालिकेने फायर एन.ओ.सी. घेतल्याशिवाय ओ.सी. देणे नियमबाह्य आहे, हेच ए.जीं.चे ऑब्जेक्शन आहे. याकरिता कोण जबाबदार आहे ? अमरावती येथे जो लिडिंग फायरमॅन आहे तो कोणी सिनिअर ऑफिसर नसताना प्रभारी अग्निशामक असतो. तो फिल्डवर चांगला आहे. परंतु, त्याला काहीच माहिती नसते. The Commissioner should get it done. असे समितीने सूचित केले असता, विभागीय प्रतिनिधींनी सहमती दर्शवून ॲक्टनुसार कारवाई करण्यात येईल असे सांगितले.

आयुक्त, अमरावती आता कारवाई करणार आहात परंतु जी कारवाई केली नाही त्याबाबतचा हा परिच्छेद आहे. सन २०१० ते सन २०१५ च्या ऑडिटचे परिच्छेद पाहत आहोत. ज्यांनी नियमाप्रमाणे कारवाई केली नाही, त्यांच्यावर काय कारवाई प्रपोज करणार आहात ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांच्यावर ॲक्ट प्रमाणे कारवाई करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

मुंबईला ज्यावेळी एक मोठी दुर्घटना झाली होती, त्यावेळी सगळया मोठ्या इमारतींचे फायर ऑडिट करण्यास सांगितले होते. त्या फायर ऑडिटचा रिपोर्टही समितीला कधी मिळाला नाही. फायर ऑडिट झाले आहे का ? किती इमारतींचे फायर ऑडिट झाले ? मुख्य म्हणजे सगळे हॉटेल्स, हॉस्पिटल्स, मोठ्या इमारती यांचे फायर ऑडिट केलेले नाही. हे फायर ऑडिट केले तर बरे होईल. ही जी परिस्थिती आहे, ती राज्यभर आहे. खाजगी इमारती व्यतिरिक्त ज्या पब्लिक युटिलिटीच्या बिल्डींग्ज आहेत, १०० बेडचे हॉस्पीटल्सच्या इमारतींना ओसी नाही. त्यांना फायरची परवानगी नाही. त्या इमारतींना फायर एक्झिट नाही. तेथे मोठमोठे दवाखाने सुरू आहेत. सर्वात मोठी गोष्ट ही आहे की, जेथे परवानग्या नसतील, ओसी नसतील तरीही हॉस्पीटल्स सुरू आहेत. हे योग्य नाही. ओसी देताना कमिशनरने तपासणे आवश्यक होते, असे समितीने मत व्यक्त केले असता, जुन्या डीसीआरप्रमाणे महापालिकेच्या टाऊन प्लानिंग डिपार्टमेंटमध्ये १५ मीटर खालच्या बिल्डींगला फायर एनओसी मागत नव्हते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस विदित केले.

नियमाप्रमाणे एनओसी घेणे आवश्यक आहे. एनओसी न घेता ओसी दिली गेलेली आहे. ओसी देणारे अधिकारी याकरिता रिस्पॉन्सिबल आहेत, त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित करण्यात यावी. तसेच एका महिन्याच्या आत समितीला याबाबतचा अहवाल सादर करावा. नियमच नाही असे आयुक्त, अमरावती म्हणत आहात, समितीला आता आयुक्त, अमरावती यांच्यावरच कारवाई करावी लागणार आहे. नियमच नाही, असे म्हणणे योग्य नाही. या अनुषंगाने ज्या ज्या ठिकाणी ज्या ज्या इमारतींनी ओसी घेतलेली नाही. त्याच्यावर डबल टॅक्स लावण्यात यावा. आता अमरावतीमध्ये महानगरपालिकेमध्ये ओसी घ्यायची पद्धतच नाही. पहिले ओसी घ्यायची नाही. नंतर डबल टॅक्सही द्यायचा नाही. याबाबत एक परिपत्रक काढण्यात यावे. नगरपालिकेमध्ये मागील दहा वर्षात आणि महानगरपालिकेत किती बिल्डींगला परवानगी दिल्या, त्याच्यामधील किती लोक राहतात आणि कोणाकडे ओसी आहे आणि कोणाकडे ओसी नाही. याची माहिती मागविली तर पूर्ण राज्याचे चित्र समजेल. प्रॉपर्टी असेसमेंट करायची गरजच नाही. महाराष्ट्रात प्रॉपर्टी असेसमेंट करायचीही गरज नाही. आज जरी याची अंमलबजावणी केली तरीही हे काम होईल. डिसेंबर, २००० पर्यंत ९२ पैकी एकाही पेट्रोल पंपने अंतिम फायर एनओसीची मागणी केली नाही. यावर शासनाने कारवाईही केलेली नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, त्यांचे नूतनीकरण ज्यावेळी केले जात होते, त्यावेळी त्यांच्याकडून फॉर्म एनओसी भरून घेण्याची कारवाई करीत आहोत असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

मागील वेळी ती कारवाई केली नाही, ती आज्ञावली बदलून पुढे जावे. जे नाही केले त्याची नोंद घेण्यात येऊ नये द्वयांनी यांच्या नियमांचे पालन केले नाही, त्यांच्यावर विभागाने कारवाई प्रस्तावित केली आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, आयुक्त अमरावती जे बोलले होते, कारण आयुक्त, अमरावती यांच्याकडेही तशाच प्रकारची माहिती कार्यालयाने दिलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

डीसीआर रुल्समध्ये नाही. तसे असेल तर समितीला ते दाखविण्यात यावे. आयुक्त जे म्हणत आहे, तसे असेल तर समितीला ते दाखवावे. दरवर्षी फायर एनओसी घेऊन त्याचा फॉलोअप घेणे आवश्यक आहे. तीनही कॉर्पोरेशनला पत्र लिहावे. पेट्रोल पंप हे महानगरपालिकेच्या मालकीचे असतात. पंप मालकाला लीजवर चालवायला दिलेले असतात. पेट्रोल पंपाची, एक्स्प्लोजिव्हची एनओसी कॉर्पोरेशनच्या नावाने असते. मालकाला

पेट्रोल पंपावरुन कंडिशन्स व्हायोलेट केल्यानंतर मनपा काढू शकते. आयुक्तांनी नोटीस कॉर्पोरेशनला द्यावी. त्यांचा एक विभाग आहे. ते विभाग हेच काम करतात. मनपाला असे लिहून पाठविण्यात यावे की, अशी तरतूद आहे, त्याप्रमाणे कारवाई केली का ? जे अधिकारी याची काळजी घेत नाही, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे असे सूचित करून ठाणे मनपाचे काय म्हणणे आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, ठाणे येथे १७ पेट्रोल पंप आहेत, एलपीजी पंधरा आहेत, सीएनजी सहा आहेत अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली. ते ठाणे म.न.पा.च्या अग्निशमन आराखड्यात दाखविले नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, अग्निशमन आराखड्यात दाखविण्यात आले नाही. पण आता फिगर्स घेतलेल्या आहेत. तसेच, ते अपडेट केलेले आहे. पेट्रोल पंप १७, एलपीजी-१५, सीएनजी-६ असे याचे ब्रेकअप आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

नाशिकची काय परिस्थिती आहे? अशी विचारणा समितीने केली असता, नाशिकमध्ये पूर्णतः ६८ पेट्रोल पंप आहेत. तीन जणांकडे पूर्ण फायर एनओसी आहेत. ६५ जणांकडे एनओसी नाहीत. त्यांना नाशिक म.न.पा.ने ऑलरेडी नोटीसेस इश्यू केलेल्या आहेत. याच्यामध्ये दोन भाग असतात. बांधकाम सुरू करण्यापूर्वीची परमिशन, ६५ ठिकाणी बांधकामाची परमिशन नाही. त्यांना टाऊन प्लानिंग विभागातून नोटिसेस इश्यू करून त्या संदर्भातील पुढची कारवाई चालू आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

नाशिक शहरामध्ये सन १९८२ पूर्वी सर्व झालेले आहे. सुरक्षात्मक दृष्टीने ज्या काही उपाययोजना आहेत, त्या तर करता येतात. सुरक्षेसाठी फायर ऑडिट आणि एनओसी दरवर्षी घेणे आवश्यक आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, परमिशन दिली त्यावेळचे रुल्स प्रिव्हेल होतात. त्यावेळी ते रुल्स नव्हते, त्यामुळे ते सक्तीचे करता येत नाही. नवीन परमिशन देताना सगळ्या कंडीशन्स फुलफिल करण्यात येतात. कायद्यामध्ये किंवा रुल्समध्ये रिट्रोस्पेक्टिव्ह इफेक्टनेही परमिशन देता येते. त्यांना नाशिक म.न.पा. सतत कौन्सेलिंग करत असतो. फायर एस्क्टिंग्विषर ठेवत जा, असे निदेशही याबाबत देता येतात असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

ज्या सुरक्षात्मक योजनांना बंधनात्मक करु शकतात, ते करावे असे समितीने सूचित केले असता, बेसकिली, रुल्समध्ये तशी प्रोव्हीजन नाही. हॉस्पिटलच्या बाबतीत आणि स्पेशल बिल्डींगच्या बाबतीत हे रुल्सनुसार लागू केलेल्या आहेत. नाशिक, मनपा कौन्सेलिंग करून त्यांची स्वतःची व्यवस्था करण्याकरिता उद्युक्त करीत आहे. कायद्यानुसार त्यांना बंधनकारक करता येणार नाही अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

अमरावती शहराच्या आराखड्याबाबत माहिती सांगावी असे समितीने निदेशित केले असता, याचे काम एका खाजगी एजन्सीला काम दिलेले आहे, ते प्रोसेसमध्ये आहे. ते तयार करीत आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

औरंगाबाद महानगरपालिकेने सांगितले की, महानगरपालिकेच्या इमारतींना निधी उपलब्ध नसल्यामुळे कमी अग्निशमन उपकरणे बसविण्यात आलेली नाहीत असे समितीने निदर्शनास आणले असता, आता औरंगाबाद मनपा अग्निशमन उपकरणे बसवून घेत आहे. आवश्यक तेवढी फायर एक्स्टिंग्विशर्स कमी होते, ते आता बसवून घेत आहोत. आता औरंगाबाद मनपाचे रुग्णालय, शाळांमध्ये फायर एक्स्टिंग्विशर्स बसवून घेत आहोत अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

नवी मुंबईबाबत माहिती सांगावी असे समितीने निदेशित केले असता, नवी मुंबईमध्ये दोन फटाक्यांची दुकाने होती, त्यांना केवळ फायर एक्स्टिंग्विशर्स ठेवण्यात आले होते. त्या ज्या इमारती होत्या, त्यांच्याकडे आग विझविण्याची कायमस्वरुपी योजना होती. नवीन गाईडलाईन्सप्रमाणे नवी मुंबई, मनपाने त्यांना डिटेल गाईडलाईन दिली. त्यांना कायमस्वरुपी यंत्रणा बसवायला लावली. त्यांनी यंत्रणा बसवून हे फॉर्म सादर केलेले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले. एलपीजी वितरक यांनी ते बसविले का ? अशी विचारणा समितीने केली असता, २९ पेट्रोल पंपने बसविलेले आहेत. पंधरा राहिलेले आहेत, असे माहितीमध्ये दाखविले होते. त्यापैकी पाच पंप २००७ मध्ये १४ जी गावे महापालिका एरियातून वगळलेली गेलेली आहेत. ती आता नवी मुंबई, मनपा कार्यक्षेत्रात येत नाही. दोन एमआयडीसीच्या क्षेत्रात आहे. एक स्थलांतरित झाली होती. त्याला फायनल एनओसी दिलेली आहे. त्यांनी सात प्रोव्हीजनल एनओसी घेतल्या होत्या. त्या बंद अवस्थेत होत्या. त्या सुरू झाल्या नाहीत. त्यांना देता येत नाही. असा उरलेल्या पंधराचा ब्रेक-अप आहे. १२ एलपीजीपैकी तीन कार्यरत नाहीत. एक एमआयडीसीत आहे. एक एनएनबीसीत आहे. ते २००७ मध्ये नवी मुंबई, मनपा हद्दीतून वगळले गेलेले आहे. सातपैकी सहा जणांकडे अंतिम एनओसी आहे. एकीकडे प्रोव्हीजनल एनओसी आहे. त्यांनीही आता फी भरलेली आहे. त्यांना गाईडलाईन्स दिलेल्या आहेत. त्यांची आता एका महिन्यात सिस्टम कार्यरत होईल असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

**परिच्छेद क्र. ४.१.१० क्षमता बांधणीतील तूट—**

संचालक, अग्निशमन सेवा यांनी सांगितले की, सुधारणा करण्याबाबत सर्व महानगरपालिकांना सूचना देण्यात येतील. संचालक, अग्निशमन सेवा यांनी काय सूचना दिलेल्या आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, सर्व महानगरपालिका यांना सूचना दिलेल्या आहेत की, त्यांनी त्यांच्याकडे जो मॅनपॉवर आहे, त्यांना कॅपॅसिटी बिल्डींग म्हणून व्यवस्थित प्रशिक्षण देण्यात यावे, त्याशिवाय आता गेल्या दोन-अडीच वर्षांमध्ये सहा प्रादेशिक ट्रेनिंग सेंटर तयार केलेली आहेत. त्याच्यामध्ये एक मुंबई येथे आहे. संचालक यांचे स्वतःचे प्रशिक्षण केंद्रही आहे. मुंबई, नाशिक, नागपूर,

सिडको,पुणे,कलिना, ठाणे येथे प्रशिक्षण केंद्र आहे. जे आता ट्रेनिंग घेत आहेत, त्यांच्याकडे टोटल ट्रेनिंग दिलेले आहे, त्याच्यापैकी प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम त्याच्यामध्ये ११६७ लोकांना ट्रेनिंग दिलेले आहे. अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम त्याच्यामध्ये एकूण ६००० लोकांना प्रशिक्षण दिलेले आहे. हे ट्रेनिंग सेंटर एक्झिस्टिंग फायर स्टेशन, फायर सर्व्हिसेस आहेत, त्याच्यामध्ये संचालक यांच्या नियंत्रणाखाली आहे. त्याचे नाव ट्रेनिंग सेंटर आहे, ते कन्झ्यूमर आहे. मुंबई अग्निशमन केंद्र त्यांचेही एक स्वतःचे ट्रेनिंग सेंटर आहे. नागपूरला जागा होती, परंतु ट्रेनिंग सेंटरचे इन्फ्रास्ट्रक्चर होते, जागा आहे, त्यांच्याकडे सांगून डॉमिटरीज,क्लासरुम फॅसिलिटीज वगैरे मिळून त्या ठिकाणी एक प्रादेशिक केंद्र केलेले आहे. पुणे येथे देखील प्रशिक्षण केंद्र आहे. त्यानंतर सिडकोला आहे. नवी मुंबई येथे देखील प्रशिक्षण केंद्र आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

संचालक, अग्निशमन सेवा जी सहा नावे सांगितले त्यापैकी तीन येथेच आहे. मुंबई, सिडको, नवी मुंबई येथेच ट्रेनिंग सेंटर्स आहेत. महाराष्ट्रातील जे सहा प्रशिक्षण आहेत, ते मुंबईतच आहेत. महाराष्ट्रातील जे आठ प्रशिक्षण केंद्र आहेत, त्यापैकी पाच तर मुंबई ठाण्यातच आहेत. विभागीय स्तरावर का उभे करीत नाहीत असे समितीने सूचित केले असता, ०९ एकरची जागा आहे, त्याकरिता भरपूर एनओसी लागत होत्या, पालघरसारख्या ठिकाणी ही जागा आहे. येथे अद्ययावत ट्रेनिंग सेंटर चालू करणार आहोत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

हे सर्व विभागीय स्तरावर करणे आवश्यक होते. महाराष्ट्रात विभागीय सहा मुख्यालये आहेत. अमरावती, नागपूर, औरंगाबाद येथेही प्रशिक्षण केंद्र उभे केले पाहिजेत. औरंगाबाद महानगरपालिकेत २६ कर्मचारी असून १३ कर्मचारी नागपूर येथे कार्यरत आहेत. अग्निशमन विभागाकडे अधिकारी कमी असून त्यापैकी एकालाही प्रशिक्षणाकरिता पाठविले नाही. विभागीय स्तरावर जायला अडचण काय ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये जे कोर्सेस असतात, ते कोर्सेस प्रोबेशनल कोर्स आहेत. संचालक अतिरिक्त सेवा जे कोर्स चालवितात, तो सब-ऑफिसर्स कोर्स आहेत. फायरमनचा जो कोर्स आहे, तोही यामध्ये महत्त्वाचा आहे. यामध्ये दोन भाग वेगवेगळे आहेत. त्याशिवाय आजच्या डेटमध्ये जेथे जेथे इन्फ्रास्ट्रक्चर आहे, जोपर्यंत संचालक यांच्या कार्यालयात मोठे ट्रेनिंग सेंटर होत नाही. जेथे पायाभूत सुविधा आहे, चांगले ट्रेनिंग मिळेल, या ठिकाणी अरेंजमेंट केलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

सहापैकी तीन प्रशिक्षण केंद्र एकाच भागात ठेवलेले आहेत. विभागाची जी सोय आहे, ती बाजूला ठेवा. आता जेव्हा नेक्स्ट प्लॅन कराल, ते प्लान करीत असताना डिव्हीजनल हेडक्वार्टरच्या ठिकाणी हे करण्यासाठी जागा ओसंडून उपलब्ध आहे असे समितीने सूचित केले असता, त्याच्यासाठीच हा उपक्रम आहे, जो १३१पर्यंत आहे. जोपर्यंत प्रत्येक विभागामध्ये रिसोर्स क्लियर करीत नाही, तोपर्यंत त्याच्यावर मॉनिटर करु शकत नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

प्रशिक्षण केंद्राकरिता लागणारी व्यवस्था, पायाभूत सुविधा, मॅनपॉवर सहा ठिकाणी या प्रकारचे प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा प्रस्ताव शासनाला पूर्वी दिलेला आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, औरंगाबादमध्ये पत्रव्यवहार केला होता असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

सध्या हे प्रशिक्षण केंद्र किती ठिकाणी आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, जेथे जेथे पायाभूत सुविधा रेडी आहे, तेथे हे प्रशिक्षण केंद्र सुरू करणार आहोत. मुंबई, ठाणे, बेलापूर येथे प्रशिक्षण केंद्र सुरू आहे. पुणे, नागपूर, नाशिक, नवी मुंबई म्यूनिसिपल कॉर्पोरेशन, एमआयडीसी सिडको, कलिना, मुंबई, येथे प्रशिक्षण केंद्र आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

एमआयडीसी कोणती आहे? सध्या उपलब्ध असलेल्या इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये प्रशिक्षण केंद्र उभारलेले आहे. समितीची शिफारस अशी राहणार आहे की, आणखी जास्त लोकांच्या आणि विभागीय स्तरावर केले तर आणखी याला प्रतिसाद मिळेल व सगळीकडे जागरुकता वाढेल. अग्निशमन विभागाकडे कर्मचारी कमी आहेत, असे उत्तर दिले जाते. याप्रमाणे संचालक, अग्निशमन सेवा यांनी शासनाला प्रस्ताव सादर करावा. तसेच, त्याची कॉपी समितीकडे सादर करावी. जे डायरेक्शन्स संचालक, अग्निशमन सेवा, यांनी इश्यू केले, त्याची कॉपी आहे का ? त्याची कॉपी समितीला सादर करावी असे समितीने निदेशित केले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

**परिच्छेद क्र.४.१.१०.१ प्रशिक्षणातील तूट—**

प्रशिक्षणच नसेल तर फायरचा कर्मचारी काय काम करेल ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, शॉर्टेज ऑफ ट्रेनिंगमध्ये बेसिक फायर कोर्स ११६७ लोकांना दिलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

ज्यावेळी नगरपालिका, महानगरपालिका अग्निशमन कर्मचारी यांना नियुक्त करते, त्यांचे ट्रेनिंग करूनच नेमले पाहिजे. अमरावती, नागपूर येथे एकूण कर्मचारी ३७७ असून केवळ एका अग्नीशमन कर्मचाऱ्याला या कालावधीत प्रशिक्षण देण्यात आले असा कॅगचा पॅरा आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, जीआर असा आहे की, फायर रिक्रुटमेंटकरिता ६ महिन्यांचे प्रशिक्षण आवश्यक असते. ते पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रातील महापालिकेत भरती करायची असते. डायरेक्टर हे केवळ फायरमन रिक्रुटमेंटकरिता ६ महिन्यांसाठी ट्रेन करतात. डिव्हीजनल

ऑफिसर, स्टेशन ऑफिसर, डेप्युटी ऑफिसर यांची जी पदोन्नती आहे त्या करिता आवश्यक असणारे प्रशिक्षण आशिया खंडात केवळ नागपूर या एकाच ठिकाणी दिले जाते. प्रत्येक महापालिकेतून एक कर्मचारी व एक अधिकारी यांच्या प्रशिक्षणासाठी ज्या प्रमाणे कोटा उपलब्ध असेल त्या प्रमाणे पाठवले जातात. डायरेक्टरकडून कर्मचारी पाठवले जात नाहीत. प्रमोशनल ट्रेनिंग करिता नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज विभागीय स्तरावर करण्याची आवश्यकता आहे. रिक्रुटमेंट ट्रेनिंग सरप्लस आहेत. ज्या महापालिका आजही मागणी करतील त्यांना उमेदवार देण्यास सक्षम आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

नागपूरला एक केंद्र आहे. महाराष्ट्रात औरंगाबाद व पुणे अशा प्रकारे एकूण ३ केंद्रे असली पाहिजेत. या बाबत नगरविकास विभागाकडे शिफारस करावी. असे मत समितीने व्यक्त केले असता, ६ प्रादेशिक केंद्राचा प्रस्ताव देण्यात आला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले. लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, या ॲकेडमीच्या अधिपत्याखाली शासनाने ८ प्रादेशिक अग्नीशमन प्रशिक्षण केंद्रांना मान्यता दिली असून अग्नीशमन प्रशिक्षणाचे पाठ्यक्रम आयोजित करण्यात येतात. ते प्रत्येक विभागात आहे. विभाग जे सांगत आहेत ते प्रादेशिक नाही. ८ प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राना शासनाने मान्यता दिलेली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

महालेखापालांचे असे म्हणणे आहे की, कलिनाला क्षमता आहे त्याचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. त्या दृष्टीने काय कार्यवाही केली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, १३१ चे मॅनपॉवर आहे त्याचा पाठपुरावा केला जात आहे. ही पदे ज्यावेळी पूर्ण भरतील त्यावेळी अधिकाधिक वापर करता येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले. १३१ पदांना मान्यता मिळाली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शवून ही पदे भरण्याची प्रक्रिया एक्सपिडीट करण्यात येत आहे. नगरविकास विभागात प्रस्ताव व आर.आर (सेवाप्रवेश नियम) पाठवले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस विदित केले.

१३१ पदांना उच्च स्तरीय समितीने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे लवकरात लवकर आदेशश काढले पाहिजेत. आर. आर तयार (सेवाप्रवेश नियम) करण्याचे काम सुरू आहे. ते झाल्यानंतर भरती करु शकतील. डायरेक्टरच्या पदांची भरती एमपीएससीकडून होणार असून त्याकरिता मागणी पत्र एमपीएससीकडे नोंदवले आहे. इतर पदांची भरती करण्यासही परवानगी द्यावी असे समितीने सूचित करून महाराष्ट्र शासनाने कलिना, मुंबई येथील एक अग्नीशमन प्रशिक्षण केंद्र स्थापना केले. मार्च, १९९०च्या जी. आर. नुसार एसएफटीसीमध्ये अग्निशमन कर्मचाऱ्यांना (नव्याने भरती झालेले व कनिष्ठ श्रेणीतील कर्मचारी) वर्षभरात सहा महिन्यांचे मूलभूत तांत्रिक अग्निशमन प्रशिक्षण द्यावयाचे होते. लेखापरीक्षेत असे आढळून आले की, २०१० ते २०१५ दरम्यान राज्यात प्रशिक्षणात द्यावयाच्या १२५० कर्मचाऱ्यांपैकी एसएफटीसीमध्ये ४०१ कर्मचाऱ्यांना ३२ टक्के प्रशिक्षण देण्यात आले. सन २०१० ते २०१५ दरम्यान एसएफटीसीमध्ये एकाही कर्मचाऱ्याला प्रशिक्षण देण्यात आले नव्हते. तसेच एमसीजीएम, अमरावती व नागपूर एकूण कर्मचारी संख्या ३७७ मधून प्रत्येकी फक्त एका अग्निशमन कर्मचाऱ्याला या कालावधीत प्रशिक्षण देण्यात आले होते. याबाबत संचालक, अग्नि सेवा यांनी खुलासा करावा. या परिच्छेदाशी सहमत आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास नकारार्थी उत्तर दिले. मग तसे लिहून का दिले नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, तसे सबमिशन केले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

ज्यावेळी महालेखाकारांचा रिपोर्ट तयार होतो त्यावेळी तो महालेखाकार सचिवांकडे पाठवतो. फॅक्टस व फिगर्स चेक करण्यासाठी ४ आठवड्यांची मुदत दिलेली असते. यामध्ये काही विसंगती असल्यास महालेखाकार कार्यालयास कळविण्यात येतो. त्या वेळी जे ऑडीट केले त्यात असे आढळून आले होते की, १२५० कर्मचाऱ्यांना ६ महिन्यांचे प्रशिक्षण द्यावयाचे होते त्यापैकी ४०० कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. ही वस्तुस्थिती विभागाला सांगितली होती असे प्रधान महालेखाकार त्यांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले.

१०० टक्के कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे अभिप्रेत होते. तसे झालेले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, बेसिक फायर ट्रेनिंग कोर्स, बेसिक कॅंडीडेट करता असून ११६७ लोक आहेत. रिक्रुटमेंट करिता ४२६९ जणांनी अप्लाय केले आहे. ऑफिसर कॅटेगरीमधील कोर्स १४५ जणांचा झालेला आहे. असे लहान मोठे कोर्स १०४९ आहे. एकूण ६ हजार ३३६ जणांना आता पर्यंत प्रशिक्षण दिले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

अमरावतीमध्ये २७ जणांची फायरमन या पदावर भरती केली असे समितीने निदर्शनास आणले असता, अमरावती, अग्निशमन विभाग यांनी विभागाकडे रिक्विझीशन पाठवली पाहिजे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले. अमरावतीमध्ये प्रशिक्षण न देता त्यांची भरती केलेली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, ज्यांना प्रशिक्षण देण्यात आले त्यांचीच भरती केली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

सद्य:स्थितीत २१ कंत्राटी फायरमन बाह्य संस्थेद्वारा घेण्याचे प्रस्तावित आहे. मनुष्यबळाची कमतरता पूर्ण झाल्यावर दर सहामाही प्रशिक्षणाकरिता विभागाकडून चार फायरमन प्रशिक्षणास पाठविण्यात येतील, असे येथे नमूद केले आहे. बेसिक प्रशिक्षण दिले आहे व प्रमोशनकरिता जे प्रशिक्षण आवश्यक आहे, त्याकरिता नागपूरला पाठवले जाते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यास विभागीय प्रतिनिधींनी होकारार्थी उत्तर देऊन, प्रत्येक महापालिकेला कोटा दिलेला आहे असे विदित केले.

बेसिक ट्रेनिग बद्दल पॅरा आहे. सचिवांनी ते मान्य देखील केले आहे. १२५० पैकी ४०१ जणांना प्रशिक्षण दिले, उर्वरित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले काय? अशी विचारणा प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, इंडक्शन ट्रेनिंग समोरच्या रिक्विझीशनप्रमाणे केले जात नाही. खाजगी प्रशिक्षण दिले जाते. महापालिकेच्या जीआरप्रमाणे हे ट्रेनिंग घेतलेल्यांना रिक्रुट केले जाते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

ॲडमिशनकरिता काय क्रायटेरिया आहे? सध्या हीच रिक्रुटमेंट सुरू आहे. त्यामुळे अनेक जण लोकप्रतिनिधींकडे चौकशीला येतात. अग्निशमन विभागामध्ये वेटींग आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, फायरमनच्या कोर्सकरिता दहावी पास, सब ऑफिसरकरिता बारावी पास आवश्यक आहे. सहा महिन्याची ३०० जणांची फायरमनची बॅच आहे. नागपूर, अग्निशमन विभागाकडे दर ६ महिन्याला जे ट्रेनिंग येते त्याचे नोटीफिकेशन वर्तमानपत्रात येते. जे उमेदवार पात्र असतात ते ट्रेनिंगला येऊ शकतात. ट्रेनिंगमध्ये उत्तीर्ण झाल्यानंतरर ते खाजगी क्षेत्र, नगरपालिका, महापालिका येथे अर्ज करू शकतात असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

आता कंत्राटी पद्धतीने देखील प्रशिक्षित कर्मचाऱ्यांनाच घेतले जाणार आहे. सन २०१० ते २०१५ या कालावधीत खाजगी किंवा ऑफिशीअल किती कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले याचा वर्षनिहाय तक्ता द्यावा. आतापर्यत ६ हजार कर्मचाऱ्यांना अग्निशमन विभागाने प्रशिक्षण द्यावयास हवे होते असे समितीने निदर्शनास आणले असता, अग्निशमन विभागाने आतापर्यंत जवळजवळ ५ हजार कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

**परिच्छेद क्रमांक ४.१.१०.२ अद्ययावत प्रशिक्षण प्रबोधिनी बांधण्यातील विलंब-**

समितीने पुन्हा दिनांक १७ ऑक्टोबर २०१८ रोजी नगरविकास विभागाचे सचिव तसेच विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी अद्ययावत अग्निशमन प्रशिक्षण प्रबोधिनी बांधण्यातील विलंब या परिच्छेदावर चर्चा करताना प्रशिक्षण प्रबोधिनी बांधण्यासाठी सन २००९ मध्ये ५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. कोणत्या जागेवर आरक्षण द्यावे, कोणत्या जागेवरील आरक्षण काढणे हे नगरविकास विभागाचे काम आहे. सन २००९ ते २०१८ पर्यंत विभागाने पाच हजार आरक्षणे टाकली असतील किंवा काढली असतील. विभागाला स्वतःच्या कामासाठी जागा मिळाली नाही अतिशय गंभीर बाब आहे. निधीची तरतूद असताना काम का करण्यात आले नाही ? या कामासाठी जागा प्राप्त करून घेण्याची विभागाची इच्छाशक्ती नव्हती काय? विभाग नेहमी ३७ (१) (२) चा उल्लेख करीत असतो. जागा उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, त्या वेळेला ज्या जागेवर दुसरे आरक्षण होते, परंतु आता जागा उपलब्ध झालेली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सन २००९ मध्ये निधी उपलब्ध झाला होता. आता सन २०१८ मध्ये आहे. विभागाकडे जागा उपलब्ध नसताना वित्त विभागाकडे निधीची मागणी का केली ? विभागास निधी प्राप्त झाल्यानंतर सहा महिन्यांत किंवा वर्षभरात जागा उपलब्ध करून घ्यावयास पाहिजे होती. याबाबत समितीला संयुक्तिक कारण द्यावे असे समितीने सूचित केले असता, ही अग्निशमन प्रशिक्षण प्रबोधिनी भिवंडी येथे होणार होती. सन २००९ मध्ये निधीची तरतूद करण्यात आली, त्यासाठी ठाणे जिल्ह्यात जागा दिली. ती जागा प्राप्त झाली नव्हती. आता पालघर येथे विराथन खुर्द येथे जागा मंजूर झालेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी स्पष्टीकरणामध्ये नमूद केले आहे की, भिवंडी तालुक्यातील (ठाणे जिल्हा) येथील जागेवर अन्य आरक्षण असल्याचे एमएमआरडीएने कळविले असल्यामुळे तेथे प्रगत अग्निशमन अकादमी प्रस्थापित करता येणार नाही. जागा उपलब्ध नसताना ५० कोटी रुपयांची मागणी का करण्यात आली ? जागा निश्चित करताना त्या जागेवर आरक्षण आहे किंवा कसे याची माहिती विभागास असणे आवश्यक आहे. नगर-विकास विभागाच्या सचिवांना एमएमआरडीएकडून जागेवर आरक्षण आहे किंवा नाही याची माहिती एक दिवसांत मिळू शकते. विभागाकडे जागेची उपलब्धता नसताना निधीची मागणी का केली ? विभागाने ५० कोटी रुपये अडकवून का ठेवले? आपल्याकडे कामाचे नियोजन नव्हते, तसेच वर्षभरात जागा मिळवून घेण्याची क्षमता नव्हती तर विभागाकडे निधीची मागणी का केली? अशी विचारणा समितीने केली असता, ही टोकन तरतूद होती असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

बजेटमध्ये एखाद्या टोकन हेडला निधी मिळाला याचा अर्थ विभागाकडे कामाची तयारी होती. ५० कोटी रुपयांची तरतूद केली होती की, फक्त टोकन केली होती? अजूनही जागा मिळालेली नाही काय? अशी विचारणा समितीने केली असता, प्रशासकीय मान्यता घेऊन टोकन तरतूद केली होती. आता प्रगत अग्निशमन प्रशिक्षण अकादमीसाठी पालघर येथील विराथन खुर्द येथे जागा मंजूर करण्यात आली आहे. या अकादमीसाठी सर्व एनओसी घेतल्या असून ॲलॉटमेंटसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रकरणण पाठविले आहे. रिझर्व्हेशन झालेले आहे, बाकी सर्व परमिशन्स ऑन प्लेस आहेत. अजून जागा मिळालेली नाही. जिल्हाधिकारी यांनी मान्यता दिल्यानंतर ७/१२ विभागाकडे येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सरकारी काम असो किंवा खाजगी काम असो, या गोष्टी सर्वांसाठी लागू आहेत. खाजगी लोक पंधरा दिवसांत परवानगी मिळवितात व नगरविकास विभाग त्यांना एनओसी देतो आणि शासनाला एनओसीसाठी दोन-पाच वर्षे लागतात? जागा उपलब्ध करून घेण्याची विभागाची क्षमता नव्हती तर निधीची मागणी का केली, आता किती दिवसांत काम सुरू होईल? की तहसिलदाराची एनओसी घ्यायची बाकी आहे? ही प्रक्रिया केव्हा

पूर्ण करणार, काम केव्हा सुरू होणार या वर्षी निधीची तरतूद केली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, हे प्रकरण लवकर निकाली काढण्यात येईल. या कामामध्ये विलंब झालेला आहे. या कामासाठी आवश्यक त्या परवानगी घेऊन प्रकरण लवकर निकाली काढण्यात येईल. सदर कामासाठी या वर्षी ५० कोटी रुपयांची तरतूद आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या कामाची प्रक्रिया किती दिवसांत पूर्ण होईल? मागील ९ वर्षापासून काही काम झालेले नाही. तीन-चार महिन्यांत काम करण्यात येईल असे ठोस आश्वासन द्यावे. याबाबत काही उत्तर नसेल तर शासनास निधी परत करावा. तो निधी अन्य विभागांना वापरता येईल. असे समितीने सूचित केले असता, या आर्थिक वर्षात जागा उपलब्ध करून कामास सुरूवात करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागास जागा मंजूर झालेली आहे. प्रयत्न केले तर जिल्हाधिकारी दोन-तीन महिन्यात जागा देतील. त्यानंतर विभागास फक्त पुढची कार्यवाही करायची आहे. अंदाजपत्रक तयार केले असेल तर फक्त निविदा प्रक्रिया करायची आहे. काम करणारी यंत्रणा कोणती आहे, सार्वजनिक बांधकाम विभाग हे काम करणार आहे काय ? नगरविकास विभागाच्या माध्यमातून डायरेक्शन दिल्या जाणार आहेत की, संचालकांच्या माध्यमातून जाणार आहेत? ॲकेडमीवर कोणत्याही महानगरपालिकेची मालकी नाही. संचालन करणारी यंत्रणा कोणती आहे? अशी विचारणा समितीने केली असता, संचालक, अग्निशमन हे फक्त तांत्रिक स्पेसिफिकेशन देतील, परंतु त्याची अंमलबजावणी सार्वजनिक बांधकाम विभाग करणार आहे. संचालक, अग्निशमन सेवा यांना नगरविकास विभाग, निधी उपलब्ध करून देणार आणि त्यांच्यामार्फत कार्यवाही होणार असून सार्वजनिक बांधकाम त्याची अंमलबजावणी करणार आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सार्वजनिक बांधकाम विभाग अंमलबजावणी करणार आणि संचालक, अग्निशमन विभाग त्यावर लक्ष ठेवणार आहे काय ? या वर्षीच्या मार्च महिन्याच्या आत काम झाल्याचे समितीला कळवावे असे समितीने सूचित केले असता, याची नोंद घेऊन आणि समितीच्या सूचनेप्रमाणे कळविण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**परिच्छेद क्रमांक ४.१.१०.३ शारीरिक स्वास्थ शिबिरे आयोजित न करणे—**

या परिच्छेदाबाबत सहा महिन्यांत शारीरिक स्वास्थ्य शिबिर घेणे आवश्यक असताना ते घेण्यात आले नाही, यास कोण जबाबदार आहे? नगरविकास विभाग परिपत्रक काढते आणि तोच विभाग परिपत्रकाची अंमलबजावणी करीत नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, या संदर्भात प्रत्येक महानगरपालिकेने दिलेले लेखी स्पष्टीकरण समितीसमोर असून त्यामध्ये त्यांनी केलेल्या प्रयत्नाचा उल्लेख केलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

प्रशिक्षणासाठी प्रयत्नाचा प्रश्नच येत नाही. ज्या वर्षात हा आक्षेप घेण्यात आला होता त्यासंबंधी माहिती द्यावी. काय केले त्याबद्दल आता विभागाने केलेले प्रयत्न योग्य आहेत. असे मत समितीने व्यक्त केले असता, हा मुद्दा शारीरिक स्वास्थ्य शिबिराचा आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शारीरिक शिबिराचा नाही तर अग्निशमन कर्मचाऱ्यांची शारीरिक क्षमता तपासणी करण्यासंदर्भात आहे. अग्निशमन दलामध्ये काम करणारा कर्मचारी काम करण्यास सक्षम आहे की नाही यासाठी ही शारीरिक तपासणी आहे. यामध्ये विभागाने सन २०१५ नंतर सुधारणा केली, परंतु सन २०१० ते २०१५ या कालावधीत या सर्व उणिवा होत्या हे मान्य आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, काही महानगरपालिकांमध्ये अंशतः काही प्रमाणात होते, पण त्यामध्ये सुधारणा केलेली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ज्या अधिकाऱ्यांची ही जबाबदारी होती त्यांनी ती पार पाडली नाही म्हणून त्यांच्यावर कोणतीही कारवाई करणार नाही काय? विभागास ही यंत्रणा तशीच पुढे चालवावयाची आहे काय ? त्या त्या महानगरपालिका आयुक्तांची ही जबाबदारी नाही काय? नागपूर महानगरपालिकेने दिलेले स्पष्टीकरण तर आश्चर्यकारक आहे. त्यांनी स्पष्टीकरणात नमूद केले आहे की, "अग्निशमन विभाग महानगरपालिका, नागपूर येथील कर्मचाऱ्यांची अशी शिबिरे आयोजित केली जात नव्हती. लेखापरीक्षणात आक्षेप घेतल्यानंतर कर्मचाऱ्यांची शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात येतील." ही चाचणी केव्हा घेण्यात आली? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने मागील महिन्यांत १ सप्टेंबर रोजी शिबिर घेतलेले आहे. हे शिबिर प्रथमच घेतले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

समितीने साक्ष लावली म्हणून विभागाने शिबिर घेतलेले आहे. लेखा आक्षेप आला नसता आणि समितीने साक्ष लावली नसती तर आणखी पाच-सहा वर्षे हे शिबिर झाले नसते. शारीरिक तपासणी शिबिरे घेण्याची जबाबदारी कोणाची आहे? अशी विचारणा समितीने केली असता, मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभाग त्यांना जबाबदार धरणार नाही काय? आपला अग्निशमन अधिकारी अद्ययावत असला पाहिजे. अग्निशमन यंत्रणा अद्ययावत असली पाहिजे असे त्यांना वाटत नाही काय? ज्या अग्निशमन अधिकाऱ्यांनी असे शिबिर घेतले नाही म्हणून त्यांना कारणे दाखवा नोटीस दिली काय?

विभागीय सचिवांनी सांगितले की, शारीरिक क्षमता तपासून घेण्याची जबाबदारी अग्निशमन अधिकाऱ्यांची आहे. सन २००८ पासून २०१५ पर्यंत एकदाही शारीरिक क्षमता चाचणी घेतली नाही म्हणून त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली काय? अशी विचारणा समितीने केली असता, ही बाब महत्त्वाची असून ती निदर्शनास आलेली आहे. यापूर्वी शारीरिक क्षमता चाचणी घेतलेली नाही हे अंशतः मान्य आहे. यानंतर सुधारणा करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यापूर्वी जे काम झाले नाही त्याबाबत संबंधितांवर कारवाई करावी. विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रॉस्पेक्टीव्हली दुरुस्त करण्यात येईल. ज्या अधिकाऱ्यांनी नियमांचे पालन केले नाही त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. जेव्हा एखादा विषय लोकलेखा समितीसमोर येतो आणि त्या विषयावर सचिवांचे मत देखील त्या गोष्टी करणे बंधनकारक आहे आणि त्या झाल्या पाहिजेत असे असेल तर त्याबाबत कारवाई होणे आवश्यक आहे. तसे नसेल तर विभागाने नियमांमध्ये बदल करावा. जर नियम असेल तर त्याप्रमाणे काम करणे बंधनकारक आहे. ज्या अधिकाऱ्यांनी ही कार्यवाही केली नाही त्यांच्यावर दंडात्मक किंवा विभागीय कारवाई केली पाहिजे जेणेकरून पुढील कालखंडात त्याची पुनरावृत्ती होणार नाही आणि कारवाई मागील समितीचा हाच उद्देश आहे. सन २००८ ते २०१५ या कालावधीत शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात आली नाही. त्याबाबत संबंधितांवर दंडात्मक कारवाई, कारणे दाखवा नोटीस देणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, या प्रकरणी महानगरपालिका आयुक्तांनी संबंधितांकडून स्पष्टीकरण मागवावे असे त्यांना निर्देश देण्यात येतील असे विभागीय सचिवांनी सांगितले. पुढील कालखंडात प्रत्येक महानगरपालिकेत अशी शिबिरे होतील याबाबत ठोस कार्यवाही करावी असे समितीने सूचित केले असता, तशा सूचना निर्गमित करण्यात येतील आणि त्याबाबत आढावा घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अमरावती येथे अत्याधुनिक व्यायामशाळा सुरू असून आणखी एक खोली व्यायाम शाळा सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. अत्याधुनिक व्यायामशाळा कोठे आहे, नवीन व्यायामशाळा कोठे प्रस्तावित करणार अशी विचारणा समितीने केली असता, आधुनिक व्यायामशाळा एमआयडीसीमध्ये आहे आणि ट्रान्सपोर्ट नगरला ओपन जिम सुरू करण्यात येत आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

एमआयडीमधील अत्याधुनिक व्यायामशाळा सुरू आहे. व्यायामशाळेची वेळ काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, ती व्यायामशाळा वर्कींग अवर्समध्ये सुरू असते असे विभागीय प्रतिनिधींनी विदीत केले.

**परिच्छेद क्र.४.१.१०.४ अपर्याप्त सामाजिक सुसज्जता आणि जागृती—**

या परिच्छेदासंदर्भात माहिती देताना त्याच्यामध्ये सर्व महानगरपालिकांनी उत्तर असे दिलेले आहे की, १४ ते २० एप्रिल हा जो सप्ताह असतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१४ ते २० एप्रिल हा सप्ताह जागतिक सप्ताह आहे. याशिवाय काही जनजागृती कुठेही केली जात नाही. हेच दुर्दैव आहे. अनेक वर्षांपासून १९४४ पासून अनेक लोक मुंबईमध्ये स्थित झाले. अनेक लोक हुतात्मा झाले. यांच्या स्मृतीस्वरुप आपल्या देशात सगळीकडे अग्निशमन दिन साजरा केला जातो. १४ ते २० एप्रिल या सप्ताहातील कार्यवाही व्यतिरिक्त बाकी काही जनजागृती करण्याची विभागाची काही जबाबदारी नाही का? अशी विचारणा समितीने केली असता, जबाबदारी आहे, त्याच्याप्रमाणे ते करण्यात येते, शाळा, कॉलेज, महाविद्यालये, ऑफिसेस, या ठिकाणी जनजागृतीची शिबिरे महानगरपालिकेने घेतलेली आहेत. मॉकड्रिल्स घेतलेली आहेत, कोणत्याही सोसायटीने किंवा कमर्शियल इमारत असलेल्या ठिकाणी मागणी केल्यास, त्या ठिकाणीही विभागाकडून प्रात्यक्षिक आणि मॉक फायर ड्रिल्स आयोजित करण्यात येतात असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

महालेखापाल यांनी सांगितले की, सप्ताह साजरा केला. २०१२ चा राष्ट्रीय आपत्कालीन व्यवस्थापनातील मार्गदर्शक सूचनांचे पालन केले नाही, असे महालेखापालांचे आक्षेप आहेत. सप्ताहव्यतिरिक्त ज्या गोष्टी मार्गदर्शक सूचनांमध्ये होत्या, त्याचे पालन झाले नाही. राज्याच्या अग्निशमन संचालकांनी कार्यपद्धतीवर नियंत्रण ठेवले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, जे डायरेक्टर आहेत, त्यांचे जे पद आहे ते अ, ब, क, ड आणि अ प्लस या सगळ्या महानगरपालिकामध्ये त्यांचे सक्षम प्रमुख अधिकारी आहेत, ते त्यांच्या अंतर्गत येतात. डायरेक्टरच्या आत येतात असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाच्या अग्निशमन अधिकाऱ्याची फायर ऑफिसर्सची ही जबाबदारी नाही का? संरक्षण उपाययोजना क्षेत्रातील तज्ज्ञांना बोलावून सामाजिक जागृतीच्या दृष्टीने जनजागृती व प्रशिक्षण आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी नाशिक अंतर्गत करण्यात येईल, अशी उत्तरे दिलेली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, २०१४ ते २०१८ पर्यंत दरवर्षी मॉकड्रील घेण्यात आलेले आहेत. १४ ते २० एप्रिल व्यतिरिक्तही जनजागृतीकरिता मॉकड्रील घेतलेले आहेत. या चार वर्षांच्या काळात १३७ मॉकड्रील्स घेतलेल्या आहेत. याच्यामध्ये नाशिक महानगरपालिकेकडे एअरफोर्स स्टेशन आहे. आर्मी कॅंटोनमेंट आहे. यांच्याबरोबर एकत्रित मॉकड्रील ही घेण्यात येत असते. प्रबोधनाचे कार्यक्रम जास्त प्रमाणात झालेले नाहीत. तेही पुढील काळात घेण्यात येतील. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

अमरावती महानगरपालिकेत किती कर्मचारी आहेत, कामकाजाचे स्वरूप लक्षात घेता मनुष्यबळाची कमतरता आहे, असे म्हटलेले आहे. आपल्याला आवश्यक कर्मचारी किती आहेत? कामावर कर्मचारी किती आहेत? अशी विचारणा समितीने केली असता, आवश्यक दोन नवीन अग्निशमन केंद्रे प्रस्तावित आहेत, त्याच्यानुसार मागील वेळेस तो मुद्दा झाला होता, त्यावेळी महानगरपालिकेने कळविले होते. महानगरपालिकेने याचे जे प्रशिक्षित त्यांना एजन्सीमार्फत नवीन कामावर घेतलेले आहेत. आराखडयाप्रमाणे सध्या किती कर्मचारी कार्यरत आहेत? किती कर्मचाऱ्यांची कमतरता आहे, किती कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे? कमतरता असली तरीही प्रशिक्षण देण्यासाठी त्याचा काही संबंध नाही. याबाबत आपण जे उत्तर दिलेले आहे, ते विसंगत आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, यावेळेस ती नस्ती आणली नाही. मागील वेळी या मुद्द्यावर डिटेल चर्चा झाली होती. महानगरपालिकेकडे कर्मचारी मर्यादित असल्यामुळे आगीच्या घटनांना रिस्पॉन्स हा एक फंक्शन असतो.` ट्रेनिंग हा एक मिशन असतो, कर्मचाऱ्यांची संख्या कमी असेल तर दोन्ही फंक्शन्स करण्यामध्ये अडचणी येऊ शकतात असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

असे किती कर्मचारी कमी आहेत? ते भरती करण्याकरिता महानगरपालिकेकडून काय कार्यवाही करण्यात येत आहे अशी विचारणा समितीने केली असता, महानगरपालिकेकडे मुख्य अग्निशमन अधिकारी एक मंजूर एक रिक्त आहे. सहायक मुख्य सुरक्षा अधिकारी एक पद असून ते रिक्त आहे. अग्र अग्निशामकाची तीन पदे आहेत, त्यातील दोन कार्यरत आहेत, एक पद रिक्त आहे. स्टेशन ऑफिसर्स एक पद रिक्त आहे, एक कार्यरत आहे. ड्रायव्हर कम फायरमन ४६ पैकी ४३ भरलेले आहेत, तीन पदे रिक्त आहेत. हे कर्मचारी जुन्या आकृतीबंधाप्रमाणे आहेत. आता अग्निशमन केंद्र वाढणार आहेत अशी विभागीय प्रतिनिधींनी दिली.

फायरस्टेशन्स वाढल्यानंतर नवीन आकृतीबंधाप्रमाणे कर्मचारी मिळतील. ॲक्च्युअल फील्डवर्कमधील ४६ पैकी ४३ पदे भरलेली आहेत. बाकी ४० टक्के जागा रिक्त आहेत. महानगरपालिकेकडे कमी रिक्त पदे आहेत. या महानगरपालिकेकडे मोठमोठी पदे रिक्त आहेत. वरिष्ठ संवर्गातील पदे रिक्त आहेत.

महानगरपालिका जनतेकडून टॅक्स घेते, त्यांना अग्नि सुरक्षा देणे हे महानगरपालिकेला बंधनकारक आहे. उद्या जर राज्याचा एखादा माणूस याचिका घेऊन हायकोर्टात गेला कि तो टॅक्स भरतो तरीही महानगरपालिकेकडे फायरची यंत्रणा उपलब्ध नाही. हायकोर्ट अशा परिस्थितीत महानगरपालिकेवर ताशेरे ओढेल. बिल्डींगचे बांधकाम परवाने देण्यात येतात. टॅक्स घेण्यात येतो तर लोकांना फायर सुरक्षा देणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. टॅक्स वाढविला, फंजीबल एफएसआय वाढविले, बिल्डींग परवाने दिले, तरीही लोकांना सुरक्षा देण्याची प्रायोरिटीही स्वीकारणे आवश्यक आहे. सुरक्षेच्या बाबीचे बळकटीकरण करावे. शिफारशीप्रमाणे अंमलबजावणी झाली पाहिजे, असे महालेखापालांचे यांचे मत आहे. शिफारस क्रमांक ०५ ची अंमलबजावणी झालेली नाही. महालेखापाल यांनी दिलेल्या शिफारशीची अंमलबजावणी झाली नाही.

यामुळे अग्निशमन अधिकारी आणि दुय्यम अधिकारी यांच्या प्रशिक्षणांच्या दर्जाचा आढावा घ्यावा आणि प्रशिक्षिणात कोणतीही तफावत राहणार नाही, याची सुनिश्चिती करावी. अद्ययावत अग्निशमन प्रशिक्षणाची प्रबोधिनी करण्याच्या कार्यास वेळ द्यावा, जे महानगरपालिकेने कबुल केले आहे. मोहिमेच्या अग्रक्रमातील कर्मचारी सदा सर्वकाळ अतिशय सतर्क राहतील याची खात्री करण्यासाठी नियमितपणे त्यांच्यासाठी शारीरिक स्वास्थ्य तपासणी करावी या दोन विषयांवर चर्चा झालेली आहे. पहिला विषय अग्निशमन कर्मचारी व दुय्यम अधिकारी यांच्या प्रशिक्षणांच्या गरजांचा आढावा घ्यावा आणि प्रशिक्षणात कोणतीही तफावती राहणार नाही, याची सुनिश्चिती करावी. याबद्दल समितीने विचारणा केली असता, दर्जाच्या अधिकाऱ्यांना काय प्रशिक्षण द्यावे, हे ऑलरेडी डिफाईन्ड केलेले आहे. त्याच्या प्रशिक्षणाच्या गरजा व त्याचे ॲनलिसिस झालेले आहे, ज्यावेळी आपले प्रशिक्षण असते, त्याकरिता नियमितपणे प्रशिक्षणाला पाठविणे, यावर सनियंत्रण ठेवले जाते असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

**परिच्छेद क्र. ४.१.११. अपर्याप्त तपासणी आणि संनियंत्रण कार्यतंत्रे—**

**परिच्छेद क्र. ४.१.११.१ आग तपासणी अहवाल तयार करण्यातील कमतरता—**

अमरावती आणि नागपूर, नवी मुंबई यामध्ये अमरावती महानगरपालिकेच्या माहितीमध्ये नमूद केले आहे की, ती स्टॅण्डिंग कमिटी व कमिशनर यांना रिपोर्ट द्यायची ते १९ पासून सादर करण्यात येईल असे समितीने निदर्शनास आणले असता, अमरावती महानगरपालिकेने हे आता सुरू केलेले आहे. मी जॉईन झाल्यापासून हे सुरू झाले आहे. साप्ताहिक विवरण आयुक्ताकडे येते. हे उत्तर आधी आलेले आहे, त्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रत्येक आगीची जी घटना होते, त्याचा अहवाल आयुक्तांकडे येतो. त्याचे साप्ताहिक विवरण स्थायी समितीकडे जाते. यापूर्वी हे झाले नव्हते, हे आता सुरू केलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

हे तर बंधनकारक आहे स्थायी समिती, आयुक्त आणि कार्यकारिणीला हे हा अहवाल सादर केला पाहिजे, असे बंधनकारक आहे. ही काही कारवाई होते का? ज्यांनी या बंधनकारक नियमाचे पालन केले नाही, ही जी वस्तुस्थिती समोर आलेली आहे, ज्यांच्यावर जबाबदारी होती, त्या लोकांनी पालन केल्याने जी जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. आयुक्त म्हणून इतके लिबरल राहणार तर सिस्टम चालणार नाही या कार्यपद्धतीत आता सुधारणा केली पाहिजे. परंतु मागचे काय? जे नियमानुसार करायचे होते, ते केले नाही. त्याबाबत कोणती कार्यवाही प्रस्तावित

केली आहे किंवा करणार आहात ? अशी विचारणा समितीने केली असता, त्याबाबत कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

नागपूरबाबत नमूद केले आहे की, वेगवेगळया तऱ्हेने आणि पद्धतीने आपण हे अहवाल सादर करीत होते. जो नमुना वापरला जात होता, त्यात संपूर्ण तपशीलाची नोंद घेतली जात नव्हती असे समितीने निदर्शनास आणले असता, स्थायी समितीला महानगरपालिकेकडून नेहमी माहिती दिली जात आहे, जुन्या वेळीही ती माहिती दिली जात होती, महानगरपालिकेचे फायर ऑफिसरही आता येथे आलेले आहेत. अगोदरही माहिती देत होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाचा जो फॉर्म्यूला चुकीचा आहे. लेखापालांनी घेतलेल्या आक्षेपाची नोंद घेऊन त्याप्रमाणे तपशीलाबाबत नवीन नमुना तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्याच्या संपूर्ण तपशीलाची नोंद घेतली जात नव्हती. असे महालेखापाल यांचा आक्षेप आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, हे बरोबर आहे. जुना जो नमुना होता असे विभागीय प्रतिनिधींनी मान्य केले. हे नमुने महापालिका तयार करते की राज्याचे हे नमुने आहेत. फायर ऑफिसरला आपल्या पद्धतीने रिपोर्ट देण्याचे स्वातंत्र्य आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांनी त्याच्यात असे निरीक्षण दिलेले आहे की, त्यांनी समान नमुना राज्यात नव्हता. आता अग्निशमनला सांगणार आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

परिपत्रक काढताना हेही दिले पाहिजे की, कशा प्रकारचे सबमिट करायचे आहे. हे परिपत्रक अपूर्ण आहे. महालेखापाल यांचाही आक्षेप आहे की, कोणत्याही समितीला ज्यावेळी १९४९ जे नियम आहेत, त्याप्रमाणेच मुंबई वगळता कोठेही योग्यरित्या पालन होत नव्हते. मुंबई वगळता चीफ फायर ऑफिसर्सची जबाबदारी होती, ती सातत्याने कोठेही पाळण्यात आली नाही. असे देखील निरीक्षण महालेखापाल यांचे आहे. याचे जे नियम आहेत, महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २८९ या अंतर्गत हे सर्व सीएफओची मॅण्डेटरी जबाबदारी आहे. ही जबाबदारी पाळली नाही तर अनुशासनाची कारवाई केली पाहिजे. काटेकोरपणाचे ते पालन झाले पाहिजे, त्याकरिता आवश्यक ते निर्देश विभागाने द्यावे. अन्यथा त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई व्हावी असे समितीने सूचित केले.

**परिच्छेद क्र.४.१.११.२ इमारतींची तपासणी न करणे-**

सन २०१०-२०१५ दरम्यान इमारती, शिक्षण संस्था, मॉल, उद्योग, सार्वजनिक संमेलनाच्या जागा, उपहारगृह इत्यादिंची तपासणी केली नव्हती. २०१० ते २०१५ पर्यंत बृहन्मुंबई आणि ठाणे महानगरपालिका वगळता इतर महानगरपालिकांनी तपासणी केली नव्हती. ही बाब गंभीर आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, तपासणी केलेली आहे, असे संबंधित कमिशनर यांचे म्हणणे आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

असे असेल तर महालेखापाल यांचे मत खोटे आहे का ? त्यांनी ज्यावेळी महालेखापाल कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी लेखापरिक्षण करायला आले होते, त्यावेळी कम्प्लायन्स करून दाखवायला पाहिजे होते की, त्या महानगरपालिकांनी तपासणी केली, असे दाखविणे आवश्यक होते असे मत समितीने व्यक्त केले.

ज्यावेळी ऑडिट करण्यात येते. त्यावेळी प्राथमिक निरीक्षणे निर्गमित करण्यात येतात, त्यावर विभागाची उत्तरे मिळतात. चर्चा करण्यात येते, अभिलेख्याची तपासणी करण्यात येते आणि प्राथमिक निरीक्षण निर्गमित केली जाते. त्याच्यावर उत्तरे येतात, काही वेळा उत्तरे येत नाहीत. त्या आधारे अहवाल तयार होतो, त्याचा प्रारुप अहवाल म्हणून प्रती सचिवांपर्यंत जातात. त्यानंतरही उत्तरे गृहित धरली जातात. त्यानंतर हा अहवाल केला जातो. प्रत्येक टप्प्यावर पूर्ण संधी मिळालेली असते. जर काही विभागाकडे असे अहवाल असतील तर ते अभिलेख्यासहीत विभाग महालेखापालांना दाखवू शकते. ज्यावेळी महालेखापाल कार्यालय असे लिहिते, याचा अर्थ त्यावेळी असे कोणतेही अभिलेखे आम्हाला उपलब्ध केलेले नाहीत. अभिलेखे उपलब्ध केलेले असते तर असे लिहिले नसते असे महालेखापालांनी स्पष्ट केले.

समिती विभागाच्या आयुक्तांचे कसे आणि कशाच्या आधारावर ऐकून घेणार ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यावेळी त्यांनी माहिती सादर करणे आवश्यक होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीला उत्तर द्यायचे आहे म्हणून आज करतो केलेले आहे, असे सांगितले जात आहे असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले.

अमरावती महानगरपालिकेत सरकारी कार्यालये, इमारती, सिनेमा हॉल, नाट्यगृह, इस्पितळे, पेट्रोल पंप्स, व्यापारी संकुले, तारांकित हॉटेल्स, रेस्टॉरेंट्स सुरक्षिततेच्या दृष्टीने तपासणी करण्याचे काम प्रगतीपथावर आहे, असे नमूद केले आहे. जे प्रगती पथावर आहे हे काम केव्हापासून सुरू झाले आणि किती दिवसांमध्ये पूर्ण करणार आहात ? या यादीतील ठिकाणांची तपासणी करून अंतिम अहवाल कधी येईल ? अशी विचारणा समितीने केली असता, १३ जुलै २०१८ ला कृती दलाची स्थापना केलेली आहे. त्याच्याबरोबर चार लोकांची टीम करून शहरातील महत्त्वाची कमर्शियल जागांना भेटी देऊन तपासणी केली आहे. ही तपासणी संपत आलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदीत केले.

त्यात काय आढळून आले ? पर्याप्त अग्निशमन यंत्रणा उपलब्ध आहेत का ?

पर्याप्त अग्निशमन यंत्रणा काही नवीन ठिकाणी उपलब्ध आहेत, जुन्या ठिकाणी उपलब्ध नाहीत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जीनिंग प्रेसिंग मिलमध्ये यंत्रणा आहे का ? त्या शहराच्या मध्यभागी आहेत. नसल्यास, त्या बंद करण्याच्या नोटिसेस इश्यू केलेल्या आहेत का ? अमरावतीच्या जुन्या बाजार समितीच्या मागच्या भागात वीज चोरी होते. ते फीडर वीज चोरी होणारे आहेत. अवैध जीनिंग प्रेसिंग मिल करतात. तेथे पर्याप्त अग्निशमन यंत्रणा नाही. वीज चोरी होते, अग्निशमन यंत्रणाही तेथे नाही. अग्निशमन यंत्रणा नसेल आणि मोठ्या प्रमाणावर जीनिंग प्रेसिंगचा अवैध धंदा चालतो, ते तत्काळ बंद करण्याचे आदेश दिलेले आहेत का ? अशी विचारणा करून जेथे काम प्रगतीपथावर आहे, तेथे जास्त आग लागण्याची शक्यता आहेत, तेथे जास्त लक्ष दिले पाहिजे असे समितीने सूचित केले असता, कृती दलाची स्थापना केलेली आहे, त्यात बरेच व्हेरिफिकेशन्स झालेले आहेत, नवीन इमारती, मॉल्स सुरू आहेत, या ठिकाणी फायर इक्विपमेंट आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जुन्या इमारतींमध्ये, आस्थापनांमध्ये फायर व्यवस्था पर्याप्त आहेत का? सार्वजनिक ठिकाणी लोकांचे जीव धोक्यात आहेत. वित्तहानी होऊ शकते. त्याबाबत महानगरपालिकेने कार्यवाही केली पाहिजे. नागपूरमध्ये बारा लोकांवर कारवाई केली, ते कोर्टात कसे गेले? अशी विचारणा समितीने केली असता, कृती दलाची यावर कार्यवाही सुरू आहे. फायर संदर्भातील नियमाच्या विरुद्ध नागपूर येथील व्यक्ती कोर्टात गेलेल्या आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

नियम व कायदा सोडून त्यांना कोणते आदेश केले की, कोर्टाने त्यांना कन्सिडर केलेले आहे अशी विचारणा समितीने केली असता, त्यांना विभागाने नियमाप्रमाणेच आदेश केलेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

साक्षीला येताना पूर्ण माहितीसह व तयारीसह येणे अपेक्षित आहे. साक्षीशी संबंधित मुद्दयांच्या उत्तराची तयारी करून यावी. समितीचा वेळ वाया घालविणे योग्य नाही असे समितीने सूचित केले असता, बारा प्रकरणांमध्ये महानगरपालिकेच्या बाजूने निर्णय लागलेला आहे, त्यावरील कार्यवाही करण्यात येत आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

अद्ययावत माहिती समितीच्या साक्षीमध्ये देणे आवश्यक आहे. विभागाने याबाबतचे एक ॲप्लीकेशन डेव्हलप करावे. अग्निशमन अधिकाऱ्याचे ५००-१००० रुपये महिना व वर्षाचे ठरलेले आहेत. जेथे तपासणी केली, तेथील फोटो काढून सिस्टमवर टाकण्याची पद्धत अवलंबिण्यात यावी. सिस्टम आता स्वस्त राहिली नाही असे समितीने सूचित केले.

**परिच्छेद क्र. ४.१.११.३ अग्निशमन कृती कक्षाची निर्मिती न करणे**

मुंबईच्या अग्निशमन कृतीकक्षाची निर्मिती करण्यात आली नाही, असे आरएफपी डॉक्युमेंट विभाग तयार करतो विभागाने उत्तरामध्ये सांगितले की, कृतीकक्ष ड्रॉप केले आहेत.अशी विचारणा समितीने केली असता, तर अग्निशमन कृतीकक्षाची निर्मिती न होण्याची काय कारणे आहेत ? अग्निशमन कृतीकक्षाची निर्मिती झालेली आहे. ६७ कार्यालये कृतीकक्षांची निर्मितीसाठी ठेवलेली आहेत. त्यावेळी कृतीकक्षाची निर्मिती झालेली नव्हती. पण आता पूर्ण कक्षाची निर्मिती झालेली आहे. महानगरपालिका नियमितपणे तपासणी करते. आज ३.५ वर्षामध्ये ४५०० च्या वर इमारतींचे तपासणी केलेली आहे. एकूण ३१ प्रॉसिक्युशन झालेले आहेत आणि या ३ वर्षामध्ये १८ प्रॉसिक्युशन झालेले आहेत. त्याशिवाय वीज कट करणे, पाणी कट करणे हे सुद्धा चालू प्रक्रियेमध्ये करण्यात येत आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

आरएफपी डॉक्युमेंट अंतिम टप्प्यात आहेत असे विभागाने म्हटले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, समितीने ज्याप्रमाणे ॲप्लिकेशन विकसीत करण्यासाठी सांगितले. त्या ॲप्लिकेशनमध्ये टॅब आहे. टॅबमध्ये तो अधिकारी तिथे गेल्यानंतर जर सिस्टिम चालू नसेल तर चेकलिस्ट असणार. चेकलिस्टमध्ये ही सिस्टिम सुरू नाही असे जर सांगितले तर त्याला फोटोग्राफ अटॅच करावी लागणार. याप्रमाणे पूर्ण सिस्टिम ॲनॅलिसिस झालेले आहे. माहिती तंत्रज्ञान विभागाकडे आरएफपी डॉक्युमेंट पण स्पष्ट झालेले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

ज्याप्रमाणे विभागाने मुंबईला जी प्रणाली तयार केली आहे त्याप्रमाणेच नागपूर, पुणे यासारख्या मोठ्या महानगरपालिकेला कमीत कमी अ वर्ग नगरपालिकेसाठी तरी करण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या माहितीप्रमाणे आरएफपीचे काम पूर्ण झालेले आहे. साधारणपणे डिसेंबर महिन्याअखेर ते ॲप्लिकेशन लाईव्ह करू शकतात, अशी त्यांची प्रोडक्टविटी आहे. ती विभागाकडून ट्रॅक करण्यात येईल आणि आपल्या समितीच्या सूचनेप्रमाणे ही प्रणाली पूर्ण राज्यात लागू करता येईल काय याचा अभ्यास करून तसे शक्य झाल्यास करू.

**परिच्छेद क्र. ४.१.११.४ निम्न स्तरावरील कर्मचाऱ्यांकडून अग्निशमन केंद्राचे नियंत्रण केले जाणे-**

या परिच्छेदासंदर्भात नागपूर आणि अमरावती अग्निशमन विभागामध्ये खूप घोळ आहे त्या ठिकाणी वरिष्ठ अधिकारीच नाहीत. कनिष्ठ स्तरावरील अधिकारी हे सर्व काम हाताळत आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, या महानगरपालिकांकडे सीएफओ नाहीत. कारण त्याचे सेवा प्रवेश नियमच नाहीत त्यामुळे महानगरपालिकांनी त्या नियुक्त्या केलेल्या नाहीत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आयुक्त मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांची नियुक्ती करतात पण अग्निशमन संचालक यांच्याकडून त्याचे सेवाप्रवेश नियम अंतिम होऊन येतात. राज्य पातळीवर सेवा प्रवेश नियम अंतिम करायचे आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

मुख्य अग्निशमन अधिकारी यांची नियुक्ती कोण करतो? नियुक्ती करून संचालक अग्निशमन यांच्याकडे पाठवले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, ते सेवा प्रवेश नियम संयुक्त केलेले आहे. विभागाचे असे निरिक्षण आहे की, मुंबई सोडून अनुभवी आणि पात्रता असणाऱ्या अधिकाऱ्यांची खूप कमतरता आहे. त्याच्या अनुषंगाने 'ड' वर्गाच्या अधिकाऱ्याने अनुभव प्राप्त केल्यानंतर तो 'ब' आणि 'अ' वर्गामध्ये बदली होऊन एक अनुभव व पात्रता जमा करून सर्व जागी अधिकारी मिळतील यासाठी डीएमओ बरोबर बैठक झालेली आहे. आता हे अंतिम पातळीवर आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

Why should it be only for one Corporation? अशी विचारणा समितीने केली असता, विभाग जे काही प्रयत्न करीत आहे ते पूर्ण महाराष्ट्रासाठी करीत आहे. पूर्ण कार्पोरेशनमधील 'ड' वर्गातील सीएफओ 'अ' मधील सीएफओ बनू शकत नाही म्हणून विभागाने कॅडरायजेशन पण करून घेतले आहे. त्याच्या अनुषंगाने किती पात्रता असायला पाहिजे, त्यांचा अनुभव कसा असायला पाहिजे आणि पुढच्या काळामध्ये हा अधिकारी जरी 'ड' वर्गातील असला तरी तो कसा प्रमोट होऊ शकतो त्याला कसा अनुभव येऊ शकतो आणि सर्व जागी व्यवस्थित अधिकारी मिळतील त्याप्रमाणे कॅडरायजेशन करून संपूर्ण पात्रता करून दोन बैठका पण झालेल्या आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

सर्व महानगरपालिकांसाठी स्टॅण्डर्ड आकृतीबंध तयार होत आहे. नगरपालिकांसाठी हा आकृतीबंध आधीच झालेला आहे याची तुलना करून यामध्ये एकसूत्रता आणण्यात येणार आहे. तसेच शासन पातळीवर यावर लवकरच निर्णय घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या विषयावर लवकरात लवकर निर्णय घेणे अत्यंत आवश्यक आहे. कारण व्यक्तीला ज्याप्रमाणे अन्न व पाणी पाहिजे त्याचप्रमाणे फायर सेफ्टी पण पाहिजे. कारण ही जिवनावश्यक गरज आहे. त्या दृष्टीने विभागाने या विषयावर एका महिन्याच्या आत सर्व निर्णय करावा. जेणेकरून ही रिक्त पदे भरली जातील आणि कनिष्ठ पातळीवरील केडर हे सर्व जागा सांभाळत आहे त्यामुळे त्यांच्या अनेक ऑब्लीगेशन पार पाडल्या जात नाहीत. या दृष्टीने सर्व वरिष्ठांची पदे भरली पाहिजे या दृष्टीने विभागाने जो ड्राफ्ट तयार केला आहे त्याला लवकरात लवकर पूर्ण करावा असे समितीने सूचित केले असता, या विषयामध्ये कायद्याला काही कन्सर्न करावे लागेल. त्यामुळे यासाठी थोडा जास्त कालावधी लागेल त्यामुळे समितीने विभागाला किमान ३ महिन्याचा कालावधी द्यावा. म्हणजे ते एक्सपिडेट करण्याचा प्रयत्न करण्यात येईल अशी विनंती विभागीय सचिवांनी केली समितीने त्यास मान्यता दर्शविली.

**परिच्छेद क्र. ४.१.११.५ अनुज्ञापक संस्थांनी जारी केलेल्या प्रमाणपत्रांवर संनियंत्रण न ठेवणे—**

या परिच्छेदाबाबत सर्व अनुज्ञापक संस्थांमध्ये घोळ दिसून येतो कारण काही संस्था ४ महिने, ६ महिने किंवा १२ महिन्यांची नोटीस देतात. ज्या संस्था नियमांचे पालन करीत नाहीत त्या संस्थांना काळ्या यादीत टाकले पाहिजे. सदर परिच्छेदामध्ये नमूद केले आहे की, निवडक ८ महानगरपालिकेपैकी ४ महानगरपालिकांमध्ये १५,३३८ इमारतींना अंतिम अग्निविषयक ना हरकत प्रमाणपत्र दिली गेली होती. त्यापैकी फक्त ४५९ इमारतींविषयी प्रपत्र-ब मध्ये प्रमाणपत्र जारी झाली. १५,३३८ पैकी ११,९२५ इमारती मुंबई महानगरपालिकेच्या आहेत. प्रपत्र-ब ची प्रमाणपत्र जारी केली आहेत. याच कालावधीमध्ये फक्त २०५ प्रपत्र-ब संस्थांनी जारी केले आहेत. एकूण ८ महानगरपालिकांमध्ये ५३ शासकीय इमारतीमध्ये कोणतीही तपासणी केली नाही म्हणून प्रपत्र-ब पण दिलेले नाही. या बाबी समितीने निदर्शनास आणल्या असता, सेक्शन ३, अंडर महाराष्ट्र फायर प्रिव्हेंशन ॲक्टनुसार ज्यावेळेस ऑक्युपेशन सर्टिफिकेट देण्यात येते त्यावेळी प्रपत्र-अ घेण्यात येते. That is mandatory. ते सर्टिफिकेशन मिळाल्याशिवाय ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळू शकत नाही. विभागाकडे ती ऑनलाईन सिस्टिम आहे. त्या सिस्टिममध्ये मॅंडेटरी डॉक्युमेंटमध्ये ज्यांनी प्रपत्र-अ दिले नाही त्याचे ॲप्लिकेशन समोर जात नाही. प्रपत्र- अ देण्यासंदर्भात सद्य:स्थितीत डायरेक्टर महाराष्ट्र भारत सर्व्हिसच्या वेबसाईटवर ६०० पेक्षा जास्त लायसन्स एजन्सी रजिस्ट्रार आहेत. कोणतीही लायसन्स एजन्सी घेतली तरी त्यासाठी विभागाचा काही संबंध नाही. बार्टी ही संस्था त्यासाठी असते किंवा ज्यांना ओसीसाठी ॲप्लिकेशन असते त्यांना त्यांच्या टेंडर डॉक्युमेंटप्रमाणे मुभा असते. प्रपत्र-ब मध्येच इश्यु येतो. प्रपत्र- ब मध्ये अंडर महाराष्ट्र फायर प्रिव्हेंशन ॲक्ट मधील सेक्शन ३ मध्ये "It is owner and occupier's responsibility to maintain the system." त्या मेंटेन सिस्टिमसाठी प्रपत्र-ब पाहिजे. त्यासाठी सोसायटी, ओनर किंवा ऑक्युपाय याला त्या लायसन्स एजन्सीमध्ये निवड करून

आधी जी सिस्टिम लावलेली आहे आणि प्रपत्र-अ केलेले आहे. ती सिस्टिम व्यवस्थित सुरू आहे की नाही त्याच्या अनुषंगाने प्रपत्र-ब दर ६ महिन्यामध्ये महानगरपालिका किंवा नगरपालिकेच्या प्रत्येक सीएफओला सादर करण्याचे काम सोसायटीचे आहे. मागच्यावेळी सांगितले की, ६७ अधिकारी आणि विभागाने विकसीत केलेले ॲप हे सर्व ते काम करत नाही म्हणून विभाग रॅन्डम चेकअप करतो. मुंबई फायर ब्रिगेडमध्ये ४५०० च्यावर इमारती तपासलेल्या आहेत. प्रॉसिक्युशन केले आहे. तसेच मध्ये मध्ये सरप्राईज बील झाले त्यावर ३५०० इस्टॅबिलेशनमेंटचे देखील इन्सपेक्शन करीत आहोत. विभागाने कितीतरी सिलेंडर सीझ केलेले आहेत. या सर्व गोष्टी पूर्ण होत आहेत पण प्रपत्र-ब चे काम हे ओनर आणि ऑक्युपायरचे आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

हे काम होत नाही तर याला इम्प्लिमेंट करण्याचे कोणाचे काम आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, ॲक्शन इम्प्लिमेंट करण्यासाठी विभागाने स्वतःचा आपला सेल तयार केलेला आहे. पण सद्यःस्थितीत जगात अशी कोणतीच संस्था नाही की तिथे फायर ब्रिगेडचा अधिकारी पूर्ण इमारतीची नियमितपणे ६-६ महिन्यामध्ये तपासणी करेल.

नियमितपणे ६-६ महिन्यामध्ये इमारती तपासणी करण्यासाठी अनुज्ञापक संस्था आहे. संस्थेने ते काम केले पाहिजे आणि त्याची बंधनकारक जबाबदारी त्या मालकाची आहे. त्यासाठी मालकाने महानगरपालिकेला प्रपत्र-ब दिले पाहिजे. महानगरपालिकेकडे प्रपत्र-ब आले नाही तरी महानगरपालिका त्यांच्यावर कारवाई करीत नाही हाच महालेखाकारांचे आक्षेप आहे. रॅन्डमची काय गरज आहे महानगरपालिकेकडे याचे रेकॉर्ड आहे. महानगरपालिकेला एवढ्या मालकांना प्रमाणपत्र द्यायची आहेत तर मालकाने जर ते दिले नाही तर महानगरपालिकेने त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. तपासणी करून घेणे ही इमारतवाल्यांची जबाबदारी आहे. इमारतवाल्यांनी तपासणी करून प्रमाणपत्र दिले नाही तर महानगरपालिका त्यांना कर लावतो त्यामध्ये अतिरिक्त २५ टक्के लागेल अशा प्रकारची काही तरतूद करण्यात यावी. त्यामुळे आपोआप ते सर्व प्रमाणपत्र देतील म्हणजे प्रत्यक्षपणे नियंत्रण करता येत नसेल तर अप्रत्यक्षपणे करावे असे काही करता येत असेल तर तपासून ते करावे. दुसरे असे की, अग्निशमन हा राज्यातील खूप मोठा विषय झालेला आहे. सर्व मल्टीस्टेट इमारती, मोठे मॉल्स, मोठे कॉम्प्लेक्स आणि त्यामध्ये आगी हा विषय आहे. महानगरपालिका वृक्षकर, पाणीपट्टी, शिक्षण कर घेते तर कार्पोरेशनमध्ये फायर करची तरतूद असते. ज्यावेळी अग्निशमन कर घेण्यात येतो याचा शीर्ष वेगळा ठेवून सर्व शीर्ष ते पैसे वेगळे ठेवतात का ? अजून जर याला बळकट करायची गरज असेल तर फायर करामध्ये जर काही तरतूद वाढवता येत असेल तर वाढविण्यात यावा. कारण आगीमुळे माणूस मरतो तर हा खूप मोठा विषय आहे. मुंबईमध्ये ५०, ७० ते ८९ मजले केलेले आहेत ज्या दिवशी तिथे आग लागली तेव्हा हे सिस्टिम नियंत्रित होणार नाही. त्यासाठी या विषयावर विशेष लक्ष देऊन काही सिस्टिम उभी करता येईल काय ? प्रपत्र-ब सादर करणे हे नियमामध्ये आहे तर त्यात दंड लावण्याविषयक तरतुदीचा खंड नाही काय ? प्रपत्र-ब देणे हे ओनरचे काम आहे. पण जर तुमच्याकडे ते प्रपत्र आले नाही तर आपण त्यांच्यावर करवाई करणार नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, पेनॉल्टीची क्लॉज आहे पण प्रपत्र-ब देणे हे अंडर महाराष्ट्र अग्नि प्रतिबंधक अधिनियम मधील कलम ३ नुसार नोटीस द्यावी लागते, कलम ४ नुसार तपासणी करावी लागते. त्यानंतर त्याला १२० दिवसांची नोटीस देऊन काम करवून घ्यावे लागते. १२० दिवसानंतर त्याने काम केले नाहीतर प्रॉसिक्युशन केले जाते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

या सर्व लोकांवर काय कारवाई केलेली आहे ? समिती फक्त मुंबई महानगरपालिकेबद्दल विचारीत नाहीतर पूर्ण ८ महानगरपालिकेबद्दल विचारीत आहे. शासकीय इमारत, रुग्णालय यांचे प्रपत्र-ब विभागाकडे येत नाही तर या विषयावर सचिव या नात्याने या लोकांकडून सर्व नियमांचे पालन करून घ्यायचे अशी शासनाची काही जबाबदारी आहे की नाही ? किंवा ज्या ज्या ठिकाणी नियमांचे उल्लंघन आहे तिथे उल्लंघनाच्या अंतर्गत असलेली दंडात्मक कारवाई केली पाहिजे. या नियमानुसार काम केले पाहिजे नाहीतर हे सर्व नियम व कायदे बदलण्यात यावेत. हे सर्व जर थांबवायचे असेल तर सर्व नियमाचे पालन झाले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली व नियमांचे पालन झाले पाहिजे कारण सुरक्षेच्या दृष्टीने फार गरजेचे आहे. समितीने सांगितल्याप्रमाणे मालकाचे जर प्रपत्र-ब दिले नाहीतर कोणत्याही पद्धतीने त्यांच्यावर दंड बसवता येईल किंवा इतर काही करता येईल म्हणजे जेणेकरून ते प्रपत्र-ब देण्यासाठी प्रवृत्त होतील याची विभागाकडून पडताळणी करण्यात येईल. अशाच प्रकारे नाशिक जिल्ह्यातील सह्याद्री रुग्णालयाची एक केस आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, सह्याद्री रुग्णालयाच्या बाबतीत इंडो फायर सेफ्टी सोल्युशन यांना काम दिले होते. हे काम पूर्ण झाल्यानंतर दिनांक २७ डिसेंबर २०१३ रोजी सदर संस्थेने ना हरकत दाखला दिला होता. तसेच दिनांक ५ जानेवारी २००५ रोजी प्रमाणपत्र दिले होते. तेव्हा ते कार्यरत होते. तपासणीअंती संस्थेला दिनांक १७ जानेवारी २०१४ रोजी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. त्यावेळी आधीच अर्ज आलेला होता आणि तो वैध होता. त्यामुळे त्यामध्ये काही त्रुटी आढळलेली नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर परिच्छेदामध्ये विभागाने असे दिले आहे की, अनुज्ञापक संस्थेचे प्रमाणपत्र दिनांक ५ जानेवारी २०१४ पावेतो होते. सदर संस्थेने दाखल्यासाठी दिनांक ७ जानेवारी २०१४ रोजी अर्ज सादर केला होता.' याकडे समितीने लक्ष वेधले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली व त्यांचा अर्ज दिनांक २७ डिसेंबर २०१३ ला आला होता म्हणजे विहित मुदत संपण्याच्या पूर्वी अर्ज आला होता असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

पण विभागाने उत्तरामध्ये दिनांक ५ जानेवारी, २०१४ ला प्रमाणपत्र दिले असे नमूद केले आहे. असे मत समितीने नोंदविले असता, संस्थांची वैधता त्या तारखेपर्यंत होती असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले. विभागाने जे उत्तर दिलेले आहे त्याची तपासणी करायची असेल तर करण्यात यावे परंतु ते पूर्वीच केले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, याबाबतच्या माहितीनुसार दिनांक २७ डिसेंबर, २०१३ रोजी संस्थेने ना हरकत दाखला नूतनीकरणाचा अर्ज सादर केला होता. तो अर्ज एजन्सीची मुदत संपण्यापूर्वीचा होता म्हणून दिनांक ५ जानेवारी, २०१४ पर्यंत त्यांचे प्रमाणपत्र कार्यरत होते. तपासणीअंती सदर संस्थेस दिनांक १७ जानेवारी, २०१४ रोजी ना हरकत दाखला दिलेला आहे. त्यांनी वैधता संपण्यापूर्वी तपासणी केलेली आहे. त्यामुळे ते योग्य आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

ज्या अनुज्ञापक संस्थांनी परवान्याच्या अटींचे पालन न केल्याबद्दल अकार्यक्षमता, गैरव्यवहार किंवा इतर कोणत्याही गंभीर कारणासाठी कोणतीही कारणे दाखवा नोटीस जारी केलेली नव्हती. अनेक ठिकाणी ४ महिने किंवा १२ महिन्यांची एनओसी दिलेली आहे. पण त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. अमरावती महानगरपालिकेबद्दल तिथे चार-पाच एमएफएस लायसींसीज एजन्सी कार्यरत आहे. असे काही अंदाजित उत्तर दिले जाते काय ? नागपूर महानगरपालिकेने तर "अधिकारी मिळणे विभागाला त्यांना कठीण होत आहे" असे उत्तर दिले आहे. 'अग्निशमन विभाग नागपूरकडे सक्षम अधिकाऱ्यांची कमतरता असल्याने अनुज्ञापन संस्थांनी जारी केलेल्या प्रमाणपत्रावर संनियंत्रण ठेवणे कठीण होत आहे,' असे काही कारण असते काय ? रिक्त पदे भरण्याचे अधिकार महानगरपालिकेला असताना त्यामध्ये कमतरता असण्याचे काय कारण आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, नागपूर महानगरपालिकेमध्ये निश्चितपणे अधिकाऱ्यांची कमतरता आहे. त्याची प्रक्रिया सुरू केलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सन २०१५ मध्ये महालेखाकारांनी विभागाच्या लक्षात आणून दिले आहे तर ३ वर्षे विभागाने काय केले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, त्याचा आकृतीबंध मंजूर झालेला आहे. आता आकृतीबंधाप्रमाणे १०० पदांची जाहिरात काढलेली आहे. उमेदवारांच्या शारिरीक तपासणीसाठी या महिन्यात तारखा निश्चित केल्या आहेत. शेवटच्या आठवड्यात अग्निशमन केंद्र अधिकाऱ्यांची ४ पदे काढलेली आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

नागपूर महानगरपालिकेकडे अधिकाऱ्यांची व खालच्या स्तरावरील किती कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत व महानगरपालिकेने किती पदांची जाहीरात काढली, ज्या पदांची जाहीरात काढली नाही त्याकरिता काय कारणे आहेत, पूर्ण पदांकरिता जाहीरात का काढली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, सध्या जी जाहीरात काढलेली आहे ती मुख्य अग्निशमन अधिकारी यांची आहे महानगरपालिकेकडे सध्या १५२ अधिकारी कार्यरत आहेत. सद्य:स्थितीमध्ये महानगरपालिकेची ४०५ पदे रिक्त आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समितीने दोन प्रश्न विचारले आहेत. महानगरपालिकेकडे निधी नाही काय? फायरच्या हेडला या कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याकरिता पैसे नाहीत काय, म्हणून महानगरपालिका पदे भरत नाही काय? पदे भरण्यात काय अडचण आहे, ४०५ पदे रिक्त असतील तर ती का भरत नाही ? फायर स्टेशननुसार जेवढे कर्मचारी पाहिजेत त्यापैकी किती कर्मचारी कमी आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, महानगरपालिकेकडे निकषांप्रमाणे नवीन एकूण २१ फायर स्टेशन्स झाले पाहिजे होते. त्यांपैकी ८ सध्या कार्यरत आहेत. त्या ८ मध्ये सध्या १५२ अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. महानगरपालिकेकडे सध्या अधिकारी वर्गातील ४५ पदे रिक्त आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ती किती दिवसांत भरणार व ती पदे भरल्याबाबतचा अहवाल समितीला पाठविण्यात यावे असे समितीने सूचित केले असता, एवढी सर्व पदे भरण्याचे नियोजन नाही असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले. महानगरपालिकेला काय अडचण आहे, महानगरपालिकेकडे पैसे आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीने सांगितले आहे, तेवढ्या पदांची जाहीरात काढलेली नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

असे का करण्यात आले आहे. त्या हेडला निधीची उपलब्धता आहे, महानगरपालिकेला त्या पदांची आवश्यकता आहे मग त्या पदांकरिता जाहीरात काढण्यास अडचण काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, सध्या महानगरपालिकेकडे अग्निशमनासाठी जो निधी आहे त्यातून सर्व अधिकाऱ्यांच्या वेतनाची व्यवस्था होऊ शकणार नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आज रोज नवीन इमारती तयार होत आहेत. नागपूर हे उप राजधानीचे शहर आहे. त्याला एक स्वरूप दिले जात आहे. महानगरपालिकेने नवीन इमारतीबाबतचे नियम बदलावेत. अग्निशमनाची तरतूद वाढवावी. ही कारणे यापुढे आग लागल्यावर चालणार आहेत काय ? महालेखापालांनी जे आक्षेप काढले आहे त्याचे पालन अनेक ठिकाणी झालेले नाही. आता पूर्तता करणार असे विभागाकडून सांगण्यात येत आहे. मागच्या ७-८ वर्षांमध्ये या त्रुटीमुळे आग लागण्याच्या किती घटना घडलेल्या आहेत ? मेन पॉवरचे लॅप्सेस किंवा पैसे असताना उपकरण खरेदी न करणे या सर्व बाबींचा विचार विभागीय सचिवांनी राज्याचे प्रमुख म्हणून केला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, महालेखापालांनी ह्युमन रिसोर्सेस, व्हेईकल्स किंवा ट्रेनिंगबाबतचे मुद्दे निदर्शनास आणले आहेत ते महत्त्वाचे आहेत. याबाबत सुधारणा करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वस्त केले.

महालेखापालांनी जे मुद्दे निदर्शनास आणले आहेत, त्यानुसार जर अंमलबजावणी केली असती तर जे नुकसान झालेले आहे ते कमी करता आले असते. याच्या अभावी अग्निसुरक्षेची कारवाई आपल्याला योग्यरित्या हाताळता आली नाही, त्यामुळे नुकसान झालेले आहे. याबाबतची गोळाबेरीज विभागाने आपण केली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत ॲनालिसीस केले आहे. आर.एम.एस. त्यानंतर महानगरपालिकेचा जो अहवाल आहे त्या अनुषंगाने पूर्ण रिक्वायरमेंट किती असली पाहिजे, फेजवाईज कसा प्रोग्राम झाला पाहिजे हे रेडी केलेले आहे. जेथे जेथे मागणी येते तेथे फायर स्टेशन कसे असले पाहिजे व व्हेईकल्स किती असली पाहिजेत आणि त्यांना टेक्नीकल स्पेसिफिकेशन काय आहे, याचे सँक्शन डायरेक्टर महाराष्ट्र फायर सर्व्हीस, ॲज अ डिस्पेसिंग ऑफिसर म्हणून देते. अ, ब, क वगळता ड व त्यानंतर बाकीच्या ठिकाणी या अभियाना अंतर्गत काम सुरू आहे. पुढच्या आर्थिक वर्षामध्ये या अभियानामध्ये जी वाहने आहेत, फायर स्टेशन्स आहेत त्याचे खर्चाचा आढावा करायचा आहे. कारण वाहनांवर किती खर्च झाला पाहिजे, फायर स्टेशन बांधायला किती खर्च झाला पाहिजे, हे ३-४ वर्षांपूर्वी निश्चित झाले होते. आता परिस्थितीच्या अनुषंगाने वाढीव दर काय असले पाहिजेत त्या प्रमाणे महानगरपालिकेचा प्रस्ताव गेलेला आहे. याबाबत पुढील अंदाजपत्रकात तरतूद करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी आश्वस्त केले.

नगरपालिकांमध्ये फायर टॅक्सची प्रोव्हीजन नाही. ॲटलिस्ट 'अ' वर्ग नगरपालिकेमध्ये तरी ती करण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, विभागाकडे महाराष्ट्र अग्नी सुरक्षा अभियान आहे. त्यामध्ये अ, ब, क वर्ग नगरपालिकांसाठी कोणती सुविधा आवश्यक आहे, कोणते फायर स्टेशन, कोणती वाहने आवश्यक आहेत याबाबत सूचना दिलेल्या आहेत विभाग त्यांना निधी देतो. विभागाकडे महाराष्ट्र अग्नी सुरक्षा अभियानाचे अर्थसंकल्पीय शीर्ष आहे.त्यामध्ये विभागाकडून तरतूद करण्यात येते.

**परिच्छेद क्रमांक ४.१.११.६ : टोलेजंग व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या नियतकालिक तपासण्या न केल्यामुळे आगीचे झालेले भीषण अपघातः**

या परिच्छेदाबाबत विशेषतः मंत्रालय इमारतीस लागलेल्या आगीबाबतचाही उल्लेख आहे. लोटस, नील कमल व्यापार संकुल या २० मजली इमारतीला विभागाने सन २००६ मध्ये फायरची एन.ओ.सी. दिली आहे. दिनांक १८ जुलै, २०१४ रोजी या इमारतीला भीषण आग लागली. तसेच, काळबादेवी येथे गोकुळ निवास या निवासी तथा व्यापारी इमारतीलाही मोठ्या प्रमाणात आग लागलेली आहे. या इमारतींची नियतकालिक तपासणी न केल्याने असे झालेले आहे. मूळ मुद्दा हाच आहे की, या सर्व बाबींची तपासणी न केल्याने या सर्व आगी लागलेल्या आहेत. या इमारतींची नियतकालिक तपासणी न करण्यासाठी जबाबदार कोण आहे, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली आहे काय ? एवढ्या मोठया आगी लागल्यानंतर प्रत्येक इमारतीची रेग्युलर नियतकालिक तपासणी झाली पाहिजे याकरिता विभागाने काही दिशा निर्देश दिले आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, याचे उत्तर या आधीच दिले आहे. इन्सपेक्शन सेलची रचना केली. ६६७९ इमारती त्यावेळेच्या होत्या. आता या ३ वर्षांमध्ये साडेचार हजारच्यावर इमारती, साडेतीन हजारच्यावर एस्टॅब्लिशमेंट, अराऊंड ७-८ हजार इमारती व एस्टॅब्लिशमेंटचे इन्स्पेक्शन सुरू आहे. प्रत्येक इमारत व मालकाला याबाबत सांगितले जाते. मालक व रहिवासी जेथे आहेत तेथे 'ए' सर्टिफिकेशन झालेले आहे, तेथे ओ.सी. झालेली आहे. काही मुद्दे आहेत जेथे ना हरकत प्रमाणपत्र नसते त्या ठिकाणी ऑक्युपेशन होऊन जाते. विभागाचे जे प्रमाणीकरण आहे. कारण जोपर्यंत समोरचा अर्ज सादर करीत नाही तोपर्यंत महानगरपालिका आग्रह करु शकत नाही. एखाद्या इमारतीमध्ये अनधिकृत ऑक्युपेशन झालेले असेल किंवा त्याने ना हरकत प्रमाणपत्र घेतली नाही व ना हरकत प्रमाणपत्रासाठी बाबी यामध्ये आहेत. महाराष्ट्र फायर प्रिव्हेन्शन ॲक्ट व एम.बी.सी. मध्ये जे निकष दिलेले आहेत त्यामध्ये मुंबईमध्ये २४ मीटर्स ॲंड त्यापेक्षा कमी उंचीच्या इमारती त्यामध्ये येत नाहीत. तरीही महानगरपालिका एम.एम.सी. ॲक्ट व सेक्शन ४ महाराष्ट्र फायर प्रिव्हेन्शन ॲक्ट ऑब्जेक्ट बाहेर काढणे वगैरे त्या अनुषंगाने एस्टॅब्लिशमेंटची पाहणी करण्यात येते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

मंत्रालयाच्या मुख्य इमारतीला विभागाने एन.ओ.सी. दिली आहे. त्याबाबत उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, मॅझेनिन फ्लोअरव्यतिरिक्त अंतिम ना-हरकत प्रमाणपत्र जारी केले. याचा अर्थ समितीला समजावून सांगावा. तेथे मॅझेनिन फ्लोअर असताना, मॅझेनिन फ्लोअरला सोडून एन.ओ.सी. कशी काय दिली ? मॅझेनिन फ्लोअरला सुरू असलेली कार्यालये अनियमित आहेत काय ? हे उत्तर कसे काय दिले याचे आश्चर्य वाटले. दुसऱ्या परिच्छेदातील शेवटच्या ओळीमध्ये असे नमूद केले आहे की, मंत्रालयातील मुख्य इमारतीस एम.सी.जी.एम.च्या अग्निशमन दलाने मॅझेनिन फ्लोअरव्यतिरिक्त अंतिम ना-हरकत प्रमाणपत्र जारी केलेले आहे. याबाबतच्या सद्यःस्थितीची विचारणा समितीने केली असता, आता पूर्ण इमारतीला ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. सत्यशोधन समितीने विभागाला ४ शिफारशी केलेल्या आहेत. त्या शिफारशींची अंमलबजावणी झालेली आहे काय ? बृहन्मुंबई महानगरपालिकेनेच ती समिती गठित केलेली आहे. त्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रतिनिधींनी माहिती द्यावी. कारण गोकुळ निवास इमारतीतील घटनेमध्ये १ सी.एफ.ओ. व ४ फायर कर्मचारी हुतात्मा झाले आहेत. त्या घटनेच्या नंतर बृहन्मुंबई महानगरपालिका सत्यशोधन समिती स्थापन केली. त्यांनी अशा शिफारस केली की, बृहन्मुंबई महानगर पालीकेच्या आग आपत्ती व्यवस्थापन विभागाने मुंबईतील मोडकळीस आलेल्या सर्व इमारतींची यादी ठेवावी. तशी यादी ठेवली काय ? मुंबई विद्युत पुरवठा, बेस्ट यांनी ३०

वर्षांपेक्षा अधिक जुन्या इमारतीतील विजेची वायरिंग व मीटर बॉक्सची तपासणी करावी. बेस्टने वार्षिक विद्युत लेखापरीक्षा करावी. जुन्या इमारतीमध्ये रासायनिक द्रव्यांचा साठा व सोनारकाम यावर बंदी घालावी. सर्व अग्नी वाहनांमध्ये जागतिक स्थितीदर्शक यंत्रणा जी.पी.एस. बसवावी. अशा शिफारशीबाबत समितीने विचारणा केली असता, महानगरपालिकेकडे पूर्ण लिस्ट आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेकडून तपासणीही करण्यात येते. जी.आय.एस., जी.पी.एस. इंटिग्रेशन कमांड व कंट्रोलचे काम गेल्या दीड वर्षांपासून टेंडर उघडून आता अंतिम टप्प्यात आलेले आहे. भायखळा येथे साऊथ एशियन-पॅसीफीकक रिजनमधील सर्वात अद्ययावत कंट्रोल रुम आहे असे विभागीय प्रतिनिधीनी अवगत केले.

महानगरपालिकेने जी.पी.एस. सिस्टिम केली. इतर ३ शिफारशींच्या अनुषंगाने महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागाने मोडकळीस आलेल्या सर्व इमारतींची यादी ठेवावी असे समितीने सूचित केले असता तरी यादी ठेवण्यात आल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम यांनी ३० वर्षांपेक्षा अधिक जुन्या इमारतीमध्ये विजेची वायरिंग व मीटर बॉक्स यांची तपासणी करण्यात यावी. त्याच बरोबर बेस्टने वार्षिक विद्युत लेखापरीक्षा करावी. जुन्या इमारतीमध्ये रासायनिक द्रव्यांचा साठा व सोनारकाम यावर बंदी घालावी, या अनुषंगाने काय केले? अशी विचारणा समितीने केली असता, अतिरिक्त आयुक्त महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली इलेक्ट्रीक सप्लायवाले जेवढे स्टेक होल्डर्स आहेत त्यांची दोनवेळा बैठक घेतली होती. त्या बैठकींमध्ये त्यांना हा सर्व विषय सेन्सीटाईज केला होता की, जेथे ३० वर्षे जुना इलेक्ट्रीक सप्लाय आहे त्या सर्वांचे वायरिंग वैयक्तिकरित्या त्यांच्याकडचे इन्स्पेक्टर पाठवून चेक करावे. ज्याबाबत वाटेल की, जे खूप डिटीरिओराईट झालेले आहे, अशा ठिकाणी त्यांनी एक तर विजेचा पुरवठा थांबवावा. जोपर्यंत रेक्टीफाय करीत नाहीत तोपर्यंत त्यांना याबाबतच्या सूचना दिल्या होत्या. परंतु, त्यानंतर त्यांचे उत्तर आले की, ते इमारतीच्या डोअरस्टेपपर्यंत सप्लाय देतात पुढची जबाबदारी मालकांची आहे. ते फक्त नोटीस देतील परंतु, त्याच्या पुढची कारवाई करता येत नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सोसायटीच्या अध्यक्षांना असे पत्र लिहिले पाहिजे की, त्यांनी महानगरपालिकेने हे काम केले पाहिजे. नाही तर उद्या तेथे अशी घटना घडली तर, सोसायटीचे बोर्ड जबाबदार राहील. महानगरपालिकेने त्या इमारतीचे ऑडिट केले काय ? बेस्ट, विद्युत विभागाचे लोक जोपर्यंत तेथील माहिती घेत नाहीत तोपर्यंत त्यांना नोटीस कशी देता येईल ? त्यांनी ते ऑडिट केले काय ? अशी विचारणा समितीने केली असता, बेस्ट टाटा वीज प्रवाह, रिलायन्स या सर्वांचे जी.एम. व त्यांच्या इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना ज्या ज्या ठिकाणच्या इमारती ३० वर्षांपेक्षा जुन्या आहेत तेथे इन्स्पेक्शन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. इन्स्पेक्शननंतर त्यांचे जे उत्तर आले त्यामध्ये काही रँडम केसमध्ये इन्स्पेक्शन केले असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु, त्यांनी त्याचा डेटा उपलब्ध करून दिलेला नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महानगरपालिकेकडे कोणती इमारत कोणत्या वर्षी झाली याची माहिती असते. ज्या इमारतींना ३० वर्षांपेक्षा जास्त वर्षे झालेली आहेत, त्या सर्व इमारतीच्या अध्यक्षांना पत्र द्यावे की, त्यांनी हे केले नाही तर सोसायटीचे बोर्ड जबाबदार राहील. असे केले तर ते स्वतः हे काम करतील. ३० वर्षांपेक्षा जास्त जुन्या व मोडकळीस आलेल्या सर्व इमारतींचे विद्युत ऑडिट झालेच पाहिजे. त्या ऑडिटप्रमाणे योग्य नसेल तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली पाहिजे. कारण एका इमारतीला आग लागल्यावर अनेक लोकांचे जीव जातात. त्याचबरोबर शेजारच्या इमारतीतील लोकांचे जीवही धोक्यात येतात. They cannot be hazardous to others. त्यादृष्टीने तशाप्रकारचे इन्स्पेक्शन सप्लायर कंपनीने केले पाहिजे. महानगरपालिकेने हे करावे असे समितीने सूचित केले असता, मुंबई महानगरपालिका आयुक्त हे डिझास्टर कंट्रोलचे हेड असल्याने डिझास्टर कंट्रोल मार्फत महानगरपालिकेने सर्व इलेक्ट्रीक सप्लाय कंपन्यांना सेक्शन ३० ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट ॲक्ट, २००५ च्या अंतर्गतही नोटीस पाठवलेली आहे की, ज्या इमारती ३० वर्षांपेक्षा जुन्या झालेल्या आहेत, त्यामध्ये जर अशा प्रकारची घटना घडली तर त्या कंपन्या वैयक्तिकरित्या जबाबदार राहतील असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

नोटीस पाठवणे ही काही उपाययोजना नाही. त्यांच्याकडून काम करून घेणे जास्त आवश्यक आहे. दुसरी गोष्ट म्हणजे सोनारकाम व रासायनिक द्रव्ये यांनाही बंदी घालावी अशीही शिफारस आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीचे मत आयुक्तांना कळविण्यात येईल इमारतीत चालणारे यांना काम रासायनिक द्रव्ये यावरही मोठ्या प्रमाणात कारवाई केली आहे. त्यातील बरेचसे युनिटस बंद करून मुंबई शहराच्या बाहेर पाठविण्यासाठी उद्युक्त केलेले आहेत. घातक रसायनांचे बरेचसे युनिटस बंद केलेले आहेत. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

मल्टीस्टोअर्ड इमारती पाहता महानगरपालिकेने फायर हेलीकॉप्टर घेतले पाहिजेत. आता ७० ते ८० मजल्यांचे टॉवर उभे केले जात आहेत. अशी घटना घडल्यास या एरियातून माणसे बाहेर काढण्याकरिता महानगरपालिकेकडे यंत्रणा असली पाहिजे. त्या इमारतीची फायर यंत्रणा बंद झाली तर महानगरपालिकेची फायर यंत्रणा ८० व्या मजल्यांवर काम करीत नाही. इतक्या मोठया इमारतींना महानगरपालिका परवानगी देते मग त्याबाबतची व्यवस्था महानगरपालिकेकडे आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, या अनुषंगाने हेलीकॉप्टरची सर्व्हिस देणारे जेवढे स्टेकहोल्डर्स आहेत किंवा अशा प्रकारची यंत्रणा जे पुरवू शकतात अशा लोकांकडून मागच्या २-३ वेळेस डेमो घेतलेले आहेत. आयुक्त पातळीवर त्यांची किती मदत घ्यायची हे ठरविण्याचे काम सुरू आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

महानगरपालिका परवानग्या देत आहे. ८० ते १०० मजल्यांच्या इमारती उभ्या राहत आहेत. परंतु, महानगरपालिकेने निर्णय घ्यावा. सचिवांनी यामध्ये लक्ष घालावे. हे तातडीने होण्याची गरज आहे. नाही तर अशा मोठ्या इमारती बांधल्यानंतर तेथे आग लागली तर तेथून माणसांना बाहेर निघताच येणार नाही. कारण महानगरपालिकेच्या सिस्टिम्स या ५०-६० मजल्यांवर काम करीत नाहीत. त्या १५ ते २५ मजल्यापुरत्याच असतात असे मत समितीने व्यक्त केले असता, अशा इमारतींमध्ये त्यांची अंतर्गत सुविधा असल्याशिवाय महानगरपालिका त्यांना परवानगी देत नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

अंतर्गत सुविधा असते हे मान्य आहे. परंतु, अंतर्गत सुविधा निष्फळ ठरली तर त्या इमारतीमध्ये अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्याचा दुसरा पर्याय काय आहे ? एकच आहे की, रेस्क्यु ऑपरेशन करावे लागेल असे मत समितीने व्यक्त केले असता, आता नवीन एन.बी.सी. व एन.बी.सी. येण्याच्या अगोदरही १ फायर टॉवरचा कन्सेप्ट आलेला आहे. इमारतीमध्येच स्वतंत्र व्हेंटिलेटेड स्टेअरकेस व त्यामध्येच इंटरनल लिफ्ट ही आता बंधनकारक करण्यात आलेली आहे. एन.बी.सी. सन २०१६ मध्ये आला आहे. परंतु, सन २०१४ पासून हे बंधनकारक केलेले आहे. लोअरिंग डिव्हाईस किंवा टॉवर या प्रकारची प्रक्रिया त्या इमारतीमध्ये असते कारण कोणत्याही हायरेज इमारतीमध्ये व्हर्टिकल रेस्क्यू होत नाही. तेथे होरिझोंटल रेस्क्यू होतो. दुबईमध्ये ज्यावेळेस मोठमोठ्या आगी लागल्या त्यामध्ये जीवित हानी यासाठी झाली नाही कारण त्या टॉवरमधून ते विनासायास निघू शकले. त्या प्रकारच्या सोयीसुविधांना आता महानगरपालिकेने सुरुवात केलेली आहे. चॉपरबाबत भरपूर डेलीबरेशन चालले आहे. इमारत व त्यामध्ये जो आवश्यक क्लिअरन्स पाहिजे, लाईन अप साईड आहे त्यानंतर कर्फ्यू आहे. चॉपर रात्री काम करूशकत नाही. या मर्यादा आहेत. परंतु, फायर टॉवरचा कन्सेप्ट असल्यानंतर कोणत्याही इमारतीमध्ये आग लागली तरी फायरमन वर जाऊ शकतो. यासाठी महानगरपालिकेकडे ९० मीटरची लॅडर आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जगामध्ये फायर हेलीकॉप्टर्स आहेत. बहुमजली इमारती जगामध्ये आहेत. ही सिस्टिम उभी करताना त्या लोकांना हे माहीत नसते, फायर लिफ्ट केलेली आहे, फायर स्टेप केलेल्या आहेत त्यावरुन ते खाली उतरतील असे होणार नाही. सर्व इमारतींना हेलीकॉप्टर कामी येणार नाही, ते रात्रीही कामी येणार नाही. परंतु, दिवसा तरी ते कामी येईल ना ? महानगरपालिका एवढ्या टेस्ट घेत आहे, महानगरपालिकेकडे एवढे पैसे आहेत की दोन हेलीकॉप्टर घेऊन ठेवावीत. तशी सिस्टिम तरी उभी करावी. महानगरपालिकेने रेफ्युज एरिया तयार केला परंतु तेथून माणसाला बाहेर काढता तरी आले पाहिजे. याबाबत महानगरपालिकेने विचार करावा. महालेखापालांच्या परिच्छेदामध्ये शेवटी निष्कर्षामध्ये ज्या शिफारशी केलेल्या आहेत, त्यांचाही शासनाने विचार करावा असे समितीने सूचित केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

**४.१.६ " वित्तीय व्यवस्थापन "**

**४.१.६.१ " अग्निशमन विभागांकडून भांडवली अर्थसंकल्पीय तरतुदींचा वापर न होणे "**

**अभिप्राय :**

**१.२** महानगरपालिका त्यांच्या स्वतःच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून अग्निशमन विभागांना निधी वाटप करतात. वर्ष २०१०-१५ दरम्यान निवडक आठ महानगरपालिकांमधील अग्निशमन विभागांना रू.१०९१.२० कोटी अर्थसंकल्पीय तरतुदींचे वाटप करण्यात आले होते. ज्यांपैकी रू.८५४.८५ कोटी खर्च करण्यात आले व रु.२३६.३५ कोटी रक्कम अखर्चित होती. संयंत्र व यंत्रसामग्री, साधनसामग्री, वाहने, विशिष्ट अग्निशमन उपकरणे इत्यादींच्या खरेदीसाठी प्रत्येक वर्षी महानगरपालिका स्वतंत्र भांडवली अर्थसंकल्पदेखील तयार करतात आणि मंजुरीसाठी स्थायी समित्यांना सादर करतात. परंतु वर्ष २०१०-१५ दरम्यान केलेल्या एकूण रू.७०२.९५ कोटी अर्थसंकल्पीय तरतुदींपैकी निवड केलेल्या आठ महानगरपालिकांनी फक्त रू.१५४.७१ कोटी खर्च केले होते. रू.५४८.२४ कोटी अखर्चित शिल्लकमधील बृहन्मुंबई महानगरपालिकेचा (MCGM) हिस्सा सर्वाधिक रू. ४२९.५९ कोटी (७८ टक्के) होता त्यानंतर महानगरपालिका, नाशिक (आठ टक्के); महानगरपालिका, नागपूर (सात टक्के); आणि महानगरपालिका, पुणे (तीन टक्के) यांचा हिस्सा होता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.३** यासंदर्भात महानगरपालिका, मुंबई यांनी नमूद केले की, टाटा व अशोक लेलँड यांसारख्या विविध चासिस उत्पादकांकडे वारंवार पाठपुरावा करूनही वर्ष २०१०-१५ दरम्यान अग्निशमन आणि बचावासाठीच्या वाहनांसाठी योग्य असे भारत स्टेज IV एमिशन नॉर्म कम्प्लाएंट चासिस उपलब्ध नव्हते. परिणामी, विशिष्ट सुविधा प्राप्त वाहने आणि साधनसामग्री यांची परदेशातून खरेदी / आयात करण्यासाठी अग्निशमन विभागाने आयात आदेश दिले. परंतु, आयात वाहने / साधनसामग्री यांचा पुरवठा कालावधी बराच मोठा असल्याने वर्ष २०१०-१५ दरम्यान अर्थसंकल्पीय तरतुदींचा लक्षणीय हिस्सा अखर्चित राहीला. जुन्या वाहनांच्या बदली नविन वेगवेगळ्या प्रकारची अग्निशमन व विमोचन वाहने खरेदी करण्याकरिता किंवा त्यांची अतिरिक्त आवश्यकता पुर्ण करण्यासाठी या दरम्यान अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली होती. भारत सरकारने दि. ०१.०४.२०१० रोजी निर्धारित केल्यानुसार योग्य असे भारत स्टेज IV प्रदूषण प्रमाणक पूर्ण करणारे सांगाडे अग्निशमन आणि विमोचनांच्या वाहनांसाठी उपलब्ध नसल्याने खरेदी प्रक्रीयेस विलंब झाला. अग्निशमन दलाच्या आवश्यकतेनुसार वैशिष्ट्यपुर्ण बांधणी करून पुरवठ्यासाठी लागणाऱ्या प्रदीर्घ कालावधीमुळे, विशिष्ट वाहने उदा. एरीअल लॅडर प्लॅटफॉर्म (ALP), टर्न टेबल लॅडर (TTL), विमोचन वाहने (Rescue Van) यांच्यासाठीची तरतूद अनुषंगिक आर्थिक वर्षात खर्च करण्यास विलंब झालेला आहे असे समितीसमोर सांगण्यात आले.

**१.४** त्याचप्रमाणे महानगरपालिका, नाशिक यांनी सांगितले की, एरीअल लॅडर प्लॅटफॉर्म आणि टर्न टेबल लॅडरच्या खरेदीसाठीच्या रु. १५ कोटी अर्थसंकल्पीय तरतुदिंचा वर्ष २०१३-१४ दरम्यान विनियोग करता येऊ शकला नव्हता आणि म्हणून ती तरतूद वर्ष २०१४-१५ मध्ये पुढे नेण्यात आली. परंतु जुलै, २०१५ पासून भरणाऱ्या कुंभमेळ्याच्या आयोजनासाठीच्या कामांच्या दबावामुळे या निविदांवर पुढील प्रक्रिया करता येऊ शकली नाही. त्याचप्रमाणे नाशिक येथे ३५ मीटरपेक्षा जास्त उंचीच्या इमारती नसल्यामुळे ५५ मीटरच्या लॅडरची तशी आवश्यकता नाही असे समितीसमोर सांगण्यात आले असता जर तेथे इमारतीची उंचीच ३५ मीटरपेक्षा जास्त नाही तर अशा यंत्रसामग्रीची खरेदीप्रक्रीया व त्यासाठी निधीची तरतूद करण्याची कोणतीही आवयकता नसताना ती तरतूद अनावश्यकरित्या करण्यात आली व एवढेच नव्हे तर ती नंतर समर्पित करण्यात आली ही बाब निश्चितच गंभीर आहे.

**१.५** महानगरपालिका, नागपूर यांनी सांगितले की, वर्ष २०१०-१५ दरम्यान प्रत्येक वर्षी ऑस्ट्रीया कडून टर्न टेबल लॅडर खरेदीसाठी रु. ७.०८ कोटींची तरतूद कण्यात आली होती. परंतु स्थायी समितीकडून त्याला मंजुरी मिळाली नव्हती. तसेच पुणे येथे (जून, २०१५) निवडणूक आचारसंहीता लागू झाल्याने आणि इतर अनेक कारणांमुळे अग्निशमन साधनसामग्रीच्या खरेदीसाठी करण्यात आलेल्या रु. ८.४० कोटी अर्थसंकल्पीय तरतुदींचा वापर करता येऊ शकला नव्हता असे समितीच्या निदर्शनास आले.

**१.६** अग्निशमन सुरक्षा यंत्रणेच्या दृष्टीने महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप अत्यंत महत्वपूर्ण व गंभीर असून अग्निशमन विभागांकडून भांडवली, अर्थसंकल्पीय तरतुदींचा वापर न होणे हे निश्चितच समर्थनीय नसून आर्थिक शिस्तीला धरून नाही. महालेखाकारांनी नमुन्यादाखल व प्रायोगिक तत्वावर तपासणी केलेल्या बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती अशा नमुन्यादाखल आठ महानगरपालिकांमधील तपासणीमध्ये अनेक कारणास्तव हा निधी त्यात्या आर्थिक वर्षात वापरला नसल्याचे दिसून आले. ज्यात मुख्यत्वे प्रशासकीय व तांत्रिक स्वरूपाची कारणे अधिक आहेत. सद्यःस्थितीत अग्निशमन विभागात निधीची कमतरता, अपूरे मनुष्यबळ, नियोजनाचा अभाव, आधुनिक व अद्ययावत साधनसामग्रीचा अभाव इ. अनेक कारणांमुळे ही यंत्रणा अद्यापही पाहिजे तशी सक्षम व प्रभावी झालेली नाही. संपूर्ण राज्यभर अग्निसुरक्षा यंत्रणा आधुनिक, सुसज्ज व अद्ययावत असणे आवश्यकच आहे. आगीची घटना घडून गेल्यानंतर उपाययोजना करणेपेक्षा अशा घटनांना

प्रतिबंध घालण्यासाठी प्रयत्न करणे अधिक महत्वाचे आहे. मुळात यासाठी प्रत्येक वेळी अर्थसंकल्पात प्राधान्याने व पुरेसा निधी प्राप्त होईलच याची शाश्वती नसते. असे असतानाही कोट्यवधी रुपयांचा निधी अर्थसंकल्पात तरतूद करून प्राप्त झाल्यानंतरही विभागाच्या अनियोजनबद्ध कार्यपद्धतीमुळे हा निधी अखर्चीत राहणे अथवा समर्पित करणे ही बाब तर अधिकच गंभीर असून वित्तीय नियमांचे उल्लंघन करणारी आहे. अशा बाबी निश्चितच आर्थिक शिस्तीला अनुसरून नाहीत. अशा परिस्थितीत अर्थसंकल्पात निधीची तरतूद करूनही त्याचा वापर न होणे हे आक्षेप तर अतिशय गंभीर असून शासनाच्या नियोजनाचा अभाव दर्शविणारे आहे. अग्निशमन सुरक्षेच्या बाबींसाठी अर्थसंकल्पित होणारा निधी विहित कालमर्यादेत खर्च करण्याचे नियोजनच विभाग करीत नसेल तर असा निधी घेऊन अडवून ठेवण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. अर्थसंकल्पित निधी विहित वेळेत खर्च करणे बंधनकारक असताना तो खर्च करण्यात येत नाही व आगीच्या घडलेल्या घटनांमध्ये अनेक कारणांस्तव निरपराध लोकांचे जीव जातात. या बाबींकडे विभागाने अधिक गांभीर्याने लक्ष देऊन नियोजन करण्याची आवश्यकता आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**शिफारस :**

**१.९ महाराष्ट्रात नगरविकास विभागाच्या नियंत्रणाखालील महानगरपालिका त्यांच्या संबंधित कार्यकक्षेतील निवासी इमारती, शासकीय कार्यालये आणि इतर आस्थापना यामध्ये होणाऱ्या आगीच्या घटना हाताळण्यासाठी आणि इमारती/कार्यालये/ आस्थापना यांचे मालक/रहिवासी राज्य शासनाने विहित केलेल्या अग्निसुरक्षा प्रमाणकांचे पालन करत असल्याची खात्री करण्यासाठी जबाबदार असतात. निवडक महानगरपालिकांकडून आगीचा प्रतिबंध आणि नियंत्रण याची वर्ष २०१०-१५ या कालावधीचे नमुन्यादाखल संपादणूक लेखापरीक्षण केले असता २६ पैकी बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती या आठ महानगरपालिका विशिष्ट अग्निशमन उपकरणे, साधनसामग्री, वाहने इत्यादीच्या खरेदीसाठी त्यांच्या भांडवली अर्थसंकल्पापैकी ७८ टक्के भाग खर्च करू शकल्या नव्हत्या. आग प्रतिबंध आणि इतर संबंधित सुरक्षात्मक उपाययोजना ही नगर रचना आणि इमारत बांधणीची महत्वपूर्ण अंगे आहेत. भारतामध्ये अग्निशमन सेवा राज्य घटनेच्या १२ व्या अनुसूचीच्या अनुच्छेद २४३W मध्ये नमूद असून १२ व्या अनुसूचीमध्ये सूचिबद्ध केलेली कार्ये पार पाडण्याची जबाबदारी नगरपालिकांची आहे. आगीशी संबंधित कोणत्याही आपत्तीमधून निर्माण झालेल्या कोणत्याही संकटांशी सामना करताना जीवित व मालमत्ता वाचवण्यासाठीची प्राथमिक उपाययोजना म्हणून राज्यांच्या स्थानिक स्वयंप्रशासनाच्या अंतर्गत नगरपालिकांकडून अग्निशमन विभागांची स्थापना केली आहे. नगर पालिका त्यांची कार्ये प्रभावीपणे व कार्यक्षमतेने पार पाडत आहेत याची खात्री राज्य शासनाने करावयाची असते. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या नियंत्रणाखाली महाराष्ट्रात २६ महानगरपालिका आहेत. महानगरपालिकांच्या संबंधित कार्यक्षेत्रातील निवासी इमारती, शासकीय कार्यालये आणि इतर आस्थापनांमधील आगीच्या घटना हाताळण्यासाठी आणि इमारती/कार्यालये/ आस्थापनांचे मालक/रहिवासी (भोगवटादार) यांच्याकडून राज्य शासनाने विहित केलेल्या अग्निसुरक्षा प्रमाणकांचे पालन होत असल्याची सुनिश्चिती करण्यासाठी महानगरपालिका जबाबदार असतात आणि राज्यातील अग्निशमन सेवा बळकटीकरणासाठी धोरणे आखतात. अशी आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी महानगरपालिकांकडे पर्याप्त प्रमाणात पायाभूत सुविधा व अग्निशमन साधने, अग्निशमन/बचाव यासाठी बंब आणि इतर विशिष्ट वाहने उपलब्ध होती किंवा कसे तसेच प्रभावीपणे व कार्यक्षमतेने सेवा पार पाडण्यासाठी महानगरपालिकांकडे सर्व सुविधा व कुशल मनुष्यबळ होते आणि निरीक्षण व संनियंत्रण कार्यतंत्र प्रभावी होते किंवा कसे याबाबींची पडताळणी करणे हे या लेखापरिक्षणाचे मूळ उद्दिष्ट होते.**

**१.१० परंतु अग्निशमन सुरक्षेसाठी मोठ्या प्रमाणात निधीची आर्थिक तरतूद करून ठेवण्यात येऊनही हा निधी विहित वेळेत खर्च होत नाही अथवा तो समर्पित करण्यात येणे असे या प्रकरणी समितीला दिसून आले. महालेखाकारांनी नमुन्यादाखल केलेल्या आठ महानगरपालिकांच्या लेखापरिक्षणात या गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत. परंतु राज्यातील उर्वरित महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये निश्चितच यापेक्षा वेगळी परिस्थिती असणार नाही याची समितीला खात्री आहे. अर्थसंकल्पित निधी त्या त्या आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. असे असतानाही मोठ्या प्रमाणात प्राप्त झालेला निधी हा अखर्चीत राहणे व प्राप्त अर्थसंकल्पिय तरतूदीचा वापर न होणे या बाबी निश्चितच गंभीर आहेत. त्यामुळे जेवढा निधी खर्च होऊ शकतो तेवढाच निधी विभागाने घेतला पाहिजे अथवा जो निधी प्राप्त करून घेतला आहे तो खर्च करण्याचे पूर्ण नियोजन केले पाहिजे अन्यथा विभागाने त्या निधीची तरतूदच करू नये. या सर्व बाबींची पडताळणी व नियोजन करणेसाठी अंतर्गत लेखापरिक्षण विभाग देखील तितकाच जबाबदार आहे. या सर्व बाबी अंतर्गत लेखापरिक्षणातच निदर्शनास येणे आवश्यक होते. परंतु तसे झाले नाही. कोणत्याही परिस्थितीत निधी अखर्चित राहणे समर्थनीय नाही. अतः अग्निसुरक्षा यंत्रणेसंदर्भातील बाबी अतिशय प्राधान्याने हाताळणे अत्यावश्यक असून विभागाकडून निधीची तरतूद करताना योग्य ते कामाचे नियोजन विभागाने करावे. जास्तीत जास्त निधी प्राप्त करून घेण्यासाठी विभागाने प्रयत्न करतेवेळी तो निधी त्या त्या आर्थिक वर्षात त्या कामांवर पूर्णपणे खर्ची पडेल याची देखील**

**खबरदारी विभागाने घ्यावी व कामांची अंमलबजावणी नियोजनबद्ध व कालबद्ध पद्धतीने करावी. कोणत्याही परिस्थितीत निधी समर्पित होऊ नये अथवा अखर्चीत राहू नये याची पुर्ण दक्षता विभागाने भविष्यात घ्यावी. अतः विभागाने अग्निशमन सुरक्षेच्यादृष्टीने अस्तित्वात असलेल्या नियमांची तंतोतंत अंमलबजावणी करावी व या कामाचे नियमित निरिक्षण व नियंत्रण करावे तसेच अर्थसंकल्पित तरतूद पुर्ण वापरुन ती कोणत्याही परिस्थितीत अखर्चीत राहू नये याची पूर्ण काळजी विभागाने घ्यावी. मोठ्या प्रमाणात निधी अखर्चीत राहू नये यासाठी सर्व स्तरावरील निर्णय प्रक्रिया अधिक जलद करण्यात यावी तसेच या संदर्भातील निर्णयाचे अधिकार आयुक्तांकडे सोपविण्याच्या पर्यायाचा देखील विचार करून योग्य तो निर्णय घेण्यात यावा. तसेच रक्कम अखर्चीत राहू नये यासाठी कामाचे व निधीचे नियोजन कसे करावे या अनुषंगाने नगरविकास विभागाच्या स्तरावरून सामायिक सूचना सर्व महानगरपालिकांना निर्गमित करण्यात याव्यात व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.६.२ " अग्निसुरक्षा निधी न स्थापने "**

**अभिप्राय :**

**१.११** करावा ज्यामध्ये महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने सर्व इमारतींच्या मालकांकडून आणि रहिवासी / भोगवटादारांकडून आकारलेले व प्राप्त केलेले शुल्क जमा करावे. या निधीतील रक्कम सामान्यतः अग्निशमन केंद्रांची देखभाल (ज्यामध्ये अग्निशमन अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन, भत्ते आणि इतर अनुषंगीक खर्च यांचा देखील समावेश असेल) आणि विशेषतः महानगरपालिका क्षेत्राच्या मर्यादेत असलेल्या किंवा क्षेत्राबाहेरील कोणत्याही जमीन आणि कोणत्याही इमारतीत अग्निप्रतिबंधक आणि अग्निशमन कार्यासाठी आधुनिक साधनसामग्री व उपकरणे उपलब्ध करण्यासाठी करावयाचा होता. परंतु निवड केलेल्या आठ महानगरपालिकांपैकी फक्त तीन महानगरपालिकांनी हा निधी स्थापन केला होता व वर्ष २०१०-१५ दरम्यान रु. ३२.०७ कोटी निधी जमा केला होता. तसेच, नागपूर महानगरपालिकेने तिच्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनादी लाभांचे प्रदान करण्यासाठी या निधीमधील रु. १० कोटी रक्कमेचा नियमबाह्य रीतीने वापर केला होता. डिसेंबर, २०१५ अखेरीस या तीन महानगरपालिकांच्या FPF खात्यात रु. ४१.७४ कोटी उपलब्ध होते. उर्वरीत चार महानगरपालिकांनी FPF स्थापित केला नव्हता परंतु, वर्ष २०१०-१५ दरम्यान रु. ४४९.९७ कोटी FPF शुल्क जमा केले होते आणि ते त्यांच्या सर्वसाधारण निधीत ठेवले होते, ज्यामध्ये महानगरपालिकांच्या अंतर्गत जमा ठेवल्या जातात. वर्ष २०१०-१५ दरम्यान अशाप्रकारे जमा केलेल्या रक्कमेचा (रु. ४४९.९७ कोटी) वापर चार महानगरपालिकांनी अग्निशमन सेवांच्या पायाभूत सुविधा सुधारण्यावर केला नव्हता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.१२** काही महानगरपालिकांनी हा निधी महालेखापालांच्या आक्षेपानंतर स्थापन केला तर काही महानगरपालिकांनी लोकलेखा समितीची साक्ष लागल्यानंतर स्थापन केला, ही निश्चितच गंभीर बाब आहे. अधिनियमातील तरतूदींची अंमलबजावणी करणे विभागावर बंधनकारक असताना त्याची अंमलबजावणी झाली नाही. याहीउपर ज्या हेतूने ही तरतूद अधिनियमात करण्यात आली तो हेतू देखील साध्य होऊ शकला नाही. केवळ निधी गोळा करायचा परंतु त्या त्या नियोजित प्रयोजनासाठी तो न वापरणे अथवा अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापरणे निश्चितच समर्थनीय नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**शिफारस :**

**१.१३ अधिनियमातील तरतूदीनुसार अग्निसुरक्षा निधी स्थापन करणे बंधनकारक असताना त्याची अंमलबजावणी न होणे अथवा अन्य प्रयोजनासाठी तो निधी वापरणे असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आहेत. सदर निधीची स्थापना करून त्याचा उपयोग अग्निशमन विभागाच्या बळकटीकरणासाठी करणे अभिप्रेत असताना या निधीची स्थापना न केल्यामुळे अथवा अन्य प्रयोजनासाठी तो वापरल्यामुळे या तरतूदीचा मूळ हेतूच साध्य होऊ शकला नाही. मुंबई महानगरपालिकेसाठी व उर्वरित महाराष्ट्रासाठी वेगवेगळा अधिनियम अस्तित्वात आहे. विभागाने मुंबईसाठी अग्निसुरक्षा निधी स्थापित केला आहे व त्यास मुंबई महानगरपालिकेची मंजुरी देखील घेतलेली आहे. परंतु महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियमातील तरतूदीनुसार त्यासंदर्भातील अधिसूचना निर्गमित करणे आवश्यक असल्यामुळे त्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. तसेच हा निधी खर्च करण्यासाठी या अधिनियमाच्या तरतूदींना अधीन राहून आणि राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाला अधीन राहून खर्च करणे अपेक्षित असून त्यासाठी राज्य शासनाची परवानगी घेणे आवश्यक आहे. परंतु पत्र पाठवूनही नगरविकास विभागाने याचे काहीही उत्तर मुंबई महानगरपालिकेला दिले नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. तसेच अन्य महानगरपालिकांमध्ये याची अंमलबजावणी होत असल्याचे दिसून आले. शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर निर्णय होण्यास**

**इतका अमर्याद विलंब होणे हे निश्चितच अनाकलनिय आहे. वास्तविकतः ही तरतूद अधिनियमात असताना याची अंमलबजावणी होणे क्रमप्राप्त होते. त्याचप्रमाणे महानगरपालिका स्तरावरून काही पत्रव्यवहार शासनाकडे झाल्यास त्याचे निराकरण विभागाकडून तात्काळ होणे आवश्यक होते. परंतु शासनस्तरावरून यास विहित वेळेत मान्यता न देता अमर्याद विलंब लागलेला आहे ही बाब निश्चितच उचित नाही. त्यामुळे या तरतुदीची अंमलबजावणी निश्चितच प्रलंबित राहिली. या अगोदर देखील हा निधी जमा करण्यात येत होता परंतु तो सर्वसाधारण खात्यामध्ये जमा होत होता. आता यासाठी स्वतंत्र खाते उघडण्यात आले आहे. अतः या प्रकरणी हा निधी स्थापन न करणाऱ्यांवर तसेच तो अन्यत्र खर्च करणेबाबत संबंधितांवर कारवाई करण्यात यावी व अग्निसुरक्षा निधी स्थापन करणेसंदर्भातील तरतूदीची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे राज्यात सर्वच महानगरपालिकांमध्ये करण्यात यावी तसेच अग्निशमन सेवांच्या बळकटीकरणासाठी आणि अग्निशमन क्षमता सुधारण्यासाठी ज्या महानगरपालिकांनी महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील तरतुदीनुसार अद्याप अग्निसुरक्षा निधी स्थापन केलेला नाही त्यांनी ते कोणताही अधिक विलंब न लावता सुरू करावे व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.६.३ " स्वीय प्रपंजी खात्यामधून नियमबाह्य खर्च "**

**अभिप्राय :**

**१.१४** नगरविकास विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार संचालक, अग्निशमन सेवा यांनी जमा केलेली शुल्काची संपूर्ण रक्कम स्वीय प्रपंजी खात्यात (PLA) जमा करावयाची होती. ज्या खात्यातील व्यवहार संचालकांनी स्वतः करावयाचे होते. अशाप्रकारे जमा केलेल्या शुल्काचा वापर फक्त अग्निशमन सेवांच्या बळकटीकरणासाठी करावयाचा होता. तरीही संचालकांनी तरतुदींच्या विरूद्ध विद्युत देयकांचे प्रदान करण्यासाठी आणि इतर किरकोळ खर्च भागविण्यासाठी PLA मधून नियमबाह्यतेने रु. ८३.४९ लाख खर्च केला होता. जुलै, २०१५ रोजी संचालकांच्या PLA मध्ये रु. ३०.५७ कोटी शिल्लक होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.१५** महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ च्या कलम २५ च्या तरतुदीनुसार आग सुरक्षा निधी अग्निशमन सेवेच्या बळकटीकरणासाठी (ज्यात अग्निशमन अधिकारी आणि कर्मचारी यांचे वेतन, भत्ते आणि आनुषंगिक खर्च याचा समावेश आहे) करण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच स्वीय प्रपंजी लेख्यामधून अग्निसुरक्षा नियंत्रण, मार्गदर्शन व सल्ला, सुरक्षा व नियंत्रण प्रशिक्षण, इतर खर्च, कार्यालयीन खर्च यावर खर्च करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. अग्निसुरक्षा निधी व स्वीय प्रपंजी लेखे यामध्ये स्वतंत्ररित्या निधी जमा करण्याची तरतूद असून त्यामधून करावयाच्या खर्चाचे शीर्ष देखील वेगवेगळे आहे व त्याचे पालन करण्याची जबाबदारी विभागाची असून त्या त्या लेख्यांमधून अनुज्ञेय असलेले खर्चच विभागाने करणे अभिप्रेत आहे. अन्य कोणत्याही कामांसाठी हा निधी वापरणे निश्चितच अभिप्रेत नाही.

**शिफारस :**

**१.१६ स्वीय प्रपंजी खात्यामधून नियमबाह्य खर्च केल्याबाबत सदरहू आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. स्वीय प्रपंजी खात्यामधून नियमबाह्य पद्धतीने विद्युत देयकावर रु. ८३.४९ लक्ष इतका खर्च केल्यासंदर्भात सदरहू आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. स्वीय प्रपंजी लेख्याअंतर्गत याअगोदर एकच शीर्ष असून या शीर्षाचे नंतर वर्गीकरण करून इतर प्रशासकीय सेवा व अग्निसुरक्षा यंत्रणा अशी विभागणी करण्यात आली व त्याअंतर्गत हा खर्च करण्यात येतो. विभागाकडून जी मार्गदर्शक तत्वे निर्गमित केलेली आहेत त्यामध्ये स्वीय प्रपंजी खात्यामध्ये आगसुरक्षा निधीची रक्कम जमा करणे व जमा निधीतील रक्कम अग्निशमन यंत्रणा सक्षम करणेखेरीज अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी खर्च करता येणार नाही असे नमूद आहे. परंतु त्याचवेळी या शीर्षकामध्ये कार्यालयीन खर्च देखील नमूद असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर विदीत केले. अशा परिस्थितीत या शासन निर्णयामध्ये अधिक सुस्पष्टता असणे आवश्यक आहे. सद्यःस्थितीत महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप अस्तित्वात असलेल्या तरतुदीनुसार योग्य आहे. परंतु दुसरीकडे विभागाने केलेली कार्यवाही देखील प्रत्यक्षरित्या नियमबाह्य आहे असे सकृतदर्शनी म्हणता येणार नाही. तरीही विभागाने या शासन निर्णयाचा फेरआढावा घ्यावा व या लेख्यामधून नेमका करावयाच्या खर्चाची स्पष्टता आणावी व सर्व महानगरपालिकांमध्ये त्याची अंमलबजावणी समानरित्या व परिणामकारकरित्या करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.६.४ " वार्षिक शुल्क न आकारणे "**

**अभिप्राय :**

**१.१७** महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम १३ (१) नुसार सामान्यतः अग्निशमन केंद्रांच्या देखभालीवरील आणि विशेषतः कोणत्याही जमिनीवर आणि कोणत्याही इमारतीमध्ये आगीच्या प्रतिबंधासाठी आणि अग्निशमनासाठी अद्ययावत यंत्रसामग्री आणि उपकरणे उपलब्ध करण्यावरील खर्च भागविण्यासाठी अग्निशमन सेवा शुल्काच्या एक टक्का इतके वार्षिक शुल्क आकारावे अशी तरतूद आहे. परंतु महानगरपालिका, पुणे ने वर्ष २०१०-१५ दरम्यान रु. २६.३५ लाख वार्षिक शुल्कापोटी जमा केले होते त्या व्यतिरिक्त उर्वरीत सातपैकी एकाही महानगरपालिकेने कोणतेही वार्षिक शुल्क आकारले नव्हते, ज्याचा वापर अग्निशमन सेवांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी करता येऊ शकला असता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.१८** या तरतुदीची अंमलबजावणी न होणे मागील कारणमिमांसा समितीने तपासली असता त्यास महानगपालिकांच्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी मान्यता न देणे, वसुलीसाठी मनुष्यबळाचा अभाव इत्यादी अनेक कारणास्तव ही वसुली न झाल्याचे दिसून येते. तर काही महानगरपालिकांनी महालेखापालांच्या आक्षेपानंतर ही वसुली सुरू केल्याचे दिसून येते. वार्षिक शुल्काची आकारणी न करण्यामागील कारणे समितीने विचारली असता प्रत्येक विकास कामात वेगवेगळी छाननी फी घेण्यात येते. पहिले कॅपिटेशन फी घेण्यात येत होती व आता छाननी फी घेण्यात येते. नागरिकांवर हा दुहेरी भार पडणार असल्यामुळे आमसभेने तो प्रस्ताव परत पाठविला. ज्यावेळी इमारत प्रस्ताव विभागाकडे इमारतीच्या छाननीसाठी आराखडा येतो त्याच्या छाननीसाठी ही वार्षिक शुल्क आकारणी आहे. स्थायी समितीची या प्रकरणी अशी हरकत होती की, फायर टॅक्स याअगोदरच गोळा करण्यात येत असल्यामुळे वार्षिक शुल्क आकारल्यास दुहेरी आकारणी होईल, त्यामुळे तो प्रस्ताव नामंजूर करण्यात आला. परंतु हा प्रस्ताव पुनःश्च मान्यतेसाठी पाठविण्यात येईल असेही मुंबई महानगरपालिकेसंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगण्यात आले. नाशिक महानगरपालिकेसंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, सन २०१० ते २०१६ दरम्यान आगसुरक्षा निधीपोटी रु.१९.६८ कोटी जमा केले आहेत त्याच्या १ टक्के म्हणजे रु.१९.६८ लक्ष वार्षिक शुल्क आकारणे अभिप्रेत होते. परंतु ती रक्कम वसूल करण्यात आली नाही व ही रक्कम आता सन २०१८-१९ मध्ये वसूल करण्यात आली असून उर्वरित रक्कम वसूल करण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. ही वसुली या अगोदरपासून नियमानुसार सुरू राहिली असती तर मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त होऊ शकला असता.

**शिफारस :**

**१.१९ वार्षिक शुल्काची आकारणी न होणे असे आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आहेत. वार्षिक शुल्क आकारणीचा नियम सन २००६ पासून अंमलात आला असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही. तसेच वेगवेगळया महानगरपालिका स्तरावरुन या तरतुदीची अंमलबजावणीत तफावत दिसून येते. औरंगाबाद महानगरपालिकेने तर मालमत्ता करामधूनच ही वसुली केली आहे. निश्चित कोणत्या पद्धतीने ही वसुली करावी याच्या कोणत्याही सामायिक व सर्वसमावेशक सूचना विभागाच्या स्तरावरुन महानगरपालिकांना दिलेल्या नसल्यामुळे अंमलबजावणीतील ही तफावत व विसंगती दिसून येते. वेगवेगळया महानगरपालिकांच्या स्तरावरुन याची अंमलबजावणी वेगवेगळ्या प्रकारे झाली आहे. अतः वार्षिक शुल्क आकारणी संदर्भातील सामायिक व सर्वसमावेशक सूचना सर्व महानगरपालिकांना विभागाकडून निर्गमित करण्यात याव्यात व त्याची प्रभावी अंमलबजावणी महानगरपालिका स्तरावरुन नियमानुसार करण्यात यावी व ज्या महानगरपालिकांनी वार्षिक शुल्क आकारणी व संकलन सुरू केले नाही त्यांनी ते कोणताही अधिक विलंब न लावता करण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.६.५ " राज्य शासनाकडून निधी प्राप्त होणाऱ्या योजनेची अंमलबजावणी न करणे "**

**अभिप्राय**

**१.२०** नागरी स्थानिक संस्थांमधील अग्निशमन सेवांमधील तफावती दूर करण्यासाठी नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी महाराष्ट्रातील ड-वर्ग महानगरपालिकांमध्ये अग्निसुरक्षा अभियान नावाची एक योजना राबविण्याचा निर्णय घेतला. राज्य शासनाकडून प्राप्त निधी (३५ टक्के) आणि महानगरपालिकेचे अंशदान (६५ टक्के) यांच्याद्वारे ड-वर्ग महानगरपालिकेमध्ये आगीच्या बंबांची खरेदी आणि अग्निशमन केंद्रांचे बांधकाम करणे हे योजनेचे उद्दीष्ट होते. या योजनेअंतर्गत महानगरपालिका,औरंगाबादला मार्च,२०१२ मध्ये नगरविकास विभागाकडून (शासनाचा हिस्सा) रु. १.७८५ कोटी प्राप्त झाले. परंतु या महानगरपालिकेने निधीचा वापर योजनेच्या अंमलबजावणीसाठी न करता ही रक्कम जून, २०१२ ते मार्च, २०१५ दरम्यान मुदत ठेवींमध्ये गुंतविली. तसेच ऑगस्ट,२०१४ ते जानेवारी,२०१५ दरम्यान मुदत ठेवीतून मुदत संपण्याआधी रु. ७८.५० लाख आहरित केले आणि ती रक्कम आपत्कालीन व्यवस्थापन इमारतीच्या बांधकामावर झालेल्या खर्चापोटी महानगरपालिकेचे दायित्व पूर्ण करण्यासाठी वळविली. जून, २०१५ रोजी महानगरपालिकेकडे रूपये एक कोटी अखर्चित रक्कम शिल्लक होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.२१** राज्य शासनाकडून निधी प्राप्त होणाऱ्या योजनेची अंमलबजावणी न करणे, त्यामध्ये महानगरपालिकेने द्यावयाच्या अंशदानाची रक्कम न देणे अथवा हा निधी इतरत्र वळता करणे असे गंभीर आक्षेप सदरहू परिच्छेदात महालेखापालांनी नोंदविलेले असून अशाप्रकारे एका

कामासाठी असलेला निधी अन्य कामासाठी वापरता येत नसताना ज्यांनी त्याचा वापर केला. त्यासंदर्भात विभागाकडून चौकशी करण्यात येईल असे समितीसमोर आश्वासित करण्यात आले. वास्तविक राज्य शासनाकडून द्यावयाचा निधी व महानगरपालिकेच्या अंशदानाची रक्कम ही एकाच वेळी जमा करणे व त्याचा वापर नियोजित प्रयोजनासाठी करणे आवश्यक असताना शासनाकडून निधी अग्रिम स्वरुपात पाठविण्यात येतो त्यात महानगरपालिका त्यांच्या हिश्श्याची रक्कम जमा न करता शासनाकडून प्राप्त झालेली रक्कम मुदत ठेवीमध्ये जमा करणे ही बाब निश्चितच आर्थिक शिस्तीला धरून नाही. त्यातही हा निधी अन्यत्र वापरणे अधिकच गंभीर आहे. त्यातही शासनाकडून निधी पाठविल्यानंतर तो एक वर्षाच्या आत खर्च करणे आवश्यक असून तसे न झाल्यास तो आर्थिक वर्षाअखेर समर्पित करणे बंधनकारक असताना महानगरपालिकेने हा निधी ३ वर्षांसाठी मुदत ठेवीमध्ये ठेवणे निश्चितच गंभीर आहे. शासनाने हा निधी महानगरपालिकेला मुदत ठेवीमध्ये ठेवण्याकरिता निश्चितच दिलेला नव्हता. शासनाकडून एकदा निधी प्राप्त झाला की त्याच्या हिश्श्याची तरतूद महानगरपालिकेकडून करण्यात येत नाही. वास्तविकतः महानगरपालिकेची स्वतःच्या हिश्श्याची रक्कम तयार झाल्यावरच राज्य शासनाने त्यांच्या हिश्श्याची रक्कम महानगरपालिकेला देणे आवश्यक आहे. तसेच निधी ज्या प्रयोजनासाठी देण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी वापरण्यात यावा असेही राज्य शासनामार्फत सर्व महानगरपालिकांना कळविणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**शिफारस**

**१.२२ राज्य शासनाकडून निधी प्राप्त होणाऱ्या योजनेची अंमलबजावणी न करणे असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. शासनाकडून महानगरपालिकेस निधी प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये महानगरपालिकेच्या अंशदानाची रक्कम तात्काळ जमा करून ज्या प्रयोजनासाठी हा निधी देण्यात आला आहे त्याची अंमलबजावणी करणे व अग्निशमन सुरक्षा यंत्रणा बळकट करणे महानगरपालिकेवर बंधनकारक असतानाही त्याची योग्यरित्या अंमलबजावणी झाली नाही. याउपर महानगरपालिकेने हा निधी आर्थिक वर्षाअखेर समर्पित न करता ३ वर्षासाठी मुदत ठेवीमध्ये ठेवणे ही अतिशय गंभीर बाब असून आर्थिक शिस्तीला अनुसरुन नाही व वित्तीय नियमांचे उल्लंघन करणारी आहे. अशा सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करून १ महिन्याच्या आत समितीस अहवाल सादर करावा अशा सूचना समितीने विभागास केल्यानंतरही अद्यापही ही माहिती समितीस अप्राप्त आहे. अतः या प्रकरणी तातडीने चौकशी करून संबंधितांवर केलेल्या कारवाईसह अहवाल समितीस १ महिन्याच्या आत सादर करण्यात यावा तसेच राज्य शासनाकडून प्राप्त होणारी रक्कम व त्यात महानगरपालिकांची अंशदानाची रक्कम त्याचवेळी समाविष्ट करून ज्या प्रयोजनासाठी निधी दिलेला आहे त्याच प्रयोजनासाठी विहित मुदतीत वापरण्यात यावा व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.७ " पायाभूत सुविधांची पर्याप्तता "**

**४.१.७.१ " अग्निशमन केंद्रांची अपर्याप्त संख्या "**

**अभिप्राय**

**१.२३** केंद्र शासनाच्या गृह व्यवहार मंत्रालयाने (MHA) प्रस्थापित केलेल्या अग्नि सल्लागार स्थायी परिषद (SFAC) या शिखर संस्थेने प्रतिसादासाठीचा कालावधी, धोका आणि लोकसंख्या यांच्या आधारावर अग्निशमन सेवांसाठी प्रमाणके निश्चित केली. या प्रमाणकांनुसार शहरी क्षेत्रात दर १० चौ.कि.मी. साठी एक अग्निशमन केंद्र आणि ग्रामीण क्षेत्रांत दर ५० चौ. कि.मी. साठी एक अग्निशमन केंद्र असणे आवश्यक आहे. अग्निशमन सेवांमध्ये योग्य ते सुधारणात्मक बदल करण्यासाठी देशात आगीचे धोके आणि जोखीम यांचे विश्लेषण करण्यासाठी केंद्र शासनाच्या NDRF आणि नागरी सुरक्षा (अग्निशमन), MHA महासंचालक यांनी RMSI (एक जागतिक IT सेवा कंपनी) नियुक्त केली RMSI ने त्यांच्या अहवालात लोकसंख्या (११.२३ कोटी) आणि क्षेत्रफळ (३.०८ लाख चौ.कि.मी.) या निकषांनुसार महाराष्ट्र राज्यात १२३१ अग्निशमन केंद्रांची गरज वर्तविली होती तिच्याशी तूलना करता राज्यातील शहरी क्षेत्रात फक्त १५४ अग्निशमन केंद्रे होती (७३ टक्के तूट). निवडक आठ महानगरपालिकांनी वर्ष २०१०-१५ दरम्यान अग्निशमन सेवांमध्ये योग्य ते सुधारणात्मक बदल करण्यासाठी तयार केलेल्या बृहद आराखड्यांच्या आणि शमन आराखडयांच्या (mitigation plan) लेखापरीक्षा तपासणीत आढळून आले की, महानगरपालिकांमधील लोकसंख्या (२.६७ कोटी) आणि क्षेत्रफळ (१८३६ चौ.कि.मी.) या निकषांचा विचार करता अग्निशमन केंद्रांच्या संख्येत १०५ इतकी तूट होती (६० टक्के). अग्निशमन केंद्रांच्या अतीव कमतरतेमुळे विद्यमान अग्निशमन केंद्रांवरील भार वाढण्याची आणि आगीची सूचना मिळाल्यावर प्रतिसादासाठी अधिक वेळ लागण्याची आणि मनुष्यहानी व मालमत्तेच्या हानीच्या घटना वाढण्याची शक्यता आहे. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिका जेथे दर १३.५१ चौ.कि.मी. साठी एक अग्निशमन केंद्र उपलब्ध होते, त्या व्यतिरिक्त उर्वरीत सात महानगरपालिकांमध्ये शहरी क्षेत्रासाठी दर १० चौ.कि.मी. साठी एक अग्निशमन केंद्र असे प्रमाणक असतांना त्याऐवजी दर ३६.५७ चौ.कि.मी. साठी एक केंद्र उपलब्ध होते. ग्रामीण क्षेत्रात दर ५० चौ.कि.मी. साठी एक अग्निशमन केंद्र असे प्रमाणक असतानाही सात महानगरपालिकांमधील ग्रामीण क्षेत्रात एकही अग्निशमन केंद्र उपलब्ध नव्हते.

**१.२४** सप्टेंबर, २०१४ च्या बृहद आराखड्यात विद्यमान ३३ अग्निशमन केंद्रांव्यतिरिक्त २६ नवीन अग्निशमन केंद्रे बांधण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रस्तावित केले. परंतु, जमिनीची अनुपलब्धता (१८ प्रकरणे), जमीन निश्चित केलेली असणे परंतु ती इतर प्रयोजनांसाठी राखीव असल्याचे आढळणे (सात प्रकरणे) आणि न्याय प्रविष्ट (एक प्रकरण) या कारणांमुळे मार्च २०१६ पर्यंत कोणतेही बांधकाम सुरू करता येऊ शकले नव्हते. या आधी घडलेल्या आगीच्या भीषण घटनांच्या आपत्कालीन परिस्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेने बचाव कार्यासाठी घेतलेल्या अत्युच्च/ प्रदीर्घ कालावधीस विचारात घेता नवीन अग्निशमन केंद्रांच्या बांधकामात विलंब झाल्यास आगीची सूचना मिळाल्यावर त्वरीत व प्रभावी रीतीने बचावकार्य सुरू करण्याच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षमतेवर आणखी प्रतिकुल परिणाम होईल असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.२५** सद्यःस्थितीत बृहन्मुंबई मनपाच्या नियंत्रणाखाली मुंबई अग्निशमन दलाची ३४ अग्निशमन केंद्रे आहेत. तसेच अग्नि सल्लागार स्थायी परिषदेच्या (SFAC) शिफारशी व RMSI व CRISIL यांच्या अभ्यासानुसार, प्रतिसादाचा कालावधी लोकसंख्येची क्षमता व आगीची जोखीम व धोके या प्रमाणकांनुसार मुंबई महानगरासाठी अतिरिक्त ३५ अग्निशमन केंद्रांची गरज आहे. त्यातील २६ नवीन केंद्रांसाठी जमिनीची आवश्यकता विकास नियंत्रण आराखड्यात दर्शविण्यात आली आहे. त्यापैकी ६ ठिकाणी जागा निश्चित करण्यात आली आहे. तर काही ठिकाणी प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. अन्य ठिकाणी जागा घेणेसंदर्भात कार्यवाही सुरू असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

**१.२६** याव्यतिरिक्त लघु अग्निशमन केंद्राची (Mini Fire Station) संकल्पना बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरू करण्यात आलेली असून महानगरपालिकेच्या अस्तित्वात असलेल्या भूखंड / आस्थापनांच्या २० ठिकाणे यासाठी निश्चित करण्यात आलेली आहेत. या लघु अग्निशमन केंद्राच्या उभारणीसाठी व वाहन खरेदीसाठी २०१६-१७ साठी आवश्यक अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे मनपाने नवीन अग्निशमन केंद्र व लघु अग्निशमन केंद्रासाठी अतिरिक्त ६५४ अग्निशामकांच्या पदांना मंजुरी दिलेली आहे व रिक्त पदे मिळुन एकूण ७७४ अग्निशामकांची भरती प्रक्रिया पूर्ण झालेली असून निवड झालेल्या उमेदवारांचे प्रशिक्षण लवकरच सुरू होईल असे समितीसमोर सांगण्यात आले. परंतु यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून लवकरात लवकर ही केंद्रे पूर्ण करणे अत्यावश्यक आहे व मुंबई शहराचे महत्त्व पाहता यासाठी कालबद्ध पद्धतीने ठोस आराखडा तयार करण्याची नितांत आवश्यकता आहे. ऑकोमोडेशन रिझर्व्हेशन पॉलिसीअंतर्गत अधिकाधीक जागा मिळविण्याचा प्रयत्न महानगरपालिकेने करणे आवश्यक आहे.

**१.२७** सद्यःस्थितीत नाशिक येथे १८ अग्निशमन केंद्रांची आवश्यकता आहे. त्यापैकी ०६ अग्निशमन केंद्र अस्तित्वात असुन उर्वरित १२ अग्निशमन केंद्रांसाठी नाशिक शहराच्या मंजूर झालेल्या नवीन शहर विकास आराखड्यामध्ये १२ जागा आरक्षित दाखविल्या आहेत. उपलब्ध निधीनुसार प्राधान्य क्रमाने अग्निशमन केंद्रे बांधून घेणेबाबत कार्यवाही सुरू करणेत येईल असे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच अमरावती महानगरपालिका क्षेत्रात एक नवीन उपकेंद्र सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. सदर नवीन केंद्र सुरू झाल्यावर प्रतिसादासाठी आणि मनुष्य हानी व मालमत्तेच्या हानी नियंत्रण अधिक प्रभावीपणे करणे शक्य होईल. नागपूर महानगरपालिका हद्दीमध्ये सद्यःस्थितीत ८ अग्निशामक स्थानके कार्यरत आहेत. नवीन आकृतीबंधानुसार १३ स्थानकांना मान्यता प्राप्त झाली आहे. नागपूरला बरीच शासकीय जमीन उपलब्ध आहे ती मिळविण्याचा प्रयत्न करण्यात यावा. नागपूर अग्निशामक विभागाने नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांना मेट्रो रिजन अंतर्गत येणाऱ्या क्षेत्रात नवीन स्थानकाकरीता जागा मिळण्याकरिता पत्रव्यवहार सुरू असल्याचे समितीस सांगण्यात आले. ठाणे महापालिका क्षेत्रात निकषांप्रमाणे किमान १४ अग्निशमन केंद्रांची आवश्यकता असून सद्या महापालिका क्षेत्रामध्ये केवळ ५०५ अग्निशमन केंद्रे अस्तित्वात असल्याने स्टँडींग फायर ॲडव्हायझरी कौन्सिल (S.F.A.C.) चे निकषानुसार ठाणे महापालिका क्षेत्रासाठी अतिरिक्त ०९ अग्निशमन केंद्रांची आवश्यकता आहे. महापालिकेचे क्षेत्रफळ, भौगोलिक परिस्थिती, लोकसंख्या तसेच अस्तित्वात असलेल्या अग्निशमन केंद्रांची ठिकाणे व अग्निशमन केंद्राचा प्रतिसाद कालावधी कमाल ०५ मिनिटे आवश्यक आहे. हा निकष ह्या सर्व गोष्टीचा विचार करून एकंदर ०९ ठिकाणी अतिरिक्त अग्निशमन केंद्रे प्रस्तावित करण्यात आली आहे.

**१.२८** अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत (सन २००१ च्या जनगणनेनुसार) औरंगाबाद महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी पाच अग्निशमन केंद्राची उभारणासाठी कार्यवाही चालू आहे. पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात सद्यःस्थितीमध्ये एकूण १३ अग्निशमन केंद्रे कार्यान्वित आहेत. पुणे मनपाच्या भवन रचना विभागाकडून उपलब्ध निधीच्या अनुषंगाने आणखीन ५ ठिकाणी नवीन अग्निशमन केंद्रे विकसित करण्याची कार्यवाही चालू असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

**१.२९** सदर तीन ठिकाणी दाट लोकवस्ती, झोपडपट्टी, अरुंद गल्ल्या, रस्ते अशी परिस्थिती असल्याने विनाविलंब मदतकार्य पोहोचविण्याच्या दृष्टीने विकसित करण्यात आली आहेत. वाहनाच्या हालचालीसाठी व बचावकार्याचे सरावासाठी सदर तीन केंद्रातील कर्मचारी व वाहने मध्यवर्ती केंद्रामध्ये बोलावली जातात.

**शिफारस :**

**१.३० सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी अपर्याप्त अग्निशमन केंद्र याबाबत गंभीर आक्षेप नमूद केले आहेत. समितीने या संदर्भात साक्ष घेतली असता अग्निशमन केंद्राच्या संख्येबाबत कोणताही ठोस आराखडा उपलब्ध नसल्याचे दिसून येते. महानगरपालिकेअंतर्गत असलेली लोकसंख्या, वाहतूकीची वर्दळ, इमारतींची संख्या इ. बाबींच्या अनुषंगाने त्याठिकाणी आवश्यक असणाऱ्या अग्निशमन केंद्राची निश्चिती ही अतिशय अभ्यासपूर्णरितीने व गुणवत्तापूर्वक होणे आवश्यक आहे. त्यातही मंजूर करण्यात आलेले अग्निशमन केंद्र देखील अद्याप अनेक कारणास्तव सुरू होवू शकले नाही ही गंभीर बाब आहे. काही ठिकाणी जागेवर आरक्षण असणे, काही ठिकाणी प्रकरण न्यायप्रविष्ट असणे, काही ठिकाणी जमिनीची उपलब्धता नसणे, भूसंपादन करण्याकरिता लागणारा विलंब व येणाऱ्या अडचणी इ. अनेक कारणास्तव ही केंद्रे पूर्ण क्षमतेने सुरू होवू शकली नाहीत. तसेच याच्या पुर्ततेसाठी कोणताही कालबद्ध कार्यक्रम सद्य:स्थितीत अस्तित्वात नाही ही देखील गंभीर बाब आहे. महालेखाकारांनी केवळ नमुन्यादाखल ८ महानगरपालिकांसंदर्भात हे लेखापरिक्षण केले असता अशा गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत. संपूर्ण राज्यातील सर्व महानगरपालिकांमध्ये निश्चितच अशीच परिस्थिती असणार याची समितीला खात्री आहे. याच्या पुर्ततेसाठी विशेष धडक कृती कार्यक्रम विभागाच्या स्तरावरुन राबविणे अत्यंत आवश्यक आहे. विभागाने जमिनीवर असलेल्या आरक्षणाचा पुन्हा आढावा घ्यावा, भूसंपादनाच्या किचकट व वेळखाऊ प्रक्रियेतून मार्ग काढण्यासाठी ॲकोमोडेशन रिझर्व्हेशन पॉलिसीला विभागाने प्राधान्य दिले आहे. त्याअनुषंगाने तातडीने व नियोजनबद्ध रितीने कार्यवाही करण्यात यावी. या मंजूर अग्निशमन केंद्राच्या भूसंपादन, बांधकाम व कार्यान्वयन या सर्व बाबींसाठी विभागाने ठोस आराखडा तयार करून तो कालबद्ध पद्धतीने राबविण्यात यावा. अनेक शहरात महानगरपालिकेच्या अथवा शासनाच्या मालकीच्या अनेक जमीनी उपलब्ध असतात. खाजगी जमिनी भूसंपादन करण्यास येणाऱ्या अडचणी पाहता विभागाने या केंद्रासाठी शासकीय जमीनी उपलब्ध करून घेण्यास प्रथम प्राधान्य द्यावे. शासकीय जमिनी यासाठी उपलब्ध होवू शकल्यास त्याची खातरजमा करून आवश्यक ती पुढील कार्यवाही तातडीने करण्यात यावी व प्रलंबित सर्व अग्निशमन केंद्रांचे कार्यान्वयन तातडीने व कालबद्ध पद्धतीने करण्यात यावे. ज्याठिकाणी महानगरपालिकेची जागा उपलब्ध असेल व अग्निशमन केंद्रासाठी ती सोईस्कर असेल तेथे अग्निशमन केंद्र उभारण्याबाबतच्या सूचना विभागाकडून महानगरपालिकेला देण्यात येतील असे आश्वासनही विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर दिले. त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. अग्निसुरक्षा अभियानातील अनुदानातून निधीची व्यवस्था करण्यात यावी. तरीही निधी कमी पडल्यास त्यासाठी आवश्यक असणारा उर्वरित निधी राज्य शासनाने/महानगरपालिकेने तातडीने उपलब्ध करून द्यावा, आवश्यक तितक्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी तसेच वाहने व आगीचे बंब देखील पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.७.२ " अग्निशमन केंद्रे सुसज्ज नसणे "**

**अभिप्राय :**

**१.३१** आगीच्या घटनांमध्ये बचावकार्य त्वरीत सुरू करण्यासाठी कार्यक्षम व सुसज्ज अग्निशमन विभागांची सेवा आवश्यक असते. आठ निवडक महानगरपालिकांपैकी सात मध्ये (MCGM व्यतिरिक्त) २४ अग्निशमन केंद्रांच्या संयुक्त प्रत्यक्ष तपासणीत अनेक त्रुटी आढळून आल्या. २४ अग्निशमन केंद्रांपैकी दोन मध्ये मुख्य रस्त्याकडून अग्निशमन केंद्रापर्यंत जाणारा पोहोच रस्ता अतिशय गजबजलेला असल्याचे आढळून आले. ११ अग्निशमन केंद्रामध्ये अग्निशमन वाहनांच्या हालचालींसाठी पुरेशी जागा उपलब्ध नव्हती. तसेच, अग्निशमन दलाला बचाव कार्याचा सराव करता यावा. यासाठी आवश्यक असणारे आभासी ड्रील टॉवर्स १५ अग्निशमन केंद्रांमध्ये उपलब्ध नव्हते. तसेच एप्रिल, २०१२ च्या राष्ट्रीय आपत्कालीन व्यवस्थापन मार्गदर्शक सूचनांच्या (प्रकरण ७) परिशिष्ट-१ नुसार अग्निशमन वाहने, उपकरणे आणि साधनसामग्री सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक अग्निशमन केंद्रात एक कायमस्वरूपी इमारत असावी. परंतु सात अग्निशमन केंद्रात आगीचे बंब कायमस्वरूपी इमारतीऐवजी रस्त्याच्या कडेला असलेल्या पत्र्याच्या आडोशाखाली ठेवण्यात येत होते. या व्यवस्थेमुळे वाहनांवर लहरी हवामानाचा परिणाम होत होता आणि त्यांचे अपघात व नुकसान होण्याचाही धोका होता. २४ अग्निशमन केंद्रांपैकी ११ मध्ये जलस्त्रोत, फायर हायड्रंट आणि उपसंयंत्रे उपलब्ध नव्हती. परिणामी दूरवरच्या जलस्त्रोतामधून पाणी उपसून ते मोठ्या पाण्याच्या टँकरमधून आगीच्या घटनास्थळी वाहून न्यावे लागत होते. तसेच सार्वजनिक रस्त्यालगत व इतर ठिकाणी बाह्य फायर हायड्रंट उपलब्ध नव्हते किंवा कार्यरत नव्हते. त्याचप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिका (MCGM) च्या स्थानिक कार्यक्षेतील १०६३७ फायर हायड्रंटपैकी केवळ १२६० (१२ टक्के) कार्यरत होते. परंतु, MCGM च्या अग्निशमन विभागाने उर्वरीत ९३७७ फायर हायड्रंट कार्यरत करण्यासाठी कोणतीही कार्यवाही केली नव्हती. खरेतर गरीब नगर झोपडपट्टी, बांद्रा (४ मार्च २०११) मंत्रालय इमारत (२१ जून २०१२) आणि लोटस नीलकमल संयुक्त व्यापारी संकुल, अंधेरी (१८ जुलै २०१४) या तीन ठिकाणी घडलेल्या आगीच्या भीषण अपघातांमध्ये बचावकार्याच्या वेळी

MCGM च्या अग्निशमन विभागाची अग्निशमन क्षमता अत्यंत कमकुवत ठरण्यास कारणीभूत झालेल्या कारणांपैकी आवारातील अकार्यरत फायर हायड्रंट हे एक कारण होते. ऑगस्ट, २००६ च्या SFAC च्या प्रमाणकानुसार दर ५०००० लोकसंख्येसाठी एक आगीचा बंब आणि दर तीन ते दहा लाख लोकसंख्येसाठी एक बचाव कार्याचे वाहन असण्याची तरतूद आहे. लोकसंख्येच्या निकषाच्या आधारावर RMSI नी त्यांच्या डिसेंबर, २०११ च्या अहवालात राज्यात १२६८ आगीचे बंब (८१ टक्के) आणि ३७ बचाव कार्याची वाहने (६४ टक्के) कमी असल्याचे स्पष्टपणे दर्शविले होते. निवडक आठ महानगरपालिकांनी तयार केलेल्या बृहत आराखड्यांच्या आणि शमन आराखड्यांच्या लेखापरीक्षा तपासणीतदेखील आगीचे बंब व बचाव वाहने यांच्या संख्येत अनुक्रमे ७६ टक्के व ७३ टक्के तूट असल्याचे आढळून आले होते.

**१.३२** महानगरपालिकांच्या स्थानिक कार्यकक्षेतील औद्योगिक आणि धोकादायक क्षेत्रात उद्भवणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितींचा सामना करण्यासाठी वापरली जाणारी सुकी रासायनिक पावडर वाहणारे बंब (Dry chemical powder tenders) आणि स्वतंत्र श्वसन उपकरण संच वाहने यांच्या बरोबरच अग्निशमन सेवांकडून वापरली जाणारी विशिष्ट उपकरणे ही तांत्रिक दृष्ट्या प्रगत यंत्रे / यंत्रसामुग्री असतात जी पाणी आणि फेस, टर्न टेबल लॅडर / हायड्रोलीक प्लॅटफॉर्म / स्काय लिफ्ट, श्वसन उपकरण संच यासारख्या वेगवेगळ्या प्रकारच्या साधनसामग्री आणि अग्निशमन माध्यमांना वाहून नेण्यास सक्षम असतात. मात्र डिसेंबर २०११ च्या RMSI च्या अहवालात तसेच आठ महानगरपालिकांनी तयार केलेल्या बृहत आराखड्यांच्या व शमन आराखड्यांच्या लेखापरीक्षा तपासणीत देखील राज्यात या सर्व उपकरणांच्या संख्येत तूट असल्याचे आढळून आले होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.३३** बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत एकूण १०४७० हायड्रंटस (नळखांब) उपलब्ध असून त्यापैकी फक्त ११३१ हायड्रंटस कार्यरत आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने हायड्रंटस कार्यरत नसण्यासाठी मुख्य कारणे म्हणजे कपलिंग व हायड्रंट व्हॉल्व्हची चोरी व रस्ते दुरूस्तीमध्ये मुख्य व्हॉल्व्ह जमिनीखाली गाडला जाणे हे होय. त्याचप्रमाणे पदपथावरील फायर हायड्रंट हे झोपडपट्टी वासियांनी अतिक्रमित केलेले आहेत. तसेच सदर फायर हायड्रंटमध्ये फक्त त्या क्षेत्रास पाणीपुरवठा करण्याच्या वेळी पाणी उपलब्ध असते, तसेच पाण्याच्या कमी दाबामुळे देखील हे हायड्रन्ट पूर्ण क्षमतेने कार्यरत होऊ शकत नाही. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून मुंबईचे भौगोलिक स्वरुप व मर्यादा तसेच वाढती लोकसंख्या, अरुंद रस्ते, वाहतूक कोंडी इत्यादी पाहता तसेच मुंबई, मुंबई उपनगरे, नवी मुंबई व ठाणे येथील उत्तुंग इमारतींचे वाढते प्रमाण पाहता अग्निशमन यंत्रणा याठिकाणी अद्ययावत, सुसज्ज व तत्परतेने कार्यरत ठेवणे आवश्यक आहे. या शहरांव्यतिरिक्त अन्य ठिकाणी जागेच्या उपलब्धतेची मर्यादा नसल्यामुळे या ठिकाणी उंच इमारतींचे प्रमाण तुलनेने अतिशय कमी असते. परंतु मुंबई, मुंबई उपनगरे, नवी मुंबई व ठाणे या ठिकाणी गजबजलेल्या वस्ती, जागेची कमतरता, उत्तुंग इमारती, अरुंद रस्ते, रहदारीचे प्रमाण, अनधिकृत पार्कींग व बांधकामे अशा अनेक अडचणींमध्ये सक्षमतेने अग्निशमन यंत्रणा कार्यरत ठेवणे हे तुलनात्मकदृष्ट्या नक्कीच आव्हानात्मक आहे. त्यामुळे ज्या निकषावर संपूर्ण राज्यात अग्निशमन यंत्रणा कार्यरत आहे त्याच निकषावर व नियोजनावर ती मुंबईत कार्यरत राहू शकत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष आगीच्या वेळी पाणी उपलब्ध होत नाही. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणातील आगींच्या वेळी अग्निशमन दल जवळ असलेली तळे, नदी, समुद्र येथून दलाकडे उपलब्ध असलेल्या पोर्टेबल फायर फायटिंग पंपाद्वारे पाणी उपसून अग्निशमनाकरिता वापरले जाते.

**१.३४** तसेच नाशिक महानगरपालिकेत ०२ अग्निशमन केंद्रांपैकी ०१ पंचवटी येथील अग्निशमन केंद्राचे सुधारित बांधकाम सुरू करणेत आलेले आहे. दुसरे अग्निशमन केंद्र सिडको (नवीन नाशिक) येथे असून सदर अग्निशमन केंद्राचे शेड सन १९९३ साली सिडको प्रशासनाने बांधुन महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेले आहे. सदर अग्निशमन केंद्राच्या बांधकामाबाबत निधी उपलब्धतेनुसार कार्यवाही सुरू करणेत येईल.

**१.३५** तसेच नागपूर शहरामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये काही अग्निशामक स्थानक सुरू करण्याकरिता ठराविक ठिकाणी मोजक्याच जागा दिलेल्या आहेत. सध्या नागपूरच्या लोकसंख्येत झपाट्याने वाढ झाल्यामुळे सुरू असलेल्या स्थानकाच्या अवतीभोवती अतिशय गजबजलेले क्षेत्र निर्माण झालेले आहे. तसेच पूर्वीकाळी मिळालेल्या स्थानकाला कमी जागा मिळाल्याने ड्रील टॉवर उभारण्यात आले नाही. तसेच मिळालेल्या जागेवरच अग्निशमन वाहने, उपकरणे आणि साधनसामग्री सुरक्षित ठेवण्यासाठी व यंत्रसामग्री खराब होऊ नये याकरिता विभागाने प्रत्येक अग्निशमन केंद्रात काही प्रमाणात कायमस्वरुपी इमारती तसेच टीन शेडची व्यवस्था तयार करण्यात आलेली आहे. विभागातर्फे नवीन बांधकाम करण्यात येणाऱ्या स्थानकामध्ये ड्रील टावरच्या बांधकामाचे करण्याचे प्रस्तावित आहे असे समितीसमोर सांगण्यात आले.

**१.३६** नवीन आगीचे बंब व बचाव वाहने खरेदी करण्याकरिता महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये पुरेशी तरतूद नसल्याने तसेच विभागाला शासनाकडून अनुदान प्राप्त न झाल्याने नवीन वाहनांची आणि नवीन सुकी रासायनिक पावडर, वाहनाचे बंब व स्वतंत्र श्वसन उपकरण संच वाहने खरेदी केली नाहीत असे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच औरंगाबाद येथे सिडको येथे ड्रील टॉवर बांधकाम करण्याची कारवाई चालू करण्यात येईल व सिडको येथे पाणी साठविण्यासाठी अंडरग्राऊंड हौद बांधकाम करून हायड्रन्ट सिस्टीमचे प्रस्ताव विचारधीन आहे. परंतु औरंगाबाद येथील पाण्याची टंचाई पाहता हायड्रन्ट किती प्रमाणात यशस्वी होतील हा देखील प्रश्न उपस्थित होतो. त्याचप्रमाणे पुणे येथील कसबा पेठ केंद्राची जमीन वादग्रस्त व न्यायालयीन प्रक्रियेत असल्याने त्या ठिकाणी भूमिगत जलस्त्रोत निर्माण होऊ शकत नाही. वास्तविक तेथे फायर स्टेशन सुरू आहे.

त्यामुळे जो न्यायालयाचा निर्णय येईस्तोवर तेथील पाण्याचा स्त्रोत वापरण्यासंदर्भात मा.न्यायालयाला विनंती करावी असेही समितीने विदीत केले. नवी मुंबई येथे अग्निशमन मुख्यालय वाशी येथे नवीन ड्रील टॉवर बांधणीचे काम सुरू असून इतर सर्व अग्निशमन केंद्रामध्ये ड्रिल टॉवर बांधणीचे काम प्रस्तावित करण्यात आलेले आहे. तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात एकूण ५ Fire fighting वाहने खरेदी करण्यात येणार आहेत. दिनांक ३१ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व नगरपरिषदा, नगरपंचायती व " ड " वर्ग महानगरपालिका यांच्या अग्निशमन सेवेतील तुट भरून काढण्याकरिता व राज्यातील अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्याकरिता विविध आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने " महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान " राबविण्याचा निर्णय घेतला असून या नागरी स्थानिक संस्थांना अग्निशमनसेवेतील तुट भरून काढण्याकरिता निधी उपलब्ध करून दिला जातो. राज्यातील अ+,अ,ब व क वर्ग महानगरपालिका अर्थिकदृष्ट्या सक्षम असल्यामुळे या अभियानाअंतर्गत सदर महानगरपालिकांना निधी उपलब्ध करून दिला जात नाही असेही समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारशी :**

**१.३७ अनेक ठिकाणी अग्निशमन केंद्रे सुसज्ज नाहीत असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. जागेची अनुपलब्धता व कमतरता, न्यायालयीन प्रकरणे, निधीची कमतरता इत्यादी अनेक कारणास्तव ही अग्निशमन केंद्रे सुसज्ज नव्हती. केवळ नमुन्यादाखल केलेल्या लेखापरिक्षणात काही महानगरपालिकांमध्ये या बाबी निदर्शनास आल्या. परंतु राज्यात सर्वच महानगरपालिकांमध्ये निश्चितच यापेक्षा वेगळी परिस्थिती अस्तित्वात असणार नाही. मुंबईमध्ये १०४७० नळखांब (हायड्रन्ट) स्वातंत्र्यपूर्व कालापासून उपलब्ध आहेत. परंतु त्यापैकी केवळ ११३१ हायड्रन्ट सद्य:स्थितीत कार्यरत आहेत. झोपडपट्टीने व्यापलेले क्षेत्र, रस्त्याच्या कामात व्हॉल्ब रस्त्याखाली गाडला जाणे, व्हॉल्बची चोरी होणे, पाण्याची अनुपलब्धता इ. अनेक कारणास्तव हे हायड्रन्ट सद्य:स्थितीत कार्यरत नाहीत. इतकेच नव्हेतर या हायड्रन्टना २४ तास पाणीपुरवठा होत नसून फक्त त्या क्षेत्रात पाणी पुरवठा होते त्यावेळीच पाणी उपलब्ध असते. त्यामुळे या हायड्रन्टची आपत्कालिन परिस्थितीत सद्य:स्थितीत उपयोगिता नाही. अधिकाधिक हायड्रन्ट हे एअर काढण्यासाठी किंवा दुषित (contaminated) पाण्याला बाहेर काढण्यासाठी वापरण्यात येतात. परिणामी इतक्या मोठ्या संख्येने उपलब्ध असलेल्या हायड्रन्टची कोणतीही उपयोगिता राहिलेली नाही. या ब्रिटीशकालीन हायड्रन्टसाठी त्यावेळी भूमिगत जलवाहिन्या व भूमिगत जलटाक्या उभारण्यात आल्या होत्या. परंतु आता त्या देखील देखभाल दुरुस्तीअभावी कार्यरत नाहीत. या हायड्रन्टच्या देखभाल दुरुस्तीसाठी येणारा कोट्यावधीचा खर्च पाहता त्याचे पुनरुज्जीवन करणे महानगरपालिकेला आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. त्यामुळे पर्यायी अग्निशमन यंत्रणा उभारण्यावर महानगरपालिकेने भर दिला आहे. २४ तास पाण्याची उपलब्धता नसणे, पाणी कपात, कमी दाबाने पाणी पुरवठा होणे या सर्व अडचणींमुळे हे हायड्रन्ट आता निकामी झालेले आहेत. त्याऐवजी पर्यायी व्यवस्था विभागाने करण्यावर अधिक भर दिला असून जास्त साठवण क्षमता असलेले टँकर वा अग्निवाहन विभागाने घेतलेले आहे. तसेच जलभरणा केंद्राची संख्या देखील वाढविण्यात आलेली आहेत असे समितीसमोर सांगण्यात आले. तरीही या ब्रिटीशकालिन नळखांब व्यवस्थेचा योग्य तो उपयोग होणेसाठी तज्ञांचा सल्ला घेवून अभ्यासपुर्ण रितीने व आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य तोडगा काढून आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी. तसेच जलभरणा केंद्रावर अग्निशमन वाहना व्यतिरिक्त अन्य कारणास्तव देखील पाणी भरण्यात येते. काही जलभरणा केंद्रे केवळ अग्निशमन विभागासाठीच आरक्षित ठेवण्याच्या पर्यायाचा देखील विभागाने विचार करावा. याअगोदर मुंबईत मोठ्या प्रमाणावर विहिरी होत्या ज्या आता बुजविण्यात आलेल्या आहेत. या संदर्भातील माहिती आजही जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध आहे. त्या विहिरींचे देखील पुनरुज्जीवन केल्यास पाण्याची उपलब्धता वाढू शकते. कोणत्याही ठिकाणी आग लागल्यास अत्यंत महत्त्वाचा विषय पाण्याची उपलब्धता हा आहे. मुंबईसह अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात नळखांब (हायड्रन्ट) यंत्रणा उपलब्ध आहे. घटनास्थळी आग विझविण्यासाठी अत्यंत महत्वाचा घटक हा पाणी असून मुबलक प्रमाणात ते उपलब्ध न झाल्यास आगीवर नियंत्रण आणणे अशक्य होते. प्रत्येकवेळी बंब भरुन आणेपर्यंत बराच कालावधी जातो. बऱ्याचदा इमारतीच्या टाकीतून पाणी वापरण्यात येते. परंतु ते देखील आगीची तीव्रता वाढल्यास अपुरे पडते. यासाठी आग विझविण्यासाठी ठिकठिकाणी पाण्याचे स्त्रोत उपलब्ध करून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. सद्य:स्थितीत मुंबई व अन्य ठिकाणी ब्रिटीशकालीन अस्तित्वात असलेली हायड्रन्ट सिस्टिम संपुष्टात आलेली आहे. रस्त्यांच्या कामांमुळे तर अनेक ठिकाणचे हायड्रन्ट दिसून देखील येत नाहीत. ज्या ठिकाणी दिसून येतात त्यात पाण्याची उपलब्धता नाही. अशा परिस्थितीत पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत पुर्नजिवीत करण्याची नितांत आवश्यकता असून हायड्रन्टना देखील २४ तास पाण्याची उपलब्धता असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. जलभरणा केंद्राची संख्या देखील वाढविण्यात यावी. यासंदर्भात पाश्चात्य देशांमध्ये कार्यरत असलेल्या आधुनिक अग्निशमन व्यवस्थेचा देखील सखोल अभ्यास करून त्याचा अवलंब करण्यात यावा. उंच इमारतीतील पाण्याच्या टाकीमध्ये देखील आगीसारख्या आपत्कालिन परिस्थितीसाठी राखीव पाणीसाठा ठेवणे अनिवार्य करण्यात यावे. अशा उपाययोजना राबवून अग्निशमन केंद्र अधिक सुसज्ज करण्याबाबतची कार्यवाही विभागाने करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१.३८ अग्निशमन केंद्रांना सुसज्ज करण्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री व वाहन खरेदी ची प्रक्रिया अत्यंत वेळखाऊ व किचकट असल्यामुळे याची उपलब्धता तातडीने होवू शकत नाही. जोपर्यंत ही यंत्रसामग्री व वाहने विभागाकडे प्राप्त होतात तोपर्यंत त्यापेक्षाही आधुनिक दर्जाची साधनसामुग्री उपलब्ध झालेली असते. शासनाच्या व महानगरपालिकेच्या स्तरावरुन अन्य विभागांसाठी राबविण्यात येणारी खरेदी प्रक्रिया व कार्यपद्धतीचे पालन व तुलना अग्निशमन विभागाच्या कार्यपद्धतीशी करणे सुरक्षिततेच्यादृष्टीने हिताचे ठरणारे नाही. अत्यंत विशेष बाब म्हणून या विभागाला कालबद्ध पद्धतीने ही सर्व प्रक्रिया राबवून विहित वेळेत ही यंत्रसामग्री व वाहने उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात यावी. जीवित व वित्त हानी कमी करण्याकरिता उत्कृष्ट सेवा प्रदान करणेसाठी पायाभूत सुविधा (अग्निशमन केंद्र आणि साधनसामुग्री/ विशिष्ट उपकरण) मधील तफावत दूर करण्यासाठी महानगरपालिकेने सर्वंकष प्रयत्न करावे. अग्निशमन सेवांच्या पायाभुत सुविधा व साधनसामग्रीच्या उपलब्धतेतील वाढत्या तुटीमुळे अग्निशमन कर्मचारी आणि समाजाला असलेले आगीचे धोके अधिक वाढतात, त्यामुळे राज्य शासनाने राज्यातील अग्निशमन सेवांच्या सध्याच्या पायाभूत सुविधांचा आढावा घ्यावा आणि नवीन भांडवली मत्तांसाठी आणि जुन्या मत्ता बदलण्यासाठी/पुनरूज्जीवीत करण्यासाठी सातत्याने निधीची तरतूद करून या तुटी कमी कराव्यात व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१.३९ अग्निशमन केंद्रे सुसज्ज करतानाच अग्निशमन अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी देखील त्याठिकाणी योग्य सोयीसुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. विशेषतः कर्मचारी निवासस्थाने, चेंजींग रुम, व्यायामशाळा, वैद्यकीय सुविधा केंद्र, लॉकर रुम याचा देखील समावेश त्यात असणे आवश्यक आहे. ही अग्निशमन केंद्रे अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने देखील सुसज्ज असण्याच्या संदर्भात योग्य ती कार्यवाही विभागाच्या स्तरावरुन करण्यात यावी. यासाठी आवश्यक असणारा निधी अग्रक्रमाने देण्यात यावा, अर्थसंकल्प तयार करताना अग्निशमन कार्यासाठी लागणाऱ्या निधीला प्राधान्य देण्यात यावे तसेच यात कोणतीही कपात करु नये याचा देखील निर्णय शासन/महानगरपालिका स्तरावरुन घेण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.८ " मनुष्यबळाची / कर्मचाऱ्यांची कमतरता "**

**अभिप्राय :**

**१.४०** अग्निशमन विभागात (महानगरपालिका स्तरावर), CFO (अग्निशमन सेवांचा सर्वंकष प्रमुख) असावा ज्यास उप CFO, विभागीय अधिकारी (DOs), सहाय्यक विभागीय अधिकारी (ADOs) यांनी सहाय्य करावे. क्षेत्रीय स्तरावर, प्रत्येक सर्वसाधारण अग्निशमन केंद्रात केंद्र अधिकारी, अग्निशमन प्रणेते, अग्निशमन कर्मचारी, आगीच्या बंबांसाठी वाहनचालक, रूग्णवाहिकेचे वाहनचालक, आकाशवाणी / बिनतारी यंत्रचालक, तंत्रज्ञ, मेकॅनिक इत्यादी सारखे अनेक महत्वपूर्ण कर्मचारी तैनात असावेत. परंतु RMSI अहवालानुसार राज्यात कर्मचाऱ्यांच्या (महत्वपूर्ण कर्मचाऱ्यांसह) संख्येत १२१५९ इतकी तूट होती त्याचवेळी बृहद / शमन आराखडयांनुसार निवडक आठ महानगरपालिकांमधील कर्मचाऱ्यांच्या संख्येत, १७३१ इतकी तुट असल्याचे दर्शविण्यात आले होते. अशा प्रकारे RMSI अहवाल प्रसिद्ध होऊन चार वर्षापेक्षा अधिक काळ उलटूनही राज्य शासन आणि संबंधित महानगरपालिकांनी अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांच्या संख्येतील तूट कमी करण्यासाठी कोणतीही कारवाई केली नव्हती. राज्यातील अग्निशमन सेवा बळकट करण्यासाठी ११६७ अतिरिक्त पदे निर्माण करण्याविषयीचा प्रस्ताव DFS, मुंबई यांनी शासनाच्या नगरविकास विभागाला सादर केला होता. राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने जरी, ११६७ पदांपैकी १३१ पदे निर्माण करण्यास मंजुरी दिली होती. तरी मार्च २०१६ पर्यंत राज्य शासनाने त्यावर कुठलीही कार्यवाही केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.४१** यासंदर्भात समितीसमोर सांगण्यात आले की, बृहन्मुंबई येथे अतिरिक्त पदे मंजुर असून त्याची भरती प्रक्रिया सुरू आहे. नाशिक येथे सुधारीत आकृतीबंध आस्थापना विभागामार्फत शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आलेला आहे. अमरावती महापालिकेत मुख्य अग्निशमन अधिकारी तथा सहाय्यक अग्निशमन अधिकारी ही दोन पदे रिक्त असून सन २००६ मध्ये सदर दोन पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली परंतु तांत्रिक कारणास्तव ही प्रक्रिया स्थगीत करण्यात आली. सद्यःस्थितीत लिडींग फायरमन हे या पदाचे प्रभारी अग्निशमन अधिक्षक म्हणून कामकाज सांभाळत आहेत. तसेच प्रशासकीय प्रमुख म्हणून उपायुक्त (सा.) यांच्याकडे कामकाज आहे. सन २०१५ मध्ये २७ SFTC चे प्रशिक्षित उमेदवारांची कायमस्वरुपी भरती करण्यात आली आहे. सन २०१६ मध्ये २५ कंत्राटी वाहनचालक यांच्या सेवा बाह्य संस्थेकडून कंत्राटी पद्धतीवर घेण्यात आलेल्या आहेत. तसेच फायरमनची २१ पदे कंत्राटी पद्धतीने भरण्याबाबतची प्रक्रिया पूर्ण झालेली असून, लवकरच याबाबत पुढील कार्यवाही पूर्ण करण्यात येत असून सद्यःस्थितीत उपलब्ध अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या आधारे सदरची सेवा कार्यक्षमपणे पुरविण्यात येत आहेत. नागपूर महानगरपालिकेतील सुधारीत आकृतीबंधास व अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागातील अधिकारी / कर्मचारी (वर्गीकरण, सेवाभरती व पदोन्नती)

नियमांना शासन मान्यता मिळालेली असल्याचे सांगण्यात आले. औरंगाबाद महानगरपालिकेत अग्निशमन विभागात कर्मचारी कमी असल्याने ११ महिने करारानुसार कंत्राटी पद्धतीने कर्मचारी घेण्यात आले आहे. पुणे येथे रिक्त असणाऱ्या पदांवर भरती करण्याची प्रक्रिया सुरू असून दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात कर्मचारी भरती करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच नवी मुंबई महानगरपालिका येथे विविध संवर्गातील एकुण ४७५ पदांना मान्यता मिळालेली असुन सदरची पदे भरण्याची प्रक्रिया ही अंतिम टप्प्यात आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

**१.४२** राज्यातील अग्निशमन सेवा बळकट करण्यासाठी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीने १३१ पदे निर्माण करण्यास मंजुरी दिली आहे. त्यापैकी संचालक, अग्निशमन सेवा गट-अ हे महत्वाचे वरिष्ठ पद सरळसेवेने भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर करण्यात आले आहे. तसेच इतर पदांचे सेवाप्रवेश नियम अंतिम करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे असेही समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारशी :**

**१.४३ अग्निशमन विभागामध्ये मनुष्यबळाची व कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याचे महत्वाचे आक्षेप महालेखाकारांनी या परिच्छेदात नोंदविलेले आहेत. या विभागासाठी मंजूर असलेला आकृतीबंध, रिक्त पदे, आकृतीबंध मंजूर झाला त्यावेळेस व सद्यःस्थितीत असलेली मनुष्यबळाची आवश्यकता यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असणे, आकृतीबंध नव्याने सुधारण्याची आवश्यकता, केवळ कर्मचाऱ्यांच्या भरतीपेक्षा हे मनुष्यबळ अद्ययावत व प्रशिक्षित असण्याची गरज या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून कार्यवाही करण्याची आवश्यकता असताना त्याचे पुर्णतः पालन झाल्याचे समितीला दिसून येत नाही. अद्यापही राज्यात आग विझविण्याची कामे तांत्रिक व अद्ययावत पद्धतीने न होता ती मानवी प्रयत्नानेच अधिक प्रमाणात होत आहेत. अशा परिस्थितीत अग्निशमन विभागात रिक्त पदे व मनुष्यबळाची कमतरता याचे गंभीर परिणाम नागरिकांना सोसावे लागते व त्यांच्या वित्तीय व जीवित हानीस मोठ्या प्रमाणात या बाबी कारणीभूत ठरणाऱ्या आहेत. यात विशेषतः कर्मचाऱ्यांची पदे मंजूर करणे, ती पदे भरणे, त्यांना प्रशिक्षण देणे असे तीन विषय प्रामुख्याने आहेत. सद्यःस्थितीत अस्तित्वात असलेल्या आकृतीबंधात मोठ्या प्रमाणात सुधारणा करून तो अद्ययावत करण्याची आवश्यकता असताना देखील जुन्या आकृतीबंधानुसारच पुर्ण पदे भरण्यात आलेली नाहीत. तसेच घेण्यात आलेला कर्मचारी वर्ग सर्वार्थाने प्रशिक्षित असण्यावर अधिक भर देण्याची आवश्यकता आहे. सद्यःस्थितीत अग्निसुरक्षेचे काम करणारे कर्मचारी व प्रशासकीय काम करणारे कर्मचारी हे एकच असून त्यामुळे देखील अग्निसुरक्षेच्या कामावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होतो. अग्निशमन विभागांतर्गतची पदे भरण्याचा अधिकार त्या-त्या महानगरपालिकेला आहेत. परंतु ती प्राधान्याने भरण्यात येत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. समितीच्या असेही निदर्शनास आले की, महानगरपालिकेच्या स्तरावर अद्यापही सेवा भरती नियम अंतिम स्वरुपात मान्य न झाल्यामुळे ही भरती थांबलेली आहे. अतः सर्व महानगरपालिकांमधील सेवा भरती नियम लवकरात लवकर तयार करून त्यास मान्यता घेण्यात यावी. महानगरपालिका स्वायत्त असल्यामुळे रिक्त पदे भरण्याचा अधिकार त्यांना प्राप्त आहे. परंतु नगरपालिका स्तरावर पदनिर्मिती व पदभरतीची कार्यवाही शासनस्तरावरुन करावी लागते, त्यामुळे देखील हा विलंब होतो. नगरविकास विभागामार्फत अशा पदांना प्राधान्याने मंजूरी देण्यात येत नाही. अतः विभागाने अशा पदभरतीच्या प्रस्तावांना प्राधान्याने मान्यता व निधी उपलब्ध करून देण्यात यावा. सुधारीत आकृतीबंध तयार करून त्यास मान्यता द्यावी तसेच ही रिक्त पदे प्राधान्याने भरण्यासंदर्भात महानगरपालिकांनी गांभीर्याने कार्यवाही करण्याबाबत विभागामार्फत परिपत्रक निर्गमित करण्यात यावे. राज्यात लागणाऱ्या आगींचे वाढते प्रमाण पाहता राज्यात सर्वत्र कोणत्याही इमारतींसाठी अग्निशमन सुरक्षा व्यवस्था व ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याचे घातलेले निर्बंध पाहता अधिकारी/कर्मचाऱ्यांनी हाताळावयाचे प्रशासकीय कामकाजात देखील मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे एकाच कर्मचाऱ्यांवर अग्निसुरक्षा व प्रशासकीय अशा दोन्ही जबाबदाऱ्या न ठेवता विभागाने या दोन्ही कामांसाठी कर्मचाऱ्यांची विभागणी करणेसंदर्भातील आवश्यकता व पर्यायाचा विचार करून योग्य तो निर्णय विभागाच्या स्तरावर घ्यावा. त्याअनुषंगाने सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात यावा, रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत व कर्मचाऱ्यांना आवश्यक ते प्रशिक्षण तात्काळ देण्यात यावे. मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे अग्निशमन विभागांच्या अग्निशमन क्षमतेवर परिणाम होत असल्यामुळे राज्य शासनाने या समस्येवर प्राथमिकतेने तोडगा काढावा. व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१.४४ महानगरपालिकेच्या आस्थापना आराखड्यास शासनाच्या मंजूरीची आवश्यकता असते. हा आराखडा शासनस्तरावरुन मंजूर करण्यासाठीची प्राथमिक अट ही आस्थापना खर्च हा ३५ टक्क्यांपेक्षा अधिक असू नये ही आहे. अनेक महानगरपालिकांमध्ये या अटीची पुर्तता न झाल्यामुळे या आराखड्यास शासनस्तरावरुन मंजूरी मिळत नाही. इतकेच नव्हेतर निरनिराळ्या महानगरपालिका स्तरावर देण्यात येणाऱ्या वेतनामध्ये समानता नसून वेतनातील या तफावतीमुळेच आस्थापना खर्च हा महानगरपालिकानिहाय**

**निरनिराळा असल्याचे दिसून येते. उत्पन्न वाढीसाठी ज्याप्रमाणे महानगरपालिका स्तरावरुन प्रयत्न करण्यात येतात त्याचप्रमाणे आस्थापना खर्च नियंत्रित ठेवण्याची देखील महानगरपालिकेंची प्राथमिक जबाबदारी आहे. जेणेकरून जास्तीत जास्त निधी सार्वजनिक व लोकहितोपयोगी कारणास्तव वापरणे महानगरपालिकांना शक्य होईल. अतः महानगरपालिकांनी आस्थापना खर्च विहित मर्यादेत ठेवणेसंदर्भात आवश्यक ती उपायोजना तात्काळ करावी व कोणत्याही परिस्थितीत आराखडा मंजूर करण्यासाठीच्या आवश्यक अटी शर्तींचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेण्यात यावी व या महत्वाच्या प्रश्नासंदर्भात महानगरपालिका व नगरविकास विभाग यांनी परस्पर सहमतीने योग्य तो तोडगा काढून त्याची अंमलबजावणी करावी. सर्व महानगरपालिकांनी सेवाशर्ती नियम तातडीने तयार करावे व त्यास शासनाकडून विनाविलंब मंजूरी घ्यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१.४५ अग्निशमन सुरक्षा ही अत्यंत आकस्मिक व अत्यावश्यक सेवा असल्यामुळे यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करताना यावर खर्चाचे निर्बंध व कपात घालणे योग्य ठरणारे नाही व सुरक्षिततेच्यादृष्टीने आवश्यक तो संपुर्ण निधी या विभागास प्राधान्याने देण्यात यावा व प्राप्त निधीचे व खर्चाचे नियोजन मात्र विभागाने यथायोग्यरितीने करावे व या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून विभागाने योग्य तो निर्णय तात्काळ घेवून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.९ " अग्नि सुरक्षा प्रमाणकांचे अनुपालन न करणे "**

**४.१.९.१ " ना हरकत प्रमाणपत्रे जारी करण्यातील अपर्याप्तता "**

**अभिप्राय :**

**१.४६** महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ नुसार नागरीकांवर, प्रामुख्याने धोकादायक जागांमधील, अग्नि सुरक्षा प्रमाणकांचे पालन सक्तीचे करणे आणि आग प्रतिबंधक उपाययोजनांविषयी जागरूकता निर्माण करणे ही अग्निशमन विभागाची प्रमुख कार्ये आहेत, जेणेकरून आगीचा धोका कमी करता येईल. महानगरपालिकेचे अग्निशमन विभाग सर्व प्रकारच्या इमारती आणि पेट्रोल पंप, द्रवरूप पेट्रोलियम वायू (LPG) पुनर्भरण केंद्रे किंवा वितरण केंद्रे, फटाक्यांची दुकाने आणि लाकुड गिरण्या यासारख्या धोकादायक व्यवसायांना ना हरकत प्रमाणपत्रे (NOCs) देखील जारी करतात. तरीही अधिनियमात तरतूद केलेल्या अग्निसुरक्षा प्रमाणकांची सक्तीने अंमलबजावणी करण्यात अनेक त्रुटी असल्याचे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

तसेच महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यकक्षेत इमारतींचे बांधकाम सुरू होतांना महानगरपालिकेचे अग्निशमन विभाग तात्पुरती फायर NOC जारी करतात. महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाकडून भोगवटा प्रमाणपत्रे (OCs) देण्याआधी अग्निशमन विभागाकडून अंतिम फायर NOCs दिल्या जातात. Commencement Certificate/NOCs/OCs यांच्या नोंदवह्या आणि संबंधित इमारत प्रस्ताव नस्तींच्या तपासणीत आढळून आले की, अग्निशमन विभागाकडून अंतिम फायर NOCs जारी केलेल्या नसतानाही वर्ष २०१०-१५ दरम्यान महानगरपालिका, अमरावती येथील नगररचना विभागाने २८ इमारतींना OCs जारी केल्या. सबब, या इमारतींनी अग्निसुरक्षा प्रमाणकांचे पालन केले होते अथवा नाही याची पडताळणी करणे कठीण होते. वर्ष १९६८ ते २०१५ दरम्यान महानगरपालिका नागपूरच्या अग्निशमन विभागाने ९२ पेट्रोल पंपना आवश्यक अग्निशमन साधनसामग्री प्रस्थापित करण्याच्या अटीवर तात्पुरती फायर NOCs जारी केली. परंतु, डिसेंबर, २०१५ पर्यंत ९२ पैकी एकही पेट्रोल पंपने अंतिम फायर NOCs ची मागणी केली नव्हती. या कसूरदार पेट्रोल पंपांविरूद्ध अग्निशमन विभागाने कोणतीही कारवाई केली नव्हती. तसेच, अग्निशमन विभागाकडून फायर NOCs प्राप्त न करता वर्ष १९९४-२०१४ या कालावधीत २७ फटाक्यांची दुकाने, ३२२ लाकूड गिरण्या आणि ४१ LPG वितरण केंद्रे (दोन पुनर्भरण केंद्रे आणि ३९ वितरक) व्यापार करत होते. तसेच नागपूर मधील ९२ पैकी दोन पेट्रोल पंप आणि २७ पैकी एका फटाक्याच्या दुकानांच्या केलेल्या संयुक्त प्रत्यक्ष तपासणीत आढळून आले की, जमिनीखाली ५०००० लिटर्सचा पाणी साठा असण्याची अनिवार्य अट असतांना त्याऐवजी पेट्रोल पंपाकडे फक्त २००० लिटर्सची साठवण क्षमता होती, सामान्य $CO_2$ असलेल्या अग्निशमन यंत्रांव्यतिरिक्त फेस/कोरडी रासायनिक पावडर असणारी कोणतीही अग्निशमन यंत्रे पेट्रोल पंपामध्ये उपलब्ध नव्हती, पेट्रोल पंपांवर कोणतेही फायर हायड्रंट बसविल्याचे आढळून आले नव्हते, तीन मजली इमारतीच्या तळ मजल्यावर असलेल्या फटाक्यांच्या दुकानात जरी १५०० किलो फटाके/स्फोटक पदार्थ यांचा साठा होता तरी दुकानात फक्त चार $CO_2$ युक्त अग्निशमन यंत्रे ठेवली होती. इतक्या मोठया प्रमाणातील फटाक्यांच्या साठयासाठी कोरडी रासायनिक पावडर असलेली अग्निशमन यंत्रे असणे आवश्यक होते.

**१.४७** समितीच्या निदर्शनास आले की, ठाणे महानगरपालिकेने २०११ मध्ये तयार केलेल्या शमन आराखडयामध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत फक्त १४ फटाक्यांची दुकाने असल्याचे दर्शविले होते, परंतु, पेट्रोल पंप, लाकुड गिरण्या आणि LPG भरणा केंद्रे यासारख्या इतर धोकादायक

जागांचा तपशील शमन आराखडयात दिला नव्हता किंवा मार्च, २०१६ पर्यंत CFO कडे उपलब्ध नव्हता. नाशिक महानगरपालिकेमध्ये अग्निशमन विभागाकडून कोणतेही अंतिम फायर NOCs प्राप्त न करता नऊ फटाक्यांची दुकाने, ४७ पेट्रोल पंप आणि ६२ लाकुड गिरण्या चालवल्या जात होत्या (एप्रिल २०१६). NOC दिलेले एकूण पेट्रोल पंप, फटाक्यांची दुकाने आणि LPG भरणा केंद्रे यांची अचूक संख्या मुंबई आणि अमरावती येथील अग्निशमन विभागांकडे उपलब्ध नव्हती. तसेच, महानगरपालिका अमरावती यांनी कोणतेही शमन आराखडे तयार केले नव्हते, २०११ मध्ये MCGM ने जो शमन आराखडा तयार केला होता त्यामध्ये देखील मुंबई शहरात चालविल्या जात असलेल्या अशा धोकादायक व्यापारांचे अस्तित्त्व दर्शविले नव्हते. महानगरपालिका नवी मुंबई यांनी दोन व्यापाऱ्यांना त्यांच्याकडे फायर NOCs आहेत अथवा नाही याची खातरजमा न करता ४५० किलो स्फोटक पदार्थांच्या विक्रीसाठी फटाक्यांचे परवाने दिले. तसेच, वर्ष २०१४-१५ पासून १२ LPG वितरक कोणत्याही फायर NOC शिवाय व्यवसाय करत होते. औरंगाबाद, नागपूर आणि अमरावती महानगरपालिकांच्या स्थानिक कार्यकक्षेतील २८ जुन्या शासकीय इमारतींमध्ये आवश्यक अग्निशमन उपकरणे बसविली नसल्यामुळे संबंधित अग्निशमन विभागांनी या इमारतींना अंतिम फायर NOCs दिल्या नव्हत्या. परंतु, महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ च्या कलम ५(१) अंतर्गत इमारतींची तपासणी करणे आवश्यक असूनही इमारतींच्या मालकांना तशा सूचना जारी केल्या नव्हत्या. अशा प्रकारे, या इमारती फक्त असुरक्षितच होत्या असे नाही तर या इमारतींमधील रहिवाशी व शासकीय कर्मचाऱ्यांच्या जीवासही सातत्याने धोका होता. केंद्र शासनाच्या नगरविकास मंत्रालयाच्या नगर आणि शहर नियोजन संघटनेच्या इमारत उप-विधीच्या नमुन्यानुसार, निवासी इमारती / उपाहारगृहे / वसतिगृहे / स्वयंपाकगृहे /पँट्री व्यतिरिक्त इतर टोलेजंग इमारतींमध्ये LPG चा वापर करण्यास परवानगी नाही. तरीही मंत्रालयात कोणत्याही सुरक्षात्मक उपाययोजनेशिवाय किंवा सक्षम प्राधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय LPG सिलेंडर्सचा वापर सुरू होता. महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ च्या अनुसूची १ नुसार अग्निशामके, आवारातील हायड्रंट, जलकुंभ, होस रिल्स, फवारणी साधने, स्वयंचलित शोध आणि धोका सूचक यंत्रणा यासारखी किमान अग्निशमन साधने शासकीय इमारती / रूग्णालये / शैक्षणिक संस्था / व्यापारी आस्थापना यामध्ये प्रस्थापित करणे आवश्यक आहे. परंतु तपासणी केलेल्या ५३ पैकी ११ इमारतीत फक्त अग्निशामके बसविली होती आणि उर्वरीत ४२ इमारतीत उपरोक्त अग्निशमन साधनांपैकी एकही साधन उपलब्ध नव्हते. अशाप्रकारे, इमारती आणि धोकादायक जागांसाठी अग्निशमन विभागाकडून मंजुरी प्राप्त करणे अनिवार्य असण्याची कायदेशीर प्रक्रियेत तरतूद असूनही राज्यातील अग्निशमन कार्यातील दुर्बलतांवर पर्याप्तपणे तोडगा काढला गेला नव्हता अथवा अग्निशमन व्यवस्थांचे या आस्थापनांवर कोणतेही नियंत्रण नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.४८** नाशिक येथे पेट्रोल पंपांना बांधकाम करणेपुर्वी अग्निशमन दलाचा दाखला दिलेला आहे. मात्र पेट्रोलपंप धारकांनीव्यवसाय सुरू करणेपुर्वी जागा / इमारत वापराचा दाखला नगररचना विभागाकडून घेणे आवश्यक असते. तथापि तसा जागा वापराचा दाखला न घेता प्राधिकृत प्राधिकरणाने पेट्रोल पंप सुरू करण्याची परवानगी दिल्याने जागा वापराचा व अग्निशमन दलाचा अंतिम ना- हरकत दाखला पेट्रोलपंपांनी घेतलेला नाही. नाशिक शहरातील शासकीय इमारती उदा. जिल्हा परिषद इमारत, जिल्हा रुग्णालय तसेच शैक्षणिक संस्था हया महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक व जिवसुरक्षा उपाययोजना अधिनियम,२००६ लागु होण्याच्या आधीपासून कार्यरत आहेत. त्यांचेशी आग प्रतिबंधक उपाययोजना करून घेणेबाबत वैयक्तिक पत्रव्यवहार केलेला आहे. तसेच वर्तमानपत्रामधून सर्व इमारतींसाठी जाहीर सुचना प्रसिद्ध केलेली आहे. याबाबत सक्तीने व प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत कारवाई करण्यात येईल असेही समितीसमोर सांगण्यात आले.

**१.४९** अमरावती महानगरपालिका क्षेत्रात एकूण पेट्रोल पंप १९ असून यापैकी एकाही पंपधारकाने अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र घेतल्याचे दिसून आलेले नाही म्हणून या पंपधारकांना ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याबाबत नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. शहरात एकही LPG/ CNG भरणा केंद्र नाहीत. तथापि, शहराबाहेर ०२ एलपीजी गोडाऊनधारक असून, त्यांना अग्निशमन ना-हरकत घेण्याबाबत नोटीस दिलेल्या आहेत असेही समितीसमोर सांगण्यात आले.

**१.५०** नागपूर महानगरपालिकेत महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ अंमलात येण्यापूर्वी नागपूर शहरामध्ये बरेच चिल्लर व ठोक फटाके विक्रेता, एल.पी.जी. डिलर, पेट्रोल पंप यांनी आपली दुकाने सुरू केलेली आहेत. डेव्हलपमेंट कंट्रोल रुल नागपूरमध्ये अंमलबजावणी होण्यापूर्वी चिल्लर फटाके विक्रेता, पेट्रोल पंप, एल.पी.जी. वितरण केंद्र, लाकुड गिरण्या नागपूर शहरामध्ये अस्तित्वात होते. म्हणून अग्निशमन नियमांचे प्रावधान सदर विक्रेत्यांना मागील तारेखपासून लागू करता येत नाही. ज्या मालकांना अग्निशामक विभागाने ना-हरकत प्रमाणपत्र जारी केलेले आहेत त्यांना नुतनीकरण करून घेण्यासाठी नोटीस देण्यात आलेले असून फॉर्म "A" व फार्म "B" भरुन देण्यास सांगितलेले आहे. डेव्हलपमेंट कंट्रोल रुल नुसार ज्या चिल्लर दुकानाचे क्षेत्रफळ १५० स्क्वे.मी. पेक्षा कमी असल्यास सदर नियम त्यांना लागू होत नाही. परंतु जीवहानी व सुरक्षेच्या दृष्टीने विभागातर्फे अग्निशमन नियमांचे पालन करण्याच्या अटीवर सशर्त तात्पुरते ना-हरकत प्रमाणपत्र अग्निशामक विभागाकडून देण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

**१.५१** औरंगाबाद येथील स्थानिक कार्यक्षेत्रातील जुन्या शासकीय इमारतीची तपासणी अग्निशमन अधिकारी यांच्याकडून करण्यात आलेली असून इमारतीच्या मालकांना सुचना जारी करण्यात आलेल्या आहे. अग्निशमन विभागाने शासकीय रुग्णालय, कार्यालय येथे फायर ऑडीट करून अग्निशमन सुरक्षा उपाययोजना करण्यासाठी नोटीस दिल्या असता शासकीय रुग्णालयांनी फॉर्म बी उपलब्ध करून दिलेला नाही. सदरील ठिकाणी अग्निशमन उपकरणे खरेदी करण्यासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. महानगरपालिकेच्या इमारतींना निधी उपलब्ध नसल्यामुळे कमी अग्निशमन उपकरणे बसविण्यात आलेली आहे. तसेच नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये एकुण ४४ पेट्रोल पंप आहेत त्यापैकी २९ पेट्रोल पंपानी अग्निशमन विभागाचा ना-हरकत दाखला घेतलेला असून उर्वरित १५ पेट्रोलपंप धारकांनी अग्निशमन विभागाचा ना-हरकत दाखला नुतनीकरण केलेला नाही. तसेच नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये एकुण १२ एलपीजी वितरक आहेत. त्यानुसार नुतनीकरण न केलेल्या पेट्रोल पंपधारकांना व सर्व एलपीजी वितरकांना महाराष्ट्र आग प्रतिबंधक उपाययोजना अधिनियम, २००६ व नियम, २००९ अन्वये नोटीस बजावण्यात आलेल्या असल्याचे समितीस सांगण्यात आले.

**शिफारशी**

**१.५२ महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असून त्याच्या अंमलबजावणीसंदर्भात कोणतीही तडजोड करणे विभागास व पर्यायी सर्वसाधारण नागरिकांना परवडणारे नाही. कोणत्याही इमारतीला अथवा व्यावसायिक आस्थापनांना ऑक्युपेशन सर्टिफिकेट देतेवेळी अंतिम फायर एनओसी देण्यात आली किंवा कसे याची कोणतीही शहानिशा न करता ओसी देण्यात येते. वास्तविकतः फायर एनओसी असल्याशिवाय ऑक्युपेशन सर्टिफिकेट न देण्याच्या अटींचे अचूकरित्या पालन होणे बंधनकारक असताना त्याचे पालन होत नाही. आगीच्या वाढत्या घटना व त्यात होणारी जीवित व वित्तीय हानी पाहता या तरतुदीच्या अंमलबजावणीमध्ये कोणतीही शिथीलता, तडजोड कोणत्याही परिस्थितीत होऊ नये याची पुर्ण दक्षता विभागाने गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. त्याची तंतोतंत अंमलबजावणी करणेसंदर्भात नगरविकास विभागामार्फत सर्व महानगरपालिकांना पुन्हा एकदा सामायिक सूचना परिपत्रकाद्वारे निर्गमित करण्यात याव्यात. तसेच सद्य:स्थितीत फायर एनओसी प्राप्त करून घेणे ही देखील फार अवघड बाब आहे. यात काही अनियमितता व गैरप्रकार देखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही ठिकाणी त्रुटींची पुर्तता न करताच संगनमताने या एनओसी देण्यात येतात ही वस्तुस्थिती आहे. अशा परिस्थितीत नक्कीच सुरक्षेसंदर्भातील मापदंडाशी तडजोड करण्यात येते जे अतिशय धोकादायक आहे. अग्निसुरक्षेशी संबंधित कोणत्याही तरतूदीचे उल्लंघन होणार नाही याची पुर्ण दक्षता विभागाने घ्यावी. तसेच एनओसी देतेवेळी इमारतीतील रहिवाशांना याचा नाहक त्रास न होता ही प्रक्रिया अधिक सुटसुटीत, पारदर्शक व विनाविलंब होण्याच्यादृष्टीने विभागाने आवश्यक ती उपाययोजना करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१.५३ पेट्रोल पंपांना तसेच विस्फोटक स्वरुपाचे काम हाताळणाऱ्या आस्थापनांसंदर्भात देण्यात येणाऱ्या एनओसी संदर्भात देखील या ठिकाणी महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. पेट्रोल पंप मंजूर करतेवेळी विस्फोटक कायदा व पेट्रोलियम कायद्याअंतर्गत विभागाची परवानगी घ्यावी लागते व अशी परवानगी मिळणेसाठी अग्निशमन विभागाची पुर्वपरवानगी देखील घेणे बंधनकारक आहे. परंतु पेट्रोल पंपासाठी आवश्यक असणाऱ्या इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेसंदर्भात स्वतंत्र एनओसीची आवश्यकता असून ती देखील घेणे बंधनकारक आहे. यासंदर्भात औरंगाबाद येथे एक प्रकरण उघडकीस आले असता तेथील एका पेट्रोल पंपाला एक्सप्लोझीव्ह विभागाने एनओसी दिल्यानंतरही त्यास फायर क्लिअरन्स नव्हते. कारण त्यांनी सीएनजी सिलेंडर मधील अंतर योग्यरित्या ठेवलेले नव्हते. लायसेन्सींग ॲथॉरिटी म्हणून एक्सल्पोझीव्ह विभागाने दिलेली एनओसी ज्याप्रमाणे आवश्यक असते त्याचप्रमाणे कोणत्याही विशेष इमारतीला फायरच्या नॉर्मसनुसार स्वतंत्र एनओसीची आवश्यकता असते व त्यासाठी दरवर्षी जानेवारी व जुलै महिन्यामध्ये फॉर्म - बी भरुन ती घ्यावयाची असते. या दोन्ही एनओसी स्वतंत्र असून त्या घेतलेल्या नसल्यामुळेच महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविलेले आहेत. अमरावती येथील २८ इमारतींसंदर्भात फायरची एनओसी न घेता ओ.सी. घेण्यात आली असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. त्याअनुषंगाने ६ सार्वजनिक सेवांशी निगडीत एनओसी असल्यामुळे तपासणी करून त्या देण्यात आल्या व उर्वरित २२ संदर्भात नोटीसी जारी केल्या असून त्या कार्यवाहीत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. वास्तविकतः महानगरपालिकेने फायर एनओसी घेतल्याशिवाय ओ.सी. देणे हेच मुळात नियमबाह्य आहे. अशा प्रकरणांमध्ये विभागाने कायद्यातील तरतूदीनुसार कारवाई १ महिन्याच्या आत करून त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करण्याचे आश्वासन दिले. त्याअनुषंगाने तात्काळ कारवाई करण्यात यावी तसेच सर्व धोकादायक व्यवसाय, व्यापारी, शासकीय आणि संस्थात्मक इमारती राज्य अग्निसुरक्षा विनिमयांचे पालन करीत आहेत आणि अग्निशमन क्षमतेच्या बाबतीत त्या स्वयंपूर्ण आहेत याची खात्री करण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील तरतुदींची अधिक प्रभावी रितीने व सक्तीने अंमलबजावणी करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१.५४ विशेषतः मुंबईमध्ये नजिकच्या काळात घडणाऱ्या आगीच्या घटना, त्यात होणाऱ्या जीवित व वित्त हानीचे प्रमाण पाहता सर्व शासकीय व खाजगी आस्थापनेमधील इमारतींचे अग्नि लेखापरिक्षण (फायर ऑडीट) तातडीने पुर्ण करून त्यातील त्रुटींचे निराकरण करून कायद्यातील तरतूदींची अंमलबजावणी करणे अत्यावश्यक असताना अग्निशमन विभागामार्फत अद्यापही ही तपासणी पुर्णपणे झाल्याचे दिसून येत नाही. अतः राज्यातील सर्व व्यावसायिक आस्थापनांमधील अग्नि लेखापरिक्षण तातडीने पुर्ण करण्यात यावे व असलेल्या त्रुटींची पुर्तता कालबद्ध पद्धतीने करून घेण्यात यावी. ज्या आस्थापनांनी फायर एनओसी न घेता कामकाज सुरू ठेवलेले आहे त्यांचेवर अधिनियमातील तरतूदीनुसार कडक कारवाई करण्यात यावी व अग्निसुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही तडजोड यात होवू नये यादृष्टीने नियमांची अंमलबजावणी करण्यात यावी. यासाठी सामायिक मार्गदर्शक सूचना सर्व महानगरपालिकांसाठी निर्गमित करण्यात याव्यात व आवश्यक ती यंत्रणा तातडीने कार्यान्वित करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.१० " क्षमता बांधणीतील तूट "**

**अभिप्राय**

**१.५५** आगीच्या आपत्तींशी प्रभावीपणे मुकाबला करण्यासाठी अग्निशमन कर्मचाऱ्यांची क्षमता सुधारण्यासाठी अग्निशमन कर्मचाऱ्यांना ज्ञान, कौशल्य, कल, शारिरीक स्वास्थ्य, दृष्टी आणि बौद्धिक जागरूकता यासारख्या वेगवेगळया बाबी नियमितपणे तपासल्या जाव्या आणि नियमित प्रशिक्षण, मॉक ड्रील, कार्यशाळा आणि सामाजिक जागृती कार्यक्रम याद्वारे त्यात सुधारणा करण्यात याव्या असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**१.५६ महानगरपालिका स्तरावरील कार्यरत अग्निशमन कर्मचाऱ्यांमध्ये क्षमता बांधणीतील तूट दिसून आल्याचे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. आगीच्या आपत्तींशी प्रभावीपणे मुकाबला करण्यासाठी अग्निशमन कर्मचाऱ्यांची क्षमता बांधणीतील तूट भरुन काढण्यासाठी त्यांची योग्य ती तपासणी व सुधारणा करण्यात याव्यात तसेच त्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण त्यांना देण्याची नितांत आवश्यकता असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी झाल्याचे दिसून येत नाही. त्याअनुषंगाने मुंबई, नवी मुंबई, नाशिक, नागपूर, ठाणे व पुणे याठिकाणी हे प्रशिक्षण केंद्र कार्यरत असून त्याठिकाणी लोकांना प्रशिक्षण देण्यात येते असे समितीसमोर सांगण्यात आले. परंतु महाराष्ट्रातील एकूण ८ प्रशिक्षण केंद्रातील ५ केंद्रे तर मुंबई, नवी मुंबई व ठाणे परिसरातच आहेत. वास्तविक ही प्रशिक्षण केंद्रे राज्यभरात भौगोलिक रचनेनुसार समप्रमाणात विभागली जाण्याची आवश्यकता असतानाही ती केवळ मुंबईच्या अवतीभोवतीच अधिक स्वरुपात असल्याचे दिसून येते. त्यामुळे अन्य भागातील कर्मचाऱ्यांना या प्रशिक्षणाचा लाभ होत नाही अथवा त्याठिकाणी येऊन हे प्रशिक्षण घेणे गैरसोयीचे ठरते. प्रसंगी ते या प्रशिक्षणापासून वंचितही राहतात. प्रत्येक विभागीय स्तरावर हे प्रशिक्षण केंद्र केल्यास त्यास अधिक प्रतिसाद मिळून सर्वच विभागातील कर्मचाऱ्यांना याचा लाभ होऊ शकेल. तसेच कर्मचाऱ्यांमध्ये ही जागरुकता देखील वाढेल. अतः राज्यभर या प्रशिक्षण केंद्रांची संख्या वाढवून ती विभागीय स्तरावर तयार करण्यात यावी व क्षमता बांधणीतील तूट भरुन काढावी. आगीच्या आपत्तींशी प्रभावीपणे मुकाबला करण्यासाठी अग्निशमन कर्मचा-यांची क्षमता सुधारण्यासाठी अग्निशमन कर्मचा-यांच्या ज्ञान, कौशल्य, कला, शारिरीक स्वास्थ्य, दृष्टी अणि बौद्धीक जागरुकता या बाबी नियमितपणे तपासणे आणि नियमीत प्रशिक्षण, मॉक ड्रिल, कार्यशाळा आणि सामाजिक जागृती कार्यक्रम याव्दारे त्यात सुधारणा करण्याबाबत सर्व महानगरपालिकांना सुचना देण्यात याव्यात व भविष्यात हे आक्षेप टाळावेत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.१०.१ " प्रशिक्षणातील तूट "**

**अभिप्राय**

**१.५७** राज्य शासनाने कालिना (सांताक्रुझ), मुंबई येथे एक राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र (SFTC) स्थापन केले. मार्च १९९० च्या GR नुसार, SFTC मध्ये अग्निशमन कर्मचाऱ्यांना (नव्याने भरती झालेले व कनिष्ठ श्रेणीतील कर्मचारी) वर्षभरात सहा महिन्यांचे मुलभूत तांत्रिक अग्निशमन प्रशिक्षण द्यावयाचे होते. परंतु वर्ष २०१०-१५ दरम्यान राज्यात प्रशिक्षण घ्यावयाच्या १२५० अग्निशमन कर्मचाऱ्यांपैकी STFC मध्ये फक्त ४०१ कर्मचाऱ्यांना दोन महानगरपालिकांमध्ये एकाही अग्निशमन कर्मचाऱ्याला प्रशिक्षण देण्यात आले नव्हते. तसेच, अमरावती आणि नागपूर (एकूण कर्मचारी संख्या ३७७) मधून प्रत्येकी फक्त एका अग्निशमन कर्मचाऱ्याला या कालावधीत प्रशिक्षण देण्यात आले होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.५८** अग्निशमन सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता नियमीत अग्निशमन प्रशिक्षण सत्रे राज्य अग्निशमन सेवा अकादमीमध्ये आयोजित करण्यात येतात. या अकादमीच्या अधिपत्याखालील शासनाने ८ प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्रांना मान्यता दिली असून तेथेही अग्निशमन प्रशिक्षणाचे पाठयक्रम आयोजित करण्यात येतात. परंतु केवळ बृहन्मुंबई महानगरपालिकेत अशा प्रकारचे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना देण्यात येते. अन्य महानगरपालिकांमध्ये हा कर्मचारी प्रशिक्षणाचा विषय गांभीर्याने घेतल्याचे समितीला दिसून आले नाही. महालेखाकारांनी सदरहू आक्षेप नोंदविल्यानंतरही समितीची साक्ष लागेपर्यंत अद्यापही असे प्रशिक्षण घेण्यात येईल असे उत्तर विभाग देत आहेत याचा अर्थ अद्यापही विभागाकडे यासंदर्भातील कोणतेही नियोजन नाही हे स्पष्ट होते व ही निश्चितच गंभीर बाब आहे.

**शिफारस :**

**१.५९ ज्यावेळी नगरपालिका व महानगरपालिका स्तरावरुन अग्निशमन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते त्यावेळी त्यांना प्रशिक्षण देऊनच नेमणे आवश्यक आहे. शासन निर्णयानुसार अग्निशमन भरतीकरिता ६ महिन्यांचे प्रशिक्षण घेणे बंधनकारक असून ते पूर्ण झाल्यानंतरच ही भरती करणे अभिप्रेत आहे. संचालक स्तरावरुन ह्या भरतीकरिता ६ महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात येते. परंतु वरील पदावरील पदोन्नतीसाठी ज्या प्रशिक्षणाची आवश्यकता आहे ते संपुर्ण आशिया खंडात केवळ नागपूर येथेच उपलब्ध करण्यात आले आहे व त्या ठिकाणी प्रत्येक महानगरपालिकेतून १ कर्मचारी या प्रशिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या कोट्याप्रमाणे पाठविण्यात येतात. संपुर्ण आशिया खंडासाठी हे एकच प्रशिक्षण केंद्र असल्यामुळे आवश्यक त्या प्रमाणात पदोन्नतीसाठी प्रशिक्षण देण्यास हे केंद्र पुरेसे नाही. जी यंत्रणा आपत्कालिन परिस्थितीत अन्य नागरिकांची सुटका करण्यास व त्यांचे जीव वाचविण्यास जबाबदार आहे ते परिपुर्णरित्या प्रशिक्षीत असल्याची खात्री करणे अथवा त्यांना योग्य ते प्रशिक्षण देणे ही पुर्णतः विभागाची जबाबदारी आहे. त्यामुळे अशा प्रशिक्षणातील तूट भरुन काढण्यासाठी ही प्रशिक्षण केंद्रे राज्यात पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात पुणे, औरंगाबाद, नागपूर, मुंबई अशा चार विभागांमध्ये हे प्रशिक्षण केंद्र तयार करण्यात यावे. व त्याअनुषंगाने नगरविकास विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी. सद्यःस्थितीत प्राथमिक प्रशिक्षण दिले जात असून पदोन्नतीसाठीचे प्रशिक्षण उपलब्ध असलेल्या कोट्याप्रमाणे देण्यात येत आहे. आगीसारख्या आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आणि इतर आपत्कालीन परिस्थितींशी कार्यक्षमतेने व प्रभावीपणे मुकाबला करण्यासाठी राज्य शासनाने अग्निशमन कर्मचारी व दुय्यम अधिकारी यांच्या प्रशिक्षणाच्या गरजांचा आढावा घ्यावा आणि प्रशिक्षणात कोणत्याही तफावती / त्रुटी राहणार नाहीत याची सुनिश्चिती करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.१०.२ " अद्ययावत अग्निशमन प्रशिक्षण प्रबोधिनी बांधण्यातील विलंब "**

**अभिप्राय**

**१.६०** एप्रिल २०१२ च्या राष्ट्रीय आपत्कालीन व्यवस्थापन मार्गदर्शक सुचनांनुसार (प्रकरण ६), स्टीम्युलेटर्स व इतर अत्याधुनिक साधनसामुग्री यासारख्या आधुनिक प्रशिक्षण साधनांसह पर्याप्त पायाभूत सुविधा, प्रशिक्षक व सुविधा असलेली आधुनिक प्रशिक्षण केंद्रे राज्यांनी प्रस्थापित करावी. कालिना येथे १.२५ एकर क्षेत्राच्या सध्याच्या SFTC वर सराव प्रात्यक्षिकांसाठी पुरेशी मोकळी जागा व अद्ययावत प्रशिक्षण सुविधा उपलब्ध नाहीत. म्हणून, राज्य शासनाकडे ५० एकर जमिनीवर एक अद्ययावत अग्निशमन प्रशिक्षण प्रबोधिनी (AFTA) स्थापन करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला (जुलै २००८) ज्या प्रबोधिनीत अग्निशमन व बचावासाठीच्या वेगवेगळया साधनांबरोबरच मोकळया जागेतील प्रशिक्षण कार्यक्रम / सुविधा उपलब्ध असतील. यासाठी नगरविकास विभागाने ऑगस्ट, २००९ मध्ये एका ठरावाद्वारे रू.५० कोटी मंजूर केले. परंतु, सात वर्षांपेक्षा अधिक काळ उलटूनही AFTA साठी जमीन अधिग्रहीत करण्यात आली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.६१** या महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत आंतरराष्ट्रीय दर्जावर उपलब्ध होत असलेल्या विविध अग्निशमन सुविधांचा विचार करून महाराष्ट्रासारख्या औद्योगिक व नागरिकीकरण झालेल्या प्रगत राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाची प्रगत अग्निशमन अकादमी प्रस्थापित करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे. भिवंडी तालुक्यातील (ठाणे जिल्हा) जागेवर अन्य आरक्षण असल्याचे एम.एम.आर.डी.ने. कळविले असल्यामुळे येथे प्रगत अग्निशमन अकादमी प्रस्थापित करता येणार नाही. आता या प्रगत अग्निशमन प्रशिक्षण अकादमीसाठी मौजे विराथन खुर्द, ता.जि.पालघर येथील स.नं.६०/अ ६, मधील ५-० हेक्टर म्हणजे सुमारे १२.५० एकर एवढी जागा या अकादमीसाठी मंजूर करण्यात आलेली आहे. लवकरच येथे प्रगत अग्निशमन अकादमी प्रस्थापित होईल व प्रगत अग्निशमन अकादमीमध्ये अग्निशमनाचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रगत प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल असे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस :**

**१.६२ अग्निशमन विभागाने अद्ययावत प्रशिक्षण प्रबोधिनी बांधण्यातील विलंबाबाबत महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविलेले आहेत. यासाठी सन २००९ मध्ये रु.५० कोटींची तरतूद देखील करण्यात आली होती. तरीही ही प्रशिक्षण प्रबोधिनी बांधण्यास विलंब झाला. निधीची तरतूद असताना देखील जागा उपलब्ध नसल्यामुळे हे काम करण्यात आले नाही. जागा उपलब्ध नसताना निधीची मागणी का करण्यात आली, किंवा एखाद्या जागेवर आरक्षण ठेवण्याचे काम महानगरपालिकेमार्फतच करण्यात येत असताना सन २००९ ते २०१८ पर्यंत या प्रबोधिनीसाठी महानगरपालिकेला कोणतीही जागा उपलब्ध करून घेता येवू शकली नाही ही देखील बाब निश्चितच समर्थनीय नाही. जागेची कोणतीही निश्चितता नसताना निधी मात्र प्राप्त करून तो खर्च देखील न करणे ही देखील बाब तितकीच गंभीर असून निश्चितच आर्थिक शिस्तीला धरून नाही. अग्निशमन प्रशिक्षण प्रबोधिनी राज्यात सुरू करण्याच्या निर्णयास राज्य शासन व महानगरपालिका स्तरावरुन मान्यता देखील मिळाली. एवढेच नव्हे तर जागा व निधी देखील देण्यात आला. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी शासन व महानगरपालिका इतके सकारात्मक असताना याच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी, त्रुटी शोधण्याची व त्याचे निराकरण करून परिपुर्ण नियोजन करण्याची जबाबदारी ही पुर्णतः प्रशासनाचीच असते. परंतु हा विषय नियोजनबद्ध रितीने व पुर्ण तपासणी न करता हाताळल्यामुळे इतक्या प्रदिर्घ वर्षानंतरही हे प्रबोधिनीचे बांधकाम सुरुच होऊ शकले नाही व निधी देखील पडून राहिला ही निश्चितच गंभीर बाब आहे. आता या प्रबोधिनीसाठी पालघर येथे जागा मंजूर करण्यात आली आहे. सर्व एनओसी घेवून जिल्हाधिकाऱ्यांकडे जागा वाटपासाठी प्रकरण पाठविण्यात आले असून यावर कार्यवाही सुरू असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. विभागाने यावर तातडीने निर्णय घेवून हे प्रकरण कालबद्ध पद्धतीने निकाली काढण्यात यावे. तसेच अद्ययावत अग्निशमन प्रशिक्षण प्रबोधिनी प्रस्थापित करण्याच्या कार्यास वेग द्यावा व तातडीने अद्ययावत प्रशिक्षण प्रबोधिनी बांधण्यासंदर्भातील आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.१०.३ " शारीरिक स्वास्थ्य शिबीरे आयोजित न करणे "**

**अभिप्राय :**

**१.६३** आगीपासून बचाव हे एक वैशिष्ठयपूर्ण कार्य असते जे करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे शारीरिक स्वास्थ्य अत्युत्तम असणे आवश्यक असते. वर्ष २०११ च्या अग्नि सल्लागार स्थायी समितीच्या शिफारशींच्या सारसंग्रहाच्या परिशिष्ट ११-G नुसार, अग्निशमन कर्मचारी त्यांची कार्ये पार पाडण्यास सक्षम राहतील याची खात्री करण्यासाठी प्रत्येक सहा महिन्यांनी त्यांच्या शारीरिक क्षमता तपासणी चाचण्या घेतल्या जाव्या. बृहन्मुंबई व्यतिरिक्त एकाही महानगरपालिकेने वर्ष २०१०-१५ दरम्यान मोहिमेवर जाणाऱ्या कर्मचाऱ्यांचे शारीरिक स्वास्थ्य तपासण्यासाठी कोणतीही शारीरिक स्वास्थ्य शिबीरे आयोजित केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.६४** बृहन्मुंबई येथे दि. ०९/०५/२०१५ रोजीच्या गोकुळ निवास इमारत, काळबादेवी येथील भीषण आगीनंतर सत्यशोधन समितीने अग्निशमन दलातील सर्व कर्मचाऱ्यांची नियमित वैद्यकीय तपासणी करण्याची शिफारस केली, त्यानुसार वर्ष २०१५-१६ मध्ये १२२५ (३५ अधिकारी आणि ११९० कर्मचारी) कर्मचारी ज्यांचे वय ४५ वर्षे व त्यापेक्षा जास्त होते त्यांची महानगरपालिकेच्या विविध रूग्णालयांमध्ये वैद्यकीय तपासणी करण्यात आली. अमरावती महानगरपालिकेत आगीच्या आपत्तीशी प्रभावीपणे मुकाबला करण्यासाठी अग्निशमन कर्मचा-यांची क्षमता सुधारण्यासाठी अग्निशमन कर्मचा-यांच्या ज्ञान, कौशल्य, कल, शारिरीक स्वास्थ, दृष्टी आणि बौद्धिक जागरुकतेकरिता मनपा अग्निशमन विभागात नियमितपणे आरोग्य शिबीर आयोजित करण्यात येतात. फिल्ड ड्युटी कर्मचाऱ्यांना नियमित प्रशिक्षण, मॉक ड्रिल, कार्यशाळा, इत्यादी उपक्रम विभागातर्फे आयोजित करण्यात येतात. नागपूर महानगरपालिकेत अग्निशामक विभाग मनपा, नागपूर येथील कर्मचाऱ्यांची अशी शिबीरे आयोजित केली जात नव्हती. परंतु लेखापरीक्षणाच्या घेतलेल्या आक्षेपानंतर अग्निशामक विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या स्वास्थ्याची शारीरीक क्षमता चाचणीची शिबीरे घेण्यात येतील असे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस :**

**१.६५ आगीसारख्या घटना घडल्यानंतर त्याठिकाणी अडकलेल्या लोकांची सुखरुप सुटका करण्याची जबाबदारी पुर्णतः अग्निशमन कर्मचाऱ्यांची असते. बऱ्याचदा अतिउंच इमारतीमधून लोकांना बाहेर काढणे हे अत्यंत जिकीरीचे व जोखमीचे काम हे कर्मचारी पार पाडत असतात. अशा परिस्थितीत या कर्मचाऱ्यांचे शारीरिक स्वास्थ्य सुदृढ व उत्तम असणे आवश्यक असून कर्मचाऱ्यांचे शारीरिक स्वास्थ्य जपण्याची प्राथमिक जबाबदारी विभागाची देखील आहे. त्यात विशेषतः स्वास्थ्य शिबीरे आयोजित करणे. शारीरिक क्षमता तपासणी चाचण्या घेणे इ. बाबींचा समावेश असतो. असे असताना कित्येक महानगरपालिकांनी ही शारीरिक स्वास्थ्य शिबीरे आयोजितच केली नाहीत असे गंभीर आक्षेप महालेखापालांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. अशाप्रकारचे**

**नियोजन करण्याची जबाबदारी विभागाची व महानगरपालिकांची आहे हे कित्येक महानगरपालिकांना माहित देखील नव्हते. केवळ महालेखापालांनी सदरहू आक्षेप नोंदविल्यानंतर काही नाममात्र महानगरपालिकांनी यासंदर्भात कार्यवाही सुरू केली. परंतु ती देखील प्रभावीपणे राबविण्यात आली नाही. काही शिबीरे तर लोकलेखा समितीने बैठक लावल्यानंतर आयोजित करण्यात आली ही देखील अतिशय गंभीर बाब आहे. अग्निशमन विभागाकडे सोपविण्यात आलेले कामाचे स्वरुप पाहता कर्मचाऱ्यांचे आरोग्य व शारीरिक क्षमता जपण्यासंदर्भात विभागाने कायम दक्ष राहण्याची आवश्यकता असताना निश्चितच याकडे विभागाचे दुर्लक्ष झालेले आहे. कर्मचाऱ्यांची शारीरिक क्षमता तपासून घेण्याची पुर्णतः जबाबदारी संबंधित अग्निशमन अधिकाऱ्यांची होती. सन २००८ ते २०१५ पर्यंत अशा प्रकारची शारीरिक क्षमता चाचणी घेतलेली नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर अंशतः मान्य देखील केले व यात पुढे सुधारणा करण्यात येईल असेही आश्वासित केले. परंतु या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई विभागाने केली नाही. वास्तविक ज्या अधिकाऱ्यांनी या नियमांचे पालन केले नाही त्यांचेवर कारवाई करणे आवश्यक होते असे समितीने विदित केले असता महानगरपालिका आयुक्तांनी संबंधितांकडून स्पष्टीकरण मागवावे असे निदेश विभागाकडून देण्यात येतील असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीसमोर दिले. तसेच भविष्यात अशी शिबीरे आयोजित करण्यासंदर्भात ठोस कारवाई करण्यात येईल व तशा सूचना निर्गमित करण्यात येतील व वेळोवेळी त्याच्या पुर्ततेचा आढावा देखील घेण्यात येईल असेही समितीसमोर आश्वासित करण्यात आले. अतः विभागाने सर्व महानगरपालिकांना अशी शारीरिक स्वास्थ्य शिबीरे आयोजित करणेबाबत सामायिक मार्गदर्शक सूचना तात्काळ निर्गमित करण्यात याव्यात, त्याच्या अंमलबजावणी संदर्भात नियमित आढावा घेण्यात यावा, जे कर्मचारी या चाचण्यांमध्ये शारीरिकदृष्टया स्वस्थ आढळले नाहीत त्यांच्या स्वास्थ्यासाठी आवश्यक ती पुढील उपाययोजना विभागाच्या व महानगरपालिकांच्या स्तरावरुन करण्यात याव्यात तसेच महालेखाकारांनी आक्षेपित केलेल्या परिच्छेदासंदर्भात अशी स्वास्थ्य शिबीरे आयोजित न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर विभागाने तात्काळ कारवाई करावी. मोहिमेच्या अग्रक्रमातील कर्मचारी सदासर्वकाळ अतिशय सतर्क राहतील याची खात्री करण्यासाठी नियमीतपणे त्यांच्यासाठी शारिरीक स्वास्थ्य शिबीरे आयोजित करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.१०.४ " अपर्याप्त सामाजिक सुसज्जता आणि जागृती "**

**अभिप्राय**

**१.६६** एप्रिल, २०१२ च्या राष्ट्रीय आपत्कालीन व्यवस्थापन मार्गदर्शक सुचनांमध्ये, आगीच्या आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावीपणे आणि संघटीतरित्या सामना करता यावा यासाठी मॉक एक्सरसाईज आणि जागृती कार्यक्रमांद्वारे समाजाला नियमीतपणे / कायमस्वरूपी संघटीत आणि प्रशिक्षीत ठेवेल असा योग्य घोषित कार्यक्रम आखण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले होते. परंतु महानगरपालिकांमधील अग्निशमन विभाग दरवर्षी १४ ते २० एप्रिल दरम्यान फक्त अग्निप्रतिबंध सप्ताह साजरा करत होते आणि समाजापर्यंत जास्तीत जास्त प्रमाणात पोहोचण्यासाठी आणि त्याला शिक्षीत करण्यासाठी वर्षभरात नियमीतपणे इतर कोणतेही कार्यक्रम आयोजित करण्यात आले नव्हते. तसेच आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजनांच्या क्षेत्रांतील तज्ञ व्यक्तींना आमंत्रण देऊन सामाजिक जागृती कार्यक्रम आयोजित केले नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.६७** दिनांक १४ एप्रिल, १९४४ रोजी मुंबई गोदीत एस.एस.फोर्ट स्टिकिन् या जहाजाला आग लागून झालेल्या भीषण स्फोटात अग्निशमन व विमोचनाचे कार्य करीत असताना मुंबई अग्निशमन दलाच्या ६६ जवानांना हौतात्म्य प्राप्त झाले. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सुचनेनुसार जनतेमध्ये अग्निशमनाबाबत जनजागृती निर्माण होण्यासाठी प्रत्येक वर्षी १४ ते २० एप्रिल या कालावधीत अग्निशमन सेवा सप्ताह पाळण्यात येतो. परंतु त्या व्यतिरिक्त सामाजिक सुसज्जता आणि जागृती करणेसंदर्भात कोणतीही उपाययोजना विभागाकडून करण्यात आली नाही.

**शिफारस :**

**१.६८ आगीच्या आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावीपणे व संघटीतरित्या सामना करण्यासाठी सामाजिक सुसज्जता आणि जागृती करणे आवश्यक असताना त्याचे प्रमाण अपर्याप्त होते. अग्निशमन विभाग दरवर्षी १४ ते २० एप्रिल दरम्यान अग्निशमन सेवा सप्ताह साजरा करतो. या व्यतिरिक्त वर्षभर कुठेही जनजागृती कार्यक्रम विभागामार्फत आयोजित करण्यात येत नाही. विभागाने वर्षभर नियमितरित्या जनजागृती शिबीरे, मॉकड्रील्स, प्रात्यक्षिके आयोजित करून लोकांना अग्निशमन सुरक्षेसंदर्भात जागरुक करण्याची जबाबदारी विभागाची असताना राष्ट्रीय आपत्कालिन व्यवस्थापनातील मार्गदर्शक सूचनांचे पालन होत नाही असे आक्षेप महालेखाकारांनी नमूद केले आहेत. राज्याच्या अग्निशमन संचालकांची या संपुर्ण कार्यपद्धतीवर नियंत्रण ठेवण्याची प्राथमिक**

**जबाबदारी असते. विभागाने यासाठी संरक्षण उपाययोजना क्षेत्रातील तज्ज्ञांना बोलावून सामाजिक जागृतीच्यादृष्टीने जनजागृती व प्रशिक्षण आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याची देखील आवश्यकता आहे. महानगरपालिकांकडे मर्यादित मनुष्यबळ व कर्मचारी संख्या हे देखील अशाप्रकारच्या उणिवांना कारणीभूत आहे. त्यातही आगीच्या घटनांना तात्काळ प्रतिसाद देणे व सोबतच प्रशिक्षण ही दोन्ही कार्ये उपलब्ध असलेल्या तेवढ्याच कर्मचाऱ्यांमधून करून घेण्यास अडचणी येवू शकतात हे समितीला मान्यच आहे. परंतु याचा अर्थ तरतूदींची अंमलबजावणीच होवू नये हे समिती कदापि मान्य करु शकत नाही. उपलब्ध मनुष्यबळात नियमाचे पालन करून अधिकाधिक कार्यक्षम कर्मचारी तयार करण्याची जबाबदारी व नियोजन हे विभागाचेच आहे. प्रशासनिक कारणे विभागाने शासनाच्या स्तरावरुन सोडवावी. परंतु कोणत्याही परिस्थितीत तरतूदींच्या अंमलबजावणीत कोठेही खंड पडणार नाही याची दक्षता विभागाने कायम घ्यावी, नागरिकांना अग्निसुरक्षा देणे या महानगरपालिकेच्या प्राथमिक जबाबदारीचे पालन करावे व सुरक्षिततेच्या बाबींचे बळकटीकरण करावे. यासाठी अग्निशमन अधिकारी व दुय्यम अधिकारी यांच्या सामाजिक सुसज्जता आणि जागृती तसेच प्रशिक्षणासंदर्भात कोणतीही तफावत राहणार नाही याची सुनिश्चिती करावी व भविष्यात असे आक्षेप टाळावेत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.११ " अपर्याप्त तपासणी आणि संनियंत्रण कार्यतंत्रे "**

**४.१.११.१ " आग तपासणी अहवाल तयार करण्यातील कमतरता "**

**अभिप्राय :**

**१.६९** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (जून २०१४ मध्ये सुधारीत केलेला) च्या कलम २८९ नुसार शहरातील आगीच्या प्रत्येक घटनेचा अहवाल अग्निशमन केंद्राच्या मुख्य किंवा इतर प्रभारी अधिकाऱ्याने महापालिका आयुक्तांना आगीच्या घटनेच्या पुढील दिवसांपर्यंत सादर करावा ज्यांनी आवश्यकतेनुसार पुढील चौकशी करावी व शहरात घडलेल्या अशा आगीच्या सर्व घटनांचे एक साप्ताहिक विवरण महानगरपालिकेच्या स्थायी समितीला सादर करावे असे नमूद आहे. परंतु वर्ष २०१०-१५ दरम्यान निवडक आठ महानगरपालिकांपैकी सहा महानगरपालिकांच्या स्थानिक कार्यकक्षेत एकूण २८२२ आगीच्या घटना (गंभीर आणि किरकोळ) घडल्या ज्यामध्ये मृतांची संख्या ११८७ होती. बृहन्मुंबई क्षेत्रात याच कालावधीत २४३३२ आगीच्या घटना (गंभीर आणि किरकोळ) नोंदल्या गेल्या ज्यामधील मृतांची संख्या ११४४ होती. अग्निशमन विभागाने आगीचे तपासणी अहवाल तयार करण्यासाठी / दाखल करण्यासाठी कोणताही एक समान नमुना विहित केला नव्हता. परिणामी महानगरपालिका आगीच्या घटनांचा तपशील वेगवेगळया तऱ्हेने आणि पद्धतीने दाखल करत होते. ज्यात संपुर्ण तपशीलाचीही नोंद घेतली जात नव्हती. तसेच महापालिका आयुक्तांना आणि स्थायी समित्यांना नियमीतपणे आग तपासणी अहवाल पाठवले जात नव्हते. आगीच्या घटनांचा अहवाल देण्यातील अशा तफावतींमुळे उच्च प्राधिकाऱ्यांना आगीच्या आपत्तीमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीचे मुल्यमापन आणि संनियंत्रण दीर्घकालीन रितीने करणे आणि योग्यवेळी उपाययोजना सुचविणे शक्य झाले नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारशी :**

**१.७० महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार शहरात घडलेल्या आगींच्या सर्व घटनांचे एक साप्ताहिक विवरण पत्र महानगरपालिकेच्या स्थायी समितीला सादर करणे बंधनकारक असताना त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचे आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आहेत. परिणामी आगीच्या घटनांचा अहवाल देण्यातील अशा तफावतींमुळे उच्च प्राधिकाऱ्यांना आगीच्या आपत्तींमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीचे मुल्यमापन आणि संनियंत्रण दीर्घकालीन रीतीने करणे आणि भविष्यातील धोरणे निश्चित करून कार्यवाही पद्धती ठरविणे व योग्यवेळी उपाययोजना सुचविणे शक्य झाले नाही. अग्निशमन व्यवस्थेसंदर्भात प्रभावी उपाययोजना व सुधारणेच्या अनुषंगाने अतिशय महत्त्वाच्या तरतूदी या अधिनियमात करण्यात आलेल्या असताना व त्याची अंमलबजावणी करणे संबंधित प्रशासकीय यंत्रणेवर बंधनकारक असताना ती करण्यात आली नाही व त्यात अनेक त्रुटी व उणिवा राहिल्या. साप्ताहिक तपासणी अहवालाची पाहणी करून घटनेच्या गांभीर्यानुसार**

**१.७१ मा.आयुक्त व मा.स्थायी समिती यांचेकडून चर्चेअंती मार्गदर्शक सूचनाही केल्या जातात. तसेच त्रुटी निर्मुलनासाठी आवश्यक त्या सुविधा निर्माण करून देणेबाबत संबंधितांना आदेशित केले जाते. अग्निशमन विभागासारख्या अतिशय महत्त्वाच्या व संवेदनशील यंत्रणेने तरी निदान तरतूदींच्या अंमलबजावणी संदर्भात इतके मवाळ व उदासिन राहणे समर्थनीय व परवडणारे नाही. या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी ही त्या त्या महानगरपालिकांच्या आयुक्तांची देखील निश्चितच आहे व त्यांचे देखील याकडे दुर्लक्ष झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते. काही ठिकाणी या तरतूदीची अंमलबजावणी करताना निश्चित कोणत्या स्वरुपात व माहितीसह हा अहवाल सादर करावा याचा आदर्श नमुना विहित नसल्यामुळे अधिकाऱ्यांनी त्यांच्या सोईप्रमाणे हा तपशिल सादर**

**केला. परिणामी अग्निशमन अधिकाऱ्याला स्वतःच्या पद्धतीने हा अहवाल देण्याचे स्वातंत्र्य या त्रुटीमुळे प्राप्त झाले. प्रत्येक महानगरपालिकांनी यासाठी वेगवेगळ्या नमुन्याचा अवलंब करण्याऐवजी विभागानेच एक आदर्श नमुना तयार करून सर्व महानगरपालिकांना त्याची अंमलबजावणी समानरित्या करण्यासंदर्भात योग्य त्या मार्गदर्शक सूचना तात्काळ निर्गमित करण्यात याव्यात व कोणत्याही परिस्थितीत भविष्यात या तरतूदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता विभागाने घ्यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.११.२ " इमारतींची तपासणी न करणे "**

**अभिप्राय :**

**१.७२** महाराष्ट्र आगप्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ च्या कलम ५(१) नुसार, आगप्रतिबंध आणि जीव सुरक्षा उपाययोजनांची पर्याप्तता किंवा त्यांच्या उल्लंघनांची पडताळणी करण्यासाठी ज्या इमारतींची तपासणी करणे गरजेचे असल्याचे निदर्शनास येईल अशा इमारतींच्या रहिवाश्यांना तीन तासाची आगावू सुचना देऊन सूर्योदय आणि सुर्यास्त यामधील कोणत्याही वेळेस एखाद्या जागेची किंवा इमारतीची तपासणी करू शकतो. परंतु मुंबई, ठाणे महानगरपालिका व्यतिरिक्त तपासणी केलेल्या कोणत्याही महानगरपालिकेने कोणत्याही इमारती, शैक्षणिक संस्था, रूग्णालये, मॉल, मल्टीप्लेक्स, उद्योग, सार्वजनिक संम्मेलनाच्या जागा, उपहारगृहे इत्यादींची तपासणी केली नव्हती. तसेच, ठाणे जिल्हयातील केंद्रीय उत्पादन शुल्क कार्यालय, प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि पोलीस अधिक्षकांचे कार्यालय या तीन इमारतींमध्ये एकही आग प्रतिबंधक आणि जीव सुरक्षा साधन बसविण्यात आले नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**१.७३ महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील तरतूदीनुसार आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजनांची पर्याप्तता किंवा त्यांच्या उल्लंघनाची पडताळणी करण्यासाठी इमारतींची नियमित तपासणी करण्याची तरतूद या अधिनियमात असताना त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचे आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नमूद केले आहेत. केवळ बृहन्मुंबई व ठाणे महानगरपालिकेमध्ये यांची अंमलबजावणी काही प्रमाणामध्ये झाल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. ही बाब अग्नि सुरक्षिततेच्यादृष्टीने अतिशय गंभीर व दखलपात्र आहे. या तरतूदीची अंमलबजावणी करून इमारतींची नियमित तपासणी केल्यास भविष्यात घडणाऱ्या अनेक आगीच्या घटनांना निश्चितच प्रतिबंध घालणे शक्य असताना त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. कित्येक इमारतीमध्ये तपासणी केल्यानंतर त्यातील त्रुटी वा उणिवा विभागाकडून निदर्शनास आणून देण्यात येतात. परंतु त्याच्या पुर्ततेची दखल वा पाठपुरावा विभागाकडून नियमित व विशिष्ट कालमर्यादेत करून घेणे आवश्यक असताना केवळ इमारतींना नोटीस देण्यापुरती ही कारवाई यंत्रणेमार्फत करण्यात येते. परिणामी आगीच्या घटनांना प्रतिबंध घालण्याचा मुळ उद्देश साध्य होवू शकत नाही. घटनास्थळी आग लागल्यानंतर त्याठिकाणी असलेल्या त्रुटी व उणिवांची नंतर चर्चा करून करावयाच्या उपाययोजनेची निश्चिती करणे ही निश्चितच फलदायी ठरु शकत नाही. या घटनांवर प्रतिबंध घालणेसाठी व घटना रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवरच विभागाने अधिक लक्ष केंद्रीत करून अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. आगीच्या घटनांमध्ये इमारतींमध्ये राहणाऱ्या त्रुटींमुळे वित्त हानी तर होतेच परंतु नाहक त्यात लोकांचा बळी देखील जातो. राज्यात अनेक ठिकाणी अशाप्रकारच्या घडलेल्या कित्येक घटनांमध्ये अनेक नागरिकांचा त्यात मृत्यू देखील झाल्याच्या घटना दिसून येतात. सरकारी कार्यालये, सिनेमा हॉल, नाट्यगृह, रुग्णालये, व्यापारी संकुले व तारांकीत हॉटेल अशा सार्वजनिक ठिकाणी तर ही जीवित हानी अधिक प्रमाणात होते त्यामुळे अशा ठिकाणच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने ही तपासणी प्राधान्याने व नियमितरित्या करणे अत्यावश्यक आहे. विभागाकडे उपलब्ध असलेल्या मनुष्यबळातून ही तपासणी नियमित करणे कठीण आहे हे समितीला मान्यच आहे. परंतु त्यावर उपाययोजना करून याची अंमलबजावणी करणे नागरिकांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने अत्यावश्यक आहे. प्रत्येक सार्वजनिक व रहिवाशी इमारती स्वतःच्या अग्निसुरक्षेसंदर्भात अधिक जागरुक, प्रशिक्षित रहिवाशी व अग्निशमन उपकरणे व यंत्रसामुग्रीने सक्षम व सज्ज करण्यावर विभागाने अधिक भर दिल्यास निश्चित अग्निशमन विभागाची जबाबदारी देखील काही प्रमाणात कमी होवू शकते. सद्यःस्थितीत नविन बांधकामांमध्ये अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. परंतु अनेक इमारतींमध्ये ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यापुरतीच ही अग्निशमन यंत्रणा कार्यरत राहते. परंतु त्यानंतर वर्षानुवर्षे त्याची देखभाल व दुरुस्ती याकडे दुर्लक्ष करण्यात येते. परिणामी ऐन घटनेच्यावेळी ही यंत्रणा निकामी ठरते. अग्निशमन विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्र देतेवेळी अनेक अनियमितता व गैरप्रकार देखील होतात ही देखील वस्तुस्थिती आहे व हे नाकारता येणार नाही. अग्निशमन सुरक्षिततेच्या अनुषंगाने द्यावयाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची कार्यपद्धती व प्रक्रिया देखील अधिक सुटसुटीत, सुलभ, पारदर्शक व मानवी हस्तक्षेप विरहित करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना तात्काळ करण्यात यावी. इमारतींची नियमित तपासणी करून त्यातील दोष व त्रुटींचे**

**कालबद्ध पद्धतीने निराकरण करून घेण्यात यावे. या सर्व कार्यपद्धतीचा अवलंब करतेवेळी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून संगणकीय आज्ञावली तयार करून त्या माध्यमातून ही यंत्रणा राबविल्यास अधिक कार्यक्षम व पारदर्शक यंत्रणा उभी राहू शकेल यादृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व ती सर्व महानगरपालिका स्तरावरुन समानरित्या अंमलात आणावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.११.३ " अग्निशमन कृती कक्षाची निर्मिती न करणे "**

**अभिप्राय :**

**१.७४** महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ मधील तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि संनियंत्रणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने ९९ अधिकाऱ्यांचा (३३ केंद्र अधिकारी आणि ६६ सहाय्यक केंद्र अधिकारी) समावेश असलेला अग्निशमन कृती कक्ष या नावाचा एक स्वतंत्र कक्ष निर्माण करण्याचे प्रस्तावित केले. परंतु मार्च, २०१६ पर्यत अग्निशमन कृती कक्षाची निर्मिती करण्यात आली नव्हती. अग्निशमन कृती कक्षाची निर्मिती न केल्यामुळे इमारतींची नियमीत तपासणी करणे, नोटीस जारी करणे, पाठपुरावा करणे, कायदेशीर कारवाई करणे इत्यादी कार्ये मनमा, मुंबईच्या विद्यमान मोहीम कर्मचारी / अधिकारी यांच्याकडून पार पाडली जात होती ज्याचा प्रतिकुल परिणाम आपत्कालीन परिस्थितीच्या दैनंदीन हाताळणीवर होत होता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.७५** अग्निशमन दलाचे नियंत्रण कक्ष हे कार्य करित असताना याचा प्रतिकुल परिणाम आपत्कालीन परिस्थितीच्या दैनंदिन हाताळणीवर होऊ नये यासाठी पुरेशी काळजी घेते. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने माहिती तंत्रज्ञान विभाग व सल्लागार PWC यांच्या सल्ल्याने RFP डॉक्युमेंट तयार केलेले असून ते इमारतीच्या तपासणीसाठी " इमारत तपासणी प्रणाली " या नावाचे सॉफ्टवेअर विकसीत करत आहे. हे RFP डॉक्युमेंट अंतिम टप्प्यात असून " इमारत तपासणी प्रणाली " खरेदी करण्यासाठी लवकरच निविदा मागविण्यात येतील जेणेकरून विद्यमान नामनिर्देशित अधिकाऱ्यांना इमारतींची तपासणी करणे, नोटीस जारी करणे, पाठपुरावा करणे, कायदेशीर कारवाई करणे इ. कार्यात सहाय्य होईल असे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस :**

**१.७६ अग्निशमन कृती कक्ष या नावाचा एक स्वतंत्र कक्ष निर्माण करणे बंधनकारक असताना त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपानंतर अधिकाधिक ठिकाणी अशा कृती कक्षाची निर्मिती करण्यात आली असून महानगरपालिका याची नियमित तपासणी करीत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले आहे व याअनुषंगाने केलेल्या तपासणीच्या आधारे विविध आस्थापनांवर कारवाई देखील करण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. या अधिनियमातील तरतूदीच्या प्रभावी तपासणी, अनुपालन व अंमलबजावणीसाठी "अग्निशमन व्यवस्था प्रणाली " नावाची आय.टी. प्रणाली विकसित करण्याबाबत महालेखाकारांसमवेत झालेल्या निर्गमन परिषदेत मान्य करण्यात आले होते. परंतु आता समितीच्या साक्षीपर्यंत त्याची अंमलबजावणी झाल्याचे दिसून आले नाही. यासंदर्भातील प्रणाली विकसित करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असल्याचे समितीस सांगण्यात आले. सदरहू प्रणाली तात्काळ कार्यान्वित करण्यात यावी व राज्यातील सर्व महानगरपालिकांमध्ये देखील ती लागू करण्याची कार्यवाही करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.११.४ " निम्न स्तरावरील कर्मचाऱ्यांकडून अग्निशमन केंद्राचे नियंत्रण केले जाणे "**

**अभिप्राय :**

**१.७७** अग्निशमन केंद्राचा प्रभारी केंद्र अधिकारी हा एक महत्वपूर्ण कार्याधिकारी असतो जो आगीची सूचना मिळाल्यावर त्यावर त्वरीत कारवाई करण्यासाठी स्वतःला आणि इतर कर्मचाऱ्यांना नेहमी सतर्क ठेवतो. केंद्राला देण्यात आलेली सर्व अग्निशमन उपकरणे, भांडार सामुग्री आणि साधनसामुग्री यांची योग्य साठवण आणि देखभाल करणे तसेच लॉग-बुक्स, नोंद पुस्तिका, हजेरी पत्रक इत्यादी ठेवणे आणि त्याच्या वरिष्ठांना सर्व विवरणे व विवरणपत्रे सादर करणे यासाठी देखील जबाबदार असतो. परंतु रिक्त पदे, अतिरिक्त कार्यभार अशा तऱ्हेने निम्न स्तरावरील कर्मचाऱ्यांकडून अग्निशमन केंद्राचे नियंत्रण केले जात होते. केंद्र अधिकाऱ्यांच्या कार्य व जबाबदाऱ्यांचा आवाका लक्षात घेता निम्नश्रेणीतील कर्मचाऱ्यांकडून (अग्निशमन कर्मचारी आणि अग्निशमन प्रणेते) अग्निशमन केंद्रांचे नियंत्रण केले जाणे ही स्थिती आगीच्या आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावीपणे मुकाबला करताना आणि गंभीर प्रसंगी धोरणात्मक निर्णय घेताना आदर्शवत ठरली नसती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**१.७८ महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप हे गंभीर स्वरुपाचे असून अग्निशमन केंद्रांचे नियंत्रण सक्षम वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून केले जाणे अभिप्रेत व आवश्यक असताना ते निम्न स्तरावरील कर्मचाऱ्यांकडून अशा केंद्रांचे नियंत्रण करणे ही निश्चितच समर्थनीय बाब नाही. त्यामुळे देखील या केंद्रांवर गुणवत्तापुर्ण नियंत्रणाचा निश्चितच अभाव राहण्याची पुर्ण शक्यता आहे. अनेक महानगरपालिकांमध्ये मुख्य अग्निशमन अधिकारीच कार्यरत नाहीत तसेच सेवाप्रवेश नियमास मान्यता नसल्यामुळे अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यास देखील अडचणी निर्माण झालेल्या आहेत. ही प्रक्रिया राबविण्यासाठीच्या मोठया कालावधीदरम्यान या केंद्रांचे नियंत्रणासारख्या संवेदनशील कामाची जबाबदारी निम्न स्तरावरील कर्मचाऱ्यांवर सोपविणे अतिशय जोखमीचे ठरु शकते. अ, ब, क, ड वर्ग महानगरपालिकांसंदर्भात याअनुषंगाने निश्चित कार्यपद्धती व निकष असण्याची आवश्यकता असताना त्याचा देखील अभाव दिसून येतो. यासाठी काही अंशी प्रशासकीय तांत्रिक अडचणी व सेवाविषयक निकष व नियम देखील बाधक ठरतात. यासाठी राज्यातील सर्व वर्गातील महानगरपालिकांसाठी निश्चित कॅडरायझेशन किंवा पद वर्गीकरण करून पात्रता निश्चित करण्याची आवश्यकता आहे. याशिवाय आदर्श आकृतीबंध देखील निश्चित करून अंतिम करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने तात्काळ शासन स्तरावरुन निर्णय घेवून आवश्यक ती उपाययोजना करून वरिष्ठ दर्जाची पदे तात्काळ भरण्यात यावीत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची महिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.११.५ " अनुज्ञापक संस्थांनी जारी केलेल्या प्रमाणपत्रांवर संनियंत्रण न ठेवणे "**

**अभिप्राय :**

**१.७९** महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ च्या कलम ९(१) आणि (३) नुसार एखाद्या इमारतीत किंवा त्यातील काही भागात अग्निप्रतिबंधात्मक आणि जीव सुरक्षा साधने पुरविण्याचे कार्य हाती घेण्यासाठी अनुज्ञापक संस्था म्हणून कामकाज करण्यासाठी एखादी व्यक्ती किंवा व्यक्तींची संघटना यांना अग्निशमन अधिकारी परवाना देऊ शकतात. अशाप्रकारे दिलेला परवाना एक वर्षासाठी वैध असतो ज्याचे तत्सम कालावधीसाठी नूतनीकरण केले जाते किंवा काही कारणांसाठी ते नाकारले जाते जी कारणे लिखित स्वरूपात नोंदवायची असतात. तसेच, महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना नियम, २००९ च्या नियम ४(१) आणि (२) नुसार अनुज्ञापक संस्थेने इमारतीमध्ये अग्निप्रतिबंधात्मक आणि जीव सुरक्षा साधनांची व्यवस्था केल्याविषयी प्रपत्र-अ मध्ये एक प्रमाणपत्र जारी करावे ज्यानंतर त्या अनुज्ञापक संस्थेने प्रत्येक वर्षी दोन वेळा (जानेवारी आणि जुलै) प्रपत्र-ब मध्ये इमारती किंवा मालमत्तांमध्ये प्रस्थापित केलेल्या अग्निप्रतिबंधात्मक आणि जीव सुरक्षा साधनांची देखभाल व्यवस्थित केली जाऊन त्या उत्तम आणि कार्यक्षम स्थितीत असल्याविषयी प्रमाणपत्र सादर करावे. मार्च २०१६ रोजी, राज्यात वैध प्रमाणपत्र प्राप्त अशा २९० अनुज्ञापक संस्था होत्या.

**१.८०** परंतु चार महानगरपालिकांमध्ये ज्या १५३३८ इमारतींना २०१०-१५ दरम्यान अंतिम फायर NOCs दिली गेली होती त्यापैकी फक्त ४५९ इमारतींविषयी (तीन टक्के) अनुज्ञापक संस्थेने प्रपत्र-ब मधील प्रमाणपत्रे जारी केली होती व ११९२५ इमारती मुंबई मनपाच्या कार्यकक्षेत होत्या ज्यापैकी याच कालावधीत फक्त २०५ प्रपत्र ब प्रमाणपत्रे (दोन टक्के) अनुज्ञापक संस्थांनी जारी केली होती. तसेच अनुज्ञापक संस्थांनी २०१०-१५ दरम्यान या मालमत्तांची कोणतीही तपासणी केली नव्हती आणि म्हणूनच प्रपत्र-ब मधील प्रमाणपत्रे जारी केली नव्हती. नाशिकमध्ये परवान्याच्या वैधतेचा कालावधी संपल्यानंतर सहयाद्री रूग्णालयाला एका अनुज्ञापक संस्थेने प्रपत्र-अ मधील प्रमाणपत्र जारी केले होते जे नियमबाहय होते. रूग्णालयाने अग्निशमन विभागाला प्रमाणपत्र सादर केले होते ज्या आधारावर रूग्णालयाला फायर NOC जारी करण्यात आली होती. काही ठिकाणी दोन सहामाही प्रमाणपत्रांऐवजी प्रपत्र "ब" मध्ये एका संपूर्ण वर्षाच्या कालावधीची प्रमाणपत्रे जारी केली होती. तर काही प्रकरणात अनुज्ञापक संस्थेने जारी केलेल्या प्रमाणपत्रांमध्ये कोणत्याही कालावधीचा उल्लेख करण्यात आला नव्हता. तर काही ठिकाणी प्रपत्र "ब" मध्ये सहा महिन्यांच्या कालावधीऐवजी चार महिन्यांच्या कालावधीसाठी (मार्च ते जून २०१५) प्रपत्र "ब" मध्ये प्रमाणपत्रे जारी केली होती. अशी चुकीची प्रमाणपत्रे CFO, पुणे यांनी मात्र स्विकारली होती आणि अनुज्ञापक संस्थेविरूद्ध कोणतीही कारवाई केली नव्हती. महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना नियम,२००९ च्या नियम १७ अंतर्गत कसूरदार अनुज्ञापक संस्थांना त्यांनी परवान्याच्या अटींचे पालन न केल्याबद्दल अकार्यक्षमता, गैरव्यवहार किंवा इतर कोणत्याही गंभीर कारणांसाठी कोणत्याही कारणे दाखवा नोटीसा जारी केल्या नव्हत्या असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.८१** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने इमारतींच्या भोगवटा प्रमाणपत्रासाठी ना हरकत प्रमाणपत्र देतेवेळी विकासक/ वास्तुविशारद यांनी प्रपत्र-अ सादर करणे अनिवार्य केलेले आहे. त्याचप्रमाणे इमारती/मालमत्तमध्ये प्रस्थापित केलेल्या अग्निप्रतिबंधात्मक आणि जीव सुरक्षा साधनांची देखभाल व्यवस्थित केली जाऊन त्या उत्तम आणि कार्यक्षम स्थितीत असल्याविषयी प्रपत्र-ब सादर करणे वर्षातून दोन वेळा

(जानेवारी आणि जुलै) संबंधित मालक/भोगवटादार यांना बंधनकारक केलेले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रपत्र-ब सादर करण्याकरीता थेट बृहन्मुंबई मनपाच्या वेबसाईटवर अनुज्ञापक संस्थेने जारी केलेले प्रपत्र-ब अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. अग्निशमन विभाग, महानगरपालिका नागपूरकडे सक्षम अधिकाऱ्यांची कमतरता असल्याने अनुज्ञापन संस्थांनी जारी केलेल्या प्रमाणपत्रावर संनियंत्रण ठेवणे कठिण होत आहे. परंतु विभागाने जारी केलेल्या ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त इमारत धारकांना नोटिस देवून त्यांच्याकडून वैध प्रमाणपत्र मागविण्याची कार्यवाही केली जाते. तसेच इमारतीची तपासणीसुद्धा करण्यात येते. अग्निशमन विभाग, महानगरपालिका, नगापूरतर्फे शहरातील ज्या इमारत धारकांना अंतिम फायर N.O.C. दिलेली होती त्यापैकी बहुतांश इमारत धारकांकडून अनुज्ञापन संस्थेचे " प्रपत्र ब " प्राप्त झालेले आहे व ज्या इमारत धारकांनी अनुज्ञापन संस्थेने " प्रपत्र ब " दिले नाहीत अशा इमारत धारकांविरुद्ध " महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ " चे कलम ६, ८(१) व ८(२) अंतर्गत विभागातर्फे पुढील कार्यवाहीबाबतची नोटीस सुद्धा बजावण्यात आलेल्या आहेत असे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस :**

**१.८२ अग्निशमन सुरक्षा व्यवस्थेच्यादृष्टीने महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप अतिशय गंभीर स्वरुपाचे असून अनुज्ञापक संस्थांनी जारी केलेल्या प्रमाणपत्रांवर संनियंत्रण न ठेवल्याचे यात नमूद केले आहे. परिणामी अग्निसुरक्षा संदर्भातील केलेल्या उपाययोजनेच्या वैधतेवरच प्रश्नचिन्ह उभे झाले आहे. महालेखाकारांनी नोंदविलेल्या सदरहू आक्षेपात सर्व तपशिल व सांख्यिकीय माहिती अतिशय सुस्पष्टपणे नमूद केलेली आहे. अधिनियमातील तरतूदीनुसार एखाद्या इमारतीत अग्निप्रतिबंधात्मक व जीवसुरक्षा साधने बसविण्यात आल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र देतेवेळी प्रपत्र-अ सादर करणे अनिवार्य आहे व त्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र मिळू शकत नाही. तसेच या साधनसामुग्रीची व उपकरणांची देखभाल दुरुस्ती व्यवस्थित व नियमीत होत आहे यासाठी वर्षातून दोन वेळा (जानेवारी व जुलै) प्रपत्र-ब सादर करणे आवश्यक आहे. सर्वच इमारतींची तपासणी व प्रपत्र देण्याच्या कार्याची अमर्याद व्याप्ती पाहता अग्निशमन विभागास हे कार्य करण्यासाठी अधिकची मदत व्हावी म्हणून त्यांनी काही अनुज्ञापक व्यक्ती वा संस्थांना अशा इमारतींची तपासणी करून हे प्रपत्र देणेसाठी प्राधिकृत करून त्यांना परवाने देखील देण्यात आले आहेत. अशा परिस्थितीत या अनुज्ञापक संस्थांनी अतिशय जबाबदारीने व सुरक्षाविषयक बाबींशी कोणतीही तडजोड न करता या इमारतींची विहित निकषांप्रमाणे नियमित तपासणी करून हे प्रपत्र गुणवत्तेनुसार देणे आवश्यक असताना या अनुज्ञापक संस्थांनीच अनेक ठिकाणी नियमांचे उल्लंघन केल्याचे गंभीर आक्षेप नोंदविलेले आहेत व असे करणे म्हणजे सुरक्षाविषयक बाबींशी अतिशय घातकदृष्ट्या तडजोड करणे होय. अनेक शासकीय इमारतीमध्ये अग्निसुरक्षेसंबंधीची कोणतीही तपासणी न केल्यामुळे देखील प्रपत्र " ब " देण्यात आले नाही. दर सहा महिन्यानी महानगरपालिका किंवा नगरपालिकांच्या प्रत्येक मुख्य अग्निसुरक्षा अधिकारी यांना या प्रपत्र-ब ची माहिती सादर करण्याचे काम सोसायटी, मालक किंवा ताबाधारक यांचे आहे. या इमारतींमध्ये नियमितपणे सहा-सहा महिन्यांमध्ये तपासणी करण्यासाठी अनुज्ञापक संस्था आहे, त्या संस्थेने हे काम नियमित व अचूकरित्या पाहिले पाहिजे. अग्निशमन विभागाच्या कामाला सहकार्य व मदत होणेसाठी अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेला पूरक म्हणून या अनुज्ञापक संस्थांची व्यवस्था निर्माण करण्यात आली. अशा परिस्थितीत या अनुज्ञापक संस्थांनीच नियमांचे उल्लंघन करणे कदापि योग्य नसून कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही. या अनुज्ञापक संस्थांच्या कामांवर अग्निशमन विभागाचे नियंत्रण असण्याची नितांत आवश्यकता आहे. परंतु अशा निर्माण केलेल्या समांतर व पूरक व्यवस्थेच्या दोषपुर्ण कामांमुळे अडचणी अधिक वाढणाऱ्या असतील तर ही व्यवस्थाच निरुपयोगी ठरेल. अशा परिस्थितीत सोसायटीने किंवा रहिवाशांनी प्रपत्र " ब " सादर केले नाही तर महानगरपालिका त्यांचेवर कोणतीही कारवाई करीत नाही. तसेच ज्या अनुज्ञापक संस्थांनी यात अनियमितता केली आहे त्यांचेवर देखील विभागाने कोणतीही कारवाई केली नाही अथवा या संस्थांना काळया यादीत देखील टाकले नाही. ज्याअर्थी या सोसायट्या वा रहिवाशांनी ही प्रपत्रे सादर न करणे म्हणजे त्यांनी त्या इमारतीत अग्निसुरक्षा विषयक बाबींचे पालन केलेले नाही अथवा उपकरणे न बसविलेली असणे असा त्याचा अर्थ होतो. अशा परिस्थितीत महानगरपालिकेने त्यांचेवर कारवाई करणे आवश्यक आहे. इतकेच नव्हेतर इमारत तपासणी करून प्रपत्र दिले नाही तर महानगरपालिका त्यांना कर आकारते. महानगरपालिकेमध्ये अग्निसुरक्षा निधीची तरतूद असते. त्याचप्रमाणे अग्निशमन कर देखील वसुल करण्यात येतो. अशा परिस्थितीत अग्निसुरक्षा विषयक तपासणी व प्रपत्रांची अंमलबजावणी अनिवार्यरित्या होणेसाठी अग्निशमन करामध्ये वाढ करणेबाबतच्या पर्यायाचा देखील विचार करून योग्य तो निर्णय घेण्यात यावा. त्याचप्रमाणे ज्यांनी प्रपत्र " ब " सादर केले नाही. त्यांचेवर अधिनियमातील तरतूदीनुसार कारवाई करण्यात यावी. प्रपत्र " ब " साठी १२० दिवसानंतर जर काम केले नाही तर कारवाईची तरतूद कायद्यात दिसून येते त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात यावी. ज्या इमारतींनी प्रपत्र ब दिले नाही त्यांचेकडून ते प्राप्त करून घेण्याची जबाबदारी विभागाच्या अधिकाऱ्यांचीच होती. इतके होवूनही ज्या अनुज्ञापक संस्थांनी परवान्याच्या अटींचे पालन केले नाही त्यांचेवर कोणतीही**

**कारवाई अथवा कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली नाही. त्यातही अधिक आक्षेपार्ह बाब म्हणजे अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र असल्याशिवाय ऑक्युपेशन सर्टिफिकेट दिले जात नाही. परंतु एखाद्या इमारतीसाठी ऑक्युपेशन सर्टिफिकेटसाठी अर्ज न करताच इमारतीचा वापर सुरू झाल्यास यावर महानगरपालिकेचे कोणतेही नियंत्रण राहत नाही. अशा इमारतींची तपासणी करून त्यांचेवर कारवाई करण्यासंदर्भात प्रभावी यंत्रणा महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही. त्यासाठी देखील पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यात यावी. वास्तविकतः सदरहु आक्षेप महालेखाकारांनी सन २०१५ मध्ये नोंदविले असतानाही समितीच्या बैठकीला येईस्तोवर विभागाने या प्रकरणी निश्चित कोणतीही ठोस कारवाई केली नाही. ही देखील निश्चितच गंभीर बाब आहे. अतः या दोषी अनुज्ञापक संस्थांवर कारवाई करण्यात यावी. अनुज्ञापक संस्थांनी जारी केलेल्या प्रमाणपत्रांवर योग्य ते संनियंत्रण ठेवण्यात यावे. ज्यांनी हे प्रपत्र सादर केले नाही त्यांचेवर शास्ती वा दंडात्मक तरतूद अधिक कठोर करण्यात यावी तसेच कोणत्याही परिस्थिती हे प्रपत्र सादर करणे अनिवार्य राहिल अशा पद्धतीची कार्यप्रणाली विकसित करण्यात यावी. इमारती आणि मालमत्तांमधील आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक सुरक्षा उपाययोजनांच्या अनुपालनाची खात्री करण्यासाठी अनुज्ञापक संस्थेने जारी केलेल्या प्रपत्र-अ व प्रपत्र-ब मधील प्रमाणपत्रांवर केले जाणारे संनियंत्रण अधिक प्रभावी करावे. तसेच सदरहू प्रकरणी दोषी आढळलेल्या संबंधितांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१.११.६ " टोलेजंग आणि मोडकळीस आलेल्या इमारतींच्या नियतकालिक तपासण्या न केल्यामुळे झालेले आगीचे भीषण अपघात "**

**अभिप्राय :**

**१.८३** सन २०१०-१५ दरम्यान बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यकक्षेत आगीचे १२ भीषण अपघात (ज्यांना "ब्रिगेड फायर कॉल्स" असेही ओळखले जाते, ज्यामध्ये अग्निशमनासाठी २० किंवा त्याहूनही अधिक आगीचे बंब तैनात केले जातात) घडले होते. अशाप्रकारे इमारतींची नियतकालिक तपासणी न केल्यामुळे महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ मध्ये नमूद केलेल्या अग्निप्रतिबंधात्मक आणि जीव सुरक्षा उपाययोजनांशी तडजोड करण्यात आली होती असे स्पष्टपणे दिसून येते.

**१.८४** सदोष विद्युत सर्कीटमुळे २१ जून २०१२ रोजी मंत्रालयामध्ये (एक टोलेजंग इमारत) भीषण आग लागली ज्यामध्ये पाच जण मृत्युमुखी पडले आणि मालमत्तेचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. तसेच अपघाताच्यावेळी इमारतीकडे मुंबई मनपाच्या अग्निशमन विभागाकडून देण्यात येणारी अंतिम फायर NOC नव्हती. ऑगस्ट २०१२ मध्ये CFO मुंबई यांनी सादर केलेल्या आग तपासणी अहवालात इतर बाबी बरोबरच असे आढळून आले की (i) वाहने उभी केल्यामुळे इमारतीकडे जाणाऱ्या अंतर्गत पोहोच रस्त्यावर कोंडी झाली होती आणि म्हणूनच आगीचे बंब पोहोचण्यास असाधारण विलंब झाला होता. (बचावकार्य सुरू करण्यास १६ मिनीटांचा कालावधी लागला होता), (ii) जरी इमारतीमध्ये जमिनीखाली पाणी साठविण्याची टाकी (२.३४ लाख लिटर क्षमतेची) उपलब्ध होती तरी इमारतीच्या आवारातील फायर हायड्रंट आणि वेटरायझर्स अकार्यरत असल्यामुळे पाण्याचा उपसा होऊ शकला नव्हता. (iii) इमारती बाहेरील मोकळ्या जागांमध्ये निसर्गचित्रांकन (landscaping) आणि द्वारमंडप (proche) असल्याने अग्निशमन वाहने प्रवेशण्यासाठी आणि चालविण्यासाठी ती जागा पर्याप्त नव्हती आणि (iv) अग्निशमन साधने कार्यरत नव्हती.

**१.८५** तसेच काचेचे आच्छादन असलेल्या लोटस निलकमल व्यापार संकुल ह्या २० मजली इमारतीला अग्निशमन विभागाने अंतिम फायर NOC दिले होते. इमारतीच्या सर्व्हर कक्षातील सदोष विद्युत सर्कीटमुळे १८ जुलै २०१४ रोजी इमारतीला भीषण आग लागली आणि ही आग आटोक्यात आणण्यासाठी ३० तासांचा कालावधी लागला. अग्निशमन कार्यादरम्यान एका अग्निशमन कर्मचाऱ्याला जीव गमवावा लागला. इमारतीमध्ये जरी जमिनीखाली एक लाख लीटर क्षमतेची पाणी साठवण्याची टाकी उपलब्ध होती तरी, जेव्हा आग लागली त्यावेळी टाकीमध्ये जेमतेम १० टक्के पाणी उपलबध होते आणि त्यामुळे आवारातील फायर हायड्रंट आणि वेटरायझर्स कार्यरत नसल्यामुळे पाण्याचा उपसा करता येऊ शकला नव्हता.

**१.८६** तसेच ३० वर्षांपेक्षा जास्त जुनी असलेली मुंबईतील काळबादेवी येथील गोकुळ निवास ही एक व्यापारी-नि-निवासी इमारतीत रेशीम व सुती साड्या, रसायने, संस्करण विद्रावके (Processing Solvent), आम्ल, LPG सिलेंडर, भ्रमणध्वनीचे सुटे भाग आणि बॅटरी, प्लास्टीक आणि कागदापासून बनविलेली वेष्टन साहित्ये, सोन्याच्या दागिन्यांसह इतर मौल्यवान धातूंवर संस्करण आणि प्रक्रीया करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य इत्यादींसारख्या वेगवेगळ्या प्रकारच्या ज्वलनशील पदार्थांचा / साहित्याचा साठा करण्यासाठी करत होते. सदोष विद्युत सर्कीटमुळे या इमारतीत भीषण आग लागली जी आटोक्यात आणण्यासाठी ८० तासांपेक्षा जास्त कालावधी लागला. संपूर्ण इमारत (तळ मजला व पोटमाळ्यांसह चार मजले) कोसळली आणि CFO, मुंबई यांच्यासह चार अग्निशमन कर्मचाऱ्यांनी या मोहिमेदरम्याने त्यांचे प्राण गमावले. यासाठी मुंबई मनपाने गठीत केलेल्या सत्य शोधक समितीने इतर बाबींबरोबर अशा शिफारशी केल्या की, (i) MCGM च्या आग आपत्ती व्यवस्थापन विभागाने /

महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रातील प्राधिकरणाने मुंबईतील मोडकळीस आलेल्या सर्व इमारतींची यादी ठेवावी, (ii) बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन (BEST) उपक्रम यांनी ३० वर्षांपेक्षा अधिक जुन्या इमारतींमधील विजेचे वायरिंग आणि मीटर बॉक्स यांची तपासणी करावी आणि BEST ने वार्षिक विद्युत लेखापरीक्षा करावी, (iii) जुन्या इमारतींमध्ये रासायनिक द्रव्यांचा साठा आणि सोनारकाम यावर बंदी घालावी, आणि (iv) सर्व अग्निशमन वाहनांमध्ये जागतिक स्थितीदर्शक यंत्रणा (GPs) बसवावी.

**१.८७** सत्य शोधक समितीने केलेल्या शिफारशींवरील अंमलबजावणी वेगवेगळ्या टप्प्यांवर सुरू होती. परंतु, सदर इमारतीकडे फायर NOC उपलब्ध नव्हती आणि अग्निशमन विभागाने तिच्या नियतकालिक तपासण्या केल्या नव्हत्या ज्या केल्या असत्या तर इतक्या मोठ्या प्रमाणावर उद्‌भवलेली आपत्ती टाळता आली असती, हे सत्य आहे.

**१.८८** बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अग्निशमन दल नामनिर्देशित अधिकाऱ्यांद्वारे आजमितीस ६६७९ इमारतींची तपासणी करण्यात आलेली असून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम, २००६ नुसार अग्निसुरक्षा व जीवसुरक्षा उपाययोजनांची पर्याप्तता नसलेल्या व कमतरता आढळून आलेल्या २७७३ इमारतींना नोटीस जारी करण्यात आल्या असून नोटीसीत उल्लेख असलेल्या पर्याप्तता / कमतरतांचे अनुपालन न करणाऱ्या इमारतींवर कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच मुंबई मनपाच्या विधी कक्षाद्वारे अशा १२ इमारतींच्या मालक / भोगवटादारांवर खटला दाखल करण्यात आलेला आहे असे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारशी :**

**१.८९ अग्निशमन सुरक्षेच्यादृष्टीने सदरहू परिच्छेदामध्ये नोंदविलेले आक्षेप अत्याधिक गंभीर असून टोलेजंग व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या नियतकालिक तपासण्या न केल्यामुळे झालेले आगीचे भीषण अपघात महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात उदाहरणादाखल आक्षेपित केलेले आहेत. सदरहू आक्षेपांचे गांभीर्य राज्यातील अन्य शहरांसाठी तर महत्त्वाचे आहेतच परंतु तुलनेने मुंबई, मुंबई उपनगरे, नवी मुंबई, ठाणे या भागातील इमारतींसाठी अत्याधिक लागू आहे. राज्यातील अन्य शहरांमध्ये इमारतींची उंची व संख्या ही मर्यादित स्वरुपाची आहे. परंतु मुंबई व परिसरात जागेअभावी उंच इमारतींचे असलेले प्रमाण, मोडकळीस आलेल्या वा दाटीवाटीच्या वस्तींचे व इमारतींचे प्रमाण, अरुंद रस्ते, वाढती लोकसंख्या, वाहतूक कोंडी, अनधिकृत व अतिक्रमित बांधकामे, रस्त्यांवरील वाहनांचे वाढते प्रमाण व वाहनांचे अतिक्रमण अशा अनेक अडचणींमुळे दुर्घटनाग्रस्त इमारतींपर्यंत पोहाचणे हे अग्निशमन यंत्रणेला फार जिकीरीचे व आव्हानात्मक आहे. मंत्रालय इमारतीत लागलेली आग, काळबादेवी येथील गोकुळ निवास, लोटस निलकमल व्यापारी संकुल इ. अनेक उदाहरणे पाहता व यातून झालेली जीवित व वित्त हानी लक्षात घेता आग लागल्यानंतर करावयाच्या उपाययोजनेपेक्षा आग लागू नये यासाठी करावयाच्या उपाययोजनांवर विभागाने अधिक भर देण्याची आवश्यकता आहे. तसेच टोलेजंग व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या नियतकालिक तपासण्या करून तेथील अंतर्गत अग्निसुरक्षा यंत्रणा किती सक्षम, मजबूत व प्रभावी आहे याची नियमित तपासणी केल्यास अशा अपघातांवर नियंत्रण मिळविणे विभागाला शक्य आहे. एखाद्या इमारतीमध्ये लागलेल्या आगीमध्ये केवळ तीच इमारत नव्हेतर आजुबाजूच्या परिसरातील अनेक इमारती प्रभावित होतात. त्यामुळे कोणत्याही एका चुकीमुळे होणारे नुकसानीचे सार्वजनिक स्वरुप पाहता अधिक काळजीपूर्वक या बाबी इमारतीमधील रहिवाशाने तसेच शासकीय यंत्रणेने हाताळणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत अग्निसुरक्षा व बचाव कार्य अशा दोन बाबींमध्ये ही अग्निशमन यंत्रणा कार्यरत असते. आग लागल्यास इमारतीतील अंतर्गत अग्निशमन यंत्रणा सक्षमरित्या कार्यरत राहिल्यास केवळ बचाव कार्याची (Fire Rescue) जबाबदारी अग्निशमन यंत्रणेवर येते. अशा परिस्थतीत ऊत्तुंग व उंच इमारतींमध्ये हे बचाव कार्य करण्यासाठी आजही विभागाकडे अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध नाही. उंच इमारतीची अंतर्गत अग्निसुरक्षा व्यवस्था निकामी ठरल्यास तेवढ्याच क्षमतेची पर्यायी व्यवस्था महानगरपालिकेकडे सद्य:स्थितीत उपलब्ध नाही. अशा परिस्थितीमध्ये ८०-९० मजली इमारतीमधून लोकांना वाचविणे अशक्य होवून बसते व त्यामुळे जीवित हानी मोठ्या प्रमाणावर होते. अग्निशमन विभागामार्फत आजही सर्व इमारतींची तसेच व्यावसायिक आस्थापनांची पूर्ण तपासणी झालेली नाही. या आस्थापनांची केवळ एकदा तपासणी करून उपयोग नसून ठराविक नियतकालामध्ये ही तपासणी नियमितरित्या करणे आवश्यक आहे. आगीच्या घटनांचे वाढते प्रमाण पाहता खाजगी, शैक्षणिक, वैद्यकीय व व्यावसायिक तसेच इतर सर्व आस्थापनांची अग्निसुरक्षेसंबंधित तपासणी करण्याचे कार्य महानगरपालिका स्तरावरुन आता सुरू करण्यात आलेले आहे. मुंबई परिसरात तर विशेष मोहिमेद्वारे ही तपासणी सुरू झाली आहे. परंतु ज्या आस्थापनांमध्ये अग्निसुरक्षा विषयक नियमांचे उल्लंघन झाले आहे अथवा त्याचे पालन झालेले नाही अथवा अनधिकृत बांधकाम आढळून आलेले आहे त्यांचेवर विभागामार्फत नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. केवळ नोटीस बजावल्यामुळे अग्निशमन विभागाची जबाबदारी संपत नाही. महानगरपालिकेने केवळ तेवढ्यावरच न थांबता या नोटीसीच्या पुर्ततेसंबंधी या आस्थापनांनी केलेल्या कार्यवाहीसंदर्भात खातरजमा करण्यासाठी व त्याच्या पाठपुराव्यासंबंधी या सर्व आस्थापनांची पुनर्तपासणी तात्काळ करण्यात**

यावी व त्या संबंधित दोषी आस्थापनांवर अधिनियमातील तरतूदीनुसार कडक कारवाई करण्यात यावी. तसेच या आस्थापनांमध्ये आढळून आलेल्या अनधिकृत व वाढीव बांधकामा संदर्भातही तात्काळ कारवाई करण्यात यावी. ही संपूर्ण कारवाई विभागाने प्राधान्याने, तातडीने व अतिशय कालबद्ध पद्धतीने करावी. इमारतीच्या अंतर्गत सुरक्षेमध्ये राहिलेल्या त्रुटींसंदर्भात केवळ नोटीस पाठविण्यापुरती अग्निशमन विभागाची जबाबदारी मर्यादीत न ठेवता त्या इमारतीमध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटी पूर्ण करून घेण्याकडे अग्निशमन यंत्रणेचा अधिक कल व प्राधान्य असावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.९० काळबादेवी येथील गोकुळ निवास येथे लागलेल्या आगीत तर बचाव कार्य करताना अग्निशमन विभागाचे कित्येक वरिष्ठ अधिकारी देखील मृत्यूमुखी पडले ही देखील बाब गंभीर व विभागाने बोध घेण्यासारखी आहे. या घटनेनंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेने सत्यशोधन समितीची स्थापन केली व त्याअनुषंगाने या समितीने अत्यंत मौल्यवान अशा शिफारशी केलेल्या आहेत. विशेषतः बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आग आपत्ती व्यवस्थापन विभागाने मुंबईच्या मोडकळीस आलेल्या सर्व इमारतींची त्यात सुरू असलेल्या व्यावसायिक आस्थापनांची यादी ठेवावी. मुंबई विद्युत पुरवठा, बेस्ट यांनी ३० वर्षापेक्षा अधिक जुन्या इमारतीमधील विजेचे वायरींग व मीटर बॉक्सची तपासणी करावी, बेस्टने नियमितरित्या वार्षिक विद्युत लेखापरिक्षण करावे, जुन्या इमारतीमध्ये रासायनिक द्रव्यांचा साठा व वापर करण्यास बंदी घालावी, अग्निवाहनांमध्ये जागतिक स्थितीदर्शक यंत्रणा बसवावी, ज्या आस्थापनांनी त्याची पुर्तता केली नाही त्यांचा विज पुरवठा थांबविण्यात यावा अशा प्रकारची कारवाई विभागाच्या स्तरावरुन करण्यात यावी. अशा अनेक शिफारशी करण्यात आलेल्या आहेत त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी. त्याचप्रमाणे इमारतीपर्यंत विद्युत कनेक्शन दिल्यानंतर प्रत्येक खोलीनिहाय त्याचा वापर कसा होतो व कशाप्रकारच्या विद्युत लाईन्स टाकण्यात येतात वा टाकलेल्या लाईन्ससमध्ये सोयीनुसार बदल करण्यात येतो. यावर महानगरपालिकेचे अथवा बेस्टचे कोणतेही नियंत्रण नसते. अंतर्गत सदोष वायरींगमुळे देखील होणाऱ्या शॉर्टसर्कीटमुळे लागणाऱ्या आगीचे प्रमाण अमर्याद आहे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी निकष व मापदंड निश्चित करण्यात यावे. आवश्यकता असल्यास त्याअनुषंगाने अधिनियमात देखील योग्य ती सुधारणा करण्यात यावी व तरीही त्याचे पालन इमारतींनी न केल्यास यासाठी सर्वस्वी इमारतीच्या सोसायटीमधील कार्यकारी मंडळ जबाबदार धरण्यात यावे. अशा प्रकारच्या तरतूदींची अंमलबजावणी कठोररित्या केली जात नाही तोपर्यंत आगीच्या या घटनांवर नियंत्रण आणता येणार नाही. त्यामुळे या सर्व बाबींची अंमलबजावणी विभागाने तात्काळ करावी व सत्यशोधन समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.९१ राज्य शासनाने राज्यातील सर्व अति लोकसंख्येच्या, महत्त्वाच्या आणि धोकादायक जागांच्या धोका प्रवणतेचे विश्लेषण करावे आणि आगीच्या घटनांच्या वेळी पालन करावयाच्या आणि टाळावयाच्या बाबींविषयी लोकांमधील जागरुकता वाढवावी. तसेच मुंबई व परिसरातील भौगोलिक परिस्थिती पाहता उंच इमारतींमध्ये बचाव कार्य अधिक तत्परतेने होण्यासाठी महानगरपालिकेने अत्याधुनिक फायर हेलिकॉप्टरची व्यवस्था करण्याच्या पर्यायांचा अभ्यास करून योग्य तो निर्णय घेण्यात यावा व त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात देखील कार्यवाही शासन/महानगरपालिका यांचेमार्फत करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.९२ शहरांमध्ये वेळोवेळी घडलेल्या आगीच्या अनेक घटनांमधून प्रकर्षाने जाणवणाऱ्या बाबी म्हणजे अग्निशमन व बचाव कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांची स्वतःची सुरक्षा कितपत सक्षम आहे याची देखील तपासणी करण्याची आवश्यकता आहे. एखाद्या इमारतीस आग लागल्यानंतर आतील लोकांना सुखरुप बाहेर काढण्याचे काम हे अग्निशमन कर्मचारी करीत असतात. आग लागलेल्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आगीच्या ज्वाळा, धुराचे लोट, बाहेर निघण्याचे मार्ग बंद पडणे इ. अनेक समस्या या प्रामुख्याने दिसून येतात. अशा घटनांमध्ये आगीने जीवित हानी होण्यापेक्षा धुरात घुसमटुन होणाऱ्या जीवित हानीचे प्रमाण अधिक असते. त्यातही अग्निशमन कर्मचारी अशा इमारतींच्या आत बचाव कार्यासाठी जात असताना या सर्व बाबींचा त्रास या कर्मचाऱ्यांना होवू नये व ते स्वतः सुखरुप राहून नागरिकांना वाचविण्याचे बचाव कार्य त्यांना सक्षमतेने करता यावे यासाठी आवश्यक ती संपूर्ण अद्ययावत व आधुनिक उपकरणे, मास्क, अग्निरोधक पोषाख अशा अनेक सुरक्षा उपकरणांची व्यवस्था या कर्मचाऱ्यांसाठी प्राथमिकरित्या असणे आवश्यक आहे. बचाव कार्य करण्यासाठी आग लागलेल्या इमारतीमध्ये गेलेला कर्मचारी जर स्वतःच गुदमरुन वा होरपळून जखमी वा मृत होत असेल तर तो अन्य व्यक्तीचे बचाव कसे करू शकेल. यादृष्टीने कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक ती उपाययोजना, अद्ययावत यंत्रसामुग्री व अग्निरोधक उपकरणांची पूर्ण व्यवस्था करण्यात यावी. आजही आग लागलेल्या इमारतींमधून लोकांना बाहेर काढण्याचे काम मानवी प्रयत्नानेच होत आहे. त्यासाठी आग लागलेल्या इमारतींच्या आत या कर्मचाऱ्यांना जाणे भाग

पडते जे निश्चितच अतिशय जोखमीचे आहे. अशा परिस्थितीत हे बचाव कार्य मानवी हस्तक्षेप विरहित व अद्ययावत यांत्रिक सुरक्षेच्या मदतीने होऊ शकते किंवा कसे याचाही सखोल अभ्यास व तपासणी करून योग्य तो निर्णय शासनस्तरावरुन घेण्यात यावा व अशा घटना टाळण्याच्यादृष्टीने वा अशा घटनांमध्ये कमीत कमी जीवित व वित्त हानी होण्याच्यादृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात येण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.९३ महालेखाकारांनी नमुन्यादाखल बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती व नागपूर या आठ महानगरपालिकांचे सन २०१०-१५ या कालावधीचे लेखापरिक्षण केले असता यात अग्निशमन विभागांनी हाती घेतलेल्या अग्नि प्रतिबंधात्मक आणि नियंत्रण उपाययोजना अत्यंत असमाधानकारक असल्याचे दिसून येते. वर्ष २०१०-१५ मध्ये विशिष्ट अग्निशमन उपकरणे, साधनसामग्री, वाहने इत्यादींच्या खरेदीसाठी जी भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती त्यापैकी फक्त २२ टक्के भाग वापरण्यात आला होता. महानगरपालिकांनी अग्निसुरक्षा निधी गठीत केला नव्हता, महानगरपालिकांनी अग्निशमन सेवा बळकटीकरणासाठी कोणतेही वार्षिक शुल्क संकलीत केले नव्हते वा आकारलेही नव्हते. अग्निशमन केंद्रांच्या संख्येत खूप कमतरता होती. अग्निशमन केंद्रे जमीन, कायमस्वरूपी इमारत, ड्रील टॉवर्स, पाणी स्त्रोत, फायर हायड्रंट, आगीचे बंब, विशिष्ट अग्निशमन उपकरणे यासारख्या मुलभूत पायाभूत सुविधांनी सुसज्जीत नव्हती आणि त्यांची कमतरता होती. राज्यात अग्निशमन विभागांमध्ये महत्वपूर्ण पदांची संख्या लक्षणीय कमी होती. स्थानिक क्षेत्रातील अनेक इमारती आणि पेट्रोल पंप, LPG केंद्रे, फटाक्यांची दुकाने, लाकूड गिरण्या इत्यादींसारखे धोकादायक व्यवसाय अग्निशमन विभागांकडून अंतिम फायर NOC प्राप्त न करता चालविले जात होते. अग्निशमन कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात लक्षणीय तूट होती आणि अद्ययावत अग्निशमन प्रशिक्षण प्रबोधिनी बांधण्याच्या पहिल्या प्रस्तावाच्या तारखेपासून सात वर्षांपेक्षा जास्त कालावधी उलटूनही त्याचे बांधकाम प्रलंबित होते. मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांद्वारा दाखल करण्यात येणाऱ्या अग्निशमन तपासणी अहवालात संपूर्ण माहिती भरली / दिली जात नव्हती. काही महानगरपालिकामध्ये अग्निशमन केंद्रांचे नियंत्रण केंद्र अधिकाऱ्यांऐवजी निम्न स्तरावरील अग्निशमन कर्मचारी आणि अग्निशमन प्रणेते यांच्याकडून केले जात होते. इमारती आणि इतर मालमत्तांमधील अग्निप्रतिबंधक आणि जीव सुरक्षा उपाययोजना यांच्या अनुपालनाची खात्री करण्यासाठी अनुज्ञापक संस्थांनी जारी केलेली प्रपत्र-अ आणि प्रपत्र-ब मधील प्रमाणपत्रे त्रुटीपूर्ण होती आणि त्यावर मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांकडून प्रभावी संनियंत्रण केले जात नव्हते. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने टोलेजंग आणि मोडकळीस आलेल्या इमारतींच्या नियतकालिक तपासण्या न केल्यामुळे मुंबईमध्ये आगीचे भीषण अपघात घडणे आणि जीवित आणि मालमत्तेची हानी होणे अशा अनेक महत्वपूर्ण त्रुटी, उणिवा या लेखापरिक्षणातून निदर्शनास आल्या आहेत.

हे आक्षेप केवळ या तपासणी केलेल्या आठ महानगरपालिकांपुरतेच मर्यादीत न राहता ही परिस्थिती निश्चितपणे संपूर्ण राज्यभरच असणार याची समितीला खात्री आहे. आज राज्यात मोठ्या प्रमाणात शहरीकरण वाढत आहे व त्याअनुषंगाने इमारतींची संख्या व उंची देखील वाढत आहे. अशा परिस्थितीत आगी लागण्याचे प्रमाण देखील लक्षणीय व सातत्याने दिसून येते. कोठेही आग लागल्यास अग्निशमन यंत्रणेवर अवलंबून राहण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय रहिवाशांकडे नसतो व यात अनेक निरपराध लोकांचे जीव जातात. अग्निशमन सुरक्षा धोरण व अवलंबावयाची कार्यपद्धती व निकष हे राज्यातील सर्व जिल्ह्यांसाठी समान स्वरुपाचे असूच शकत नाही. जिल्ह्यांची भौगोलिक परिस्थिती, तेथील लोकसंख्या, इमारतींची उंची, वाहतूकीचे प्रमाण, रस्त्यांची रुंदी, पाण्याची उपलब्धता, वाहतूक कोंडी अशा अनेक कारणांस्तव त्या त्या शहराची अग्निसुरक्षेची गरज, आवश्यकता व उपाययोजना निरनिराळी असते. याअनुषंगाने विभागाने योग्य ते नियोजन करणे आवश्यक आहे. हे नियोजन पुढील २०-२५ वर्षातील होणारे शहरीकरण लक्षात घेता अत्यंत दूरदृष्टीने करण्यात यावे. एवढेच नव्हेतर जगाच्या पातळीवर अग्निशमन यंत्रणा अतिशय आधुनिक व सुसज्ज स्वरुपात कार्यरत असताना आपल्या देशात मात्र त्याचा अवलंब तातडीने केला जात नाही. एखाद्या तंत्रज्ञानाचा अवलंब करून त्यांची अंमलबजावणी करेपर्यंत लागणाऱ्या अमर्याद कालावधीदरम्यान ती यंत्रणा अन्य ठिकाणी कालबाह्य झालेली असते. अशापरिस्थितीत शहरनिहाय निकषांच्या आधारांवर विभागाने आधुनिक व अद्ययावत तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, त्यासाठी आवश्यक जास्तीत जास्त निधीची तरतूद करण्यात यावी, या बाबींचा अभ्यास व नियोजन करण्यासाठी एक तज्ज्ञ समिती नियुक्त करण्यात यावी, आवश्यकता पडल्यास त्यावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे तज्ज्ञ देखील घेण्याबाबतचा विचार व्हावा, अग्निशमन कर्मचाऱ्यांना त्या आधुनिक तंत्रज्ञानाचे योग्य प्रशिक्षण देण्यात येऊन अग्निशमन सुरक्षा यंत्रणा अतिशय सुसज्ज व अद्ययावत करण्यात यावी व महालेखापालांनी नोंदविलेल्या महत्त्वपूर्ण आक्षेपांची पुनरावृत्ती भविष्यात टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.९४ शहरांमध्ये ऊतुंग व उंच इमारतींची संख्या दिवसागणिक वाढत असून अशा इमारतींमध्ये आग लागल्यास बचाव कार्य करणे हे मोठे आव्हान आहे. अशा परिस्थितीमध्ये इमारतीमधील अंतर्गत अग्निशमन सुरक्षा यंत्रणा निकामी झाल्यास सद्यःस्थितीत कुठलीही पर्यायी व्यवस्था अग्निशमन विभागाकडे नाही. एका मर्यादेच्या पलिकडील उंच इमारतीमधून अग्निशमन यंत्रणा देखील लोकांना वाचवू शकत नाही. यासाठी आवश्यकता असल्यास महानगरपालिकेने नवीन इमारतीसंदर्भात अग्निशमन सुरक्षा नियम अधिक कठोर व परिपूर्ण करावेत. अग्निशमन विभागासाठी आर्थिक तरतूद वाढवावी. मनुष्यबळ, वाहने, अग्निशमन बंब तसेच प्रशिक्षण या बाबींसंदर्भात आधुनिक पद्धतीने सुधारणा करण्यात यावी. अग्निशमन यंत्रणा निश्चित करताना शहराचे भौगोलिक स्वरुप, लोकसंख्या, शहरीकरण व औद्योगिकरणाचे प्रमाण, इमारतीची उंची, रस्ते, वाहतूक या सर्व बाबींच्या आधारे शहराची अग्निशमन सुरक्षा सक्षम करण्यासाठी किती आवश्यकता आहे याचे मुल्यमापन व आढावा घेऊनच टप्पानिहाय कार्यक्रम तयार करावा, त्यात किती फायर स्टेशन व किती वाहनांची आवश्यकता आहे, त्याचे तांत्रिक मापदंड काय असावेत, त्यातही अ,ब,क,ड महानगरपालिकांमध्ये त्याची काय स्थिती असावी व त्यांना देण्यात येणारे प्राधान्यक्रम, या सर्वांसाठी येणारा खर्च, आर्थिक तरतूद याचे परिपूर्ण नियोजन व मुल्यमापन करूनच ही यंत्रणा उभी करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.९५ मुंबई ही राज्याची राजधानी व देशाची आर्थिक राजधानी असून या शहराचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय व राजकीय महत्त्व अनन्यसाधारण आहे. मुंबईचे भौगोलिक स्वरुप पाहता जागेची अत्यंत कमतरता याठिकाणी आहे. त्यामुळे इमारतींची उंची दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत चाललेली आहे. त्यातही या शहराची वाढती लोकसंख्या, वाहतूकीची वर्दळ, अरुंद रस्ते, पार्कींगची समस्या, अनधिकृत बांधकामे व पार्कींग, वाहनांची वाढती संख्या, दाटीवाटीची वस्ती व रस्त्यावंर होणारी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी अशा अनेक समस्यांमधून योग्य तो मार्ग काढून अग्निशमन व्यवस्था शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचविणे व कमीत कमी जिवीत व वित्त हानी होण्याच्यादृष्टीने यथायोग्य नियोजन करणे हे अतिशय आव्हानात्मक व जिकीरीचे ठरत असले तरी ते करणे अग्निशमन विभागास बंधनकारक ठरते. त्याचप्रमाणे घराच्या सजावटीसाठी अंतर्गत विद्युत रचनेत व विद्युत वाहिनीमध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेले बदल तसेच यासाठी लाकडाचा मोठ्या प्रमाणात होत असलेला वापर या सर्व बाबींमुळे शॉर्टसर्कीटने आग लागण्याचे प्रमाण देखील दिवसागणिक वाढतच आहे. जोपर्यंत उंच इमारतींमधील शेवटच्या मजल्यावरील लोकांना वाचविण्याची यंत्रणा महानगरपालिकेकडे उपलब्ध होत नाही तोपर्यंत उंच इमारतींना परवानगी देणे अत्यंत धोकादायक आहे अथवा उंच इमारतींसाठी पुरेशी अग्निशमन यंत्रणा उभी करून ती मजबूत करण्याची आवश्यकता आहे. अग्निसुरक्षा (Fire Fighting) व बचाव कार्य (Fire Rescue) हे दोन्ही विषय समांतर व स्वतंत्ररित्या हाताळण्याची आवश्यकता आहे. सद्यःस्थितीत अग्निशमन शाखेकडे उपलब्ध असलेल्या व्यवस्था व आधुनिक यंत्रसामुग्री ही अत्यंत अपूरी व तोकडी असून विभागाकडे उंच शिड्यांचा देखील अभाव आहे. अशा परिस्थितीत वरच्या मजल्यांवरती राहणाऱ्या लोकांच्या सुटकेसाठी सद्यःस्थितीत कोणतीही परिपूर्ण यंत्रणा अस्तित्वात नाही. त्याचप्रमाणे सद्यःस्थितीत कार्यरत असलेल्या शिड्यांची उंची ही जास्तीत जास्त ७ ते ८ मजल्यापर्यंतची असल्यामुळे त्याचा पूर्ण उपयोग होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे दाटीवाटी, अरुंद रस्ते, इमारतीखाली पार्कींग केलेली वाहने व वाहतूकीच्या कोंडीमुळे अग्निशमन बंब हे घटनास्थळी वेळेत तातडीने पोहोचू शकत नाहीत व आग आटोक्यात आणण्यास अमर्याद विलंब होतो. त्याचा परिणाम मोठ्या प्रमाणात जीवित व वित्त हानीवर होतो. अतः मुंबई, मुंबई उपनगर, नवी मुंबई व ठाणे इ. जिल्ह्यांमधील विशेष भौगोलिक परिस्थिती व इमारतींची उंची पाहता या शहरांसाठी अग्निशमन यंत्रणा अतिशय सुसज्ज, आधुनिक व तत्पर ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी जगाच्या पातळीवर अन्य ठिकाणी कार्यरत असलेल्या अग्निशमन यंत्रणेचा अभ्यास करून योग्य ती यंत्रणा अद्ययावत सामुग्रीसह याठिकाणी निर्माण करण्यात यावी. आग लागल्यानंतर अग्निशमन दलाने ती विझविण्याअगोदर त्या इमारतीमध्ये अस्तित्वात असलेली अग्निशमन व्यवस्था अधिक सक्षम व अद्ययावत व कार्यरत ठेवण्यावर अधिक भर देण्यात यावा. प्रत्येक इमारतीमध्ये आग विझविण्याची अंतर्गत सुरक्षा व्यवस्था निर्माण करणे बंधनकारक करण्यात यावे, त्या यंत्रणेचा वापर करण्याचे योग्य प्रशिक्षण इमारतीतील रहिवाशांना देण्यात यावे. लोकांमध्ये अग्निसुरक्षेसंदर्भात जागरुकता निर्माण करण्यात यावी, जेणेकरून अग्निशमन दल येईस्तोवर इमारतीच्या स्तरावरच प्राथमिकरित्या आग विझविण्याचे प्रयत्न सुरू करणे शक्य होईल. त्याचप्रमाणे फायर स्टेशनची संख्या वाढविण्यात यावी, त्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ पुरविण्यात यावे, राज्य शासनाने स्वतंत्र अग्निशमन यंत्रणा उभी करावी व त्यास आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून द्यावा. तसेच नविन इमारतीच्या बांधकामास परवानगी देतेवेळीच त्या-त्या प्रमाणात फायर स्टेशनची जागा आरक्षित ठेवण्याच्या पर्यायाचा देखील विचार विभागाने सकारात्मकरित्या करून योग्य तो निर्णय घेवून त्याची प्रभावी अंमलबजावणी सद्यःस्थितीत अस्तित्वात असलेल्या अग्निशमन नियमांनुसार अनेक बंधने इमारतींवर घालण्यात आलेली आहेत. ज्यात स्वतंत्र जिना, फायर फायटींग सिस्टिम इ. अनेक बाबींचा त्यात समावेश आहे. परंतु त्याची देखील प्रभावी अंमलबजावणी होत नाही, अग्निशमन यंत्रणेकडून यासंदर्भातील पाहणी व निरिक्षण नियमितपणे होत नाही. यासंदर्भात योग्य ते धोरण व कार्यपद्धती निश्चित करून त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

## नगरविकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेदांवरील परिच्छेद क्र.५.१

| परिच्छेद क्र. | परिच्छेदाचे स्वरुप | स्पष्टीकरणात्मक ज्ञापन |
|---|---|---|
| ५.१ | प्रशिक्षण केंद्राच्या बांधकामावर झालेला निष्फळ खर्च –<br>**निधीची व कर्मचाऱ्यांची अनुपलब्धता यामुळे घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पाचा भाग म्हणून नाशिक महानगरपालिकेने मार्च २००९ मध्ये बांधलेल्या प्रशिक्षण केंद्राचा वापर एप्रिल २०१६ पर्यंत करण्यात आला- नव्हता, ज्यामुळे त्यावर झालेला रु.१.०३ कोटी इतका खर्च निष्फळ ठरला.**<br>जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत नागरी पायाभूत सुविधा आणि सुशासन यावरील उप अभियानाच्या केंद्रीय मंजूरी व संनियंत्रण समितीने नाशिक महानगरपालिकेच्या (NMC) घनकचरा व्यवस्थापन (SWM) प्रकल्पाला रु.६० कोटी इतक्या अंदाजित खर्चास मंजूरी दिली (डिसेंबर २००६). रु.६० कोटी या प्रकल्प खर्चात शिक्षण, जनजागृती, SWM मधील नैपुण्य केंद्र (प्रशिक्षण केंद्र) आणि कर्मचारी निवासस्थाने यासाठीच्या रु.९० लाख खर्चाचा समावेश होता.<br>NMC ने प्रशिक्षण केंद्र (९७७.०८ चौ.मी.) आणि पाच कर्मचारी निवासस्थाने (४८८.५४ चौ.मी.) यांच्या बांधकामाचे रु.९०.४० लाख इतक्या एकूण खर्चाचे काम एका कंत्राटदाराला सोपविले (ऑक्टोबर २००७) जे एप्रिल २००८ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. प्रशिक्षण केंद्र आणि कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांना एकाच युनिटमध्ये एकत्रित केल्यामुळे प्लींथ पर्यंतचा पाया, अतिरिक्त मजला वाढविल्यामुळे आर.सी.सी. कॉलम आणि बिम्सच्या संख्येत झालेला वाढ, | नाशिक महानगरपालिकेमार्फत JNNURM अंतर्गत अस्तित्वातील घनकचरा प्रकल्पाची असलेली ३०० मे.टन प्रतिदिन क्षमता वाढवून ५०० मे.टन प्रतिदिन पर्यंत करण्यासाठी आवश्यक असलेल्या कामांचा समावेश असलेला प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला.<br>यामध्ये सदर प्रशिक्षण केंद्र व निवासस्थाने बांधणे या कामांचा समावेश होता. सदर प्रकल्पास मान्यता मिळाल्यानंतर, या प्रकल्पांतर्गत प्रशिक्षण केंद्राची इमारत बांधली असून, या इमारतीमध्ये कर्मचाऱ्यांची निवासस्थाने व प्रशिक्षण केंद्र आहे. इमारतीमधील सर्व निवासस्थानांचा महानगरपालिकेच्या पात्र कर्मचाऱ्यांकडून वापर होत आहे.<br>प्रशिक्षण केंद्र चालवण्यासाठी महानगरपालिकेकडे पुरेशी यंत्रणा नसल्याने सदर प्रशिक्षण केंद्र चालविण्यासाठी या क्षेत्रातील संस्थांची मदत घेण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. यासंदर्भात ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांचेसोबत महानगरपालिकेमार्फत पत्रव्यवहार करण्यात आला असला तरी, त्यास अंतिम रुप मिळाले नाही.<br>सदर प्रशिक्षण केंद्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत |

| | |
|---|---|
| काँक्रीट रस्ता, पदपथ आणि कुंपणाची भिंत, पोहोच व्दार नगरविकास विभाग अशा अतिरिक्त बाबींचा समावेश झाल्यामुळे एकूण रु.१.५५ कोटी खर्चात हे काम मुदतीनंतर मार्च २००९ मध्ये पूर्ण करण्यात आले.<br>NMC च्या दस्तऐवजांची तपासणी केली असता असे आढळून आले की (एप्रिल २०१५) NMC च्या पात्र कर्मचाऱ्यांकडून सर्व पाच कर्मचारी निवासस्थानांचा नियमीतपणे वापर केला जात होता त्याचवेळी मार्च २००९ मध्ये बांधकाम पूर्ण होऊनही एप्रिल २०१५ पर्यंत प्रशिक्षण केंद्राचा वापर करण्यात आला नव्हता. लेखापरीक्षकांनी NMC कर्मचाऱ्यांबरोबर प्रशिक्षण केंद्राची प्रत्यक्ष तपासणी केली असता (एप्रिल २०१५) असे आढळून आले की, दीर्घ काळ केंद्र विनावापर पडून राहिल्यामुळे त्याचे दरवाजे तुटले होते आणि विद्युत साधने आणि उपकरणे गहाळ झाली होती.<br>NMC ने असे सांगितले (एप्रिल २०१५) की निधी व कर्मचाऱ्यांच्या अनुपलब्धतेमुळे प्रशिक्षण केंद्राचा वापर करता येऊ शकला नव्हता. त्यांनी पुढे असेही सांगितले की, सदर केंद्र महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन प्रबोधिनी (MEETRA), GOM यांना त्यांच्या वापरासाठी हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लेखापरीक्षकांना परंतु असे आढळून आले की, एप्रिल, २०१६ पर्यंत प्रशिक्षण केंद्र MEETRA ला हस्तांतरीत करण्यात आले नव्हते. अशाप्रकारे नाशिक महानगरपालिकेने बांधलेले प्रशिक्षण केंद्र सात वर्षांपेक्षा अधिक काळ वापरात आणले गेले नव्हते (मार्च २००९ ते एप्रिल २०१६) परिणामी त्यावरील रु.१.०३ कोटीचा खर्च निष्फळ ठरला.<br>हे प्रकरण जुलै २०१५ मध्ये शासनाकडे संदर्भित करण्यात आले, एप्रिल २०१६ पर्यंत त्यांचे उत्तर प्राप्त झाले नव्हते. | करण्यासंदर्भात प्राधिकरणाने अनुकूलता दर्शविली. त्यासंदर्भात त्यांचेकडेही वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला. मात्र हस्तांतरणाची कार्यवाही पुर्ण झाली नाही.<br>या प्रशिक्षण केंद्राचा विविध महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व विविध शासकीय खाजगी संस्थांना घनकचरा व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण व माहिती देण्याकरीता वापर करण्यात आला.<br>नाशिक महानगरपालिकेने घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट लावण्यासाठी उभारलेला ५०० मे.टन प्रतिदिन क्षमतेचा प्रकल्प खाजगीकरणाच्या तज्ञ व अनुभवी एजन्सीच्या माध्यमातून ३० वर्ष कालावधीसाठी चालविण्याबाबत निर्णय घेतला आहे. यामुळे प्रकल्प संबंधित एजन्सीकडे हस्तांतरीत झाल्यानंतर या प्रशिक्षण केंद्राची इमारत संबंधित एजन्सीकडे हस्तांतरीत होऊन त्याचा प्रशिक्षणासाठी वापर होणार आहे.<br>तथापि या प्रशिक्षण केंद्राची इमारत सन २००९ मध्ये बांधण्यात आल्यानंतर इमारतीचा सन २०१६ पर्यंत प्रशिक्षणासाठी वापर झाला नाही. याकरीता जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याबाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.<br>**मा. महालेखापाल यांचे अभिप्राय :-**<br>Compliance to the following may be given to PAC. |

| | | |
|---|---|---|
| | | 1. Whether any action has been initiated against the officers involved in it ?<br>2. On what terms and conditions it is proposed to hand over the Training Centre to private agency ?<br>3. Expenditure incurred on the repairs and maintenance on the Training Centre may also be furnished. |

(सु. द. धोंडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**साक्ष :**

उक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक १४ जून, २०१८ रोजी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली, त्यावेळी सदरील परिच्छेदाबाबत समितीला अवगत करण्यास सूचित केले असता, सदरहू परिच्छेदामध्ये तीन मुद्दे काढण्यात आलेले आहेत.— (१) प्रशिक्षण केंद्र विनावापर पडून असल्यामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्यामुळे त्यासंदर्भातील जबाबदारी निश्चित करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणे, (२) प्रशिक्षण केंद्र खाजगी संस्थेकडे कोणत्या अटी व शर्तीच्या आधारे देण्यात आले, (३) प्रशिक्षण केंद्र विनावापर पडून राहिल्यामुळे प्रशिक्षण केंद्रावर झालेल्या खर्चाची वसुली संबंधित अधिकाऱ्यांकडून केली जाणार आहे काय ? संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी पूर्ण केलेली आहे. विभागीय चौकशीचा अहवाल प्राप्त झालेला आहे. विभागीय चौकशीत चार्जेस सुरू झाले नाहीत, असा अहवाल प्राप्त झालेला आहे. ते असंमत केलेले आहे. त्यानुसार १० टक्के पेन्शन रोखण्याबाबतचा प्रस्ताव तयार करून सर्वसाधारण सभेपुढे (General body) सादर केलेला आहे. त्यानुसार सर्वसाधारण सभेमध्ये (General body) निर्णय घेतला जाणार आहे. चार्जेसमध्ये उत्तर देताना सांगण्यात आले की, शासनाची मान्यता आहे त्यामुळे ते होऊ शकत नाही. विभागप्रमुखांनी डीपीआर परिपूर्ण करणे अपेक्षित आहे. यामध्ये काही त्रुटी राहिल्या होत्या. त्यानुसार त्यांना शिक्षा प्रस्तावित केलेली आहे. विभागीय चौकशीमध्ये शिस्तभंगाची कारवाई ही अंतिम टप्प्यात आहे. त्यानुसार सर्वसाधारण सभेकडून (General body) निर्णय घेतला जाणार आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सर्वसाधारण सभेने (General body) हे नाकारले तर काय होईल ? अशी विचारणा समितीने केली असता, सर्वसाधारण सभेने नाकारले तर शासनाकडे पुढील कार्यवाही करण्यासाठी जावे लागणार आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम पूर्णपणे निष्फळ ठरलेले आहे. हे कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी वापरले जात आहे. आता ते काम खाजगी संस्थाला दिले जाणार आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, प्रशिक्षण केंद्राच्या बांधकामावर १ कोटी ३ लक्ष रुपयांचा खर्च झालेला आहे. सदरहू प्रशिक्षण केंद्र हे विविध महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व विविध शासकीय, खाजगी संस्थांना घनकचरा व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण व माहिती देण्याकरिता अपेक्षित होते. यासाठी सन २००९ ते २०११ आणि सन २०१६ पर्यंत तीन वेगवेगळ्या संस्थांना देण्यासाठी प्रयत्न करण्यात आला. अजून त्यास पूर्णत्वाचे स्वरूप आलेले नाही. यामध्ये ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट बॉडी आहे. मित्र आपली एजन्सी आहे. परंतु, यास अंतिम स्वरूप देता आले नाही. त्यामुळे सन २०१६ पासून महानगरपालिकेने प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. सन २०१६ मध्ये १५२७, सन २०१७ मध्ये २१८८ आणि सन २०१८ मध्ये ११३३ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिलेले आहे. अशा प्रकारे वापर सुरु झालेला आहे. परंतु, भविष्यात घनकचरा व्यवस्थापन प्रशिक्षणासाठी कसा वापर करता येईल यासाठी प्रयत्न केले जात आहे. तसेच निवासी वापरदेखील होत आहे. कुशल प्रशिक्षण दिले जात आहे. घनकचरा व्यवस्थापनाच्या ठिकाणी प्रशिक्षण केंद्र कसे उभारता येईल त्यासाठी विभागाचा प्रयत्न सुरु राहणार आहे. देखभाल दुरुस्ती व वीज देयकावर आणि वेतनावर खर्च होत आहे. इतर वेगळा खर्च केला जात नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

दुरुस्तीवर काही खर्च केला जातो काय ? सन २००९ ते २०१६ पर्यंत दुरुस्तीवर खर्च केलेला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, दुरुस्तीवर खर्च केलेला नाही. परंतु, सन २०१६ मध्ये १ लाख १३ हजार ७३०, सन २०१७ मध्ये १ लाख ७३ हजार ७३० आणि सन २०१८ मध्ये ४७ हजार १२० रुपयांचा खर्च झालेला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

नाशिक महानगरपालिकेने वापरून प्रशिक्षण द्यावे, अशी भूमिका असणार आहे काय? इतर संस्थेला वापर करण्यासाठी देण्याऐवजी नाशिक महानगरपालिकेने योग्य प्रकारे वापर केला तर विद्यार्थ्यांना आणि इतरांना चांगला फायदा होणार आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यास सहमती दर्शवत यासंदर्भात दोन्ही बाजूने विचार केला जात आहे. पीपीपी मॉडेल हे केंद्र शासनाचे आहे. यांच्याबरोबर टायप करता येईल किंवा कसे हे पाहिले जात आहे. दोन्ही मॉडेलचा विचार करून यामधील मोस्ट फिजिबल जे असेल त्याचा विचार केला जाणार आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

## अभिप्राय व शिफारस:-

### ५.१ "प्रशिक्षण केंद्राच्या बांधकामावर झालेला निष्फळ खर्च"

### अभिप्राय

२.२ जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत नागरी पायाभूत सुविधा आणि सुशासन यावरील उप अभियानाच्या केंद्रीय मंजूरी व संनियंत्रण समितीने नाशिक महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन (SWM) प्रकल्पाला रु.६० कोटी इतक्या अंदाजित खर्चास डिसेंबर,२००६ मध्ये मंजूरी दिली. ज्यात शिक्षण, जनजागृती, SWM मधील नैपुण्य केंद्र (प्रशिक्षण केंद्र) आणि कर्मचारी निवासस्थाने यासाठीच्या रु. ९० लाख खर्चाचा समावेश होता. त्यासाठी नाशिक महानगरपालिकेने प्रशिक्षण केंद्र आणि पाच कर्मचारी निवासस्थाने यांच्या बांधकामाचे रु.९०.४० लाख इतक्या एकूण खर्चाचे काम कंत्राटदाराला दिले, जे एप्रिल,२००८ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. प्रशिक्षण केंद्र आणि कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांना एकाच युनिटमध्ये एकत्रित केल्यामुळे प्लींथ पर्यंतचा पाया, अतिरिक्त मजला वाढविल्यामुळे आर.सी.सी. कॉलम आणि बिम्सच्या संख्येत झालेली वाढ, काँक्रीट रस्ता, पदपथ आणि कुंपणाची भिंत, पोहोच व्दार इत्यादींचे बांधकाम अशा अतिरिक्त बाबींचा समावेश झाल्यामुळे एकूण रु.१.५५ कोटी खर्चात हे काम मुदतीनंतर मार्च,२००९ मध्ये पूर्ण करण्यात आले. कर्मचारी निवासस्थानांचा नियमितपणे वापर केला जात होता. परंतु मार्च,२००९ मध्ये बांधकाम पूर्ण होऊनही एप्रिल,२०१५ पर्यंत प्रशिक्षण केंद्राचा मात्र वापर करण्यात आला नव्हता व दीर्घ काळ केंद्र विनावापर पडून राहिल्यामुळे त्याचे दरवाजे तुटले होते आणि विद्युत साधने आणि उपकरणे गहाळ झाली होती असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

२.३ प्रशिक्षण केंद्र चालवण्यासाठी महानगरपालिकेकडे पुरेशी यंत्रणा नसल्याने तसेच निधी व कर्मचाऱ्यांच्या अनुपलब्धतेमुळे प्रशिक्षण केंद्राचा वापर करता येऊ शकला नव्हता. तरीही हे प्रशिक्षण केंद्र चालविण्यासाठी ऑल इंडिया इन्स्टीट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु त्यास अंतिम रुप मिळाले नाही. तरीही

आता नाशिक महानगरपालिकेने हा प्रकल्प खाजगीकरणाच्या तज्ञ व अनुभवी एजन्सीच्या माध्यमातून ३० वर्षे कालावधीसाठी चालविण्याबाबत निर्णय घेतला आहे. यामुळे प्रकल्प संबंधित एजन्सीकडे हस्तांतरीत झाल्यानंतर या प्रशिक्षण केंद्राची इमारत संबंधित एजन्सीकडे हस्तांतरीत होऊन त्याचा प्रशिक्षणासाठी वापर होणार आहे. तथापि, या प्रशिक्षण केंद्राची इमारत सन २००९ मध्ये बांधण्यात आल्यानंतर इमारतीचा सन २०१६ पर्यंत प्रशिक्षणासाठी वापर झाला नाही याकरीता जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याबाबत संबंधितांना निदेशीत केल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

**शिफारस**

**२.४ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप अतिशय गंभीर असून केवळ घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पाचा भाग म्हणून नाशिक महानगरपालिकेने मार्च,२००९ मध्ये बांधलेल्या प्रशिक्षण केंद्राचा वापर निधी व कर्मचाऱ्यांच्या अनुपलब्धतेमुळे एप्रिल,२०१६ पर्यंत करण्यात आला नव्हता, प्रशिक्षण केंद्र व कर्मचाऱ्यांचे निवासस्थान याचे एकत्रित काम रु. १.५५ कोटी मध्ये विलंबाने पूर्ण करण्यात आले परंतु कर्मचाऱ्यांच्या अनुपलब्धतेमुळे प्रशिक्षण केंद्राचा वापर न झाल्यामुळे त्यावर झालेला रु.१.०३ कोटी इतका खर्च निष्फळ ठरला. सदरहू प्रशिक्षण केंद्र विनावापर पडून राहिल्यामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले असून घनकचरा व्यवस्थापनासंदर्भातील प्रशिक्षणाचा लाभ देखील पात्र विद्यार्थ्यांना मिळू शकला नाही. या गंभीर प्रकरणी महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतर संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन दोषी अधिकाऱ्यांवर विभागाने तात्काळ कारवाई करणे आवश्यक असताना महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपाची कोणतीही दखल विभागाने स्वत:हून घेतली नाही. लोकलेखा समितीची बैठक लागल्यानंतर या कारवाईस गती प्राप्त झाली. ही गंभीर बाब असून समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. या प्रकरणी समितीने चौकशीच्या सद्य:स्थितीबाबत विचारणा केली असता संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी पुर्ण करण्यात आली असून त्याचा अहवाल प्राप्त झालेला**

आहे. विभाग प्रमुखांनी डीपीआर तयार करताना तो परिपूर्ण करणे अपेक्षित आहे. त्यामध्ये काही त्रुटी राहिल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर शिक्षा प्रस्तावित केलेली आहे. तसेच विभागीय चौकशीमध्ये शिस्तभंगाची कारवाई अंतिम टप्प्यात आहे. त्यात १० टक्के निवृत्तीवेतन रोखण्याबाबतचा प्रस्ताव तयार करुन सर्वसाधारण सभेपुढे (General Body) सादर केला असून यासंदर्भातील निर्णय त्यात घेतला जाणार असल्याचे विभागीय प्रतिनिधींकडून समितीसमोर सांगण्यात आले. याबाबत आक्षेप नोंदवित सर्वसाधारण सभेमध्ये या प्रस्तावित कारवाईस मान्यता मिळाली नाही तर पुढे काय, अशी समितीने विचारणा केली असता ते शासनाकडे पुढील कारवाईसाठी येईल असे समितीस सांगण्यात आले. प्रशिक्षण केंद्राचे केलेले बांधकाम पुर्णपणे निष्फळ ठरले असून ते आता फक्त कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी वापरले जात आहे व आता ते काम खाजगी संस्थेला दिले जाणार आहे. सन २०१६ पासून महानगरपालिकेने हे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली असल्यामुळे त्याचा वापर सुरु झाला आहे. परंतु सन २०१६ पर्यंत हे प्रशिक्षण दिले जात नव्हते हे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले.

अत: सदरहू प्रशिक्षण केंद्र इतर संस्थेला देण्याऐवजी त्याचा वापर नाशिक महानगरपालिकेने स्वत: करुन विद्यार्थ्यांना प्रशिक्षण द्यावे तसेच अन्य पर्यायांचा देखील विचार करुन शासन हिताचा निर्णय तात्काळ घेवून या प्रशिक्षण केंद्राचा वापर तात्काळ करण्यात यावा तसेच या प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करुन केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

## नगरविकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१४-२०१५ चा स्थानिक संस्था अहवाल

| परिच्छेद क्र. आणि वर्ष | परिच्छेद | उत्तर | महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय |
| --- | --- | --- | --- |
| ५.२ २०१४-१५ | **कंत्राटदारास जादा भूगतान**<br><br>डक्टाईल लोखंडी पाइप्स (Ductile iron pipes) ची तरतूद आणि पुरवठा करण्याकरिता चुकीचे दर लावल्यामुळे नगर परिषद, बसमतनगर, हिंगोली व्दारे कंत्राटदारास रुपये ४०.५४ लाखाचे जादा भुगदान करण्यात आले. | | |
| | मुख्य अधिकारी, नगर परिषद, बसमतनगर (BMC), हिंगोली यांनी बसमत पाणी पुरवठा योजनेचे आवर्धन हे काम छोटया आणि मध्यम शहराकरिता केंद्र पुरस्कृत नागरी पायाभूत सुविधा विकास योजना (UIDSSMT) अंतर्गत रुपये ४७.२६ कोटी स्वीकृत निविदा किंमतीवर (निविदाच्या रुपये २२.५८ कोटी अंदाजित किमतीवर १०९.४० टक्के अधिक्याने) ३० महिन्यांच्या (फेब्रुवारी २०१२ ) विनिर्दिष्ट कालावधीत पूर्ण करण्याकरिता कंत्राटदारास बहाल केले. (ऑगस्ट २००९) योजनेच्या कार्यान्वयाकरिता तांत्रिक प्राधिकरण असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कामाचे प्राक्कलन तयार केले जे MJP च्या दर अनुसुची (SoR) २००६-०७ वर आधारित होते आणि तेच प्राक्कलन BMC व्दारे स्विकारण्यात आले.<br><br>पाणी पुरवठा योजनेचे काम अनेक पोट-कामामध्ये विभागले होते. ज्यापैकी 'रॉवॉटर ग्रॅव्हीटी मेन' (Raw Water Gravity Main) हे एक होते. या पोट कामामध्ये डक्टाईल लोखंडी (DI) पाईप्सची तरतूद आणि पुरवठा तसेच त्याचे परिवहन, चढवणे/उतरवणे, मजूरी आणि मालाची किंमत इत्यादी समवेत त्याची संपूर्ण जोडणी समाविष्ट होती. या पोट-कामाकरिता MJP ने SoR २००६-०७ अनुसार रुपये ६५ प्रति किलोग्रॅम प्रमाणे ५०,००० किलोग्रॅम DI पाईप्सची आवश्यकता असल्याचा अंदाज बांधला. नगरपरिषद, बसमतनगर | केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी अंतर्गत मंजूर बसमत पाणी पुरवठा योजना मंजूर आहे. सदर प्रकल्पाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तयार केले होते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अदांजपत्रकात डीआय पाईप्स संदर्भात नमूद केलेल्या रु.६५/- प्रति किलोग्रॅम दरापेक्षा बसमत नगरपरिषदेने निविदेमध्ये रु.१०५/- प्रति किलोग्रॅम अंतर्भूत केले. त्यामुळे कंत्राटदारास रु.४०.५४ लक्ष चे जादा प्रदान झाले.<br><br>बसमत नगरपरिषदेने सदर उल्लेखित | वसूलीची कार्यवाही झाली असल्याने अभिप्राय नाहीत. |

यांच्या दस्तऐवजांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले (मार्च २०१५) की DI पाईप्स करिता MJP ने अंदाजित केलेल्या रुपये ६५ प्रति किलोग्रॅम ऐवजी BMC ने निविदा दस्तऐवजाच्या अनुसुची-ब मध्ये रुपये १०५ प्रति किलोग्रॅम दर अंतर्भुत केला होता. खाली तक्ता १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे ४८,४०० किलोग्रॅम DI पाईप्स वापरल्यामुळे कंत्राटदाराला रुपये ४०.५४ लाखाचे जादा प्रदान झाले.

तक्ता १:- कंत्राटदारला केलेले जादा भुगतान दर्शविणारे विवरण

| कंत्राटदाराला केलेले भुगदान | | | | कंत्राटदारला प्रत्यक्ष देय असलेले भुगतान | | | जादा भुगदान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उपयोगात आलेले एकुण परिमाण (कि.ग्रॅ.मध्ये) | दर प्रति कि.ग्रॅ. (रु. मध्ये) | केलेले भुगदान (रुपये लाखात) | १०९.४० % अधिक्याने (रुपये लाखात) | दर प्रति (रु. मध्ये) | अनुदेय भूगदान ( रुपये लाखात) | १०९.४० % अधिक्याने (रुपये लाखात) | १०६.४२ लाख वजा ६५.८८ लाख |
| ४८४०० | १०५ | ५०.८२ | १०६.४२ | ६५ | ३१.४६ | ६५.८८ | ४०.५४ |

लेखापरिक्षणात निदर्शनास आणून दिल्यावर मुख्य अधिकारी BMC यांनी सांगितले (मार्च २०१५) की वस्तुस्थितीची पडताळणी केल्यावर कंत्राटदाराकडून जादा भुगतानाची वसुली करण्यात येईल आणि त्याबाबतचा अहवाल लेखापरिक्षेस सादर करण्यात येईल. तथापि, एप्रिल २०१६पर्यत कंत्राटदाराकडून कोणतीही वसुली करण्यात आली नाही.

ही बाब जुलै २०१५ मध्ये शासनास कळविण्यात आली. एप्रिल २०१६ पर्यत त्याचे उत्तर प्रतिक्षित होते.

जादा प्रदान झालेली रक्कम रुपये ४०.५४ लक्ष इतकी रक्कम संबंधित ठेकेदाराच्या देयकामधून कपात करण्यात आली आहे. त्याबाबतचा मुख्याधिकारी बसमतनगर यांचा अहवाल सोबत जोडला आहे.

(निलेश पोतदार)
कक्ष अधिकारी
नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

# वसमतनगर नगरपरिषद, वसमतनगर

(स्थापना 1952)

Toll Free No. 1800 233 1272 जिल्हा हिंगोली Email-ID : cobasmat@gmail.com

जा.क्र.:-1984/2018

Municipal Council BMC Basmathnagar Dist.Hingoli

दिनांक : 29/05/2018

प्रति,
मा.सहसचिव,
नगरविकास विभाग, मंत्रालय,
महाराष्ट्र शासन, मुंबई.
E-mail: pandurang.jadhav@nic.in , k85070@gmail.com
nilesh.potdar@nic.in

**विषय: भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन 2014-2015 च्या स्थानिक संस्था अहवालामधील परिच्छेद क्र. 5.2**

संदर्भ: 1) आपले कडील पत्र क्र. लेखाप-2018/प्र.क्र. 214/ नवि-33 दि. 7 मे, 2018
2) या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. 1605/2018 दि.08/05/2018
3) या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. 1648/2018 दि.09/05/2018
4) या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. 1681/2018 दि.10/05/2018
5) या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. 1765/2018 दि.16/05/2018

आ. महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन या नगरपरिषदेने **UIDSSMT** अंतर्गत सुधारीत वसमत शहर पाणी पुरवठा योजनेच्या निविदेमध्ये अनावधानाने झालेल्या त्रुटीमुळे **Raw Water Gravity Main** करीता आवश्यक **DI pipes** चे Specials च्या दरातील तफावतीमुळे संबंधीत ठेकेदार यास रु. 40.54 लक्ष इतकी रक्कम अधिक प्रदान झालेली आहे. त्यानुसार अतिप्रदान करण्यात आलेल्या रक्कमे पैकी खालील प्रमाणे कपातीची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | तपशिल | कपात केलेली रक्कम (रु. लाखात) | दिनांक | प्रमाणक क्र. | धनादेश क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 01 | देय असलेल्या शिल्लक FSD | 17.91 | 08/05/2018 | 136 | 234011 |
| 02 | चालु देयक क्रमांक 31 | 9.78 | 09/05/2018 | 149 | 234012 |
| 03 | चालु देयक क्रमांक 31 | 7.39 | 09/05/2018 | 157 | 234013 |
| 04 | चालु देयक क्रमांक 31 | 5.45 | 29/05/2018 | 202 | 234014 |
| | **एकूण** | 40.54 | | | |

वरील प्रमाणे संबंधीत ठेकेदाराच्या बीलातून संपूर्ण रक्कम रु. 40.54 लक्ष कपात करण्यात आली आहे. सोबत आवश्यक कागदपत्रे सादर करीत आहे. तसेच लेखा आक्षेप वगळून घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. करिता अंतीम अहवाल सविनय सादर करण्यात येत आहे.

आपला विश्वासु,

(निशिकांत प्रचंडराव)
मुख्याधिकारी

**प्रतिलिपी,**
मा. कार्यकारी अभियंता तथा प्रकल्प तांत्रिक सल्लागार, (PMC) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग परभणी यांना माहितीस्तव सादर.

नमुना १०७ (नियम १३१ व १४१)

# नगर परिषद वसमतनगर

२०१८ सालाच्या ---- ४ ---- महिन्यातील

## आकस्मीत खर्चाचे बिल

---- विभाग लेखाशिर्ष FSD बाबत २०० च्या ----

महिन्यातील प्रदानाच्या यादीतील प्रमाण पत्र क्रमांक ----

| उप प्रमाणकांचा अनुक्रमांक | खर्चाचे वर्णन आणि मंजुरीची आवश्यकता असलेल्या सर्व खर्चासंबंधीच्या प्रधिकाराच्या दिनांक व क्रमांक | रक्कम रुपये | पै. |
|---|---|---|---|
| | कार्यालयीन आदेश क्र. 1604/18 दि. 08/05/18 अन्वये UIDSSMT वसमत सुधारित पा.पु. योजने अंतर्गत शिल्लक असलेली FSD रक्कम रु. 17.91 लक्ष बाबत. | 1791000 | |
| | एकुण - | 1791000 | |

एकुण अक्षरी रुपये - सतरा लाख एक्याण्णव हजार केवळ

( मागील बाजु )

१) मी प्रमाणीत करतो की, परिषदेच्या हिताकडे योग्य लक्ष देवुन या बिलात आकारलेला खर्च टाळता येणे शक्य नव्हते माझ्या संपुर्ण माहिती प्रमाणे व नियमानुसार प्रमाणीत करतो कि,या बिलात नमुद केलेल्या रकमा, त्या मिळविण्याचा हक्क असलेल्या संबधीत व्यक्तींशी यथोचित रित्या दिल्या आहेत.

२) -।- मी प्रमाणीत करतो कि,विशेष परिस्थीतीमुळे शिर्षाखालील अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मासिक परिमाणापेक्षा अधिकप्रमाणात तात्पुरता खर्च करणे आवश्यक झाले व अधीक आवश्यक अनुदानाचा रकमेहुन अधीक प्रमाणात खर्च होईल तर अतिरिक्त अनुदान मंजुर करून देण्यास येईल या बद्दल मी माझी खात्री करून घेतली आहे.

३) -।- मी प्रमाणीत करतो कि, अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मासिक परिमाणापेक्षा अधिक खर्च झालेला नाही.

४) मी प्रमाणीत करतो कि, प्रमाणकात तपशीलवर दिलेल्या सर्व वस्तुचा संबधीत नोंदवहीत किंवा वस्तुसुचिमध्ये विशेष घेण्यात आलेला आहे.

५) मी प्रमाणीत करतो कि, बिलात खरेदी केल्याचे दाखविलेला माल चांगल्या स्थितीत मिळाला असुन त्यांचे परिमाण बरोबर आहे. त्याचा दर्जा चांगला आहे. त्यासाठी त्या दराचे पैसे देण्यात आले आहेत ते दर मंजुर केलेल्या व बाजार दरापेक्षा अधीक नाहीत आणी दोनदा रक्कम दिली जाउ नये म्हणुन संबधीत मागणीपत्रात व विजकपात रक्कम दिल्यासंबधीची नोंद घेण्यात आली आहे.

-।-प्रमाणपत्र (२) किंवा (३) खोडुन टाकावे

रूपये 1791000/- अक्षरी सत्रा लाख एक्क्याण्णव हजार

द्यावेत नांव नगर परिषद वसमतनगर

लेखापाल

मुख्याधिकारी

Municipal Council Basmathnagar Dist Hingoli BMC

चेक नंबर 234011

दिनांक 08/5/2018

नमुना १०७ (नियम १३१ व १४१)

# नगर परिषद वसमतनगर

२०१८ सालाच्या ---- मे ---- महिन्यातील

## आकस्मीत खर्चाचे बिल

(नगर परिषद वसमतनगर, वसमतनगर (महाराष्ट्र))

---- विभाग लेखाशिर्ष ---- UIDSSMT ---- २०० च्या ---- [illegible]

महिन्यातील प्रदानाच्या यादीतील प्रमाण पत्र क्रमांक ----

| उप प्रमाणकांचा अनुक्रमांक | खर्चाचे वर्णन आणि मंजुरीची आवश्यकता असलेल्या सर्व खर्चासंबंधीच्या प्रधिकाराच्या दिनांक व क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|
| | कार्यालयीन आदेश क्र. 1604/18 दि. 9/5/18 प्रमाणे UIDSSMT वसमत शहरातील पाणीपुरवठा योजना 3L चे चालू देयकातून रु. 0978212/- मंजूर बिल | 978212 |
| | एकुण - | 978212 |

एकुण अक्षरी रुपये नऊ लाख अठ्ठ्याहत्तर हजार दोनशे बारा फक्त

( मागील बाजु )

१) मी प्रमाणीत करतो की, परिषदेच्या हिताकडे योग्य लक्ष देवुन या बिलात आकारलेला खर्च टाळता येणे शक्य नव्हते माझ्या संपुर्ण माहिती प्रमाणे व नियमानुसार प्रमाणीत करतो कि, या बिलात नमुद केलेल्या रक्कमा, त्या मिळविण्याचा हक्क असलेल्या संबधीत व्यक्तींशी यथोचित रित्या दिल्या आहेत.

२) -।- मी प्रमाणीत करतो कि, विशेष परिस्थीतीमुळे शिर्षाखालील अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मासिक परिमाणापेक्षा अधिकप्रमाणात तात्पुरता खर्च करणे आवश्यक झाले व अधीक आवश्यक अनुदानाचा रक्कमेहुन अधीक प्रमाणात खर्च होईल तर अतिरिक्त अनुदान मंजुर करुन देण्यात येईल या बद्दल मीं माझी खात्री करुन घेतली आहे.

३) - ।- मी प्रमाणीत करतो कि, अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मासिक परिमाणापेक्षा अधिक खर्च झालेला नाही.

४) मी प्रमाणीत करतो कि, प्रमाणकात तपशीलवर दिलेल्या सर्व वस्तुचा संबंधीत नोंदवहीत किंवा वस्तुसुचिमध्ये विशेष घेण्यात आलेला आहे.

५) मी प्रमाणीत करतो कि, बिलात खरेदी केल्याचे दाखविलेला माल चांगल्या स्थितीत मिळाला असुन त्यांचे परिमाण बरोबर आहे. त्याचा दर्जा चांगला आहे. त्यासाठी त्या दराचे पैसे देण्यात आले आहेत ते दर मंजुर केलेल्या व बाजार दरापेक्षा अधीक नाहीत आणी दोनदा रक्कम दिली जाउ नये म्हणुन संबधीत मागणीपत्रात व विजकपात रक्कम दिल्यासंबधीची नोंद घेण्यात आली आहे.

-।-प्रमाणपत्र (२) किंवा (३) खोडुन टाकावे

रुपये 978212/- अक्षरी रु. नऊ लक्ष अठ्ठ्याहत्तर हजार ...

धावेत नांव मुख्याधिकारी नगर परिषद वसमत.

लेखापाल मुख्याधिकारी

अध्यक्ष वसमतनगर
नगर परिषद वसमतनगर जि. हिंगोली (महाराष्ट्र)

चेक नंबर 284012

दिनांक 09/05/18

नगर परिषद वसमतनगर

२०१८ सालाच्या ---- महिन्यातील

आकस्मीत खर्चाचे बिल

विभाग लेखाशिर्ष UIDSSMT ---- २०० च्या ----

महिन्यातील प्रदानाच्या यादीतील प्रमाण पत्र क्रमांक ----

| उप प्रमाणकाच्या अनुक्रमांक | खर्चाचे वर्णन आणि मंजुरीची आवश्यकता असलेल्या सर्व खर्चासंबंधीच्या प्राधिकाऱ्याच्या दिनांक व क्रमांक | रक्कम रुपये | पैसे |
|---|---|---|---|
| | कार्यालयीन आदेश क्रं. 16-4/18 दि 4/6/18 प्रमाणे UIDSSMT वसमत नागरिक पाणी पुरवठा योजना 3 चे चालू देयकापोटी रु. 739364/- अदाई बील | 739364 | 00 |
| | एकूण | 739364 | 00 |

अक्षरी रक्कम — सात लाख उनचाळीस हजार तीनशे चौसष्ट [illegible]

( [illegible] )

[illegible] खर्च झाला [illegible] [illegible] संपूर्ण माहिती [illegible] प्रमाणीत करतो कि [illegible] बिलात [illegible] केलेल्या [illegible] रकमा, त्या मिळविण्याचा हक्क असलेल्या संबंधी [illegible] यथोचित [illegible] आहेत.

२) [illegible] मी प्रमाणीत करतो कि, विशेष परिस्थितीमुळे शिर्षखालील अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मासिक परिमाणापेक्षा अधिक [illegible] खर्च करणे आवश्यक झाले व अधीक आवश्यक अनुदानाला [illegible] अधीक प्रमाणात खर्च होईल तर अतिरिक्त अनुदान मंजुर करुन देण्यास येईल या [illegible] मी [illegible] खात्री करुन घेतली आहे.

३) [illegible] मी प्रमाणीत करतो कि, अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मासिक परिमाणापेक्षा अधिक खर्च झालेला नाही.

४) मी प्रमाणीत करतो कि, प्रमाणकात तपशीलवार दिलेल्या सर्व वस्तुंच्या संबंधीत नोंदवहीत किंवा वस्तुसुचिमध्ये [illegible] घेण्यात आलेली आहे.

५) मी प्रमाणीत करतो कि, बिलात खरेदी केल्याचे दाखविलेला माल चांगल्या स्थितीत मिळाला असुन त्यांचे परिमाण बरोबर आहे. त्याचा दर्जा चांगला आहे. त्यासाठी त्या दराचे पैसे देण्यात आले आहेत ते दर मंजुर केलेल्या व बाजार दरापेक्षा अधीक नाहीत आणी [illegible] रक्कम दिली जाउ नये म्हणुन संबधीत मागणीपत्रात व [illegible] रक्कम दिल्यासंबधीची नोंद घेण्यात आली आहे.

[illegible] प्रमाणपत्र (२) किंवा (३) खोडुन टाकावे.

रक्कम 7393641/- अक्षरी [illegible]

धारकाचे नाव मुख्याधिकारी [illegible]

लेखापाल

मुख्याधिकारी

धनादेश क्रमांक 234016

दिनांक [illegible]

नमुना १०७ (नियम १३१ व १४१)

# नगर परिषद वसमतनगर

२०१८ सालाच्या ---मे.--- महिन्यातील

## आकस्मीत खर्चाचे बिल

---विभाग लेखाशिर्ष --- UIDSSMT ---२०० च्या V.No. 202

महिन्यातील प्रदानाच्या यादीतील प्रमाण पत्र क्रमांक --- 24/05/18

| उप प्रमाणकांचा अनुक्रमांक | खर्चाचे वर्णन आणि मंजुरीची आवश्यकता असलेल्या सर्व खर्चासंबंधीच्या प्राधिकाराच्या दिनांक व क्रमांक | रक्कम रुपये | पैसे |
|---|---|---|---|
| | कार्यालयीन आदेश क्र. 1604/18 दिनांक 07/05/2018 प्रमाणे UIDSSMT वसमत सुधारीत पाणी पुरवठा योजना 3% चालु देयकातुन रु. 545424/- कपात केले. | 545424/- | |
| | "सत्यप्रत" मुख्याधिकारी नगर परिषद वसमत जि.हिंगोली | | |
| | एकुण - | 545424/- | |

एकुण अक्षरी रुपये पाच लाख पंचेचाळीस हजार चारशे चोवीस

लेखापाल मुख्याधिकारी अध्यक्ष

## ( मागील बाजु )

१) मी प्रमाणीत करतो की, परिषदेच्या हिताकडे योग्य लक्ष देवुन या बिलात आकारलेले खर्च टाळता येणे शक्य नव्हते माझ्या संपुर्ण माहिती प्रमाणे व नियमानुसार प्रमाणीत करतो कि,या बिलात नमुद केलेल्या देय रक्कमा, त्या मिळविण्याचा हक्क असलेल्या संबधीत व्यक्तींशी यथोचित रित्या दिल्या आहेत.

२) -।- मी प्रमाणीत करतो कि,विशेष परिस्थितीमुळे शिर्षाखालील अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मासिक परिमाणापेक्षा अधिकप्रमाणात तात्पुरता खर्च करणे आवश्यक झाले व अधीक आवश्यक अनुदानाचा रक्कमेहुन अधीक प्रमाणात खर्च होईल तर अतिरिक्त अनुदान मंजुर करुन देण्यास येईल या बद्दल मी माझी खात्री करून घेतली आहे.

३) -।- मी प्रमाणीत करतो कि, अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मासिक परिमाणाप्रेक्षा अधिक खर्च झालेला नाही.

४) मी प्रमाणीत करतो कि, प्रमाणकात तपशीलवर दिलेल्या सर्व वस्तुचा संबंधीत नोंदवहीत किंवा वस्तुसुचिमध्ये विशेष घेण्यात आलेला आहे.

५) मी प्रमाणीत करतो कि, बिलात खरेदी केल्याचे दाखविलेला माल चांगल्या स्थितीत मिळाला असुन त्यांचे परिमाण बरोबर आहे. त्याचा दर्जा चांगला आहे. त्यासाठी त्या दराचे पैसे देण्यांत आले आहेत ते दर मंजुर केलेल्या व बाजार दरापेक्षा अधीक नाहीत आणी दोनदा रक्कम दिली जाउ नये म्हणुन संबधीत मागणीपत्रात व विजकपात रक्कम दिल्यासंबधीची नोंद घेण्यात आली आहे.

-।-प्रमाणपत्र (२) किंवा (३) खोडुन टाकावे

रुपये 54547.61

## ( मागील बाजु )

१) मी प्रमाणीत करतो की, परिषदेच्या हिताकडे योग्य लक्ष देवुन या बिलात आकारलेले खर्च टाळता येणे शक्य नव्हते माझ्या संपुर्ण माहिती प्रमाणे व नियमानुसार प्रमाणीत करतो कि,या बिलात नमुद केलेल्या देय रक्कमा, त्या मिळविण्याचा हक्क असलेल्या संबधीत व्यक्तींशी यथोचित रित्या दिल्या आहेत.

२) -।- मी प्रमाणीत करतो कि,विशेष परिस्थितीमुळे शिर्षाखालील अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मासिक परिमाणापेक्षा अधिकप्रमाणात तात्पुरता खर्च करणे आवश्यक झाले व अधीक आवश्यक अनुदानाचा रक्कमेहुन अधीक प्रमाणात खर्च होईल तर अतिरिक्त अनुदान मंजुर करुन देण्यास येईल या बद्दल मी माझी खात्री करून घेतली आहे.

३) -।- मी प्रमाणीत करतो कि, अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मासिक परिमाणाप्रेक्षा अधिक खर्च झालेला नाही.

४) मी प्रमाणीत करतो कि, प्रमाणकात तपशीलवर दिलेल्या सर्व वस्तुचा संबंधीत नोंदवहीत किंवा वस्तुसुचिमध्ये विशेष घेण्यात आलेला आहे.

५) मी प्रमाणीत करतो कि, बिलात खरेदी केल्याचे दाखविलेला माल चांगल्या स्थितीत मिळाला असुन त्यांचे परिमाण बरोबर आहे. त्याचा दर्जा चांगला आहे. त्यासाठी त्या दराचे पैसे देण्यांत आले आहेत ते दर मंजुर केलेल्या व बाजार दरापेक्षा अधीक नाहीत आणी दोनदा रक्कम दिली जाउ नये म्हणुन संबधीत मागणीपत्रात व विजकपात रक्कम दिल्यासंबधीची नोंद घेण्यात आली आहे.

**साक्ष :**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक १४ जून २०१८ रोजी नगर विकास विभागाचे प्रधान सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली त्यावेळी सदरहू परिच्छेदाच्या अनुषंगाने वसुली केलेली असून, ती मान्य आहे. महालेखापाल यांनी परिच्छेद काढला नसता तर हे पैसे पूर्णपणे बुडाले असते. असा प्रकार भविष्यात होऊ नये म्हणून विभागाने दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. यामध्ये कंत्राटदारास ४०.५४ लक्ष रुपये जास्तीचे प्रदान करण्यात आलेले आहेत. महालेखापाल यांनी परिच्छेद काढल्यानंतर ते पैसे वसूल केले आहेत. अशा प्रकारची चूक भविष्यात कोणत्याही नगरपालिकेत होऊ नये या दृष्टीकोनातून सूचना केल्या जाणार आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, निश्चितच सूचना केल्या जाणार आहेत. या परिच्छेदामध्ये एक दर डीआय पाईपचा टीएसमध्ये मंजूर असताना दुसऱ्या दराने निविदा काढली आहे. ज्या दराने टी.एस. होतो आणि त्यानुसार प्रशासकीय मान्यता दिली जाते. या अनुषंगाने निविदा काढली पाहिजे. हा निविदा प्रक्रियेचा एक भाग आहे. हे या परिच्छेदात झाल्याचे दिसून येत नाही. निविदेस अंतिम स्वरुप देणाऱ्या तांत्रिक व्यक्तीची प्रथम जबाबदारी असते. अशा प्रकारचे परिपत्रक काढून संबंधितांना एका महिन्याच्या आत सूचना दिल्या जाणार आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

The internal audit arrangements are the most important aspect in such cases. We have already written to the Chief Secretary and P.A.C. has also taken up this matter. महानगरपालिकेकडून अशा प्रकारच्या रोज तक्रारी येत आहेत. We are very much concern about the functioning of ULBs. यामध्ये शासनाने अंतर्गत लेखापरीक्षण यंत्रणा बळकट केली नाही तर अशी अनेक प्रकरणे येतच राहणार आहेत, असे मत महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून व्यक्त केले असता, We will entirely agree with you as an Urban Development Department. वास्तविक पहाता वित्त विभागाने त्याबाबतची नोंद घेतली पाहिजे. लोकल फंड ऑडिटची यंत्रणा ही वित्त विभागाला अहवाल सादर करीत असते. वित्त विभागाने ते अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले तर अशा वेळी नगरविकास विभागाकडून आवश्यक ती मदत त्यांना दिली जाणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

प्रस्ताव शासनाला सादर केला जाणार आहे. महानगरपालिकेचे लेखापरिक्षण वित्त विभागामार्फत केले जात आहे. याकरिता जिल्हापरिषदेमध्ये पंचायत राज समिती काम करीत आहे, असे वित्त विभागाच्या सचिवांनी समितीस सांगितले.

टीएसच्या पलिकडे जाऊन ज्या अधिकाऱ्याने निविदा काढली असून, त्यांच्यावर कारवाई केलेली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, संबंधित अधिकाऱ्यांकडून पहिल्यांदा खुलासा घेतलेला आहे. खुलाशामध्ये नजरचुकीने झाले असे संबंधित अधिकाऱ्याने उत्तर दिलेले आहे. परंतु, विभागाने त्यांनी दिलेले उत्तर मान्य केलेले नाही. ज्या दराला टीएस दिले जाते, त्याच दराने निविदा काढली पाहिजे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केलेली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, संबंधित तांत्रिक अधिकाऱ्याने निविदा निश्चित केलेली आहे. अशा अधिकाऱ्यावर कारवाई करून त्यासंदर्भातील अहवाल विभागास सादर करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP) यांस सूचित केले जाणार आहे. पीएमसी ही एमजेपी होती. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यामध्ये कार्यकारी अभियंता जबाबदार असणार आहेत. शाखा अभियंताची तशी जबाबदारी येणार नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, युएलबी लेव्हलवर जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई केली जाणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

तांत्रिक मंजुरी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने (MJP) दिलेली आहे. मुख्याधिकारी निविदा काढत असतात. त्यामुळे कनिष्ठ अधिकाऱ्यांवर जबाबदारी टाकणे योग्य नाही. The Tender process is being implemented only by the signature of the President and C.O.. However, the President is a Public representative and he is not a technical person and the only responsible person is C.O. of that Municipal Council. असे मत समितीने व्यक्त केले असता, मुख्याधिकारी हा तांत्रिक अधिकारी नसतो. पीएमसी म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP) याची नेमणूक केलेली आहे. मुख्याधिकारी यांना तांत्रिक सल्ला सदरील प्राधिकरणाकडून दिला जातो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने (MJP) टीएस केलेला आहे. निविदा नगरपालिकेने काढली आहे. त्यानुसार नगरपालिकेतील मुख्याधिकारी यांनी टीएसप्रमाणे निविदा काढण्याची जबाबदारी आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, मग आता चौकशीचा मुद्दा उपस्थित होणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदरहू प्रकरण सन २००९ मधील आहे. आता त्याची चौकशी कधी पूर्ण होणार हा देखील महत्वाचा प्रश्न आहे. सन २०१८ मध्ये चौकशीला सुरुवात केली जाणार आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, We will submit a report in three months. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

No, you have to submit report within one month. Our main concern is that you never submit the assured reports. आपल्या विभागाकडून नेहमी समितीला आश्वासने दिली जात आहेत, असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाकडून ॲक्शन टेकन रिपोर्ट सादर केला जाणार आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदरहू विषयाच्या अनुषंगाने साक्ष आयोजित केली जाऊ शकते. It will go about ८ meetings. समितीला ठोस असे आश्वासन दिले पाहिजे. विभागाने यासंदर्भात दोन किंवा आठ महिन्याच्या आत कार्यवाही केली जाईल असे आश्वासन दिले जाणार असेल तर ते पाळले पाहिजे. असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

विभागाने आजपर्यंत समितीला दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केलेली नाही, याबाबतचे रेकॉर्ड समितीकडे आहे. विभागाची साक्ष संपली याचा अर्थ विषय संपला असा होत नाही. समिती आता ॲक्शन टेकन रिपोर्टसंदर्भात बैठक आयोजित करणार आहे. सचिवांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली याबाबतची विचारणा समितीकडून पुढील तीन ते चार महिन्यानंतर आयोजित केल्या जाणाऱ्या समितीच्या बैठकीत केली जाणार आहे. एक महिन्याच्या आत कारवाई करून त्यासंदर्भातील अहवाल समितीला सादर करावा असे समितीने सूचित केले असता, This is a one point enquiry and we will complete it within one month, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**अभिप्राय व शिफारस**

**५.२ " कंत्राटदारास जादा भूगतान "**

**अभिप्राय**

**३.२** मुख्य अधिकारी, नगर परिषद, बसमतनगर (BMC), हिंगोली यांनी बसमत पाणीपुरवठा योजनेचे आवर्धन हे काम छोट्या आणि मध्यम शहराकरिता केंद्र पुरस्कृत नागरी पायाभूत सुविधा विकास योजना (UIDSSMT) अंतर्गत रु.४७.२६ कोटी स्वीकृत निविदा किंमतीवर (निविदाच्या रु.२२.५८ कोटी अंदाजित किमतीवर १०९.४० टक्के अधिक्याने) ३० महिन्यांच्या विनिर्दिष्ट कालावधीत पूर्ण करण्याकरिता कंत्राटदारास बहाल केले. योजनेच्या कार्यान्वयाकरिता तांत्रिक प्राधिकरण असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कामाचे प्राक्कलन तयार केले जे MJP च्या दर अनुसूची (SoR) २००६-०७ वर आधारित होते आणि तेच प्राक्कलन BMC व्दारे स्वीकारण्यात आले. या पाणीपुरवठा योजनेच्या पोट कामामध्ये डक्टाईल लोखंडी (DI) पाईप्सची तरतूद आणि पुरवठा तसेच त्याचे परिवहन, चढवणे/उतरवणे, मजुरी आणि मालाची किंमत इत्यादी समवेत त्याची संपूर्ण जोडणी समाविष्ट होती. या पोट-कामाकरिता MJP ने SoR २००६-०७ अनुसार रु.६५ प्रति किलोग्रॅम प्रमाणे ५०,००० किलोग्रॅम DI पाईप्सची आवश्यकता असल्याचा अंदाज बांधला. परंतु त्याऐवजी BMC ने निविदा दस्तऐवजाच्या अनुसूची-"ब" मध्ये रु.१०५ प्रति किलोग्रॅम दर अतंर्भू केला होता. परिणामी कंत्राटदाराला रु.४०.५४ लाखाचे जादा प्रदान झाले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

विभागीय प्रतिनिधींनी या जादा रकमेच्या प्रदानाची बाब समितीसमोर मान्य केली व सदर उल्लेखित जादा प्रदान झालेली रु.४०.५४ लक्ष इतकी रक्कम संबंधित ठेकेदाराच्या देयकामधून कपात करण्यात आली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस :**

**३.३ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप हे अतिशय गंभीर असून याअन्वये डक्टाईल लोखंडी पाईप्स (Ductile iron pipes) ची तरतूद आणि पुरवठा करण्याकरिता चुकीचे दर लावल्यामुळे नगरपरिषद, बसमतनगर, हिंगोलीव्दारे कंत्राटदारास रु.४०.५४ लाखाचे जादा प्रदान करण्यात आले. विभागीय प्रतिनिधींनी हे आक्षेप समितीसमोर मान्य करून संपूर्ण वसुली कंत्राटदाराकडून करण्यात आल्याचे समितीसमोर सादर केले असता समितीने याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत सदरहू आक्षेप महालेखाकारांनी सन २०१४-१५ या वर्षाकरिता नोंदविलेले असतानाही व सदरहू प्रकरण प्राथमिकरित्याच अतिशय सुस्पष्ट असताना लोकलेखा समितीची बैठक लागेपर्यंत विभागाने या प्रकरणी कोणतीही कार्यवाही केली नाही. केवळ समितीची साक्ष लागल्यामुळे विभागाने ही रक्कम कंत्राटदाराकडून वसूल केली. केवळ महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविल्यामुळे व लोकलेखा समितीने बैठक लावल्यामुळे ही वसुली विभागाने केली. ही बाब अतिशय गंभीर असून विभागाचे अंतर्गत लेखापरिक्षण कमकुवत असल्याचे द्योतक आहे. वास्तविकतः या दरातील त्रुटी व तफावत अंतर्गत लेखापरिक्षणातच विभागाच्या निदर्शनास येणे आवश्यक असतानाही याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे कंत्राटदारास रु.४०.५४ लाखाचे अतिरिक्त प्रदान करण्यात आले. यामध्ये कंत्राटदार व अधिकाऱ्यांमध्ये संगनमत झाल्याची देखील शक्यता नाकारता येणार नाही. डी.आय.पाईपचा एक दर मंजूर असताना वाढीव दराने निविदा काढली. ज्या दराने तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता दिली जाते त्याच दराने निविदा काढणे बंधनकारक असताना निविदा मात्र वाढीव दराने काढण्यात आली. विभागाची अंतर्गत लेखापरिक्षण यंत्रणा बळकट नसल्यामुळे या बाबी निदर्शनास येऊ शकल्या नाहीत. वास्तविक पाहता स्थानिक निधी लेखापरिक्षणाची यंत्रणा वित्त विभागाला हा अहवाल सादर करीत असते. वित्त विभागाने देखील अशा बाबींची गंभीर दखल घेऊन त्याची पुनरावृत्ती होणार नाही यासाठी यंत्रणा सक्षम व अधिक बळकट करण्याची आवश्यकता आहे. तांत्रिक मान्यतेच्या पलिकडे जाऊन अधिकाऱ्याने निविदा काढणे ही अतिशय गंभीर बाब असून केवळ कंत्राटदाराकडून अतिरिक्त रकमेच्या वसुलीची कारवाई फक्त विभागाने केली. परंतु समितीची साक्ष लागेपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई विभागाने केली नाही, तसेच त्या अधिकाऱ्याकडून केवळ खुलासा मागविणे व सदर खुलाशामध्ये ही बाब नजरचुकीने झाल्याचे संबंधित अधिकाऱ्याने मान्य करणे या सर्वच बाबी निश्चितच समर्थनीय नसून विभागाने संबंधितांवर करावयाच्या कारवाईबाबत देखील गांभीर्याने निर्णय घेणे आवश्यक आहे. सदरहू प्रकरण सन २००९ मधील असून सन २०१८ पर्यंत या प्रकरणी दोषींवर कोणतीही कारवाई न करता व आता समितीच्या आग्रहामुळे ही चौकशी विभागाने सुरू करणे यावरुनच विभागाचा संबंधितांवरील कारवाईबाबतचा हेतू शुद्ध नसल्याचे दिसून आल्यामुळे विभागाने दोषींवर कारवाई करून १ महिन्याच्या आत त्या संदर्भातील अहवाल समितीस सादर करावा असे निदेश समितीने दिल्यानंतरही ६ महिन्याचा कालावधी उलटून देखील विभागाने या कारवाई संदर्भातील अहवाल समितीस सादर केला नाही. या संपूर्ण प्रकरणी समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. अतः सदरहू प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. तसेच समितीला आश्वासित करूनही गत ६ महिन्यामध्ये या प्रकरणी कोणतीही कारवाई न करणाऱ्यांवर विभागाने कारवाई करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस २ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट-अ

## गुरुवार, दिनांक १४ जून २०१८

## लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक १४ जून, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरु होऊन दुपारी ३.४५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(५) श्री. विजय **ऊर्फ** भाई गिरकर, वि.प.स.

(६) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-**

श्री. सो.न.सानप, अवर सचिव

**निमंत्रित :—**

**महालेखाकार कार्यालय :**

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

**वित्त विभाग :—**

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग

**विभागीय प्रतिनिधी :—**

**नगरविकास विभाग :—**

(१) श्रीमती मनिषा म्हैसकर, प्रधान सचिव, नगरविकास विभाग

(२) श्री. तुकाराम मुंढे, आयुक्त, नाशिक महानगरपालिका

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. ५.१ व ५.२ संदर्भात प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांची साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०१८

### लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरु होऊन दुपारी ३.४५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. शंभूराज देसाई, वि.स.स.

(१३) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१४) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ.चां. कोल्हे, उ.स.तथा नि.अ.

(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

**निमंत्रित :—**

**महालेखाकार कार्यालय :**

(१) श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई

(२) श्री. राजदिप सिंह, महालेखाकार, नागपूर

**वित्त विभाग :—**

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग

**विभागीय प्रतिनिधी :—**

**नगरविकास विभाग :—**

(१) श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगरविकास विभाग

(२) श्री. जाधव, सह सचिव, नगरविकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. ४.१ संदर्भात प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०१८**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४.५० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(७) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(८) श्री. सुरेश धानोरकर, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

**निमंत्रित :—**

**महालेखाकार कार्यालय :**

(१) श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई

**वित्त विभाग :—**

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग

**विभागीय प्रतिनिधी :—**

**नगरविकास विभाग :—**

श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगरविकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. ४.१ संदर्भात प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१८**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक बुधवार, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरु होऊन दुपारी ३.२५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(३) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(४) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

(५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ.चां.कोल्हे, उ.स. तथा नि.अ.

(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

**निमंत्रित :-**

**महालेखाकार कार्यालय :**

(१) श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, महालेखाकार, मुंबई

**वित्त विभाग :-**

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग

**विभागीय प्रतिनिधी :-**

**नगरविकास विभाग :-**

(१) श्री. मु. मु. कृष्णन, संचालक, नगरप्रशासन तथा प्रभारी सचिव

(२) श्री. तुकाराम मुंढे, आयुक्त, नाशिक महानगरपलिका

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. ४.१ संदर्भात सचिव, नगरविकास विभाग यांची साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक २ जानेवारी, २०१९

### लोकलेखा समिति

समितीची बैठक बुधवार, दिनांक २ जानेवारी, २०१९ रोजी विधान भवन मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.३५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख :**

(१) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(४) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(५) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(६) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-**

(१) श्री. अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(२) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. ५.१ व ५.२ संदर्भात नगरविकास विभागाशी संबंधित समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला.

**बुधवार, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१९**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक बुधवार, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४.३५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(५) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(६) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(७) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(९) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(२) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. ४.१ संदर्भात नगरविकास विभागाशी संबंधित समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई